
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०७०



मैत्रेसाक

दलितमुक्तीचा
एक प्रयोग

संत देशपांडे

REFBK-0024448

27 JAN 1985

13 FEB 1985

19 MAR 1986

16 APR 1986

8 MAY 1988

11 MAY 1988

म्हैसाळ

संदर्भ निबंध
३०७०
२४४४८
२७१२८४



म्हैसाळ

दलितमुक्तीचा
एक प्रयोग

❀

वसंत देशपांडे


REFBK-0024448



०७०६

मौज प्रकाशन : ३२२
पहिली आवृत्ती : १९८४
© १९८४, वसंत देशपांडे

मुखपृष्ठ
बाळ ठाकूर

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई
४०० ००४

किंमत वीस रुपये



अनुक्रम

	प्रस्तावना : विजय तेंडुलकर	नऊ
१.	प्रास्ताविक	१
२.	देवल : व्यक्ती आणि विचार	५
३.	म्हैसाळ गाव	१४
४.	प्रकल्पास प्रारंभ : दूधव्यवसाय	१८
५.	सामुदायिक शेती : परिवर्तनाचे साधन	२९
६.	सामुदायिक शेती : यश आणि धडे	४१
७.	इतर उपक्रम	५६
८.	दलितांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत पडलेला फरक	७०
९.	एकात्मतेच्या दिशेने वाटचाल	७९
१०.	म्हैसाळ-प्रकल्पापासून काय शिकायचे ?	९०



ऋणनिर्देश

सदरहू पुस्तक वाचकांच्या हाती देण्यास विलंब झाला. परंतु पुस्तक उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

पुस्तक तयार करण्यास अनेकांचे साहाय्य लाभले. प्रथमतः श्री० मधुकरराव देवलांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावयास हवा. त्यांचे साहाय्य मौलिक आहे. त्यांच्या इच्छेशिवाय आणि मुक्त मदतीशिवाय हे लिखाण झालेच नसते. श्री० मधुकररावांच्या बरोबरच म्हैसाळ येथील माझ्या दलितमित्रांचे साहाय्य मी मौलिक मानतो. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व इतर सभासद या सर्वांनी मला आपले मानले. माझे म्हैसाळमधील सभासदांच्या सहवासातील दिवस मला विसरता येणार नाहीत. सामुदायिक शेतीवर मी त्यांच्याबरोबर हिंडलो, जेवलो, त्यांच्या समवेत राहिलो. त्यांचे अपार प्रेम आणि सहकार्य हीच पुस्तक लिहिण्यामागील खरी प्रेरणा आहे.

माझ्या पाहणीत मला श्री० नारायण फडतरे यांचे साहाय्य लाभले. श्री० फडतरे हे पुरोगामी विचाराचे एक तरुण कार्यकर्ते आहेत. त्यांना परिवर्तनाच्या कामात रस आहे. त्यांनी पोटतिडिकीने काम केले. आज 'ग्रामायन' या संस्थेमार्फत म्हैसाळधर्तीवर चालणाऱ्या प्रकल्पाचे ते काम पाहतात.

पुस्तकछपाईस 'कम्युनिटी एड ॲब्रॉड' (ऑस्ट्रेलिया) या संस्थेच्या श्रीमती बेदी यांनी अनुदान देऊन प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे एक मित्र आणि ग्रामायनचे सचिव श्री० अनिल काळे यांनी हस्तलिखित तपासून दुरुस्त करण्याची मोठी कामगिरी बजावली; त्यांचाही मी ऋणी आहे.

वसंत देशपांडे



प्रस्तावना

समाजकार्याचे क्षेत्र हे कोठल्याही अर्थाने माझे क्षेत्र नाही. तरीही या क्षेत्रात काम करणाऱ्या भल्या माणसांविषयी मला एक कायम आणि वेगळी उत्सुकता वाटत आली आहे.

ही माणसे आपले हितसंबंध बाजूला ठेवून किंवा प्रसंगी झुगारून इतरांच्या हितसंबंधांसाठी जिवाचे एवढे रान का करीत असतात? यात त्यांना काय मिळते? या शोधात मी ज्या अनेक ठिकाणी पोचलो त्यांत मिरजेजवळचे म्हैसाळ हे ठिकाण होते.

ते १९७९-८० साल होते.

मुंबईच्या टाटा समाजविज्ञान संस्थेच्या दृक्-श्राव्य-विभागातर्फे चार वेगवेगळ्या प्रकारच्या स्वयंप्रेरित (व्हॉलंटरी) ग्रामीण-विकास-प्रकल्पांवर आम्ही स्लाइड-शोज आणि छोटे चित्रपट करणार होतो त्यांत म्हैसाळचा समावेश आम्ही केला होता.

म्हैसाळला जाण्यापूर्वी या प्रकल्पाविषयी आणि तो निर्माण करणारे श्री० मधुकर देवल यांच्याविषयी माझ्या मनाशी काही शंका होत्या. एक तर ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्वी केव्हातरी पूर्णवेळ कार्यकर्ते होते आणि संघाच्या विचारसरणीशी मी स्वभावतः असहमत होतो. दुसरे, दलित जातीचा समाज एका ब्राह्मणाला आपला नेता आणि मार्गदर्शक म्हणून खऱ्या अर्थाने स्वीकारील यावर इतर अनेक अनुभवांमुळे माझा विश्वास नव्हता. तिसरे, दलित कधीही यशस्वी रीत्या शेती करणे शक्य नाही असा सिद्धांत ग्रामीण भागात शेती केलेल्या अनेक प्रागतिक शेतकऱ्यांकडून मी वारंवार ऐकला होता आणि म्हैसाळला तर दलितांनी शेती सहकारी सोसायटी चालवल्याची बोलवा होती.

म्हैसाळला, कामानिमित्ताने, मी अनेकदा गेलो. तिथे फिरलो, बोललो, स्थानिक दलित आणि उच्चवर्णीय लोकांमध्ये बसलो-उठलो. देवलांशी चर्चा केल्या. जवळच्या सांगली-मिरजकडच्या माणसांकडे चौकश्या केल्या.

ज्या कामासाठी मी जात असे त्या कामाच्या दृष्टीने हे आवश्यक होतेच; पण आवश्यक त्याहून जास्त मी हे सर्व केले आणि याचे कारण म्हैसाळने मला विचाराला प्रवृत्त केले होते.

माझ्या दृष्टीने हा एक लक्षणीय प्रयोग होता. आजही माझे हे मत कायम आहे.

वसंत देशपांडे यांच्या प्रस्तुतच्या पुस्तकाचे मूळ हस्तलिखित मी त्याच काळात वाचले आणि देशपांडे यांच्याशी या विषयावर चर्चा केल्या.

मला वाटते की म्हैसाळचे जे चित्र देशपांडे यांनी या पुस्तकात रंगवले आहे, ते पुरेसे चिकित्सक आणि शिवाय एका संवेदनक्षमतेने रंगवलेले आहे. ते परिपूर्ण म्हणता येणार नाही; कारण मूळ प्रयोग संपलेला नाही, तो चालूच आहे. देशपांडे यांनी किंवा मी पाहिले त्यानंतर अजून बरेच काही तिथे घडलेले असणार. आम्ही म्हैसाळ पाहिले तेव्हा तो एका कोपऱ्यातला एक आगळा आणि छोटा प्रयोग होता. आता म्हैसाळची वाट विदेशी अभ्यासकांच्या पावलांनी प्रत्यही मळू लागली आहे. आम्ही तेथे फिरलो तेव्हा त्या चालीवरचे आसपासच्या टापूतले प्रयोग नुकते कोठे सुरू होत होते. एव्हाना त्यांना रंगरूप आले असेल. म्हैसाळचा प्रयोग इतरत्र किती प्रमाणात पुनरावृत्त होऊ शकतो त्याचा कस एव्हाना पुरेसा लागला असण्याची शक्यता आहे. माझे क्षेत्र वेगळे झाले; त्यामुळे मनात येऊनही गेल्या तीनएक वर्षांत मला म्हैसाळला जाता आलेले नाही. देशपांडे यांच्या या पुस्तकातदेखील या अगदी अलीकडील कालखंडातले म्हैसाळमधील बदल आढळत नाहीत.

कदाचित म्हैसाळचा आम्ही पाहिला, अभ्यासला तोच आरंभीचा कालखंड सर्वांत महत्त्वाचा आणि मोलाचा असू शकेल. कोणताही प्रकल्प सर्वकाळ महत्त्वाचा राहू शकत नाही. समाजाला त्याने जे काही द्यायचे ते बहुशः आरंभीच्या पहिल्या टप्प्यातच देऊन होते असा अनुभव आहे. या टप्प्यातली आव्हाने, धडपड, चुका, फलित असे सर्व विचाराला नवी चालना देणारे असते. फलितापेक्षा चुका जास्त असल्या तरी या चुका बोधप्रद असतात. अपयशदेखील क्वचित स्फुरण देणारे असते. पुढे लौकरच या प्रकल्पाची 'संस्था' बनते आणि नंतर 'संस्थान'. त्यानंतर महत्त्वाचे किंवा मोलाचे काहीच घडत नसेल असे नाही; परंतु पहिल्या टप्प्याचा वेगळेपणा, रसरशीतपणा पुढे नसतो. आणि पहिल्या टप्प्यात नसते असेही बरेच काही—उदाहरणार्थ, स्थैर्य, स्थावरजंगम मालमत्ता, नफा, संचालक-मंडळ, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, राजकारण, व्यवस्थापन आणि कारभार/गैरकारभार—अपरिहार्यपणे येते. म्हैसाळचे असे थोडेफार झाले असले तर आश्चर्य नव्हे आणि त्यामुळे या प्रकल्पाचे मोल कमी होण्याचेही कारण नाही. तसे झाले नसेल तर ती आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट आहे.

म्हैसाळ-प्रकल्पाचे वेगळेपण माझ्या दृष्टीने कोणते होते?

तेथे वारंवार पोचून खात्री करून घेतल्यावर मला जाणवले होते ते असे : एक तर खरेच देवलांसारख्या 'बाहेरच्या' माणसाला मार्गदर्शक आणि मित्र म्हणून म्हैसाळच्या बहुसंख्य दलितांनी मनापासून स्वीकारले होते. त्याचे मार्गदर्शन पत्करले होते. त्याच्या मागून काही मार्ग नेकीने आक्रमिला होता.

'बाहेरचा' म्हणजे बाहेरून आलेला किंवा दलितांपुरते बोलायचे तर उच्चवर्णीय; त्यातही 'ब्राह्मण' आणि तोदेखील जुना 'संघ'पंथीय 'हिंदू' ब्राह्मण.

अनुभव असा की 'बाहेर'च्या माणसाने कितीही निःस्वार्थपणे, इतकेच नव्हे तर पदरमोड करून काम केले तरी समाजाच्या तळागाळातली माणसे त्याच्याविषयी काही प्रमाणात साशंकच राहतात. 'इतर उद्योग सोडून हा इथे का?' हा प्रश्न त्यांच्या मनात, काही प्रमाणात त्या 'बाहेर'च्याला अनुसरतानाही, घोळत असतो. पुढे या प्रश्नातून एखादे गाऱ्हाणेदेखील तयार

होते. असंतोष धुमसण्याला आरंभ होतो. स्वार्थाचे आरोप त्या 'बाहेर'च्यावर होऊ शकतात. संबंध बिघडतात. काम बिनसते.

देवलांच्या बाबतीत हे का होऊ नये ?

याचे मुख्य कारण माझ्या मते देवलच होत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कामसूपणाबरोबर एक प्रकारचा अलिप्तपणा आणि परखडपणा आहे. आपण काढलेले किंवा केलेले काम आपणच व्यापावे हा जो कर्तबगार माणसांचा गुणधर्म, तो देवलांमध्ये नाही. ते कामात असून काहीसे अलिप्त असतात. अंग मोडून इतरांबरोबर काम करतानाच इतर आपल्या बरोबरीने काम करीत आहेत की नाहीत हे पाहतात. अशा प्रकारे इतरांवर अनेकार्थांनी त्यांचे लक्ष असल्याने ते स्वयंकेंद्रित होत नाहीत; त्याचबरोबर इतरांशी त्यांचे एक चांगले 'नाते' तयार होते. म्हैसाळच्या प्रमुख दलितांशी देवलांचे असे 'नाते' मला जाणवले आहे. 'नात्या'मध्ये कालांतराने जातपात, शिक्षण यांविषयीचे भेद घासून झिजतात. शंका आपोआप विरघळून जातात. राग आला तरी गाऱ्हाणे तयार होत नाही. देवलांमधला परखडपणा अशा वेळी उपयोगी ठरतो. हिशेब जेथल्या तेथे चुकवले गेले की काही साचू शकत नाही, निचरा होत राहतो. तसेच सहानुभूती, प्रेम, दया, असल्या भावना अशा कामात पदोपदी येऊ लागल्या की व्यवहारात गोंधळ होतात आणि कोठलेही काम हा मुख्यतः व्यवहार असतो. देवल रुक्ष किंवा भावनारहित नाहीत, परंतु ते रोकडे आहेत. भावना जेथे ठेवायच्या तेथेच ठेवून ते कामाला लागतात. शाब्दिक भावुकतेची त्यांना नावड आहे. आलंकारिक आणि उदात्त भाषेशी त्यांची संगत नाही. ते सहसा भारावत नाहीत आणि इतरांनी भारावावे असे काही ते बोलत नाहीत. या सर्वांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एखादे वलय तयार होणे टळत आले आहे. त्यामुळेच भ्रमनिरासाचाही प्रश्न उरत नाही. जे देवल प्रथम भेटीत आपल्याला जाणवतात तेच पुढेही जवळून-लांबून तसेच जाणवत राहतात, असे मला तेव्हा पटले.

याशिवाय देवल यांचा विशेष म्हणजे ब्रह्मचारी असूनही 'म्हैसाळ'-प्रकल्प हा आपला एकमेव ध्यास त्यांनी होऊ दिलेला दिसत नव्हता, सहकारी शेती सोसायटीव्यतिरिक्त इतर उद्योग त्यांनी चालू ठेवले होते आणि मुख्यतः त्यांच्या स्वतःच्या बागायत शेतीतील वेगवेगळे तांत्रिक प्रयोग हा त्यांचा एक लाडका उद्योग राहत आला होता. या प्रयोगात ते छान रमत होते. म्हैसाळचा सहकारी शेती प्रकल्प हा त्यांच्या जगण्याचा 'केंद्रबिंदू' झाला नाही; तो त्यांचा एक महत्त्वाचा प्रयोग राहत आला, इतकेच. यामुळे 'देवल म्हणजे श्रीविठ्ठल सहकारी शेती सोसायटी' असे समीकरण—आणि त्यामुळे होऊ शकणारे संभाव्य तोटे—टळले. देवल या प्रकल्पाबाहेरही वाढले आणि त्यामुळेच या प्रकल्पाकडे ते अलिप्तपणे पाहू शकत आले. हा प्रकल्प एक वेळ देवलांवर काही प्रमाणात अवलंबून असेल; परंतु देवल या प्रकल्पावर अवलंबून आहेत असा ग्रह चुकूनही कोणाचा होत असेल असे वाटत नाही. अशा माणसाविषयी सहसा गैरसमज होत नाहीत. हा प्रकल्प पूर्णतया दलित कार्यकर्त्यांच्या हवाली करून आपण तो यशस्वी रीत्या चालताना पाहावा हे देवलांचे स्वप्न अर्थपूर्ण आहे आणि हे त्यांचे केवळ स्वप्न नव्हे हे त्यांनी कृतीने स्पष्ट केले आहे.

म्हैसाळ-प्रकल्पासाठी, दलितांच्या गहाण पडलेल्या जमिनी देवलांनी सावकारांकडून सोडवून

घेतल्या हा इतिहास वाटतो तितका साधा नाही. सावकारांनी त्या का सोडल्या ? गहाण घेऊन कसाला आणलेली जमीन कोठला सावकार बऱ्या बोलाने सोडील ? आणि या जमिनी परत न मिळत्या तर दलितांची विठ्ठल सहकारी सोसायटी अस्तित्वातच आली नसती. जमिनी दलितांना परत मिळाल्या यात देवलांचा वाटा मोठा मानला जातो. सावकारांची समजूत त्यांनी पटवली. दलित परस्पर सावकारांकडे गेले असते तर हे झाले असते असे वाटत नाही. दलितांची वकिली देवलांनी यशस्वी रीत्या केली. वकिली म्हणून देवलांनी कोणते कसब वापरले असेल ? जिभेचा लाघवीपणा त्यांच्याकडे नाही. वकिली डावपेचांनी बोलणेही त्यांच्या स्वभावात नाही. मला तर वाटते, देवलांनी या मंडळीला सौम्य शब्दांत परखड सत्य ऐकवले असेल. जमिनी दलितांच्या; थोडकी कर्जे देऊन बदल्यात त्या तुम्ही मिळवल्या. त्यात स्वतःचा पैसा घालून त्यांचा कस वाढवला हे खरे; परंतु त्या वाढलेल्या कसाचे उत्पन्नही वर्षानुवर्षे तुम्ही खाल्ले. तुम्ही घातलेला पैसा अशा प्रकारे वसूल होऊन वर आणखी मिळाला. आता जमिनी योग्य किंमत घेऊन दलितांना परत का करीत नाही ? त्या परत केल्या नाहीत तर उद्या त्या एखाद्या सरकारी कायद्याने हातच्या हिसकावल्या जातील आणि तेव्हा आम्ही आज देऊ ती किंमतही येणार नाही.—असे काही बिनवकिली सत्य स्वभावगत खडखडीतपणे सौम्यप्रकृती देवलांनी मांडले असावे आणि सावकारांना यातला व्यवहार उमगून ते जमिनी परत देण्याला राजी झाले असावेत असे वाटते. देवल हा सावकारांच्या वर्गातला माणूस, पण निःसंग, फकीर; याला वारस नाही, इस्टेट नाही. संसारी आणि व्यवहारी सावकारांवर याचा दबाव येणे साहजिक होते; मग भले त्यांना त्याचा दलित-सहकाराचा उद्योग नसेना का पसंत !

उच्चवर्णीय सावकार आणि दलित या दोहोंचा विश्वास या माणसाने एका वेळी संपादन केला. या प्रकारचे कसब आपल्याकडे विधायक कामांतील कर्त्या माणसांकडे असतेच असे नाही. अनेकदा ते नसते; असतो फक्त कार्य-भाव. केवळ त्याने निभत नाही असा अनुभव आहे. समाजकार्य म्हणजे निष्ठा, सचोटी, निःस्वार्थभाव, कष्टाळूपणा, इत्यादी गुण असले की झाले असे वाटते, पण तसे प्रत्यक्षात नाही. प्रत्यक्षात माणसे जोडणे, माणसांची समजूत पटवणे, त्यांना बरोबर घेऊन काम करणे यासाठी लागणारे कसब विधायक कार्यकर्त्याकडे असणे फार आवश्यक असते. यासाठी मनुष्यस्वभावाचा अभ्यास लागतो. एरवी एक तर 'ॲकला चॉलो रे'चा कर्मठ एककल्लीपणा उरतो किंवा एखादे विधायक काम हा समाजकार्योत्सुक मंडळींचा 'डाकबंगला' किंवा 'धर्मशाळा' होते. आज येतो तो उद्या नसतो. कायम असतो तो मूळपुरुष आणि त्याच्या हाती सापडलेली दोनचार असहाय माणसे.

वर उल्लेखिलेले कसब देवलांकडे कोठून आले ? एक तर स्वभावतः त्यांच्याकडे त्यातील काही असू शकेल. परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कामांच्या अनुभवांनी या स्वभावगत गुणात वाढ झाली असली पाहिजे. संघाचा पूर्णवेळ कार्यकर्ता हा उत्तम संघटक असावा लागतो. तो तसा नेहमीच असेल असे नाही, परंतु देवलांमधला संघटक मात्र संघकार्यातूनच आकाराला आला असे समजण्याला भरपूर जागा आहे. कारण एखादे काम करताना आपले व्यक्तिमत्त्व त्या कामावर न लादता किंवा स्वतः त्या कामाचा मेढा न होता इतरांना कार्यप्रवृत्त करणे, स्वावलंबी बनवणे ही व्यक्तिस्तोमविरहित कार्यपद्धती मिशनऱ्यांच्या, संघाच्या आणि कम्युनिस्टांच्या अशा

तीन परंपरांमध्ये जितकी दिसते तितकी इतरत्र दिसत नाही. देवल ही कार्यपद्धती अनुसरत आले आहेत.

मला तर वाटते की म्हैसाळच्या प्रकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य देवल आणि त्यांची कार्यपद्धती हेच आहे. आणि तरीही देवलांपासून हा प्रकल्प क्रमशः, धीमेपणाने परंतु वेगळा होत आहे, असे मला तेव्हा दिसले. त्याचे स्वतंत्र अस्तित्व देवलांच्या अपरोक्ष प्रकल्पक्षेत्रात फिरताना, माणसांशी बोलताना मला जाणवले. दलितांपकी काही कार्यकत तरी स्वतःचा आत्मविश्वास, अस्मिता आणि मते असलेले भेटले, आणि ते देवलांच्याच हाताखाली तयार झालेले होते. प्रसंगी देवलांशी असलेले आपले मतभेद मांडण्याला ते कमी करीत नव्हते. याचे श्रेय त्या कार्यकर्त्यांना होते त्याहून अधिक देवलांना होते. त्यांनी माणसे तयार करताना त्यांचे कणे शाबूत ठेवले.

म्हैसाळमधल्या कार्यकर्त्या दलितांमध्ये जशी एक अस्मिता आणि आत्मविश्वास दिसला तसा म्हैसाळमधल्या आणि आसपासच्याही बहुसंख्य उच्चवर्णीयांमध्ये दलितांच्याविषयी एक दबदबा जाणवला. सहकारी पायावर दलितांनी केलेल्या प्रगतीचे कौतुक करताना किंवा त्याविषयी परोक्ष-अपरोक्ष कुत्सित बोलताना, हा दलित हा इतउप्पर 'दलित' राहिलेला नाही याची जाणीव ठसठशीतपणे व्यक्त होई. कुत्सितपणाची जागा क्वचित् असूया घेई. ग्रामीण भागात वावरलेल्या कोणालाही यातली अपूर्वाई तेव्हाच उमगेल. सहकारी शेती सोसायटीच्या प्रयोगाने म्हैसाळचा दलित केवळ माणसात आला इतकेच नव्हे तर प्रतिष्ठित झाला, स्थानिक अर्थकारणात आणि राजकारणात तो सवर्णाच्या मांडीला मांडी लावून बसू शकतो, हे मी पाहिले.

दलिताला त्याच्या दलितपणातून केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे तर मानसिकदृष्ट्या बाहेर काढणे हे काम म्हैसाळपुरते सहकारी शेती सोसायटीच्या प्रयोगाने केले हा झाला या प्रयोगाच्या श्रेयाचा अर्धाच भाग. उरलेला अर्धादेखील दलितांसंबंधातल्या आजवरच्या प्रयोगांत, प्रकल्पांत आणि चळवळींत वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वाचा ठरावा असा होता. श्रीविठ्ठल शेती सहकारी सोसायटीने दलितांना प्रतिष्ठित बनवतानाच दलितेतर गरजू गरिबांना आर्थिक बळ पुरवण्याचे काम आरंभले. मराठा समाजापासून मांग जातीपर्यंत अनेकांना सोसायटीने कर्जमुक्त होण्याला मदत केली. दलितांच्या चळवळी इतर समाजापासून फटकून चालतात तशी ही चळवळ नव्हती. दलितांना किंवा कोणाही अल्पसंख्यांकांना मुख्य समाजापासून अलग राहून जगता येणार नाही हे वास्तव मान्य करून त्याला खुबीने सामोरे जाणारा, या मुख्य समाजातील तळच्या माणसाशी संबंध जोडणारा म्हैसाळचा प्रयोग मला स्वागतार्ह वाटला.

म्हैसाळच्या प्रकल्पात मला केवळ 'शेतकरी' दलित भेटले नाहीत, तर 'व्यवस्थापक' दलित भेटले. सहकारी सोसायटीचे व्यवहार दलित बघत होते, व्यवस्थापनाच्या भाषेत ते बोलत होते. जनरल बॉडी आणि गव्हर्निंग कौन्सिलच्या मीटिंगा चालवत होते. ग्रामीण दलितांचे असे रूप महाराष्ट्राच्या किंवा देशाच्या इतर भागांत अद्यापीही अपरिचित आहे. यातही विशेष हे की व्यवस्थापनात एका दलित स्त्रीला सहभाग देण्यात आला होता.

म्हैसाळ-प्रकल्पाचे १९७९-८० साली मला दिसलेले वेगळेपण येथवर सांगितले. श्रद्धायुक्त नजरेने नव्हे तर मनाशी अनेक शंका ठेवून मी हे पाहिले आणि माझ्या मर्यादांत पडताळून

घेतले. तरीही क्वचित् काही राहून गेले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. देशपांडे यांच्या प्रस्तुत पुस्तकात वर्णन केलेले चित्र केव्हाही अधिक अभ्यासपूर्ण आणि विचक्षण आहे. म्हैसाळ-प्रकल्पाचा आर्थिक पायाही त्यात बराच तपशीलवार तपासण्यात आला आहे; तो या प्रयोगाचे यशापयश ठरवण्याला फार उपयोगी ठरणारा आहे.

म्हैसाळसारख्या प्रकल्पांचा अर्थकारण हा निःसंशय फार महत्त्वाचा भाग असतो. आर्थिक गुणवत्ता (व्हायाबिलिटी) हा या प्रकारच्या मूल्यमापनात एक प्रमुख निकष मानला जातो आणि तसा तो जावाही. म्हैसाळचा प्रयोग या दृष्टीने किती तोलाचा आहे? हे अर्थकारण बरोबर असेल तर ते इतरत्र हा प्रयोग करू गेल्यास किती उपयोगाचे ठरेल?

या बाबतीत तज्ज्ञांना शंका आहेत. मुळात म्हैसाळची माती सुपीक; त्यात दलितांकडे, गहाण का होईना, जमिनी होत्या. या गहाण जमिनी उत्तम मशागत केलेल्या स्थितीत माफक किंमतीत त्यांना परत मिळू शकल्या. खुद्द देवलांची स्थिती स्वतः या प्रकल्पात महत्त्वाची आर्थिक गुंतवणूक करण्याची होती. सहकारी दूध सोसायटीचे यश शेती सोसायटीमागे उभे होते, त्याचाही आधार झाला. हे इतरत्र उपलब्ध होण्याची शक्यता, दलितांच्या परिस्थितीचा विचार करता, जवळ-जवळ नाही. मग म्हैसाळचे यश पुनरावृत्तिक्षम (रेप्लिकेबल) कसे होणार? हा प्रश्न उपस्थित करणारी मंडळी म्हैसाळ शेती सहकारी सोसायटीचे ताळेबंददेखील काहीसे फसवे मानतात. वस्तुतः सहकारी शेतीचा हा प्रयोग आर्थिक दृष्ट्या वाटतो तितका सफल झालेला नाही असा त्यांचा दावा आहे. एरवी देवलांनी गुंतवलेला पैसा सोसायटीने अद्याप संपूर्ण परत का करू नये? तो परत केला गेला नसताना त्याचा विचार बाजूला ठेवून सोसायटीचे आर्थिक बळ कसे जोखले जाते? अशा अनेक शंका उपस्थित केल्या जातात.

याला महत्त्व आहे यात शंका नाही. अर्थकारण वजा केले तर सहकाराच्या प्रकल्पात तसे म्हटले तर काय उरेल? तरीही मला वाटते की म्हैसाळसारख्या वेगळ्या अर्थप्रधान प्रकल्पांकडे थोड्या वेगळ्या दृष्टीनेच पाहिले पाहिजे, त्यामागच्या सामाजिक आशयाचा संदर्भ कायम ध्यानात ठेवला पाहिजे. विशेषतः या प्रयोगांचे मूल्यमापन करताना या विशिष्ट संदर्भात या प्रयोगांनी काय दिले, काय साधले, हेच प्रामुख्याने पाहिले पाहिजे. केवळ अर्थकारण यशस्वी करणारे सहकाराचे प्रयोग आपल्याला आता नवीन नाहीत. एका सामाजिक आव्हानापोटी जेव्हा या प्रकारचा प्रयोग केला जातो तेव्हा केवळ अर्थप्रधान प्रयोगांना उपलब्ध असणारी अनेक साधने आणि वाटा या प्रयोगाला निषिद्ध असतात किंवा उपलब्ध नसतात. भर सामाजिक संदर्भावर असतो, मुख्य उद्दिष्ट ते असते. अर्थकारण व त्याचे ज्ञान क्वचित डळमळीत असते. चुकांतून शिकावे लागते. प्रयोग फसतोही. परंतु सामाजिक संदर्भ पक्का असेल तर अशा अपयशालाही महत्त्व असते. अर्थकारणात फसताफसता या प्रयोगाने सामाजिक दृष्ट्या काही साधलेले असू शकते. किमानपक्षी अशा प्रकारच्या भावी प्रयोगांना उपयोगी येईल असे काही मागे ठेवलेले असते. त्या प्रयोगाचे हे फलित मानले पाहिजे.

म्हैसाळचा आर्थिक ताळेबंद कसाही ठरला तरी या देशातील दलितांच्या प्रश्नांवरील विचाराला या प्रकल्पाने नवी दिशा दिली, हे त्याचे श्रेय निर्विवाद वाटते.

आणि म्हणूनच प्रस्तुतच्या पुस्तकाला महत्त्व आहे. हे पुस्तक ही एका अर्थाने या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची—किंवा त्याच्या एका महत्त्वाच्या कालखंडाची—बखर आहे. सच्च्या मनाने आणि सामाजिक तळमळीने अभ्यासपूर्वक ती लिहिली आहे. तिला प्रकाशात आणण्याबद्दल मौज प्रकाशनाला धन्यवाद दिले पाहिजेत.

आजच्या एकंदर कुंद परिस्थितीतही काही मनस्वी माणसे कोठे कोठे ठाण मांडून नवा माणूस घडविण्याची धडपड अहर्निशपणे करीत आहेत. प्रसिद्धीची गरज त्यांना नसली तरी आपल्याला आशास्थानांची गरज आहे. दिलासा हवा आहे. या प्रकारच्या कामांच्या बखरी यासाठीही लिहिल्या जायला हव्यात आणि प्रकाशित व्हायला हव्यात.

४ सप्टेंबर १९८४

विजय तेंडुलकर

करणारी माणसे आहेत हे पाहून बरे वाटले. या लोकांचा पक्षीय राजकारणाशी संबंध नव्हता म्हणून यांच्या कार्याचे महत्त्व अधिक वाटले.

यांच्यापैकी काही लोकांचे काम जवळून पाहण्याचे या मेळाव्यातच ठरवले. देवल हे त्यांपैकीच एक. साहजिकच देवलांचा अधिक परिचय करून घ्यावासा वाटला. तरीही देवलांची संघाची पार्श्वभूमी आड येत होती. पण त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षित करणारे होते. तसे ते 'संघाचे' असे दिसतही नव्हते. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि प्रसन्नता कमावलेली नव्हती. बोलण्याचालण्यात कृत्रिमता नव्हती. ते सहजपणे आणि पोटतिडिकेने बोलत. आपल्या कामाविषयी बोलताना ते मोकळेपणाने बोलत. त्यात काही लपवण्याचा किंवा अतिशयोक्ती करण्याचा प्रयत्न नसे. हिंदू धर्म, संघ, राजकारण, समाजव्यवस्था इत्यादी विषयांवर बोलताना ते आपले अनुभव प्रांजळपणे सांगत. त्यात मुत्सद्देगिरी नसे किंवा वकिली थाटही नसे. त्यांची विनोदबुद्धी लोकांना आकर्षित करी. या त्यांच्या स्वभावामुळे त्यांच्याशी स्नेह होण्यास आणि वाढण्यास फारसा काळ लागला नाही. म्हैसाळला येण्याचे त्यांचे निमंत्रण होतेच.

म्हैसाळला प्रथम गेलो तो द्राक्षाच्या हंगामात. सामुदायिक शेतीमधील द्राक्षबाग पाहून बरे वाटले. तेथील दलित कार्यकर्त्यांत मिसळलो आणि बराच वेळ गप्पागोष्टी केल्या. त्यानंतर पुन्हा असाच एकदोनदा जाऊन आलो. तेथील दलित कार्यकर्ते खूपच मोकळेपणाने वावरताना आढळले. विशेष म्हणजे त्यांच्यावर देवलांचे दडपण नाही हे जाणवले. त्यांच्याशी बोलताना देवल उपस्थित नसत. उपस्थित असले तरी त्यांचे काम ते करीत राहत. कार्यकर्त्यांना ते मोकळेपणाने बोलू देत. त्यांना उत्तरे सुचवत नसत. कार्यकर्तेही सहजपणे बोलत.

"शहरातील तरुणांचा येथील कार्यकर्त्यांशी संबंध वाढला पाहिजे," असे देवल नेहमी म्हणत. त्याप्रमाणे 'ग्रामायन'तर्फे काही तरुणांना घेऊन म्हैसाळ येथे मी पाच दिवस मुक्काम केला. हे आमचे शिबिर फार उपयुक्त ठरले. या मुक्कामात येथील काम जवळून पाहण्याची मला संधी मिळाली. अनेक दलितांच्या घरांत जाऊन मी बातचीत केली. दलितेतरांनाही भेटलो. या मुक्कामात प्रथमच मला या प्रकल्पाचे महत्त्व पटले आणि या प्रकल्पाचा अभ्यास करण्याचे मी ठरवले.

या शिबिरानंतरही या ना त्या निमित्ताने मी म्हैसाळला जाऊन येत असे. देवलांच्या संघाच्या पार्श्वभूमीची भीती आता पूर्णपणे नाहीशी झाली होती. माझ्या समाजवादी मित्रांतही मी या प्रकल्पाविषयी बोलत होतो. भाई वैद्य पुण्याचे महापौर असताना त्यांना आग्रहाने म्हैसाळला घेऊन गेलो. इतरही त्यानंतर येऊन गेले. सर्वांनाच या प्रकल्पाविषयी आदर वाटू लागला.

प्रकल्पाची पाहणी करण्यास सुमारे सहा महिने लागले. पाहणीतील माहिती १९७८-७९ या वर्षाची आहे. पाहणीसाठी प्रथम अनेक दलित कार्यकर्त्यांना भेटलो आणि मगच पाहणीचा आराखडा तयार केला. आज म्हैसाळ प्रसिद्धीच्या झोतात आहे. परंतु त्यावर सविस्तरपणे लिहिले गेलेले नाही. म्हैसाळसारखे प्रकल्प इतरत्र उभे करायचे असतील तर या प्रकल्पाची सविस्तर माहिती आणि परीक्षण उपलब्ध होणे आवश्यक आहे. एक म्हैसाळ यशस्वी होणे ही स्पृहणीय गोष्ट असली तरी समाजापुढील समस्या त्यामुळे सुटणार नाही, म्हणून अशा प्रकल्पांना वाव किती आहे हे या परीक्षणातून दिसले पाहिजे. सदरहू पुस्तक या दृष्टीने सुरू केलेल्या प्रयत्नांचा

प्रारंभ आहे असेच मानावे. विविध क्षेत्रांतील विचारवंतांनी आणि कार्यकर्त्यांनी या प्रकल्पाची अधिक चिकित्सा करावी आणि आपल्यापुढील जटिल समस्या सोडविण्यासाठी त्यातून काही मार्गदर्शन होते काय ते पाहावे. अशा चिकित्सेला प्रारंभ म्हणून या पुस्तकाची उपयुक्तता वाटली तर पुस्तक लिहिण्याचे सार्थक झाले असे मी मानीन.



प्रकरण दुसरे

देवल : व्यक्ती आणि विचार

एका व्यक्तीच्या प्रयत्नांतून जेव्हा एखादा प्रकल्प उभा राहतो तेव्हा त्या व्यक्तीचा किमान परिचय आणि तिच्या विचारांची जडणघडण समजावून घेणे आवश्यक ठरते. प्रकल्पाची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रश्नांविषयीची त्या प्रवर्तकाची समज यांवर प्रकाश टाकण्यास या परिचयाचा उपयोग होऊ शकतो.

मधुकरराव देवल हे खुद्द म्हैसाळ गावचे. आजही त्यांची शेती या गावात आहे. म्हैसाळ गाव पूर्वी सांगली संस्थानात मोडत होते. शिंदे घराण्याकडे या गावाची जहागीर होती. गावच्या जमिनीचा जो एकूण महसूल येई त्यातील फक्त दहा टक्के महसूल सांगली संस्थानाच्या राजाकडे जाई. बाकीचा सर्व महसूल शिंदे यांना मिळे. याशिवाय शिंदे घराण्याच्या मालकीची नऊशे एकर जमीन होती. शिंदे घराण्यातील केदारराव यांनी मधुकररावांच्या पणजोबांना १२८ एकर जमीन इनाम म्हणून बहाल केली होती. त्याचे कारण त्यांनी केदाररावांना त्यांच्या संकटकाळी स्वतःचा जीव धोक्यात घालून मदत केली होती. पराक्रमी पुरुष म्हणून मधुकररावांच्या पणजोबांचा लौकिक होता. एकदा एका मस्तवाल बैलाचे नाक दाबून त्याला त्यांनी वठणीवर आणल्याची हकीकत ऐकावयास मिळते.

मधुकररावांचा जन्म १९१८ साली झाला. त्यांचे मराठी चवथीपर्यंतचे शिक्षण म्हैसाळ गावातच झाले. घराणे सनातनी वळणाचे. देव, धर्म, सोवळेओवळे यांचे बरेच प्रस्थ असे. आजही त्यांच्या वृद्ध मातोश्री आपला बराच वेळ कर्मकांडात घालवतात. म्हैसाळ गावात त्याकाळी अस्पृश्यता पाळली जात होती. मधुकरराव ज्या शाळेत शिकले त्या शाळेतही अस्पृश्य जातीची मुले वर्गाबाहेर बसवीत. वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत मधुकररावांचा काळ सनातनी वातावरणात गेला.

१९२० च्या सुमारास या भागात औद्योगिक विकासास प्रारंभ झाला. महाराष्ट्रातील ख्यातनाम उद्योगपती श्री० लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी आपले उद्योगव्यवसाय प्रस्थापित केले. मिरजच्या जवळच किर्लोस्करवाडी नावाचे शहर औद्योगिक व्यवसायांचे शहर म्हणून निर्माण झाले. किर्लोस्कर कुटुंबातील प्रमुख व्यक्ती औद्योगिक विकासाबरोबरच पुरोगामी विचारांचा प्रसार करण्यातही पुढाकार घेत होत्या. 'किर्लोस्कर' नावाचे मासिक त्यांनी सुरू केले आणि त्या मासिकातून अंधश्रद्धा, बुवाबाजी, जुन्या अनिष्ट चालीरीती यांवर आघात करणारे लेख प्रसिद्ध होऊ लागले. या लेखनाचा तरुण मनांवर योग्य तो प्रभाव पडत होता. स्वा० सावरकर यांचे विज्ञाननिष्ठ

दृष्टिकोनातून लिहिलेले आक्रमक आणि प्रभावी लेख या मासिकातून व इतरत्रही येत होते. 'गाय हा आर्थिक दृष्ट्या उपयुक्त प्राणी आहे; पशुधन म्हणून प्राणिजगाकडे पाहावयास हवे, धार्मिक दृष्टिकोनातून नव्हे,' हा त्यांचा विचार आणि यांसारखे विचार सनातनी लोकांना पटण्यासारखे नव्हते. परंतु तरुण मनाला नवीन वळण देण्याचे काम अशा लेखनातून होत होते.

देवलांवर या विचारांचा प्रभाव पडत होता. हिंदू समाजातील जुनाट चालीरीती, श्रद्धा यांचा त्याग करण्यासाठी आवश्यक असणारे मानसिक बळ या लेखनातून त्यांना मिळाले. विवेकनिष्ठ पद्धतीने समाज आणि अर्थव्यवस्था यांची पुनर्रचना झाल्याखेरीज परकीय राज्यकर्त्यांना हाकलून लावणे शक्य नाही हा विचार देवल आणि त्यांच्यासारखे अनेक तरुण लोक यांच्या मनात या काळातच रुजला.

'वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षीच आपला देवधर्मांवरील विश्वास उडाला' असे देवल सांगतात. त्यास काही तत्कालीन घटना आणि पुरोगामी विचारांचा प्रभाव कारणीभूत झालेला दिसतो. एक घटना देवलांनी सांगितली ती अशी : रस्त्यावर एक साधू जळत्या निखाऱ्यांवर साष्टांग नमस्कार घालून आपल्या दैवी सामर्थ्याचे प्रदर्शन करीत होता. परंतु त्याच्या अंगावरचे केस जळत असल्याचे देवल व त्यांचे मित्र यांच्या लक्षात आले. देवाची कृपा खरोखरच असती तर केस कसे जळतील ? हा प्रयोग थोडे धाडस व कौशल्य असले की जमतो असे वाटल्यावरून त्यांनी तिथेच जमलेल्या लोकांपुढे हा प्रयोग स्वतः करून दाखवला.

वयाच्या सतराव्या वर्षी सांगली येथे हायस्कूलमध्ये शिकत असताना मधुकरराव राष्ट्रीय स्वयंसेवक संघात ओढले गेले. जाज्वल्य देशाभिमान या एकाच गोष्टीने ते संघाकडे आकृष्ट झाल्याचे दिसते. एका बलाढ्य संघटनेत सामील होऊन देश स्वतंत्र करता येईल असे त्यांना वाटले. समाजकारण, अर्थकारण इत्यादी विषयांबाबत त्यांनी त्या काळी सविस्तर विचार केला नव्हता. पण संघ देशाला स्वातंत्र्य मिळवून देईल असे त्यांना वाटत होते. सशस्त्र संघर्षाशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही असे त्या काळी तरुणांना वाटत असे. स्वातंत्र्यासाठी आपणांस आहुती द्यावी लागेल आणि आपण त्यासाठी तयार राहिले पाहिजे, हा विचार मन व्यापून राहिला होता. दुसरे काही सुचत नव्हते. लष्करी शिक्षण घेण्याशिवाय तरणोपाय नाही असे वाटून त्यांनी सैन्यात जाण्याचे ठरवले.

त्या वेळी देवल महाविद्यालयात इंटर सायन्सच्या वर्गात होते. सैन्यात भरती चालू होती. ऑफिसर म्हणून त्यांची निवड होणे शक्य होते. परंतु त्यांनी सामान्य जवान होण्यासाठी अर्ज केला. मुलाखतीत "तुम्ही ऑफिसरच्या जागेसाठी का नाही प्रयत्न करीत ?" अशी विचारणा झाली. तेव्हा आपणास जवान म्हणून जायला आवडेल असे त्यांनी स्पष्ट सांगितले. त्यामागे त्यांचा विचार असा होता की सामान्य जवान म्हणून सामील झाल्यास इतर जवानांशी जवळीक साधता येईल आणि त्यांना बंड करून उठण्यास प्रवृत्त करता येईल. ऑफिसर झाल्यास जवानांमध्ये मिसळता येणार नाही.

सहा महिन्यांच्या आतच मधुकररावांना सैन्यात दाखल होण्याचा हुकूम आला. हा हुकूम गावपाटिलामार्फत मधुकररावांच्या वडिलांकडे आला, तेव्हा ते हादरलेच. त्यांनी मोडता घातला आणि मधुकररावांनीही हा मार्ग सोडून दिला.

संघ-शाखेतील निवडक सहकाऱ्यांत स्वातंत्र्यलढ्याचा विषय वारंवार चर्चेस येई. १९४२ साली म० गांधींच्या नेतृत्वाखाली 'चले जाव' आंदोलन सुरू झाले. यात सामील व्हायचे की नाही यावर मधुकरराव आणि त्यांचे संघातील सहकारी यांच्यात चर्चा सुरू झाली. वास्तविक संघात कोणत्याच चर्चेला वाव नव्हता. परंतु मधुकरराव आणि त्यांचे सुमारे दोनशे समविचारी सहकारी यांना या चळवळीत भाग घ्यावा असे वाटत होते. त्याप्रमाणे त्यांनी संघातील कार्यकर्ते आणि अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करण्यास सुरुवात केली. परंतु अधिकाऱ्यांस हा विचार पसंत नव्हता. संघातील अधिकारीवर्गाची याबाबत नेमकी काय भूमिका होती हे कळण्यास मार्ग नाही. परंतु संघाच्या पद्धतीप्रमाणे वरून आदेश येईपर्यंत इतरांनी कृती करायची नाही असा संकेत असल्यामुळे देवल आणि त्यांचे सहकारी आदेशाची वाट पाहत बसले. वरून आदेश आला नाही. कालांतराने बेचाळीसची चळवळही थंडावली.

एका बाजूला स्वातंत्र्यलढ्याचा विचार चालू असताना मधुकरराव समाजाची परिस्थिती जवळून पाहत होते. संघाची शाखा चालवणे हे त्यांनी कधीच आपले अंतिम उद्दिष्ट मानले नाही. समाजातील तरुणांना संघटित करण्याचे हे एक साधन आहे असे त्यांना वाटे. त्यामुळे साहजिकच समाजातील सर्व थरांतील लोकांचे जीवन जवळून पाहणे त्यांना अगत्याचे वाटले. चिपळूणला असताना समाजातील विस्कळीतपणा, जातीजमातींतील दुजाभाव, तरुणवर्गात असलेले नैराश्य आणि एकूणच सामाजिक मागासलेपण देवलांच्या लक्षात आले. समाजात चैतन्य निर्माण करणे हे संघाचे एक उद्दिष्ट होते. हिंदूंचे संघटन हे अंतिम ध्येय होते. पण संघटन आणि चैतन्य निर्माण करण्याचे मार्ग व पद्धती यांबद्दल फारशी स्पष्टता नाही हे देवलांना उमगू लागले. हिंदुसंघटन हे ध्येय मानले तरी त्यासाठी जातिव्यवस्थेचा विचार करणे आवश्यक होते. श्रीमंत-गरीब यांच्या संबंधांविषयी डोळस अभ्यास आवश्यक होता. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उपेक्षित वर्गास जवळ करण्यासाठी कार्यक्रम हवे होते. खेडेगावातील गरीब आणि नाडलेल्या लोकांना आर्थिक उन्नतीसाठी मदत हवी होती. या सर्व गोष्टींचा विचार करून देवलांनी एक ढोबळ योजना तयार करून वरच्या अधिकाऱ्यांकडे पाठविली. (मला तिची प्रत पाहण्यास मिळाली नाही.)

तिच्यातील महत्त्वाचे मुद्दे असे होते : संघाचा प्रचारक प्रामुख्याने खेडेगावी पाठवावा. खेडेगावातील गरिबांच्या जीवनाशी संबंध येईल अशा तऱ्हेने त्याचा कार्यक्रम आखावा. आर्थिक जीवनाशी संबंधित एखादी संस्था प्रचारकाने स्थापन करावी. दोन वर्षे संघाने प्रचारकाच्या पालनपोषणाची व्यवस्था सांभाळावी. त्यानंतर त्याच्या कामातूनच त्यास जीवनवेतन मिळेल अशी कामाची आखणी व्हावी. दरवर्षी प्रचारकांचे शिबिर घ्यावे. त्यात झालेल्या आणि पुढील काम-काजाविषयी, तसेच इतर संबंधित विषयांवर चर्चा आयोजित करावी. प्रचारकाने ब्रह्मचारी राहू नये. समविचारी साथीदार निवडून त्याने संसार करण्यास हरकत नसावी.

वरील आशयाच्या टिपणावरून मधुकरराव देवलांच्या विचारांचे स्वरूप लक्षात येते. संघाच्या कार्याला निश्चित दिशेने आकार देण्याचा त्यांचा प्रयत्न होता, हे यावरून स्पष्ट होते. खेडे-गावात नेमके काय काम करावे याचा तपशीलवार विचार जरी त्यांनी त्या काळी केला नव्हता,

तरी कार्याची दिशा निश्चित होत होती यात संशय नाही. प्रामुख्याने गरीब लोकांना उपयुक्त होईल असे काम त्यांना हवे होते. गरिबांच्या आर्थिक प्रश्नांना हात घातल्याखेरीज त्यांच्यात आपल्याला स्थान मिळणार नाही आणि म्हणून त्यांना देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि त्यानंतर सुराज्यासाठी प्रवृत्त करता येणार नाही असे देवलांचे मन त्यांना सांगत होते. आर्थिक संस्थांच्या तपशिलाचा विचार त्यांनी केला नव्हता. जातीपातीचाही सखोल विचार केलेला नव्हता. परंतु हिंदूंचे संघटन हे मर्यादित उद्दिष्टदेखील जातीजातींतील अंतर तोडल्याशिवाय साध्य करता येणार नाही, असे ते ठामपणे सांगत होते.

देवलांच्या पुढच्या कार्यक्रमाचा पाया या सुमारास घातला गेला असे म्हणायला हरकत नाही. त्या वेळी संघप्रचारकांबाबतच्या अपेक्षा अवास्तव होत्या. त्यागाच्या कल्पनाही अव्यावहारिक होत्या. प्रचारकाने समाज संघटित करण्यासाठी आयुष्य वेचावे हे खरे, परंतु प्रचारक सामान्य माणसाप्रमाणे राहू शकला नाही तर तो समाजकार्यही करू शकणार नाही असे मधुकरराव देवलांना वाटत होते; म्हणून प्रचारकाने संसार करावा हा विचार त्यांनी हेतुपुरःसर मांडला. तसेच प्रचारकाने उदरनिर्वाहासाठी इतरांवर कायमचे अवलंबून राहणेही त्यांना पसंत नव्हते. आर्थिक संस्थेतून त्याला आपला संसार चालवण्याइतपत उत्पन्न मिळावे असे त्यांना वाटत होते.

आर्थिक संस्था उभ्या करण्यात याशिवाय अधिक महत्त्वाचा हेतू होता. आर्थिक संस्था ही 'जागृतीचे केंद्र' म्हणून उपयोगी पडते. म्हैसाळ-प्रकल्पात दलितांना संघटित करताना हाच मुद्दा त्यांनी अधिक विशद करून सांगितला आहे. व्यक्तिगत मदत करून काही मोजक्या दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारणे सोपे आहे. परंतु दलित समाज संघटित करण्यास त्याचा उपयोग नाही. एखादी संस्था चालविण्याचे शिक्षण आणि संधी दलितांना मिळाली तर समाजात ते एक शक्ती निर्माण करू शकतात. या विचारालाच पुढे व्यावहारिक स्वरूप देऊन त्यांनी म्हैसाळ-प्रकल्प अंमलात आणला.

वरील आशयाचे टिपण पाठवताना त्यांनी हेही स्पष्ट केले की जर आपल्या सूचनांचा विचार होणार असेल तरच पुढील वर्षी आपण प्रचारक म्हणून जाऊ.

हा १९४४-४५ चा सुमार होता. संघातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याकडून या सूचनांना प्रतिसाद मिळाला नाही. पत्राची दखलही घेतली गेली नाही. वर्ष संपल्यानंतर प्रचारक म्हणून आपली काम करण्याची इच्छा नाही असे देवलांनी स्पष्ट कळविले. परंतु "आज्ञा केली तर जाऊ आणि तेही एकच वर्ष" असे ते बोलून गेले.

वरिष्ठांकडून आज्ञा आली आणि शब्द पाळण्यासाठी देवल प्रचारक म्हणून जाण्यास तयार झाले. त्यांची रवानगी मालेगावला झाली.

मालेगावचे वातावरण निराळे होते. तिथे संघाची शाखा नव्हती. मुसलमान लोकांचे प्रमाण इतर गावांच्या मानाने तेथे जास्त होते. पाकिस्ताननिर्मितीचे वारे वाहण्यास प्रारंभ झाला असल्याने दोन जमातींत तणाव निर्माण झाले होते. त्यामुळे एक प्रकारे संघाचे काम सोपे होते. परंतु तळागाळातला माणूस संघटित करण्यास प्राधान्य देण्याचे देवलांनी निश्चित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी परिसरातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला. या समाजात भिल्ल लोक

अधिक मागासलेले आणि गरीब दिसले. त्यांच्या वस्तीला 'भिलाटकी' म्हणत. तिथे दारिद्र्य आणि पिळवणूक होती. भिल्ल स्त्रियांना अवमान सोसावा लागे. हिंदू समाजाने भिल्लांना आपल्या चौकटीबाहेरच ठेवले होते.

या गटाचे प्रश्न आपण हाती घेतले पाहिजेत असे देवल आपल्या सहकाऱ्यांना म्हणू लागले. पण सहकारी तयार होईनात. आपण भिलाटकीत जाऊ लागलो तर लोक आपल्याला नावे ठेवतील असे त्या सहकाऱ्यांना वाटत होते. याउलट, हिंदूंच्या संघटनासाठीदेखील या लोकांपासूनच सुरुवात करावयास हवी असे देवलांचे म्हणणे होते. देवल स्वतः भिलाटकीत जाऊ लागले. त्यांच्याबरोबर त्यांचे सहकारी आले नाहीत. भिलाटकीमधील जीवन देवलांनी जवळून पाहिले. पण या भिल्लांसाठी काय करावे हे मात्र त्यांना कळेना. रामदास महाराज नावाचा भिल्लांचा गुरू होता. त्यांना भेटण्यासाठी ते गेले, पण तेथील वातावरण पाहून ते पूर्ण निराश झाले. हा गुरूच भिल्लांचा प्रमुख शोषक होता.

वर्ष संपून गेले आणि पुन्हा प्रचारक म्हणून जाण्यास देवलांनी नकार दिला. पण त्यांच्या मित्रांनी आग्रह धरला की देवलांनी संघ न सोडता, संघात राहूनच संघाच्या कार्यास इष्ट वळण लावावे. देवलांनी हा विचार स्वीकारला. संघ ही बलाढ्य संघटना आहे आणि तिच्यात तरुणांचा भरणा आहे, तेव्हा या संघटनेत राहून आपल्या विचारांचा प्रसार करावा हे त्यांना पटले. त्यांचा समविचारी मित्रांचा गट लहान नव्हता. त्यामुळे आपल्या विचारांचा प्रभाव इतर तरुणांवर पाडणे शक्य होईल असेही त्यांना वाटले. संघात राहून असा मतप्रचार करण्यात अडथळे बरेच आहेत याची त्यांना जाणीव होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांना या वाढत्या गटाचा प्रभाव जाणवत होता. परंतु या गटाच्या विचारांचा स्वीकार करण्यास ते तयार नव्हते. चर्चा करून निर्णय घेण्याची पद्धत संघात नव्हती. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण उघडपणे होत नव्हती. या मर्यादा लक्षात घेऊनही देवल संघात राहिले. एकदा सरसंघचालकांबरोबर देवल आणि त्यांचे सुमारे पस्तीस-चाळीस मित्र यांची बैठक झाली. परंतु त्यातून काही निष्पन्न झाले नाही.

या अनुभवानंतरही देवलांनी संघ सोडला नाही. त्यांना आशा वाटत होती की आज ना उद्या आपले विचार सर्वांना मान्य होतील. खेड्यांत राहणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठ्या संघटनेचे पाठबळ पाहिजे, त्याशिवाय त्यांचे कार्य यशस्वी होणार नाही, या भावनेतून ते संघाला चिकटून राहिले. हळूहळू का होईना परंतु आपल्या विचारांचा प्रभाव वाढत आहे असे त्यांना वाटत होते. दोन वर्षांनंतर जेव्हा त्यांना मंडलप्रमुख नेमण्यात आले, तेव्हा देवलांचे विचार काही प्रमाणात वरच्या गोटात मान्य होत होते असे दिसून येते.

मंडलप्रमुख झाल्यावर देवलांनी आपले विचार अधिक जोमाने मांडण्यास सुरुवात केली, त्याचप्रमाणे विविध विचारप्रवाहांशी स्वयंसेवकाचा परिचय व्हावा यासाठी त्यांनी अभ्यासमंडळ सुरू केले. संघात हे नवीन होते. खुद्द देवलांचा अभ्यास फार होता, अशातला भाग नाही. पण अशा अभ्यासाची गरज त्यांना वाटत होती. डाव्या-उजव्या विचारसरणींशी त्यांचा परिचय मामुलीच होता. कॉलेजमध्ये असताना त्यांनी कार्ल मार्क्सचा 'कॅपिटल' हा ग्रंथ वाचण्याचा प्रयत्न केला होता. पण प्रत्यक्ष अभ्यासापेक्षा विविध पंथांच्या कार्यकर्त्यांशी बोलणे ते अधिक पसंत करीत होते. एकदा सावरकरांविषयी बोलताना ते म्हणाले, "सावरकरांनी मॅझिनी वाचला पण

मार्क्स वाचला नाही, ही मोठी उणीव आहे.'' प्रत्यक्ष वादविवादात देवल कधी पडल्याचे दिसत नाही.

डाव्या विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव पडला नाही; परंतु वर्गकलहाचे तत्त्व त्यांना नामंजूरही नव्हते. भांडवलदारांविरुद्धचा लढाही त्यांना नामंजूर नव्हता. परंतु या सर्व गोष्टींचा विचार स्वातंत्र्यानंतर करता येईल असे त्यांना वाटे. डाव्या विचारसरणीतून त्यांनी प्रमुख धडा घेतला तो एवढाच की समाजातील तळागाळातल्या लोकांपर्यंत आपण पोहोचल्याशिवाय कोणतेही कार्य शक्य नाही; त्याचप्रमाणे सर्व प्रकारची विषमता नष्ट झाल्याशिवाय नवीन समाजरचना शक्य नाही. परंतु फार तपशिलांत जाऊन त्यांनी त्या काळी याचा विचार केला नव्हता.

स्वयंसेवकांनी या सर्व विचारसरणींचा अभ्यास केला पाहिजे असे मात्र त्यांना मनोमन वाटत होते. 'अभ्यासमंडळा'ची स्थापना या हेतूनेच त्यांनी केली आणि प्रथम स्टॅलिनचे 'ऑन ऑर्गनायझेशन' हे पुस्तक अभ्यासासाठी घेतले. वरच्या अधिकाऱ्यांना ही गोष्ट रुचणारी नव्हती. हे अभ्यासमंडळ पुण्यातील सर्व स्वयंसेवकांसाठी असावे असे ठरवून त्या अधिकाऱ्यांनी ते ताब्यात घेतले आणि म० शि० गोळे यांच्या 'हिंदुधर्म आणि सुधारणा' या पुस्तकावर प्रवचने देण्यास सुरुवात केली. देवलांना हे आवडले नाही; म्हणून त्यांनी अभ्यासमंडळ सोडले. दोन महिन्यांतच अभ्यासमंडळ बंद पडले. अभ्यासमंडळ बंद पाडण्याचाच हा डाव होता असे देवलांना वाटले.

मंडलप्रमुख असतानाच दुष्काळी भागाची पाहणी करण्याचे काम देवलांनी अंगावर घेतले. हे काम प्रा० ध० रा० गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या पाहणीत विविध विचार-प्रणालींचे कार्यकर्ते सामील झाले होते. आपल्या पाहणीचा अहवाल देवलांनी संघातील अधिकाऱ्यांकडेही पाठवला; त्याबरोबर काही सूचनाही केल्या. परंतु त्याची संघाच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही.

१९४७ साली देवलांसह वीस पदवीधर कार्यकर्त्यांना महाराष्ट्राबाहेर प्रचारासाठी जाण्याचे आवाहन करण्यात आले. चारचार जणांचा गट करून आसाम, बंगाल, ओरिसा, आंध्र आणि मद्रास या प्रांतांत एकेक गटास पाठवण्याचे ठरले. देवलांच्या वाट्याला मद्रास प्रांत आला. आपणास पुण्यातून घालवण्याचाच हा 'मास्टर प्लॅन' आहे अशी देवलांची भावना झाली. त्यामुळे हा डाव यशस्वी होऊ द्यायचा की नाही असा प्रश्न त्यांच्यापुढे साहजिकच उभा राहिला.

एका बाजूस हे आवाहन धुडकावून पुण्यातच राहावे आणि आपल्या मताचा प्रसार करावा असे वाटत होते; दुसऱ्या बाजूस संघाशी संबंध न तोडता, नवीन संधीचा फायदा घेऊन आपणास हवे त्या पद्धतीने काम करावे आणि आपल्या विचारांचा प्रभाव वाढवून संघाच्या कामास नवीन वळण द्यावे असे त्यांना वाटत होते. संघाबाहेर राहून काही म्हणण्याजोगे काम एखादी व्यक्ती करू शकेल असे त्यांना वाटत नव्हते. संघ आणि इतर संघटना यांची तुलना करता संघ अधिक प्रभावी आणि शिस्तबद्ध दिसत होता. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे संघाचे आकर्षण समाजात वाढले होते. अशा परिस्थितीत संघ सोडून एकाकीपणे काही काम करण्यापेक्षा संघात राहूनच आपल्या विचारांचा प्रसार करणे योग्य आहे असे त्यांचे मत बनले, आणि त्यांनी मद्रास

प्रांतात जाण्याचे ठरविले. तिथे संघाचे काम नव्यानेच सुरू करायचे असल्यामुळे, आपल्या इच्छेप्रमाणे संघटना बांधता येईल हेही एक आकर्षण होते.

मद्रास प्रांतात चिदंबरम येथे देवल आठ महिने राहिले. या आठ महिन्यांत नवीन धर्तीवर शाखा बांधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भूमिहीन मजुरांना शाखेत आणणे, त्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी खटपट करणे, किमान वेतन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, इत्यादी नवीन तऱ्हेचे काम करण्यास त्यांनी प्रारंभ केला. आपल्या कार्यक्रमाविषयी देवलांनी वरच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय केला नाही. जे वीस कार्यकर्ते महाराष्ट्राबाहेर गेले ते मात्र या एकाच समान भूमिकेतून काम करण्याच्या तयारीने गेले होते. देवलांनी थोड्याच काळात तेथे पाचसहा शाखा काढल्या. या शाखा तालुक्याच्या ठिकाणी होत्या. प्रत्येक शाखेत वीस-पंचवीस तरुण होते. यांत ब्राह्मणेतरांचा भरणा अधिक होता. स्वयंसेवकांना वारंवार आसपासच्या खेड्यांत ते पाठवीत आणि तेथील लोकांच्या जीवनाची जवळून पाहणी करण्यास सांगत. संघशाखा ग्रामीण भागात निघावयास हव्यात आणि तेथील गरीब लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वयंसेवकांनी प्रयत्न करावयास हवा असे ते सतत सांगत होते.

परंतु आठ महिन्यांतच हे सर्व काम गुंडाळावे लागले. म० गांधींचा खून झाला आणि संघावर बंदी आली. देवलांना अटक झाली आणि बऱ्याच खटाटोपानंतर त्यांची सुटका झाली.

पुण्यास आल्यावर पुढे काय करायचे हा प्रश्न उभा होताच. परिस्थिती आता अधिकच बिकट होती. संघबंदीच्या काळात संघ सोडणे भेकडपणाचे लक्षण ठरले असते, म्हणून तो विचार सोडून द्यावा लागला. बंदीच्या काळातच संघकार्याचे स्वरूप बदलण्याचा आग्रह धरण्यातही अर्थ नव्हता. संघाच्या अडचणीच्या काळात आपली भूमिका रेटणे देवलांना योग्य वाटले नाही. या परिस्थितीत, बंदी उठल्यानंतरच्या तीन महिन्यांच्या काळात जर संघाच्या धोरणात हवा तसा बदल होत नाही असे दिसले तर आपण संघाशी संबंध तोडावेत, संघात राहूनच संघ बदलण्याची आशा सोडून द्यावी, असे त्यांनी ठरविले.

ऑक्टोबर १९४९ मध्ये संघावरील बंदी उठली आणि आधी ठरवल्याप्रमाणे देवलांनी अधिकाऱ्यांना कळविले की संघ सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित राहील असा धोरणात्मक बदल तीन महिन्यांच्या मुदतीत व्हावा, नाहीतर आम्ही संघ सोडू. या पत्राची दखल अधिकाऱ्यांनी घेतली नाही. तीन महिन्यांचा काळ संपला आणि देवल व त्यांचे सुमारे दोनशे समविचारी सहकारी संघातून बाहेर पडले.

संघत्याग केल्यानंतरही संघातले काही मित्र देवलांशी संपर्क ठेवून होते. "तुमच्यासारखे लोक संघाबाहेर गेले तर संघ आहे तसाच राहील," या भूमिकेतून त्यांना परत येण्याचा ते आग्रह करीत राहिले. "मी संघाच्या नावाने आंघोळ केली आहे," या शब्दांत देवलांनी या मित्रांना आपला निर्णय कळवला. तरीही दिलजमाईचे प्रयत्न चालू होते. काहींच्या मध्यस्थीने सरसंघचालक आणि देवल व त्यांचे स्नेही यांची बैठक आयोजित करण्यात आली. पण बैठकीतून काही निष्पन्न झाले नाही. कठोर शब्दांत एकमेकांनी आपापली मते मांडली. आणि देवल संघापासून दूर गेले ते कायमचेच !

आयुष्यातील अनेक वर्षे देवल संघात राहिले हेच खरे आश्चर्य. देवलांचा देवाधर्मावर विश्वास नाही. "वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षीच मी पूर्णपणे नास्तिक झालो," असे ते म्हणतात. त्यांच्या दैनंदिन व्यवहारात हा नास्तिकपणा स्पष्ट दिसून येतो. असे असतानादेखील ते संघाकडे आकृष्ट झाले आणि दीर्घकाळ या संघटनेत राहिले. याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात, "खरं म्हणाल तर संघाजवळ धर्मासंबंधी काही कल्पना अगर भूमिका नाही; निदान संघस्थापनेच्या वेळी तरी नव्हती. ज्या परिस्थितीत संघ स्थापन झाला ती परिस्थिती लक्षात घ्या. त्या काळात भारतात मुसलमान लोक चढाईखोर होते. हिंदू समाज विस्कळीत व निष्प्रभ होता. राष्ट्रीय भावना नव्हती. या परिस्थितीत या देशातील बहुसंख्य (हिंदू) लोकांचे संघटन करून, त्यांच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करणे, एवढेच उद्दिष्ट संघस्थापनेमध्ये होते. हिंदुधर्म म्हणजे सनातनी, कर्मठ हिंदुधर्म अशी कल्पना नव्हती. तसेच इतर धर्मांतील लोकांच्या विरोधात जाण्याचेही कोणाच्या मनात नव्हते. त्या वेळीही संघातील कित्येक कार्यकर्ते पूर्णपणे नास्तिक होते. पण हिंदू लोक जोपर्यंत संघटित नाहीत तोपर्यंत हे राष्ट्र जिवंत होणार नाही असे मात्र वाटत होते. एकदा हिंदू लोकांचे संघटन करायचे ठरल्यानंतर, सामान्य लोकांना प्रेरक ठरतील अशा गोष्टींना प्राधान्य देणे ओघाने येते. परंतु प्रथमपासूनच डॉ० हेडगेवार या बाबतीत भारतातील सर्व प्रदेशांतील व सर्व थरांतील लोकांना एकत्र आणण्यास आवश्यक ते सर्व काही करावे असे ठासून सांगत होते. हिंदुसंघटनेचे एक महत्त्वाचे कारण मुसलमानांचे धर्मवेड (फॅनॅटिसिझम). या धर्मवेडाला कसे तोंड द्यायचे हे निधर्मी म्हणवणाऱ्या लोकांनाही कळत नाही. डॉ० हेडगेवार यांची भूमिका याबाबत लवचिक होती. तिचा नंतर विसर पडला आणि संघटनेसाठी संघटन सुरू झाले."

देवलांचे संघाविषयीचे विवेचन वादग्रस्त होऊ शकेल. येथे हा वाद अप्रस्तुत असल्यामुळे त्याची सविस्तर चर्चा करण्याचे कारण नाही. स्वतःच्या कल्पनांप्रमाणे देवलांना संघात राहून काम करता आले नाही म्हणून त्यांना बाहेर पडावे लागले.

जातिव्यवस्था मुळापासून नष्ट केली पाहिजे याबद्दल देवलांच्या मनात संदिग्धता नाही. ती सहजासहजी जाणार नाही; सातत्याने विधायक कार्य, प्रबोधन आणि संघर्ष या मार्गानेच ती जाईल, असे त्यांना वाटते. या मार्गाचे अधिक विवेचन पुढे येईलच. सामाजिक विषमतेबरोबर आर्थिक विषमताही घालविली पाहिजे असे त्यांचे मत आहे. पण त्यासाठी जमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे त्यांना व्यवहार्य वाटत नाही. जमीनधारणेवर कमाल मर्यादा हवी. आज आहे त्यापेक्षा कमाल मर्यादा खाली आणावी. सर्वसाधारणपणे बागायत जमिनीवर पाच एकरांची मर्यादा असावी. कोरडवाहू जमिनीवरील कमाल मर्यादा पावसाचे प्रमाण पाहून ठरवावी. अतिरिक्त जमीन दलित आणि भूमिहीन यांना वाटून द्यावी. मात्र अशी जमीन व्यक्तिगत पायावर कसण्यास देऊ नये. सहकारी तत्त्वावरच या जमिनी कसण्याचे त्यांच्यावर बंधन असावे. अल्पभूधारकांना सामुदायिक शेतीशिवाय भविष्य नाही. सामुदायिक शेतीतून आर्थिक आणि सामाजिक बळ या वर्गाला प्राप्त होईल. विषमता घालवण्यावर हाच एक उपाय आहे असे देवलांचे ठाम मत आहे.

सर्व भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्यास पुरेशी जमीन उपलब्ध होणार नाही, म्हणून त्यांना

बिगरशेती व्यवसाय द्यावा, आवश्यक असल्यास भूमिहीन कुटुंबांची स्वतंत्र खेडी वसवावीत, त्यांना एकत्र आणल्याने त्यांचे प्रश्न सोडविणे सोपे जाईल, अशा स्वरूपाचा मार्ग देवल सुचवतात.

देवलांच्या विचारांची रूपरेषा देण्याचा प्रयत्न मी वर केला आहे. गेल्या काही वर्षांत देवलांशी बातचीत करण्याची संधी मला मिळाली, त्याचा फायदा घेऊन देवलांना समजावून घ्यायचा प्रयत्न मी केला. मला ते जसे दिसले तसे मांडण्याचा प्रयत्न इथे केला आहे. त्यांना समजावून घेण्यात त्यांचे समर्थन करण्याचा किंवा त्यांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण करण्याचा येथे प्रयत्न केलेला नाही. ते आहेत तसेच वाचकांना कळावेत एवढाच हेतू वरील रूपरेषेत आहे. देवल 'विचारवंत' या सदरात मोडत नाहीत. अनेक विषयांत त्यांना रस असला तरी त्यांनी त्या विषयांचा सखोल अभ्यास केलेला नाही. दलितांना सामाजिक-आर्थिक न्याय मिळावा यासाठी प्रत्यक्ष काम करणारी देवल ही एक व्यक्ती आहे. दलितांना आर्थिक उपक्रमांभोवती संघटित करणे आणि एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनाच पुढाकार घेण्यास प्रवृत्त करणे हे त्यांच्या कार्यपद्धतीचे सार सांगता येईल. याचा अधिक विचार पुढे येणार आहेच. प्रत्यक्ष कृती त्यांना महत्त्वाची वाटते. ही कृती एकट्यादुकट्या कार्यकर्त्याने करावी असे त्यांना वाटत नाही. कारण अशा एकट्यादुकट्या कार्याचे यश मर्यादित राहते. समाजव्यवस्था बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ठिकठिकाणी प्रयत्न हवा. त्यासाठी अनेक कार्यकर्ते हवेत. अशा कार्यकर्त्यांच्या पाठीशी बलाढ्य संघटना हवी. देवलांचा संघात राहण्याचा अट्टाहास या त्यांच्या भूमिकेतून समजणे शक्य होते. ही भूमिका वाचकांनाही समजेल असा मला विश्वास वाटतो. यापेक्षा अधिक चिकित्सा या पुस्तकाशी संबंधित नाही असे वाटते.





प्रकरण तिसरे

म्हैसाळ गाव

दलितांचे आर्थिक जीवन स्वतंत्र आणि भक्कम पायावर उभे करणे, त्यासाठी त्यांना संघटित करून सामूहिक कृतीस प्रवृत्त करणे, सर्व दलित आणि गरीब गावकऱ्यांना मदतीचा हात देऊन एकत्रित आणणे आणि दलित-दलितेतर यांमध्ये सामंजस्य निर्माण करणे, अशी उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून देवलांनी कामास सुरुवात केली. ही उद्दिष्टे साध्य करण्यास म्हैसाळ हे गाव सर्व दृष्टींनी उपयुक्त आहे. मिरजेपासून सहा मैलांवर हे गाव असून बसमधून या गावास केव्हाही जाता येते. खुद्द मिरज ते म्हैसाळ या दरम्यान विशेष दळणवळण असल्याने खास बस जात-येत असते. म्हैसाळ रेल्वेमार्गावरही आहे. परंतु स्टेशन बरेच दूर असल्याने आणि फारच थोड्या गाड्या तिथे थांबत असल्यामुळे रेल्वेने म्हैसाळला जाणे सोयीचे नाही. म्हैसाळ गाव मोठे असून सर्व प्रमुख धर्मांचे आणि हिंदू धर्मातील जवळजवळ सर्व जातींचे लोक गावात राहतात. १९७१ च्या गणतीप्रमाणे गावात १२६७ कुटुंबे असून लोकसंख्या ८८८५ आहे. आज हा आकडा १०००० च्या वर गेला असेल. जातवार लोकसंख्या सरकारी दप्तरात मिळत नाही. परंतु १९७१ च्या गणतीप्रमाणे अनुसूचित जातींतील लोकसंख्या १६१० होती. एकूण लोकसंख्येशी त्याचे प्रमाणे १८·७ टक्के पडते. अनुसूचित जातींचे प्रमाण बरेच आहे हे यावरून दिसते. गावात मिळालेल्या माहितीनुसार जाती व धर्मानुसार कुटुंबांची संख्या खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्र० ३·१

गावात राहणारी कुटुंबे

ब्राह्मण	३०	मराठा	३५०	धनगर	५५
न्हावी	२०	कोळी	१५	लोहार	१०
सुतार	१०	सोनार	५	परीट	७
चांभार	६५	महार	१३०	मातंग	४०
कोरवी	१५	शिकलगार	१२	वडार	१०
मईबागडी (मच्छीमार)	२०	रामोशी	३	लिंगायत माळी	२५
लिंगायत कुंभार इ०	२०	मुसलमान	७०	जैन	२००
		लिंगायत वाणी इ०	४०		
				एकूण	११५२

तक्ता क्र० ३·२

स्टेशनजवळील वस्ती

गोसावी	२०	चांभार	४
रामोशी	१०	मांग	४
महार	१०	लिंगायत माळी	१०
मराठा	४	इतर लिंगायत	६
		एकूण	६८
		दोन्ही गटांतील एकूण	१२२०

वरील आकडेवारी गावातील प्रमुख लोकांना विचारून गोळा केलेली असल्यामुळे ती ढोबळच आहे. यावरून मिळणारा एकूण कुटुंबांचा आकडा गावच्या दप्तरात नोंदलेल्या आकड्याशी जुळत नाही. परंतु जातवार वर्गवारी कळण्यास वरील आकडेवारीवरून म्हैसाळ गावाचे वैशिष्ट्य लक्षात येते. सर्व महत्त्वाच्या जातींतील लोक या गावात वास्तव्य करीत असून प्रत्येक जातीतील कुटुंबांची संख्या बऱ्यापैकी आहे. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींतील लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. अशा गावात देवलांच्या प्रकल्पाचे यशापयश मार्गदर्शक ठरण्याचा संभव आहे तो याच कारणासाठी.

पूर्वीच्या जमान्याप्रमाणे जातीनुसार लोकवस्त्या करत. आजही काही प्रमाणात जातीनुसार वस्त्या दिसतात. परंतु एकाच ठिकाणी एका जातीची सर्व कुटुंबे वस्ती करून आहेत असे नाही. मराठा, लिंगायत या जमातींतील कुटुंबे अधिक प्रमाणात विखुरलेली आहेत. जैन कुटुंबेही काही प्रमाणात विखुरलेली आहेत. महार, मातंग इत्यादी जाती आपापल्या वस्त्या करून आहेत.

लागवडीखाली एकूण ३२४० हेक्टर जमीन आहे. त्यापैकी आज २८४० हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा होतो. म्हणजे बागायत जमिनीचे एकूण जमिनीशी प्रमाण सुमारे अठ्ठ्यायशी टक्के पडते. गेल्या पंधरावीस वर्षांतच हे प्रमाण झपाट्याने वाढले. म्हैसाळ गावाजवळूनच कृष्णा नदी वाहते. या नदीला बारा महिने भरपूर पाणी असते. या पाण्याचा शेतीला उपयोग करून घेण्यासाठी आजपर्यंत (१९७८–७९) विजेवर चालणाऱ्या २०३ मोटारी बसविल्या आहेत. पाणीपुरवठ्याच्या एकूण सात योजना आहेत. त्यांतील पाच सहकारी कारखान्यांच्या व दोन सरकारी आहेत. खाजगी मालकीच्या तेवीस योजना आहेत. विहिरींची संख्या १६७ असून त्यांपैकी १५० विहिरींना बारा महिने पाणी असते. परंतु प्रामुख्याने विहिरींपेक्षा उपसासिंचन-योजनांमुळेच शेतीला पाणी मिळते.

एकूण खातेदार १२१० आहेत. उरलेल्या ५७ कुटुंबांजवळ शेतजमीन नाही. पाच एकरांच्या आतील जमीनधारकांची संख्या ४०० आणि पाच एकरांपेक्षा अधिक शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ८१० आहे. व्यक्तिगत शेतीचा आकार नसामान्यपणे अधिक आहे हे यावरून

दिसते. भरपूर शेतजमीन आणि बारमाही पाणीपुरवठ्याची सोय यांमुळे हे गाव श्रीमंत आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

पाणीपुरवठ्याची सोय झाल्यामुळे पीक-रचनेतही मोठा बदल झाला. बागायत जमिनीवर ऊस आणि द्राक्षे यांसारखी भरपूर पैसा देणारी पिके घेतली जातात. त्याशिवाय मका, गहू, संकरित ज्वारी इत्यादी पिके घेतात. जिरायत जमिनीवर भुइमूग, देशी ज्वारी, बाजरी आणि कडधान्ये घेतात. एकूण सोळा द्राक्षबागा असून त्याखाली अंदाजे चाळीस एकर जमीन आहे. द्राक्षापासून दर एकरी निव्वळ उत्पन्न रु० पंधरा ते वीस हजारांपर्यंत येते. पानमळे तेरा आहेत (सुमारे एकोणीस एकर). यांतून निव्वळ उत्पन्न एकरी रु० वीस हजारांपर्यंत निघू शकते.

शेतीखालोखाल दूधव्यवसाय येतो. फार पूर्वीपासून या गावात दुधाचा व्यवसाय चालू आहे. गावाला 'म्हैसाळ' हे नाव पडले ते या व्यवसायावरूनच असावे असे गावकऱ्यांना वाटते. आज एकूण ११०० म्हशी आणि १५० संकरित गायी अशी एकूण १२५० दुभती जनावरे आहेत. सरासरी प्रत्येक कुटुंबामागे एक दुभते जनावर पडते. दिवसाकाठी सरासरी ५००० लिटर दूध विक्रीसाठी गोळा होते. त्यात दलित लोकांकडील सुमारे १००० लिटर दूध असते. हे प्रमाण अलिकडेच वाढले आहे. एकूण चार दूध-संकलन-केंद्रे आहेत.

पाणीपुरवठ्याची सोय झाल्याने शेती व दूधव्यवसाय यांचा विकास झाला. आर्थिक प्रगती झाली. त्याबरोबर गावातील पारंपरिक सामाजिक चौकटही बदलू लागली. पूर्वी बलुते पद्धत होती. ती आज नाहीशी झालेली दिसते. बेकारी नष्ट झाली. आज रोजगार मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे सर्वांना काम मिळू शकते. त्यामुळे उपासमार शिल्लक राहिली नाही. मजूरवर्ग संघटित होऊन ठेक्याने कामे घेऊ लागला आहे.

गाव मोठे व आर्थिकदृष्ट्या भरभराटीचे असल्यामुळे इतर सर्व सोयी व संस्था उपलब्ध आहेत. दोन प्राथमिक शाळा आहेत. एक मुलांसाठी व एक मुलींसाठी. याशिवाय इंग्लिश माध्यमातून शिक्षण देणारी एक प्राथमिक शाळा आहे. या शाळांतून शिकणाऱ्या मुलामुलींची संख्या सुमारे १७०० आहे. एक माध्यमिक शाळा आहे. तीत ७०० मुले आहेत. गावात वैद्यकीय व्यवसाय करणारे एकूण अकरा लोक आहेत. एक सरकारी दवाखाना व एक प्रसूतिगृह आहे. चार निरनिराळ्या बँकांच्या शाखा आहेत. पिठाच्या अकरा गिरण्या, अडतीस दुकाने, चवदा हॉटेले आणि दोन वर्कशॉप्स गावात आहेत. दूरध्वनीची सोय असून आठ ठिकाणी दूरध्वनी आहेत. गावास ग्रामपंचायत आहे आणि घरपट्टी, दिवापट्टी, पाणीपट्टी, व्यवसायकर यांमार्फत वार्षिक उत्पन्न चाळीस ते पंचेचाळीस हजार रुपये येते.

गावातील १३४ गरीब कुटुंबांना घर बांधण्यासाठी जागा देण्यात आली. चार भूमिहीन कुटुंबांना एकूण दहा एकर शेतजमीन मिळाली.

पिण्याच्या पाण्यासाठी १९७४ पासून नळयोजना चालू आहे. गावात एकूण अठ्ठावीस ठिकाणी नळांची कोंडाळी असून गावकऱ्यांत पाणी मिळण्याबाबत तक्रार दिसत नाही.

गावात पंधरावीस वर्षांपूर्वी अस्पृश्यता पाळली जात असे. नदीवर पाणी भरण्याची अस्पृश्यांची जागा निराळी होती. मंदिरप्रवेश नव्हता. हॉटेलमध्ये बाहेर निराळी कपबशी ठेवलेली होती.

शाळेतही अस्पृश्य मुले दूर बसत. परंतु अस्पृश्यता हळूहळू कमी होत गेली. त्यास काही घटना कारणीभूत झाल्याचे दिसते. १९६३ पूर्वी श्री० यशवंतराव चव्हाण म्हैसाळमध्ये येऊन गेल्याचे लोक सांगतात. त्यांनी दलित वस्तीतच बैठक घेतली. सहभोजनाचा कार्यक्रम त्यांच्या भेटीत पार पडला. त्यानंतर वर्षभराने पुन्हा असा एक कार्यक्रम झाला. त्या वेळेस दलितांनी सर्वांना जेवण-चहा दिला. त्यानंतर पुन्हा एकदा बाहेरचे लोक (बहुधा सरकारी अधिकारी असावेत) आले होते. त्या वेळेस जैनांच्या वस्तीला दलितांनी पाणी घालायचे ठरले होते. परंतु हा कार्यक्रम यशस्वी झाला नाही असे काही दलित म्हणाले. दहापंधरा दलितांनी पाणी घालायचे ठरले होते, पण ते धजावले नाहीत. जैन लोक चावडीत बसले होते. पाणी घातले म्हणून दलितांनी खोटेच सांगितले. त्यांना जैनांची भीती वाटली. पण नंतर जैनांनाही उमगले की अशी अस्पृश्यता चालणार नाही. हळूहळू फरक पडत गेला. १९६२ नंतर सुधारणा जलद गतीने होत गेली. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हैसाळ-प्रकल्पाची सुरुवात असे दिसते. १९६२ मध्ये दूधव्यवसाय आणि १९६९ मध्ये सामुदायिक शेती या दोन उपक्रमांमुळे गावातील शिवाशीव पूर्णपणे गेली. या उपक्रमांना त्याचे मोठे श्रेय दिले पाहिजे. परंतु सर्व श्रेय या उपक्रमांना देता येणार नाही.

जुन्या जमान्यात दलितांना गावकीची कामे करावी लागत. त्याच्या आठवणी आजही ऐकावयास मिळतात. मजुरीसाठी 'रयतां'वर अवलंबून राहावे लागे. त्यामुळे त्यांच्या घरचीही कामे करावी लागत. मामुली कर्ज देऊन गडी बांधून घेण्याची प्रथा होती. नेहमीची गावकीची कामे होतीच; त्याशिवाय चावडीमध्ये कुणबी लोकांना चिलीम ओढण्यासाठी रोज आगटी पेटवून ठेवावी लागे. चावडीची झाडलोट आलटूनपालटून महार लोकांना करावी लागे. रोजचे रोज गावचे टपाल मिरज येथून आणावे लागे. हे कामही काही महार कुटुंबांना वाटून दिले होते. या कामासाठी काहीही मोबदला मिळत नसे. रोज पायी येणे व जाणे; सायकलही नसे. गावात कोणी अंमलदार येणार असेल त्या वेळी संपूर्ण गाव झाडून स्वच्छ ठेवण्याची जबाबदारीही महार कुटुंबांवर होती. या कामासाठीही मोबदला नव्हता.

प्रत्येक रयताची ठरलेली महार कुटुंबे होती. त्यांना रयताची सर्व कामे करावी लागत. मेलेली जनावरे ओढून नेणे, लग्नसमारंभात मांडव साफ ठेवणे, घरचा ओटा झाडणे, वत्त्या धरणे, मयताची खबर देणे, लाकडे फोडणे इत्यादी सर्व कामे या कुटुंबांना करावी लागत. या कामाचा मोबदला म्हणून वर्षअखेर काही धान्य मिळे. रयताला वीस पोती धान्य आले तर त्यांतील चार पोती महार कुटुंबाला मिळत. त्यांतील दोन पोती बऱ्यापैकी धान्य व दोन पोती खराब धान्यअसे.

ही सर्व प्रथा हळूहळू नष्ट झाली. पुढे दिलेल्या काही मुलाखतींतून अधिक स्पष्ट कल्पना येईलच. दलित लोकांत जागृती होऊन ते स्वावलंबी होऊ लागले, तेव्हापासून या जुन्या प्रथा झपाट्याने नाहीशा होऊ लागल्या.



प्रकरण चौथे

प्रकल्पास प्रारंभ : दूधव्यवसाय

देवलांनी कामास सुरुवात केली तेव्हा प्रकल्पाचा पूर्ण आराखडा त्यांच्या डोळ्यापुढे नव्हता. आपल्या गावातील दलितांसाठी काम करायचे, त्यांना इतर समाजाबरोबरीचे स्थान मिळवून देण्यासाठी झटायचे, एवढीच प्रबल इच्छा होती. या इच्छेपोटी एकएक पाऊल टाकले गेले आणि प्रकल्पाला आकार येत गेला.

देवलांचा गावाशी घनिष्ठ संबंध १९५८ नंतर आला. या सुमारास सांगली येथे एक सहकारी साखर-कारखाना निघाला. आशियामध्ये हा सर्वांत मोठा साखर-कारखाना मानला जातो. देवलांनी या कारखान्याच्या उभारणीत प्रथमपासून भाग घेतला आणि जबाबदारीचा काही वाटा उचलला साखर-कारखाना निघाल्यामुळे उसाखालील क्षेत्र वाढविण्यास चालना मिळाली. उसाची लागवड फायद्याची असल्यामुळे सहकारी पद्धतीवर उपसा-जलसिंचन-योजनांचा विचार होऊ लागला आणि अशा योजनांचा प्रसार झपाट्याने झाला.

म्हैसाळ गावात 'धनलक्ष्मी' नावाची पहिली उपसा-योजना १९६० च्या सुमारास पुरी करण्यात आली. ही योजना पुरी करण्यातही देवलांचा वाटा होता. योजना सहकारी तत्त्वावर चालवावी असे प्रथमपासूनच ठरलेले होते. परंतु गावातील काही प्रतिष्ठित गावकऱ्यांना ही योजना सहकारी क्षेत्रात न ठेवता आपल्या हातात यावी असे वाटू लागले. त्या दृष्टीने त्यांनी पावले टाकण्यास प्रारंभ केला. खाजगी मालकीची योजना झाली म्हणजे पाणी विकून अमाप पैसा मिळविता येईल असा त्यांचा हिशेब होता.

गावातील बहुसंख्य लोकांना हे पसंत नव्हते. परंतु विरोध करण्यास कोणी धजत नव्हते. देवलांनाही ही योजना सहकारी पद्धतीवर व्हावी असे वाटत होते. ही योजना खाजगी मालकीची झाली की सर्व शेतकरी चार लोकांच्या मर्जीवर अवलंबून राहतील आणि योजनेचे फायदे काही मूठभर लोकांनाच मिळतील, हे त्यांना स्पष्ट दिसत होते. परंतु शक्तिशाली राजकारणी व्यक्तींनी डाव टाकला होता. त्यांच्याविरुद्ध उभे राहायचे की नाही हे पूर्ण विचाराअंतीच ठरवावयास हवे होते. काही सहकारी आणि पाठिंबा मिळाल्याशिवाय पाऊल टाकणे योग्य नव्हते. किमान सहकार्य आणि पाठिंबा मिळताच देवलांनी पाऊल उचलले आणि पुढाकार घेऊन योजना पुरी करण्यासाठी हालचालीस सुरुवात केली. पूर्वीच्या प्लॅनची फेरतपासणी केली, त्यात महत्त्वाचे बदल केले. आणि अल्पावधीत काम पूर्ण करून १९६० च्या सुमारास या योजनेचे उद्घाटन केले.

देवलांनी पूर्वीच्या प्लॅनमध्ये बदल सुचवून त्यात सुमारे सोळा हजार रुपयांची बचत केली.

स्वतःच्या पदरचे पाच हजार रुपये काही काळासाठी घातले. या सगळ्या उलाढालीत देवलांच्या विरुद्ध तक्रारी करण्यात आल्या. 'त्यांचे प्लॅन चुकीचे आहेत', 'हिशेबात गफलत आहे' इत्यादी स्वरूपाच्या तक्रारी वरपर्यंत गेल्या. सर्व तक्रारींचा तपास करण्यासाठी माणसे पाठवण्यात आली. तक्रारींत काही तथ्य नाही असे या तपासणीत दिसून आले; एवढेच नव्हे तर देवलांचे प्लॅन अधिक बरोबर असल्याचा निर्वाळा तज्ज्ञांनी दिला.

ही योजना पुरी झाल्यानंतर किमान एक वर्षभर तरी देवलांनी तिचा कारभार हाती घेऊन व्यवस्थापनाची घडी नीट बसवून द्यावी, असा त्यांना आग्रह करण्यात आला. देवलांनी ते मान्य केले. आणि अशा रीतीने देवल हे या योजनेचे पहिले अध्यक्ष झाले. या संस्थेचे ऐशी सभासद होते आणि सुमारे पाचशे एकर जमीन या योजनेमुळे भिजणार होती. बहुतेक सर्व जमीन उसासाठी वापरण्यात आली.

या योजनेनंतर म्हैसाळ गावात या धर्तीवर अनेक योजना पार पाडण्यात आल्या.

देवलांच्या या कामगिरीमुळे त्यांची गावातील प्रतिष्ठा वाढली. गावातील प्रभावी, आर्थिक व राजकीय दृष्ट्या शक्तिमान व्यक्तींविरुद्ध उभे राहण्याचे साहस गावच्या इतिहासात प्रथमच दिसत होते. या कामात यश मिळाले नसते किंवा देवलांनी माघार घेतली असती तर देवलांचा प्रकल्प उभा राहणे कठीण झाले असते. ज्या दलित लोकांसाठी कार्य करायचे, त्यांच्याही मनात कार्यकर्त्याविषयी आदर असणे आणि त्याचे सामर्थ्य आणि कुवत यांविषयी विश्वास असणे आवश्यक असते. देवलांना जे यश मिळाले त्यात त्यांच्या कर्तृत्वाचा वाटा जसा आहे तसेच त्यांना बाहेरच्या शक्तींचा पाठिंबा होता या गोष्टीलाही महत्त्व आहे. गावकऱ्यांच्या दृष्टीने या दोनही गोष्टींना महत्त्व होते.

देवलांना गावकऱ्यांचा पाठिंबा होता पण तो मूक स्वरूपाचा होता. गावातील सामान्य शेतकरी विस्कळीत होते. उपसा-योजना त्यांना सहकारी क्षेत्रात हवी होती. त्यात त्यांना फायदा दिसत होता. पण एकत्रित येऊन सहकारी तत्त्वावर ही योजना पुरी करण्याचे आणि पुढे चालविण्याचे मानसिक धैर्य त्यांच्याजवळ नव्हते. गावचे पारंपरिक बलिष्ठ पुढारी सांगतील त्या मार्गाने जाण्याची मनाला लागलेली सवय, आपापसांतील हेवेदावे आणि फाटाफूट, सामुदायिक कृतीस आवश्यक असणाऱ्या शिस्तीचा अभाव इत्यादी कारणांमुळे गावकरी एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करण्यास समर्थ नव्हते. अशा परिस्थितीत देवलांनी पुढाकार घेतला आणि ही संस्था सहकारी तत्त्वानुसार चालविण्याचे आव्हान स्वीकारले. त्यामुळे त्यांचे वजन आणि प्रतिष्ठा वाढली; एवढेच नव्हे तर गावपुढाऱ्यांच्या इच्छेविरुद्ध संघटित होऊन आपण आपल्या हिताचे संरक्षण आणि संवर्धन करू शकतो हा आत्मविश्वास सर्वसामान्य गावकऱ्यास आला.

हे घडले नसते तर 'धनलक्ष्मी' आणि त्यानंतरच्या उपसा-योजना यांची मालकी काही विशिष्ट लोकांचे हाती राहिली असती आणि सरंजामशाही पद्धतीवर चालू असलेले गावचे सामाजिक जीवन त्याच पद्धतीवर पुढेही चालू राहिले असते. ही उपसा-योजना होण्यापूर्वी म्हैसाळ गावची शेती कोरडवाहू होती. आज सुमारे अडीचशे टक्के जमीन या योजनांमुळे पाण्याखाली आली आहे. त्यामुळे गावात समृद्धी आली. या उपसा-योजना जर काही थोड्या लोकांच्या हातीच राहिल्या असत्या तर समृद्धीतील सिंहाचा वाटा या थोड्या लोकांनाच लाभला

असता आणि विषमतेची दरी अधिक रुंदावली असती.

सामान्य गावकऱ्यांच्या मनात देवलांना स्थान मिळाले तरी देवल अजून दलितांपर्यंत पोहोचले नव्हते. दलितांच्या प्रश्नांशी देवल जाऊन भिडले ते विठू महारामुळे. स्वतःच्या शेतावर देवल एकदा सायकलीवरून जात असताना देवलांना विठू दिसला. देवलांनी सहजच काही चौकशी केली. प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी विठू मटकन खाली बसला. देवलांनी ओळखले, विठू दोनतीन दिवसांचा उपाशी आहे. त्यांनी स्वतःचा डबा त्याच्यापुढे केला. विठूने डबा फस्त केला. या घटनेमुळे देवलांच्या मनात विचारचक्रे जोराने फिरू लागली. काही तरी निश्चित योजना आखली पाहिजे असे त्यांचे मन त्यांना सांगू लागले. त्यासाठी दलित वस्त्यांत त्यांच्या वाऱ्या सुरू झाल्या.

प्रथम त्यांनी बारकाईने पाहणी केली. किती लोक बेकार आहेत ? उपासमारीचे प्रमाण किती आहे ? ती थांबविण्यासाठी कोणती उपाययोजना शक्य आहे ? काही उद्योग दिल्याखेरीज हा प्रश्न सुटणार नाही, हे स्पष्ट होते. गावात उपासमार होती ती प्रामुख्याने दलित लोकांत होती आणि त्यांतही महार लोकांत अधिक होती असे त्यांना आढळून आले. रोज रात्रीचे जेवण न मिळणारी कुटुंबे बरीच होती. त्यामुळे संध्याकाळनंतर दिसणारे दलित वस्तीतील वातावरण मन उद्विग्न करणारे होते. दिवाबत्ती क्वचितच असे. हातभट्टीचे प्रमाण मोठे होते. भांडणे, मारामाऱ्या, बरळणे आणि वेश्याव्यवसाय यांमुळे वस्तीकडे फिरकणेही अवघड होते. देवदासीची प्रथा प्रचलित होती. एकूणच दलित वस्तीला अवकळा आलेली होती.

दलित कुटुंबांचे उपजीविकेचे प्रमुख साधन गावकीची कामे आणि भीक मागणे हे होते. 'रोगराई', 'दारू', 'वेठ' आणि 'मारामाऱ्या' या काही शब्दांत दलित वस्तीचे वर्णन पुरे होत होते. त्या भागात इतर गावकरी जात नसत.

देवलांनी या वर्गातून मित्र गोळा करण्यास प्रारंभ केला. आबा पिरू हा देवलांचा पहिला साथीदार. इतरही हळूहळू जमा झाले. त्यांच्या मदतीने देवल बैठका घेऊ लागले. हलाखीची कारणमीमांसा आणि उपाययोजना यांवर ते त्यांच्याशी बोलू लागले. परंतु दलितांकडून चर्चेत सहभाग काहीच नव्हता. त्यांना काही सांगायचे नव्हते. त्या बैठकांचे वर्णन करताना देवल म्हणाले, "त्यांच्या डोक्यात कल्पना नव्हत्या, विचार नव्हते, राग नव्हता, तक्रार नव्हती. दिसत होती ती फक्त असहायता. आपल्या हलाखीबद्दल ते कोणाला दोष देत नव्हते. 'आपल्या मालकीच्या जमिनी होत्या, त्या आज गहाण आहेत' हेही कोणी सांगितले नाही. सवर्ण, जमीनदार, गावपुढारी यांबद्दल कोणाच्याही मनात राग नव्हता. अस्पृश्यतेबद्दल चीड नव्हती. आपणच आपल्या परिस्थितीला जबाबदार आहोत आणि त्याला उपाय नाही असे त्यांना वाटत असल्याचे दिसत होते. गावातील सवर्णांबद्दल, मोठ्या शेतकऱ्यांबद्दल आदराचीच भावना होती. 'हे लोक आपल्याला भीक घालतात हे काय कमी आहे,' असे त्यांना वाटत होते."

या विशिष्ट मानसिक अवस्थेवर प्रहार करण्याचे काम प्रथम केले पाहिजे असे देवलांना वाटले. पण ही अवस्था केवळ सांगून, शिकवून जाणार नाही; त्यासाठी दीर्घकाळ झगडा करावा लागेल आणि त्यासाठी काही आर्थिक उपक्रम शोधला पाहिजे. सवर्णांचे प्रबोधन करूनही हा प्रश्न सुटणार नाही. या लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास त्यांना काही उद्योग देणे आणि

गावातील सवर्णांवरचे त्यांचे अवलंबित्व नष्ट करणे हाच एक उपाय आहे अशी देवलांची खात्री झाली. दूध-व्यवसाय हा एकच मार्ग त्यांना दिसत होता. म्हैसाळ गावात दुधाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत होता. १९६२ मध्ये 'म्हैसाळ दूधपुरवठा सहकारी सोसायटी' स्थापन झाली. ती स्थापन करण्यात देवलांनीही पुढाकार घेतलेला होता. गावोगाव दूध-सोसायट्या स्थापन करून सहकारी तत्त्वावर दूधविक्री करावी अशी सरकारची योजना होती, त्यानुसार ही सोसायटी म्हैसाळमध्ये काढण्यात आली.

या सोसायटीचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट गरिबांना दूधव्यवसाय करण्यास मदत करणे हे होते. परंतु हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी फारशी हालचाल झालेली नव्हती. त्यात अडचणीही बऱ्याच होत्या. दलित कुटुंबांजवळ दुभती जनावरे नव्हती. ती घेण्यासाठी त्यांना साहाय्य करणे हे प्रथम आवश्यक होते. पण त्याआधी दूध-सोसायटी फायद्यात चालणे आवश्यक होते. देवलांनी सोसायटीचा व्यवहार वाढवला, कारभार अधिक कार्यक्षम केला. थोड्या अवधीत म्हैसाळ सोसायटीला चौतीस हजार रुपयांचे कर्ज मिळणे शक्य झाले. त्या वेळी म्हशीची किंमत प्रत्येकी चारशे रुपयांच्या आसपास होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर म्हशी घेण्यास कर्ज उपलब्ध झाले.

कर्ज उपलब्ध झाले तरी प्रश्न सुटला नाही. दोन प्रमुख अडचणी उपस्थित झाल्या. म्हैस घेण्यास दलित पुढे येईनात ही त्यांतली पहिली अडचण. कर्ज काढून म्हैस घेण्यास ते धजावत नव्हते. दूधव्यवसायातून फायदा होतो आणि या फायद्यातून कर्ज फेडता येते, ही कल्पनाच ते करू शकत नव्हते. याशिवाय म्हशीची देखभाल करणे, धार काढणे या गोष्टीही त्यांना नवीन होत्या. ही जोखीम आपण पत्करू शकू असा आत्मविश्वास दलितांजवळ नव्हता. दुसरी महत्त्वाची अडचण तारणाबाबतची. नियमाप्रमाणे काही तारण असल्याखेरीज कर्ज देता येत नव्हते. म्हैसाळमधील दलितांजवळ तारण देण्यासाठी काहीच नव्हते. त्यामुळे त्यांना कर्ज कसे द्यायचे हा प्रश्न निर्माण झाला. सोसायटीने प्रथम ज्या पंधरा लोकांना कर्ज दिले त्यांत एकही दलित नव्हता, तो याच कारणासाठी.

यावर तोडगा काढण्यासाठी देवल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेले. पण त्यांनी नियमावर बोट ठेवले आणि कोणताही तोडगा शक्य नसल्याचे स्पष्ट सांगितले.

पण त्यांच्याशी वाद करण्यात अर्थ नव्हता. सोसायटीत एक ठराव संमत करून घेतला गेला आणि त्यानुसार सभासदाला वैयक्तिक जामीन घेऊन, म्हैस तारण ठेवून कर्ज द्यावे असे ठरविले गेले. या ठरावाप्रमाणे दलितांना कर्ज मिळण्यातील एक मोठा अडसर दूर झाला.

या ठरावानुसार १९६२ च्या सुमारास यल्लप्पा दादूला पाचशे रुपये कर्ज प्रथम मिळाले. कर्ज रोखीने न देता, म्हैस घेऊन द्यावी असे ठरले होते. त्याप्रमाणे स्वतः देवल म्हैस खरेदी करण्यास गेले. बरोबर पाचसहा दलित कार्यकर्ते घेतले. म्हैस घेतली, परंतु धार कशी काढायची हे दलितांना माहीत नव्हते. तेही देवलांनी शिकविले. म्हशीची निगा कशी राखायची हेही सांगणे आलेच.

यल्लप्पाचे उदाहरण पाहून अनेक दलित कुटुंबे पुढे आली. त्या सर्वांना त्याच पद्धतीने मदत देण्यात आली.

दूधव्यवसाय फायदेशीर ठरण्यास परिस्थिती फार अनुकूल होती. मुख्य प्रश्न वैरणीचा होता.

परंतु वैरण जवळजवळ फुकटच मिळत होती. पूर्वीपासून दलित मजूर शेतावर मजुरी करून घरी परत येताना गवत गोळा करून आणत असत. हे गवत मालकाला देऊन त्याच्या मोबदल्यात थोडे ताक किंवा काही शिळे अन्न मिळे. म्हैस ठेवल्यापासून हे गवत मालकाला देणे बंद झाले. गावच्या परिसरात अशा रीतीने गवतचारा गोळा करण्यास बराच वाव होता. वैरणीचा प्रश्न या परिस्थितीमुळे सुकर झाला. खर्चाच्या इतर बाबी फारशा नव्हत्या. म्हशीचा विमा उतरवण्याची सोय सोसायटीने केलेली होती. म्हशीला औषधपाणी कमी लागते, पण त्याचीही सोय केली होती.

सोसायटीने असा नियम केला की दूध हे पूर्णपणे सोसायटीसच घातले पाहिजे. जेवढे होईल तेवढे दूध-उत्पादन विकत घेण्याची सोसायटीची तयारी होती. भावही चांगला होता. एका वेळच्या दुधाचे पैसे कर्जापोटी वसूल करून घ्यायचे व एका वेळचे पैसे सभासदाने घ्यायचे असा नियम केल्यामुळे कर्जवसुली आपोआप होत होती. दर म्हैशीमागे दिवसाकाठी किमान सहा लिटर दूध मिळत असे. लिटरमागे भाव खालीलप्रमाणे वाढत गेला :

तक्ता क्र० ४·१

दुधाचा भाव

साल	प्रत १	प्रत २	प्रत ३
१९६३	०·५५	०·६०	०·६५
१९६४	०·८०	०·९०	१·००
१९७८	१·८५	२·१०	२·४५

दूध-उत्पादनाचा खर्च मर्यादित राहिल्यामुळे नफ्याचे प्रमाण भरपूर राहिले. रोजच्या रोज सभासदास किमान पाच रुपये घरखर्चासाठी मिळणे सहज शक्य झाले.

दूधव्यवसाय फायद्याचा आहे व तो चालविणे अवघड नाही असे दिसू लागताच कर्ज मागण्यासाठी अनेक दलित कुटुंबे पुढे आली. एका वेतातच काही जणांनी कर्ज फेडले. १९६२ ते १९६८ या काळात नव्वद दलित कुटुंबांनी म्हशी घेतल्या. एका वेतात निम्मे कर्ज फिटले तर लगेच दुसरी म्हैस घेण्यास कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली. एक वेताचा काळ सुमारे ६ ते ८ महिने असतो. पुढचे ६-७ महिने उत्पादन नसते. म्हणून पहिली म्हैस आटण्यापूर्वीच दुसरी म्हैस घेण्याची सोसायटीने सोय केली. अशा रीतीने दुधापासून वर्षभर सातत्याने उत्पन्न मिळू लागले.

सुरुवातीच्या काळात लोक गावठी म्हैस पसंत करीत असत. 'गावठी म्हैस दुधाला कमी, परंतु स्थानिक वातावरणात अधिक चांगली', असा समज होता. दूधव्यवसायाचा सराव जसा होऊ लागला तसा इतर दुभत्या जनावरांचा विचार होऊ लागला. अलिकडच्या काळात म्हशीऐवजी संकरित गाय अधिक पसंत केली जाते. सोसायटीनेही गाय देण्यावर भर दिला आहे. गायीपासून दुधाचे उत्पादन अधिक आहे. गायीचा दूध देण्याचा काळही अधिक आहे. सोसायटीने गायीच्या आणि म्हशीच्या दुधाला एकच भाव देण्याचे धोरण स्वीकारल्याने गाय ठेवणे अधिक फायद्याचे

ठरू लागले. त्यामुळे गायीसाठी कर्ज मागणाऱ्यांची संख्या वाढू लागली.

आज दलित कुटुंबांजवळ सुमारे १४० म्हशी व ९७ गायी आहेत. सातआठ महिने दूध मिळाल्यानंतर इंजेक्शन देऊन दूध बंद करतात, म्हणजे गाय लगेच गाभण राहू शकते. पहिले पाच महिने गाय बारा-तेरा लिटर दूध देते. नंतर एकदोन महिने दहा लिटर दूध देते. पुढे दुधाचे प्रमाण कमी होते. गायीपासून फायदा अधिक असल्यामुळे आता गायच ठेवण्याकडे लोकांचा कल आहे.

गायीला रोज दोन भारे गवत (रु० २-००) व भरडा दहा दिवसांना एक पोते (रु० ७०-००) अशी खादगी लागते. सर्वसाधारणपणे दिवसाचा खर्च दहा रुपये होतो. दुधाचे उत्पादन सरासरी दहा लिटर धरले तरी रोज वीस ते पंचवीस रुपयांचे उत्पन्न होते. याशिवाय वर्षाकाठी दहा गाड्या शेणखत होते (गाडीचा भाव रु० २०). त्याचप्रमाणे वासरांची पैदास हीही उत्पन्नाची बाब आहे. संकरित गायीच्या वर्षाच्या खोंडाला पाचशे ते सातशे रुपये मिळतात. वर्षाच्या कालवडीची किंमत तीन हजार रुपयांपर्यंत असते. कालवड बहुधा विकीत नाहीत.

दूधव्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची तपशीलवार माहिती घेण्याचा प्रयत्न पाहणीत केला. अकरा जणांची माहिती चांगल्या प्रकारे मिळाली. ती सोबत जोडलेल्या तक्ता क्रमांक ४·२ मध्ये दिली आहे.

माहिती ऑगस्ट १९७८ ते जुलै १९७९ या वर्षाची आहे. माहिती मिळवणे हे एक अवघड काम आहे, हे सांगणे नकोच. ज्यांची माहिती विश्वासार्ह वाटली, त्यांचीच फक्त निवड केली आहे. गाय व म्हैस यांचा खर्च स्वतंत्रपणे मिळणे शक्य झाले नाही. एकूण उत्पन्नात शेणखत, मेलेल्या जनावराचे कातडे इत्यादी पैदास यांपासूनचे उत्पन्न समाविष्ट केलेले नाही. त्याचा साधारण हिशेब वर दिला आहेच. हे उत्पन्न लक्षात घेतले तर उत्पन्नाचा आकडा बराच वाढेल.

खर्चामध्ये वासरांचा खावटीखर्च धरलेला नाही.

तक्त्यावरून व वरील स्पष्टीकरणावरून दुधाचा व्यवसाय फायद्याचा ठरतो हे स्पष्ट होते. निव्वळ उत्पन्नाप्रमाणे या अकरा जणांचा क्रम लावला, तर खालीलप्रमाणे चित्र दिसते :

तक्ता क्र० ४·२

दूधव्यवसायातून मिळालेले निव्वळ उत्पन्न

क्र०	निव्वळ उत्पन्न	क्र०	निव्वळ उत्पन्न
	रु०		रु०
१	७७३०	७	१८२०
२	६७१५	८	१३००
३	४५३०	९	९५०
४	४२५०	१०	५९०
५	२८८०	११	१९०
६	२४५०		

यांपैकी क्र० ११, ८, ७ व २ यांनी घरची अथवा गोळा केलेली वैरण घातल्याचे प्रमाण मोठे आहे. काहींच्या बाबतीत संपूर्ण दुधाचा काळ या वर्षात न पडल्यानेही उत्पन्न कमी आहे.

दर दुभत्या जनावरामागे निव्वळ उत्पन्न किती झाले हे काढणे कठीण आहे. तरीसुद्धा सर्वसाधारणपणे वर्षाकाठी जनावरामागे निव्वळ उत्पन्न दोन हजार रुपयांच्या आसपास आहे असे दिसते. याशिवाय शेणखत इत्यादी निराळेच.

तक्ता क्र० ४·३

दूधव्यवसाय : खर्च आणि उत्पन्न

[ऑगस्ट १९७८ ते जुलै १९७९]

अ०नं०	दुभती जनावरे		वार्षिक खर्च रु०					
	गायी	म्हशी	खुराक-भरडा	पेंड	वैरण चारा	विकत न घेतलेला	विमा	औषध व इतर खर्च
१	२	३	४	५	६	७	८	९
१	२	१	३०००	१००	३९००	—	५००	५५०
२	१	१	१५००	१००	११००	—	२५०	३००
३	१	१	२२५०	१००	७००	—	२५०	३००
४	२	—	३०००	—	१८००	—	५००	५००
५	२	२	३०००	२००	३६५०	—	५००	६००
६	—	१	—	१००	७००	—	—	५०
७	—	१	—	५०	—	७००	—	५०
८	१	—	—	—	२००	१००	२५०	२५०
९	२	१	१९००	१००	२३००	—	५००	५५०
१०	२	—	३०००	—	८२५	४००	५००	५००
११	—	१	—	१००	—	१०००	—	५०

(१) शेणखत जनावरामागे वर्षाकाठी वीस गाड्या—प्रत्येकी किंमत रु० २०. (२) एकूण (३) दुधाचा भाव सरासरी रु० २-०० प्रमाणे धरला आहे.

दूधव्यवसाय सर्वच दृष्टींनी उपकारक ठरला. एक स्वतंत्र, मानप्रद उद्योग मिळाल्यामुळे पारंपरिक जीवनाच्या चौकटीतील परावलंबी आणि लाचारीचे जिणे संपुष्टात आले. आर्थिक फायद्यापेक्षा ही गोष्ट महत्त्वाची होती. मुलाखतींतून अनेक दलितांनी या गोष्टीला प्राधान्य दिल्याचे दिसून येईल. पूर्वीच्या जमान्यातील जीवन म्हणजे हांजी हांजी. कष्ट फार नव्हते, परंतु ताठ मानेने जगणे अवघड होते. स्वतंत्र दूधव्यवसायामुळे प्रथमच जुन्या चौकटीबाहेर जीवन जगणे शक्य झाले. एक नवीन उत्साह व आत्मविश्वास दलितांमध्ये निर्माण झाला. दुसरा परिणाम असा झाला की, पूर्वीच्या आयुष्यातील मरगळ नाहीशी झाली आणि दलित वस्तीत उत्साहाचे वातावरण दिसू लागले.

एकूण खर्च रुपये	दुधाचे उत्पादन							किंमत	निव्वळ उत्पन्न
	गाय			म्हैस			गाय+म्हैस एकूण दूध लिटर		
	सरासरी दूध लिटर	दुधाचे महिने	एकूण दूध लिटर	सरासरी दूध लिटर	दुधाचे महिने	एकूण दूध लिटर			
१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९
८०५०	२०	६	३६००	५.५	८	१३२०	७८९०	१५७८०	७७३०
	११	९	२९७०						
३२५०	७	९	१८९०	४	८	९६०	२८५०	५७००	२४५०
३६००	१०	८	२४००	४	७	८४०	३२४०	६४८०	२८८०
५८००	८.५	९	२२९५	–	–	–	३१९५	६३९०	५९०
	६	५	९००						
७९५०	१४	८	३३६०	९	७	१८९०	६२४०	१२४८०	४५३०
	८	१	२४०	२.५	१०	७५०			
८५०	–	–	–	४	७½	९००	९००	१८००	९५०
८००	–	–	–	१.५	११	४९५	४९५	९९०	१९०
८००	५	७	१०५०	–	–	–	१०५०	२१००	१३००
५३५०	८	७	१६८०	७	८	१६८०	४८००	९६००	४२५०
	८	६	१४४०						
५२२५	९	१२	३२४०	–	–	–	५९७०	११९४०	६७१५
	१३	७	२७३०						
११५०	–	–	–	५.५	९	१४८५	१४८५	२९७०	१८२०

उत्पादनात शेणखत व जनावर मेल्यानंतर कातडे इत्यादी मिळणारे उत्पन्न यांचा समावेश केलेला नाही.

अगदी पहाटेस म्हशीला आंघोळ घालण्यापासून आता दिनचर्येस सुरुवात होते. घरातील लहानमोठी माणसे आपल्या जनावराची मनापासून काळजी घेत असल्याचे दिसते. धार काढणे, दूधविक्री करणे, वैरण गोळा करून आणणे इत्यादी कामांत प्रत्येक घरातील एकदोन माणसे दंग असतात. या नवीन दिनचर्येमुळे बऱ्याच दलितांचे जीवन पार बदलून गेले. कामासाठी लाचारीने दुसऱ्यांच्या दारी उभा राहणारा, व्यसनाने पछाडलेला, दरिद्रीनारायण असा दलित आज घरात म्हशीच्या आगमनामुळे उत्साही, स्वाभिमानी आणि तत्पर झालेला दिसतो.

रोजच्या रोज रोखीने चारपाच रुपये घरात येणे हे पूर्वी अनुभवलेले नव्हते. पूर्वी मजुरी अधूनमधून मिळायची. रोख मजुरी क्वचितच. मिळाली तरी नाममात्र असे. या परिस्थितीत आमूलाग्र फरक पडला. दूधकेंद्र चालवण्याची जबाबदारीही पूर्णपणे तरुण दलितच सांभाळीत आहेत. त्यासाठी लागणारे आधुनिक शिक्षण आणि माहिती त्यांनी मिळविली आहे. दूध तपासणे, हिशेब ठेवणे, रोजच्या रोज दूध मिरज येथे नेऊन घालणे ही सर्व जोखमीची कामे दलित तरुणच करतात.

दूध-धंद्यामुळे पडलेला फरक दलितांच्याच शब्दांत सांगता येईल.

देवाप्पा सीताराम प्रथमपासून या उपक्रमात सामील झालेला. सुमारे पन्नास वर्षांचा निरक्षर सभासद. चौघा भावांत मिळून त्याची फक्त तीन एकर जमीन होती. एकूण चारपाच पोती ज्वारी निघायची. त्या वेळी पोत्याचा भाव पन्नास रुपये होता. त्यामुळे प्रामुख्याने मजुरीवर अवलंबून राहावे लागे. तो सांगतो, "पूर्वी रोजी चार आणे (पंचवीस पैसे) मजुरी मिळे. वर्षातून निम्मे दिवस बेकार राहत होतो. कधी पूर्ण उपास तर कधी अर्धपोटी अशी परिस्थिती होती. शक्य असेल तेव्हा कामातून वसूल करण्याच्या बोलीवर पैसे उसनवार घेत होतो. रोख परत करण्याच्या बोलीवर कर्ज घेतल्यास एक रुपयाला एका महिन्याला दोन आणे व्याज द्यावे लागे. या पद्धतीवर वर्षाकाठी शंभर ते दीडशे रुपये कर्ज घेत असे. (हा साधारण १९३५ चा सुमार). पावसाळ्याचे चार महिने तंगीचे असत. या चार महिन्यांत पूर्णपणे उपवासाचे असे एकूण तीस दिवस होत असत. आठवड्यात एकदोन दिवस मोठ्या मुलांनाही उपवास घडे. ती खूप रडत. गावातील दलितांची एकदोन घरे सोडली तर सर्वांची हीच परिस्थिती होती. मुलांना शाळेत घालावे असे कधी वाटलेच नाही. जरा मूल कळते झाले तर कुठल्यातरी रयताकडे लावायचे.

"मजुरी करणारा कोणत्याही जातीचा असो, त्याची परिस्थिती अशीच होती. पण आमच्या (महार) लोकांची संख्या खूप होती.

"शेती आम्ही प्रथम घरीच करीत होतो. प्रथम बैलही होते. ते ठेवणे परवडेना, म्हणून विकून टाकले. मग शेतीसाठी बैल भाड्याने घ्यावे लागत. दिवसाकाठी एका जोडीला अडीच रुपये भाडे द्यावे लागे. किमान सहा दिवस तरी बैलजोडी लागे. भाड्याचे पैसे रोख द्यावे लागत. हे काहीच परवडेना. उपासमार हटेना. शेवटी तीन हजार रुपयांना जमीन गहाण टाकली. दहा वर्षे फेडीत खाण्यासाठी. जमीन गहाण टाकल्यावर त्याच जमिनीतून सावकाराने ऊस घेण्यास सुरुवात केली. एकरी पन्नास-पंचावन्न टन ऊस निघत असल्याचे डोळ्याने पाहत होतो. त्या वेळी

भाव टनामागे शंभर रुपये होता. वर्षाकाठी त्याच जमिनीतून सावकार पाच हजार रुपये सहजपणे निव्वळ फायदा घेत होता.

"आमचे सर्वच लोक परिस्थितीने गांजलेले होते. सावकार पैसे देतो म्हणून ते भराभर जमीन देण्यास तयार झाले. कवडीमोलाने जमिनी दिल्या. त्या वेळी आम्हांला अक्कल नव्हती. इलाजही नव्हता.

"दादांनी तक्क्यावर मीटिंग घेतली तेव्हा ते म्हणाले, 'तुमचे मजुरीवर भागणार नाही, दुधाचा जोडधंदा करा.' त्यांनी सर्व योजना तयार केली.

"मी दोन म्हशी घेतल्या. एक गाभण देशी म्हैस पाचशे रुपयांना घेतली. दुसरी एक वर्षानंतर मुरा जातीची घेतली. ती अडीच महिन्यांची गाभण होती. देशी म्हैस दिवसाला पाच लिटर व मुरा दिवसाला आठ लिटर दूध देई. भाव लिटरला एक रुपया होता. रोज तेरा रुपये मिळू लागले. त्यांतले निम्मे कर्जवसुलीसाठी जात.

"मुरुवातीला वैरण विकत घ्यावी लागली नाही. मजुरीला जात होतो, तिथून येताना गोळा करून आणत होतो. औषधपाण्याचाही खर्च नव्हता. दुधाशिवाय शेण मिळे. वर्षाकाठी चार गाड्या शेणखत मिळायचे. भाव गाडीला आठ रुपये होता. त्यांतील दोन गाड्यांच्या गवऱ्या करीत होतो. चार महिन्यांचे सरपण त्यामुळे भागत होते.

"देशी म्हशीचे कर्ज दोन वर्षांत फिटले. मुराचे एका वर्षात.

"अनेकांना धार कशी काढायची हेसुद्धा ठाऊक नव्हते. असे असतील पंचवीस टक्के. पण एका आठवड्यात धार काढायला शिकले.

"आयुष्यात एकदम फरक पडला. उपासमार नाही नि काही नाही. म्हशी आल्या आणि संसाराची 'लेवल' लागली.

"म्हशीमुळे आमचे लोक संसाराच्या नादाला लागले. दोन घास मिळू लागले.

"दूध-सोसायटीमुळे देवलांची ओळख वाढली. शेती-सोसायटीची (विठ्ठल सोसायटीची) कल्पना त्यांनीच मांडली. आम्हांला काही कळत नव्हते. दादांनी सांगितले, 'जमीन सोडवून घ्यायची व एकत्रित कसायची, म्हणजे फायदा आपल्यालाच मिळेल. शेती जितकी चांगली करू तितका आपला फायदा अधिक.' आम्ही एकदम मान्य केले. पहिल्याच वर्षी मला एकरी अडीचशे, दोनशे व पन्नास या प्रमाणात खंड मिळाला. दरवर्षी खंड वाढत गेला. आता चारशे-पाचशे रुपये खंड मिळतो.

"दूध-सोसायटी व नंतर श्री विठ्ठल सोसायटी यांमुळे माणूस म्हणून जगायची शक्यता झाली. दुसऱ्याला रामराम करायचे कमी झाले."

वर सांगितल्याप्रमाणे वैरण जवळपास फुकट मिळत होती. दूधव्यवसाय फायद्यात चालण्याचे हे एक प्रमुख कारण होते. परंतु ही परिस्थिती कायम राहणे शक्य नव्हते. अनेक लोक या व्यवसायात पडू लागल्याने वैरणीची टंचाई निर्माण होण्याची शक्यताही होती. गोळा केलेल्या वैरणीच्या जोरावर दलित आपला दूधव्यवसाय चालवतात याबद्दल तक्रारी येणार हेही स्पष्ट होते.

अपेक्षेप्रमाणे तक्रारी येऊ लागल्या. 'दलित आमची वैरण चोरतात,' अशी तक्रार देवलांकडे

अनेकांनी केली. या तक्रारीत फारसे तथ्य नव्हते. कारण यात चोरी अशी नव्हती. दलित वैरण गोळा करून आणत, ती रानातून व बांधावरून. क्वचितप्रसंगी चोरण्याचे प्रकार होत होते. पण अशी तक्रार करण्यामागे खरी पोटदुखी होती ती ही, की शेतकरी मालकांना दलित मजूर फुकट गवत गोळा करून आणून देत असत ते बंद झाले! त्याचप्रमाणे मामुली वेतनावर किंवा शिळ्या अन्नावर दलित मजूर पडेल ते काम करण्यास राजी असत, तेही बंद झाले. दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे याचे वैषम्य वाटल्यावाचूनही राहिले नाही.

तक्रारी वाढू लागल्या तेव्हा देवलांना त्यांची दखल घेणे भाग पडले. तक्रारींत तथ्य नाही असे देवल सांगत होते, परंतु यातून भांडण व तणाव निर्माण होऊ नयेत असे त्यांना वाटत होते. आजघडीला शेतकऱ्यांशी वाकडेपणा नको, कारण त्याने तणाव वाढतील आणि त्यात दलितांचेच नुकसान होईल असे त्यांना वाटले. दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारली तरी अजून ती म्हणावी अशी भक्कम पायावर उभी राहिलेली नव्हती. म्हणून देवलांनी शेतकऱ्यांशी वाद टाळण्याचे ठरविले. "आम्ही बंदोबस्त करू," असे आश्वासन देऊन देवलांनी वैरणीच्या प्रश्नाचा विचार करण्यास सुरुवात केली. दलितांना ही परिस्थिती त्यांनी समजावून दिली. कारण आज ना उद्या हा वैरणीचा प्रश्न उभा राहणार होताच. दूधव्यवसायाच्या वाढीबरोबर गोळा करून आणलेली वैरण अपुरी पडणार होती. बांधावरचे गवत घेण्यास देवलांनी सर्वांना मनाई केली.

वैरणीच्या प्रश्नास हात घालण्याचे ठरले आणि त्यातूनच सामुदायिक शेतीचा प्रकल्प उभा राहिला.



प्रकरण पाचवे

सामुदायिक शेती : परिवर्तनाचे साधन

सामुदायिक शेतीचा प्रकल्प उभा राहिला तो दूधव्यवसायाला लागणाऱ्या वैरणीच्या शोधातून. कोणाचे तरी रान विकत घ्यावे व सर्वांसाठी त्याचा वापर करावा असा विचार प्रथम देवल आणि त्यांचे साथीदार यांच्या मनात आला. आबा पिरू हा देवलांचा प्रथमपासूनचा साथीदार. त्याचे दोनतीन एकरांचे शेत होते. तिथे विहीर खणावी आणि सर्वांनी त्याचा वापर करावा असे सर्वांनुमते ठरले.

त्या दृष्टीने पाहणी करण्यासाठी शेतावर फेरफटका मारीत असता देवलांनी आसपासच्या शेतांची चौकशी करण्यास सुरुवात केली. आणि त्यांना आश्चर्याचे धक्के बसत गेले. आसपासची सारी शेते या ना त्या दलित कुटुंबाच्या मालकीची होती. खुद्द उपस्थित दलित लोकच हे सांगू लागले. ही सर्व शेते पूर्वी त्यांच्या मालकीची, परंतु नंतर सावकार किंवा मोठे शेतकरी यांच्याकडे गहाण गेलेली होती. देवलांना हे प्रथमच समजत होते. आजपर्यंत दलितांनीही याविषयी एक अक्षर काढले नव्हते. हे सर्व दलित भूमिहीन आहेत असे देवल गृहीत धरून चालले होते.

सर्व जमिनींचे रेकॉर्ड तपासून पाहण्याचे देवलांनी ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी तलाठ्याला बोलावणे पाठवून त्यास विनंती केली. आश्चर्य म्हणजे तलाठ्याने तत्परतेने, कोणतीही आडकाठी न करता किंवा कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करता, आठ दिवसांच्या आत सर्व माहिती उपलब्ध करून दिली. तलाठी ब्राह्मण जातीचा होता. देवलांविषयीचा आदर व देवलांनी हाती घेतलेल्या कामाविषयी आस्था हे या तत्परतेचे कारण असावे.

ही माहिती हाती पडली तेव्हा कोणाची जमीन कोणाकडे गहाण आहे हे देवलांच्या लक्षात आले. एकूण सतरा सावकार निघाले. सर्वांचे मिळून दीड लाख रुपये देणे होते. एकूण सुमारे सव्वाशे एकर शेतजमीन गहाण पडलेली होती.

या जमिनी सोडवणे हे पहिले काम. देवलांनी या सर्व सावकारांची बैठक बोलावली आणि दलितांना संघटित करून, त्यांची आर्थिक उन्नती घडवून आणण्याचा आपला मनोदय त्यांना सांगितला. देवलांविषयी सर्वांना आदर होता. त्यांच्या कार्याची सर्वांना कल्पना होती. "आज जमीन सोडा, तुमच्या सर्व कर्जाच्या परतफेडीची मी हमी देतो," असे आवाहन देवलांनी केले. ते सर्वांनी मान्य केले व एका बैठकीतच जमिनी मुक्त झाल्या. त्याही फार थोड्या अवधीत आणि फार प्रयास न पडता! सावकारांनी देवलांच्यावर विश्वास ठेवून जमिनी सोडल्या.

त्यानंतर थोड्या काळातच देवलांनी सर्वांचे कर्ज फेडून टाकले. त्यासाठी आपल्या मित्र-

परिवाराकडून आणि स्वत:च्या शिलकीतून देवलांनी निधी उभा केला. यानंतरही अनेक लोकांचे साहाय्य देवलांना मुबलक प्रमाणात लाभले. ही गोष्ट दलितांच्या नजरेस आणून, "आपल्या कार्यात समाजातील सत्प्रवृत्त लोकांचे सहकार्य लाभले आहे," यावर देवल नेहमी भर देत आले आहेत. देवलांचा प्रकल्प जसजसा आकार घेऊ लागला तसतशी बाहेरून मोठ्या प्रमाणावर मदत आली. अनेक लोकांनी आस्थापूर्वक चौकशी करून मदत केली.

अर्थात सावकारांनी जमिनी मुक्त केल्या यात त्यांच्या सत्प्रवृत्तीव्यतिरिक्त इतर कारणेही आहेत. मामुली कर्ज देऊन ते फिटेपर्यंत शेतजमीन अनेक वर्षे वापरणे याच्याइतकी फायद्याची गुंतवणूक दुसरीकडे शक्य नाही. कर्जव्यवहाराचा तपशील काही मुलाखतींत दिला आहे, त्यावरून या व्यवहारातील फायद्याची कल्पना येईल. 'अनेक वर्षे सतत फायदा उकळल्यानंतर व्याजासह सर्व बाकी रकमेची हमी घेऊन जमीन सोडण्यात कसली सत्प्रवृत्ती?' असा प्रश्न साहजिकच कोणी या बाबतीत उपस्थित करू शकेल.

या प्रश्नात अभिप्रेत असलेल्या आक्षेपात बरेच तथ्य आहे. सतरा सावकारांपैकी एक सावकार सर्वांत मोठा होता. त्याच्याकडे पन्नास जणांची सुमारे पंचेचाळीस एकर जमीन होती. ही जमीन घेतल्यानंतर त्याने पंचवीस अश्वशक्तीची इंजिने, पाइपलाइन आणि इतर गोष्टी यांवर खर्च करून अनेक वर्षे अफाट उत्पन्न घेतले. ही सर्वच गुंतवणूक वाया जाण्याची चिन्हे दिसू लागली होती, कारण साखर-कारखान्याची एक उपसा-योजना तयार झाली होती. आणि या सावकाराला अशी भीती वाटत होती की दलितांनी जर आपल्या जमिनी रीतसर कर्ज फेडून सोडवून घेऊन या योजनेतून पाणी घ्यायचे ठरवले तर ही यंत्रसामग्री वाया जाईल. आज ना उद्या दलितांच्या जमिनी बिनशर्त सोडाव्या लागतील याचीही त्याला कल्पना होती. तेव्हा या सावकाराने देवलांना पाऊण लाख रुपये किंमतीला सर्व शेत व यंत्रसामग्री देऊ केली. देवलांनी ही तडजोड मान्य केली. पैसे सावकाशीने द्यायचे ठरले. ही परिस्थिती लक्षात घेता सावकारांनी केवळ देवलांची प्रतिष्ठा आणि त्यांच्या कार्याविषयी आस्था यासाठीच जमिनी मुक्त करण्याचे मान्य केले, असेच म्हणता येणार नाही.

हे जरी खरे असले तरी दलितांच्या जमिनी सोडवण्याचा याखेरीज दुसरा मार्ग उपलब्ध होता असेही वाटत नाही. हा साधारण १९६७-६८ चा काळ. या वेळचे सामाजिक, राजकीय वातावरण आणि त्या काळी उपलब्ध असलेले कायदेकानू हे पाहता तातडीने जमीन सोडवून घेण्याचा दुसरा मार्ग देवलांना उपलब्ध होता असे म्हणता येत नाही. मनात आणले असते तर सावकार देवलांना नकार देऊ शकले असते. निदान काही वर्षे तरी ते देवलांना झुलवत ठेवू शकले असते. 'आधी पैसे टाका' असा आग्रह त्यांना धरता आला असता. यांपैकी सावकारांनी काही केले नाही व देवलांचे म्हणणे मुकाटपणे मान्य करून त्यांच्या शब्दावर विसंबून त्यांनी तत्काळ जमिनी मुक्त केल्या. देवल व खुद्द दलित शेतकरीही ही गोष्ट महत्त्वाची मानतात.

पूर्ण कर्जाची फेड करण्याचे देवलांनी मान्य केले, त्यापाठीमागे त्यांची विशिष्ट भूमिकाही आहे. जुन्या कराराप्रमाणे कर्जफेड करणे हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. मग ते अवाजवी असले तरी चालेल. तसे जर केले नाही तर जमाती-जमातींत द्वेषभाव पसरतो. दलितांच्या पुढच्या विकासाच्या दृष्टीने अशी भावना पसरणे देवलांना योग्य वाटले नाही. दलित लोकांनी

सर्व कर्ज प्रामाणिकपणे फेडले तर त्यांच्याविषयी गावात एक आदब राहील आणि आर्थिक उन्नती-नंतरच्या सामाजिक सुधारणांसाठी आवश्यक असे वातावरण तयार होण्यास मदत होईल असे देवलांना वाटत होते. त्याचप्रमाणे 'सावकारांचे कर्ज बुडवले तर पुढे इतरांचेही कर्ज बुडविण्यास हरकत नाही' ही भावना वाढू लागेल असेही त्यांना वाटत होते. यासाठी सर्व कर्जफेड करणे योग्य असा देवलांनी निर्णय घेतला व त्याप्रमाणे त्यांनी तो अंमलात आणला.

सर्व जमीन मुक्त होणार असे दिसू लागताच ती कशी कसायची याचा विचार सुरू झाला. व्यक्तिगत मालकीची जमीन आकाराने खूपच लहान होती. निम्म्यापेक्षा अधिक सभासदांची जमीन अर्ध्या एकरापेक्षा कमी होती; आणि जवळपास सर्व सभासदांची जमीन पाच एकरांपेक्षा कमी होती. एकूण सहासष्ट शेतकरी सभासदांपैकी पस्तीस सभासदांची जमीन अर्ध्या एकरापेक्षा कमी होती; आणि फक्त पाच सभासदांची जमीन पाच एकरांपेक्षा जास्त होती.

हे तुकडे स्वतंत्रपणे कसणे जवळजवळ अशक्य होते. आकार लहान हे एक कारण होते, पण त्याशिवाय इतरही अनेक कारणे होती. शेती करण्यासाठी लागणारी अवजारे व जनावरे जवळपास कोणाजवळच नव्हती. ही अवजारे व जनावरे स्वतंत्रपणे प्रत्येकाने विकत घेणे अशक्यप्राय होते. त्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध होणे शक्य नव्हते. तसा पैसा उपलब्ध झाला तरी त्याची परतफेड करणे अवघड होते. भूमिसिंचनाची व्यवस्था थोड्याच जमिनीसाठी होती. कोरडवाहू शेतीतून कर्जफेड करण्याइतपत रोख फायदा एवढ्या अल्प जमिनीतून मिळणे शक्य नव्हते. स्वतः शेती करण्याची शारीरिक व मानसिक कुवतही कोणाजवळ नव्हती. स्वतःच्या जबाबदारीवर शेती करण्याचा अनुभव बहुतेकांस नव्हता.

या सर्व कारणांमुळे, प्रत्येकाने स्वतंत्रपणे शेती करावी असा विचार केला तर फारच थोड्या काळात सर्वांची शेती परत गहाण पडेल हे स्पष्टपणे दिसत होते. तेव्हा सर्वांच्याच जमिनीचा एकत्रित विचार करणे क्रमप्राप्त होते. एकत्रित शेती केल्याने, गुंतवणूक करून जमिनीची उत्पादनक्षमता वाढविणे शक्य आहे, असे देवलांचे ठाम मत होते. नजिकच्या कृष्णा नदीचे पाणी वापरून बरीच जमीन भिजवता येईल आणि आधुनिक पद्धतीने नगदी व धान्याची पिके घेता येतील अशी देवलांची खात्री होती.

संयुक्त पद्धतीने शेती करण्याचा विचार देवलांनी सर्वांपुढे मांडला तेव्हा त्यावर वादविवाद न होता सहजपणे सर्वांनी ही कल्पना मान्य केली, ही एक महत्त्वाची गोष्ट नमूद केली पाहिजे. सामान्यतः संयुक्त अगर सहकारी शेती संस्था प्रस्थापित करण्याकडे शेतकऱ्यांचा कल नसतो. स्वतंत्र-पणे शेती करण्याकडे प्रवृत्ती असते. संयुक्त शेतीचे फायदे कितीही असले तरी भारतातील शेतकरी आपली शेती-संयुक्त-शेती संस्थेत समाविष्ट करण्यास राजी नसतो, असा सर्व ठिकाणचा अनुभव आहे. संयुक्त शेतीत सामील होण्याने आपल्या मालकी हक्कावरच गदा येते अशी त्याची भावना आहे. एक वेळ आपली अल्पशी जमीन मामुली रकमेसाठी सावकाराकडे गहाण टाकून वर्षानुवर्षे हा शेतकरी अत्यंत खडतर असे जीवन स्वीकारण्यास तयार होतो, परंतु सहकारी शेतीस तयार होत नाही. हा अनुभव जमेस घेता म्हैसाळ येथील दलित शेतकरी संयुक्त पद्धतीने शेती करण्यास सहजपणे तयार झाले याचे प्रथमदर्शनी नवल वाटते. परंतु याची कारणे सापडणे अवघड नाही.

मुख्य कारण असे की, बहुतेक जणांची जमीन अनेक वर्षे, पिढ्यान्‌पिढ्या सावकारच कसत होते; त्यामुळे मालकी हक्काची भावना फारशी शिल्लक राहिली नव्हती. जमीन प्रत्येकाच्या ताब्यात मिळण्यापूर्वीच संयुक्त-शेती-संस्था स्थापन करण्यात देवलांनी कौशल्य दाखवले. त्याच-प्रमाणे पहिल्याच काही वर्षांत संयुक्त शेतीच्या व्यवस्थापनाची नीट घडी बसवून देऊन प्रत्येक सभासदाच्या पदरात काही किमान फायदा पडण्याची व्यवस्था त्यांनी केली. यातही त्यांची कार्यक्षमता आणि दूरदृष्टी दिसून येते. सावकारांकडून घेतलेले कर्ज पूर्णपणे फेडण्यापूर्वीच जमीन मुक्त होणे आणि संयुक्तरीत्या कसण्यास प्रारंभ होताहोताच त्यापासून फायदा मिळणे यांमुळे दलितांच्या मनावर विलक्षण छाप पडली. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे देवलांच्या विषयी दलितांच्या मनात असलेली आदराची भावना. जमिनी मुक्त होऊन संयुक्त शेती संस्था स्थापन होण्यापूर्वीच देवलांविषयी दलितांच्या मनात पूर्णपणे विश्वास निर्माण झालेला होता. देवल सांगतील ते आपल्या भल्यासाठीच, हे त्यांच्या मनावर ठसलेले होते. त्याचबरोबर ते म्हणतील ते यशस्वी करून दाखविण्याची कुवतही त्यांच्यापाशी आहे असा विश्वास दलितांना वाटत होता. गावात देवलांचा दबदबा होता. तेव्हा त्यांनी हाती घेतलेल्या कामात अडथळा आणण्यास कोणी धजावणार नाही याचीही दलितांना खात्री होती.

जमिनी मुक्त करून १ जानेवारी १९६९ रोजी 'श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी' स्थापन करण्यात आली. कर्जफेड व इतर कारणे यांसाठी सुमारे रु० दोन लाख फंड गोळा झाला. त्यात पंचवीस हजार रुपये देणग्यांच्या स्वरूपात व राहिलेली रक्कम ठेवी म्हणून मिळाली. या फंडात खुद्द देवलांचे सत्तर हजार रुपये होते. देवलांची रक्कम सोडल्यास पाचसहा वर्षांत सर्व रकमा परत करण्यात आल्या.

या ठेवींशिवाय दरवर्षी शेतीच्या चालू खर्चासाठी तातडीने रक्कम लागे, तीही देवलच देत होते. उदाहरणार्थ, १९७३-७४ मध्ये वीस एकर कापूस लावला होता. त्यावर रोग पडला व त्यावर तातडीने औषधाचे फवारे मारणे आवश्यक होते. इतरही खर्च अचानक उद्भवला. पीक-कर्जाची तजवीज नव्हती. देवलांनी चाळीस हजार रुपये कर्ज देऊन पीक वाचवले. देवल साधारणपणे दरसाल दहाबारा हजार रुपये कर्ज अशा कामासाठी देत आले आहेत. याशिवाय शेतीच्या कामाला लागणारी अवजारे आणि जनावरे देवल विनामूल्य देत होते. गेल्या तीनचार वर्षांपासून देवलांची मदत लागेनाशी झाली. वेळीअवेळी लागणारी सर्व प्रकारची मदत देवल देऊ शकत होते हे संयुक्त शेती सुरळीत चालण्याचे एक महत्त्वाचे कारण होते हे लक्षात घेतले पाहिजे.

याशिवाय देवलांनी एक महत्त्वाची मदत केली, ती म्हणजे शेतीसंबंधीचे शिक्षण आणि मार्गदर्शन. बहुसंख्य सभासद 'श्री विठ्ठल सोसायटी' स्थापन होईपर्यंत मजुरी आणि गावकीची कामे करीत होते. स्वतःच्या जोखमीवर शेती करण्याचा अनुभव त्यांना नव्हता. या परिस्थितीत शेतीसंबंधीचे, विशेषतः आधुनिक शेतीपद्धतीचे ज्ञान सभासदांना देण्याची महत्त्वाची कामगिरी देवलांना पार पाडावी लागली.

देवल स्वतःच्या शेतावर किमान महिन्यातून एकदा तरी सर्व सभासदांना बोलावून घेत आणि

विविध प्रकारच्या पिकांसंबंधी सविस्तर माहिती देत. देवलांच्या शेतावर सर्व तऱ्हेच्या पिकांची लागवड होते. आपला अनुभव आणि ज्ञान यांमुळे हे शिक्षण देणे देवलांना शक्य झाले. पहिल्या वर्षी श्रीविठ्ठल सोसायटीच्या शेतात तेरा एकर गहू लावला. गव्हाचे पीक घेण्याचा अनुभव दलित सभासदांना नव्हता. एकरी जेमतेम एकदोन पोती उत्पादन होईल असा त्यांचा कयास होता. एकरी दहाबारा पोती निघतील असा देवलांचा अंदाज होता. सभासदांचा त्यांच्या अंदाजावर विश्वास बसेना. त्यांच्यात फारसा उत्साह नव्हता. परंतु 'दादा म्हणतील तसे करायचे' या नियमाप्रमाणे गव्हाच्या पिकाची सारी कामे करण्यात आली आणि प्रत्यक्षात एकरी तेरा क्विंटल उत्पादन निघाले.

दलितांना हा चमत्कार वाटला. एकूण एकशेसत्तर पोत्यांची रास एकत्रित झाली. हे दृश्य सभासदांच्या मनावर विलक्षण परिणाम करणारे ठरले. शेती फायदेशीर होऊ शकते, हे त्यांना प्रथमच उमगले. इतकी वर्षे आपली जमीन आपण गहाण ठेवून आपले नुकसान करून घेतले, विनाकारणच दारिद्र्यात पिचत राहिलो, हा विचार अनेकांच्या मनास चाटून गेला. पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट लक्षात आली ती ही की, 'आपली शेती इतरांच्या मानाने थोडीफार सरस आहे' ही होय. आपण उत्तम शेतकरी होऊ शकतो हा आत्मविश्वास येण्यास या पहिल्याच वर्षीच्या उत्पादनाने प्रारंभ झाला.

गव्हाची रास दिसत होतीच, पण प्रत्यक्षात घरोघरी काय मिळणार हा प्रश्न होता. पहिल्या वर्षी एकूण उत्पादनावरोबरच सर्वसामान्य सर्व गरीब सभासदांना यातील भरघोस वाटा मिळावा अशा तऱ्हेने वाटप-व्यवस्था करण्यात देवलांनी पुन्हा एकदा कौशल्य दाखवले. एकूण उत्पादनातील आठदहा पोती विकून त्या पैशातून नव्वद लुगडी विकत आणली आणि प्रत्येक सभासदाच्या घरी एकेक लुगडे दिले. याशिवाय उरलेला गहू सभासदांत वाटून दिला. याचा दलितांच्या मनावर विशेष परिणाम झाला. सभासदांच्या अंगावर त्या वेळी धड कपडे नव्हते. 'त्यांच्या अंगावर चिंध्या असत,' असे एका गावकऱ्याने त्यांचे वर्णन केले. उपासमार होतीच. हेतुपुरस्सर सभासदांच्या बायकांना लुगडी देण्याने दलितांची मने संयुक्त शेतीबाबत अनुकूल करून घेण्यात यश आले.

संयुक्त शेती कधीच किफायतशीर होणार नाही अशा तऱ्हेचे विचार दलित सभासदांच्या कानांवर वारंवार पडत होते. सर्वच गावकरी या प्रयोगाकडे 'बघू या कशी काय शेती फायद्यात चालते!' अशा उपहासात्मक दृष्टीने पाहत होते. त्यांच्या म्हणण्यात तथ्य नव्हते असे नाही. कारण आजपर्यंत देशातील संयुक्त पद्धतीने केलेल्या शेतीच्या प्रयोगाचे अपयश सर्वश्रुत होते. त्यातच 'म्हैसाळमधील दलितवर्ग शेती करण्यास लायक नाही,' असे सर्वांचे मत होते. खुद्द दलित लोकांतील पुढारीही 'आम्ही ऐदी लोक, शेतकरी होण्यास नालायक,' असे म्हणत होते. या संदर्भात संयुक्त शेती पहिल्याच वर्षी किमान प्रमाणात यशस्वी करणे अत्यंत आवश्यक होते, तसेच पहिल्याच वर्षी उत्पादनातला भरघोस वाटा सभासदांच्या घरात पोहोचणेही आवश्यक होते.

स्त्रियांना नवीन लुगडे व सर्वांना खाण्यास भरपूर गहू या दोन गोष्टी मिळाल्यामुळे, "सोसायटी घरोघरी पोहोचली." सोसायटी आपली आहे, केवळ आपण मजूर नसून मालकही आहोत,

ही भावना मूळ धरू लागली. भूक टाळता येते, इतरांच्या दारी भीक मागण्याची गरज नाही, हे प्रथमच दिसू लागले. एक सभासद म्हणाला, "आम्ही सावकार झालो." 'सावकार' या शब्दाची त्यांची व्याख्या निराळी होती. 'ज्याच्या घरी सुगीमध्ये वर्षाला पुरेल एवढे धान्य पडते तो सावकार' असे त्यांना वाटे. सावकार म्हणजे भला श्रीमंत असेच नव्हे. उपाशीपोटी शब्दांच्या व्याख्या कशा बदलतात, याचे हे उदाहरण आहे. या व्याख्येप्रमाणे दलित लोक 'सावकार' झाले. म्हणजेच वर्षाची बेगमी होईल इतपत धान्य घरोघरी पोहोचले.

पुढील उत्पादनाच्या कार्यक्रमास लागणारी प्रेरणा आणि उत्साह पहिल्याच वर्षी या कारणांमुळे मिळाला.

सोसायटी स्थापन करताना केवळ सहकारी पद्धतीने शेती करून सभासदांची आर्थिक बाजू बळकट करणे एवढीच मर्यादित दृष्टी न ठेवता, या समाजातील प्रमुख दुखणे दृष्टीपुढे ठेवून ते नाहीसे करण्यासाठी आपण एक लहानसे पण महत्त्वाचे पाऊल टाकीत आहोत, ही जाणीव करून देण्याचे प्रयत्न प्रथमपासून होत असल्याचे स्पष्ट दिसते. जातिसंस्थेमुळे निर्माण झालेली विषमता आणि सर्व दरिद्री व दुर्बल वर्गांत जातींप्रमाणे झालेली विभागणी या दोन्हींवर प्रत्यक्ष आघात करण्यासाठी टाकलेले पाऊल म्हणून या प्रकल्पाकडे सभासदांनी पाहावे असा देवल यांचा आग्रह असल्याचे सुरुवातीपासून दिसून येते. याबाबतची आपली भूमिका स्पष्ट आणि सोप्या भाषेत त्यांनी मांडलेली आहे. औपचारिक सभासमारंभांत, अनौपचारिक बैठकांतून आणि व्यक्तिशः लोकांशी बोलताना त्यांनी ही भूमिका समजावून सांगण्याची संधी दवडलेली नाही.

त्यांची ही भूमिका दोन मार्गांनी समजावून घेता येईल. यांतील पहिला मार्ग संस्थेची घटना व वार्षिक अहवाल यांमध्ये दिलेली उद्दिष्टे व वेळोवेळी केलेली निवेदने यांवरून आणि दुसरा मार्ग त्यांनी वेळोवेळी सभाबैठकांतून काही प्रसंगांनिमित्ताने मार्गदर्शन केले त्यातून. त्याचप्रमाणे देवल आणि त्यांचे कार्यकर्ते यांच्याशी केलेल्या चर्चेवरूनही भूमिका स्पष्ट होते.

वार्षिक अहवालातील काही निवडक उतारे खाली दिले आहेत; त्यांवरून विठ्ठल सोसायटीच्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट होण्यास मदत होईल :

१. "सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत व उपेक्षित आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल व शोषित अशा समाजाने नैराश्य झटकून पुढे टाकलेले हे पाऊल आहे. अन्य समाजानेही अडसर न आणता सहजासहजी कल्पनेत न बसेल इतकी मदत आपणांस केली आहे. त्यामुळेच सत्प्रवृत्त समाजाशी संघर्ष न येता सहकाराच्या भावनेने आपले काम चालू झाले आहे." (वार्षिक अहवाल पहिला, १९६९-७०).

२. "आपला आर्थिक प्रश्न हा समाजातील इतर दुर्बळ घटकांच्या प्रश्नाचाच एक भाग आहे. त्यामुळे आपण वाटचाल करताना या समाजाशी अभेद्य एकजूट राखल्यास आपली शक्ती वाढणार आहे. आपला लढा दीर्घ मुदतीचा असून केवळ आपल्या पायांपुरतेच पाहून चालणार नाही. आपल्या पायांत शक्ती आल्यावर पुढेमागे त्याचा आधार इतर दुर्बळ घटकांनाही देण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे." (वार्षिक अहवाल, १९६९-७०).

३. "आपल्याच समाजातील काही लोक आपली जमीन (संयुक्त शेती-संस्थेत) समाविष्ट

करण्यास नाखूष असल्याचे पाहून वाईट वाटते. हितसंबंधी लोकांच्या मतलबी सल्ल्याला बळी पडल्याने हे होत आहे. आपल्या समाजाची एकजूट, इतर समाजाशी जिव्हाळ्याचे संबंध, पडतील ते कष्ट उपसण्याची तयारी आणि निर्व्यसनी वागणूक या चार गोष्टींतूनच आपला समाज पुढे येणार आहे...भारतातील पाच कोटी हरिजन समाजाचा आपण एक छोटा भाग आहोत. या पाच कोटी हरिजन व दलित समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी करावयाच्या प्रचंड प्रपंचाचे आपली सोसायटी हे एक छोटे पाऊल असून हे पाऊल पक्के रोवण्यासाठी आपली एकजूट अभेद्य राहू द्या." (वार्षिक अहवाल, १९७०-७१).

४. "सहकारी शेती हे आपले साधन आहे. दलित समाजाला इतर समाजाच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून देणे हे आपले साध्य आहे...बाबासाहेबांनी सर्व दलित समाज आपल्या डोळ्यासमोर ठेवला होता. त्याप्रमाणे आपणही व्यापक दृष्टिकोनातून काम करण्याचे ठरविले पाहिजे." (वार्षिक अहवाल, १९७१-७२).

५. "दोन वेळा चार घास सुखासमाधानाने खाऊन मानाने जगण्याची पहिली पायरी आपण गाठली आहे. इतकेच नव्हे तर गावातील गरजू लोकांना थोडा हातभार लावून त्यांनाही दोन घास मिळवून देण्यात यश आले आहे.... या सोसायटीच्या सभासदांना नियमांद्वारे असलेल्या हक्कांचा आग्रह फारच जपून करावा लागेल व पोटनियमांत काही गोष्टी नसल्या तरी बऱ्याच गोष्टी कर्तव्य म्हणून कराव्या लागतील. प्रत्येक सभासदाने आत्मपरीक्षण करून आपल्यातील कमीपणा समजावून घ्यावा. इतरांना वरती येण्यास हातभार लावणे आपले कर्तव्य आहे. वेळप्रसंगी आपल्याला मिळणाऱ्या दोन घासांतून एक घास काढून ठेवावा लागेल." (वार्षिक अहवाल, १९७२-७३).

६. "सोसायटीची आणखी एक बाजू फारच कच्ची आहे. आपल्यांतीलच एखाद्यास मोठा करून, त्या वेळेपुरते का होईना, त्याचे ऐकून सोसायटी व्यवस्थित चालवण्यास मदत होईल अशी मानसिक शिस्त आपण लावून घेतली नाही. सोसायटी चालविण्याची ताकद तुम्ही मिळविली आहे असे म्हणता येणार नाही. एकोपा टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येकाने नेहमी सावध राहावे. या बाबतीत बायकांनी अधिक समजूतदारपणे वागण्यास शिकले पाहिजे. आपसांतील दुराव्याचे मूळ बऱ्याच वेळा बायकांतील भांडणांत दडलेले असते. लहानसहान गोष्टीला फार महत्त्व दिले जाते...मेलेले मन जिवंत होऊ द्या, तरच एकोपा वाढेल." (वार्षिक अहवाल, १९७-२७३).

७. "दरवर्षी येणाऱ्या उत्पन्नातून जमीनधारकांना भरपूर प्रमाणात खंड न देता आहे त्या प्रमाणातच देण्याचे धोरण ठेवावे व जे लोक शेतावर प्रत्यक्ष राबतात—मग ते जमीनधारक असोत अथवा भूमिहीन असोत—त्यांच्या मजुरीपोटी त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी व त्यांना व त्यांच्या गुराढोरांना व्यवस्थित घरे व गोठे बांधण्यासाठी जास्तीत जास्त रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. सोसायटी हे एक सर्व समाजाला पुढे नेण्याचे साधन आहे या तत्त्वानुसार ज्या घरात राबणारी माणसे नसतील त्या ठिकाणी विशेष व्यवस्था करावी लागेल." (वार्षिक अहवाल, ७३-७४).

८. "संपूर्ण देशातील दलितांचा सर्वांगीण विकास म्हणजे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास होण्यासाठी आता एकच मार्ग उरला आहे, आणि तो म्हणजे 'सहकारी शेतीसंस्थेचे

तत्त्व'. सरकारने दलित-विकासासाठी फार मोठ्या आणि बऱ्याच योजना आखल्या. परंतु त्यांपासून म्हणावे तितके यश सरकारच्या पदरी पडले नाही. शिवाय त्या योजनांचा दलितांना काडीमात्र फायदा झाला नाही. फायदा मात्र इतरांनी उपटला. ही अतिशय खेदाची गोष्ट आहे ...या संस्थेने (विठ्ठल सोसायटी) दलित समाजाच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग सहकारी शेतीच्या रूपाने आपणासमोर ठेवला आहे. अनंत अडचणींना तोंड देऊन हा यशस्वी करून दाखवला आहे. एवढ्याच यशावर समाधान मानून चालणार नाही. हे कार्य म्हैसाळपुरते मर्यादित ठेवावयाचे नाही. तर याचा प्रसार भोवतालच्या गावांतून होऊन ठिकठिकाणी असे प्रकल्प उभे राहिले पाहिजेत आणि ते सर्व प्रकल्प दलितांनीच चालवले पाहिजेत. त्यासाठी म्हैसाळकडे कार्यकर्त्यांसाठी मागणी आहे. ते सहकार्य करावयाचे आपण आपल्या शिरावर घेतलेले आहे. दोन कार्यकर्तेही आपण दिले आहेत." (वार्षिक अहवाल, जून १९८०).

वरील उताऱ्यांवरून आणि इतर संभाषणांवरून असे दिसून येईल की, सर्व दुर्बल आणि दलित लोकांना एकत्रित करण्यावर सातत्याने भर देण्यात आला आहे. हा भर हेतुपूर्वक दिसून येतो. अस्पृश्य जातींच्या समस्या सोडवण्यासाठी आर्थिक दृष्ट्या दुर्बल व शोषित अशा सर्व घटकांना एकत्र आणणे आवश्यक आहे, हा विचार रुजविण्याचा येथे प्रयत्न दिसतो. खेडेगावांत असा प्रयत्न होणे हे अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण खेड्यांतील समाज जातपातीच्या बाबतीत अधिक सनातन आहे. केवळ स्पृश्यांनीच अस्पृश्यांना दूर ठेवले आहे असे नाही, तर अस्पृश्य जातीही आपापसांत जातिभेद आणि अस्पृश्यता मानतात. किंबहुना अस्पृश्य जातींमध्ये जाति-भेदाची भावना अधिक तीव्र आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. ही जातपात दूर करून आर्थिक समान हितसंबंधांवर सर्व दुर्बल घटकांनी एकत्र येणे हे एक दुरापास्त काम मानले जाते.

आजपर्यंत या दृष्टीने जे थोडेफार प्रयत्न झाले, त्यांत अपयशच अधिक प्रमाणात आलेले आहे. काही एका प्रसंगी सर्व दलित जाती आणि इतर गरीब शोषित वर्ग एकत्र येणे निराळे; आणि डोळसपणे जातपातीच्या भिंती उखडून टाकून व्यापक आणि दीर्घ मुदतीच्या लढ्यासाठी एकत्र येऊन एकात्म वर्ग निर्माण करणे निराळे. भारतात या दिशेने प्रयत्नही थोडेच झाले. झाले ते शहरी भागांत अधिक प्रमाणात झाले. त्यांत मिळालेले यश टिकाऊ ठरले नाही. या संदर्भात खेड्यांतून हा विचार मांडणे आणि त्या दृष्टीने कार्यक्रम आखून सातत्याने त्याचा पाठपुरावा करणे हे महत्त्वाचे आहे. या प्रयत्नांना मिळालेले यशापयश हे आपण नंतर पाहूच.

दलितांनी स्वतःची समस्या सोडवण्याच्या पद्धतीबाबतही वरील उताऱ्यांत विशिष्ट भूमिका घेतलेली आहे. स्वतःची आर्थिक परिस्थिती बळकट करणे आणि समाजातील इतर घटकांशी शक्यतो सहकार करणे हा या भूमिकेचा गाभा आहे. समाजात एकात्मता निर्माण करण्यासाठी दलितांनी पुढाकार घ्यावा अशीही अपेक्षा आहे. या भूमिकेत दलितांवरच अधिक जबाबदारी आणि भार टाकलेला दिसतो. सवर्णांवर त्या मानाने जबाबदारी काहीच नाही. सद्यःपरिस्थितीत सवर्ण आपण होऊन दलितांना हात देण्यासाठी आणि त्यांना समान दर्जा देण्यासाठी पुढे येतील अशी शक्यता नसल्यामुळे देवलांनी ही भूमिका घेतलेली दिसते.

परिवर्तनाच्या प्रक्रियेत संघर्ष आणि विधायक कार्य यांचे स्थान कोणते याबाबत कार्यकर्त्यांमधे सतत वाद चालू असतो. या वादाच्या संदर्भात वरील भूमिका समजावून घ्यावयास हवी.

संघर्षवाद्यांचे म्हणणे थोडक्यात असे : आजपर्यंत जातिव्यवस्थेवर प्रहार करणारे समाजसुधारक जनमानस बदलण्यास असमर्थ ठरले. काही सुशिक्षित सवर्णांनी समतेची भावना स्वीकारली. समतेचा पुरस्कार करणाऱ्या काही संस्था निर्माण झाल्या. काही दलितांना मानाची स्थाने मिळाली. त्यांचा गौरव झाला. परंतु सर्वसामान्य दलित जनता हजारो वर्षे होती त्याच अवस्थेत राहिली. बहुसंख्य सवर्णांनीही मनमोकळेपणाने सुधारणांचा स्वीकार केला नाही. ते जुन्या मतांना आणि रूढींना चिकटून राहिले. ग्रामीण भागात तर जातिव्यवस्था जशीच्या तशीच घट्ट राहिली. तीवर ओरखडाही उठला नाही. समाजरचना जशी होती तशीच राहिली. ही परिस्थिती पाहून प्रबोधन व वरवरच्या मामुली सुधारणा यांनी हा प्रश्न सुटणार नाही, आणि सुटायचा झाल्यास हजारो वर्षे लागतील, असे आजच्या पिढीतील काही तरुण कार्यकर्त्यांना वाटते. हा प्रश्न तातडीने सुटला पाहिजे अशी त्यांची कळकळीची इच्छा आहे. विशेषतः दलित तरुणांना आपण अधिक कळ सोसावी हे मान्य नाही.

ही भावना रास्त आहे, याविषयी दुमत होणे शक्य नाही. पण त्यासाठी मार्ग कोणता ? संघर्षवाद्यांना अधिक क्रांतिकारक, झटपट यश देणारा मार्ग हवा आहे. त्यासाठी आवश्यक असल्यास बळाचाही वापर करावा असे त्यांना वाटते. कायद्यांची कठोर अंमलबजावणी हवी; दलितांची आर्थिक हलाखी दूर करणे, अस्पृश्यतानिवारण इत्यादी विधायक कार्य म्हणजे मलमपट्टी आहे. या उपायांनी जातिव्यवस्थेची धार बोथट होऊ शकेल, पण जातिव्यवस्था नष्ट होणार नाही; म्हणून अधिक जालीम, तातडीची उपाययोजना हवी. सवर्णांना समता स्वीकारण्यास सक्तीने, बळजबरीने भाग पाडणारी कृती हवी. सुधारणांचा मानवेल तेवढा डोस देत आणि सनातनी लोकांच्या मानसिक परिवर्तनावर भर देत गेल्यास समतेच्या पायावर उभारलेली नवीन समाजरचना अस्तित्वात येणार नाही. जातपात गाडली जाणार नाही.

याउलट, विधायक कार्यावर भर देणाऱ्यांचे म्हणणे असे सांगता येईल : जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे यात संशय नाही. ती तातडीने व्हावी याबद्दल दुमत नाही. परंतु त्यासाठी सतत विधायक कृती आणि प्रबोधन यांखेरीज मार्ग दिसत नाही. सक्तीने, बळाचा वापर करून ही गोष्ट साध्य होणार नाही. उलट, तोटाच होईल. दलित अल्पसंख्य आहेत. त्यांच्यातही फाटाफूट मोठी आहे. सवर्णांत पुरोगामी विचारी लोकांचा गट लहान आहे. त्यातही प्रत्यक्ष कृतिशील लोकांची संख्या फारच अल्प आहे. अशा परिस्थितीत क्रांतिकारक मार्गाचा अवलंब केल्यास दलितांचे नुकसानच अधिक होईल. जातीजातींतील वैरभाव वाढेल.

म्हैसाळ-प्रकल्पावर 'सुधारणावादी' प्रकल्प म्हणून टीका केली जाते; म्हणून या वादाच्या पार्श्वभूमीवर म्हैसाळ प्रकल्पामागील भूमिका समजावून घेणे अधिक अगत्याचे आहे.

संघर्ष आणि समन्वय किंवा संघर्ष आणि रचनात्मक कार्य यांची सांगड अचूकपणे व शहाणपणाने घातली पाहिजे, अशी संक्षिप्तरूपात या प्रकल्पामागील भूमिका सांगता येईल. जातिव्यवस्था पूर्णपणे नाहीशी करणे हे अंतिम उद्दिष्ट देवल आणि त्यांचे कार्यकर्ते मानतात. हे उद्दिष्ट

गाठण्यासाठी प्रामुख्याने सवर्णांचेच प्रबोधन आवश्यक आहे हे जरी खरे, तरी त्यासाठी दलितांची आर्थिक आणि राजकीय शक्ती प्रथम संघटित करावयास हवी असे त्यांचे मत आहे. यासाठी सुरुवातीस आणि नंतरही आवश्यक असेल तेव्हा समन्वयाची आणि रचनात्मक भूमिका स्वीकारण्याखेरीज गत्यंतर नाही. या देशातच सर्वांना एकत्र नांदायचे आहे, म्हणून संघर्षाचे स्वरूप-देखील या अंतिम उद्दिष्टाचे भान ठेवूनच ठरवावयास हवे. आपली शक्ती संवर्धित होत असताना इतरांना या शक्तीचे भय न वाटता आदर वाटेल अशा तऱ्हेने ही शक्ती वापरावी, असा देवलांचा आग्रह असतो. ही शक्ती आपल्याही फायद्याची आहे, असे सवर्ण व इतर श्रेष्ठांना वाटत राहिले पाहिजे, असे ते सांगत असतात.

देवलांच्याच शब्दांत त्यांची यावाबतची भूमिका अशी : "मी दलितांना नेहमी सांगत आलो आहे की, आपला प्रयोग वर्षाचे तीनशे चौसष्ट दिवस रचनात्मक आणि एक दिवस संघर्षात्मक. याचा अर्थ एवढाच की, रचनात्मक काम फार अवघड असते. त्यासाठी फार चिकाटी लागते. त्यामुळे या कार्यावर भर दिला पाहिजे. रचनात्मक कार्यावर भर देण्याचे कारण असे की संघर्ष पेलण्याची ताकद रचनात्मक कामातून मिळणार असते. संघर्ष अंगावर घेताना आपली ताकद अजमावली पाहिजे. ही ताकद अशा स्वरूपाची हवी की या ताकदीचा सवर्णांनी आदर करावा. यासाठी प्रथम दलित शोषितांना ज्या उपक्रमांनी आत्मविश्वास वाटेल आणि त्यांचे स्वावलंबन व सामर्थ्य वाढेल असे उपक्रम हाती घ्यावे.

"मला दिसतो तो महत्त्वाचा मार्ग म्हणजे गावोगावी महत्त्वाच्या संस्था दलितांना चालवायला देणे. शेतीसंस्था ही अशाच प्रकारची एक महत्त्वाची संस्था. अशा संस्था अगर उपक्रम चालवण्यामुळे आधुनिक उत्पादनतंत्र, व्यवस्थापनशास्त्र इत्यादी आधुनिक विषयांत दलित पारंगत होतील. त्यामुळे आपण इतरांपेक्षा कमी तर नाहीच, उलट काकणभर सरस आहोत, असा विश्वास त्यांना वाटेल. ही परिस्थिती प्राप्त झाली म्हणजे समाजातील इतर लोकांना ते मार्गदर्शन आणि मदत करू शकतील. गावासाठी काही करू लागतील. अनेक क्षेत्रांत त्यांना नेतृत्व लाभेल असे उपक्रम हवेत. हजारो वर्षांच्या अन्यायाचे परिमार्जन आजच्या दलित पिढीने समकालीन सवर्णांवर सूड घेऊन करण्याऐवजी, सवर्णांवर उपकार करून त्यांना लाजवावे असे मला वाटते."

खुद्द म्हैसाळ गावात देवलांनी याच विचारांच्या अनुरोधाने उपक्रम हाती घेतले.

'संघर्ष सतत टाळत राहावे' असे मात्र त्यांचे म्हणणे नाही. संघर्ष काही प्रमाणात अटळच आहे. उदाहरणार्थ, जमिनी मिळविण्यासाठी संघर्ष जरूर करावा असे देवलांचे मत आहे. 'एक पाणवठ्या'साठी सरसकट मोहीम आखावी असे मात्र त्यांना वाटत नाही. काही निवडक ठिकाणी आणि काही विशिष्ट परिस्थितीतच एक पाणवठ्यासाठी संघर्ष करावा. उदाहरणार्थ, जिथे पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे आणि दलितांना सवर्ण पाणी भरू देत नाहीत तिथे संघर्ष करावा; परंतु दलितांची पाण्याची सोय असेल तर पाणवठ्याच्या संघर्षापासून प्रकल्पाला सुरुवात करू नये असे त्यांना वाटते. त्याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात, "पाण्याचा प्रश्न नसताना संघर्ष केला तर दलितांची हलाखी वाढते असा अनुभव आहे. त्यांच्यावर सवर्ण बहिष्कार टाकतात, त्यांना रोजगार मिळणार नाही अशी व्यवस्था करतात. बाहेरच्यांची मदत घेऊन 'एक पाणवठा' प्रस्थापित होऊ शकतो; पण नंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीत मात्र बाहेरचे लोक निरुपयोगी

ठरतात. म्हणून असा संघर्ष करण्यापूर्वी बहिष्कार इत्यादी परिस्थितीला दलित समर्थपणे तोंड देऊ शकतील असे कार्य व्हावयास हवे. नंतरच 'एक पाणवठ्या'साठी संघर्ष करावा."

"म्हैसाळ येथे दलितांची ही प्राथमिक तयारी पूर्ण झाल्यानंतर गरज पडली असती तर पाणवठ्यासाठी जरूर आग्रह धरला असता आणि त्यासाठी संघर्षास तयार झालो असतो," असे देवल म्हणाले. पण तसा प्रसंग आला नाही. म्हैसाळ गावात त्यापूर्वीच अस्पृश्यता नाहीशी होऊ लागली होती आणि श्रीविठ्ठल सोसायटी स्थापन झाल्यानंतर तर झपाट्याने अस्पृश्यता आणि शिवाशिवी नष्ट झाली.

विधायक अथवा संघर्षात्मक कार्याचे अंतिम उद्दिष्ट 'वरिष्ठ वर्गाचे वर्चस्व मोडणे' हे असले पाहिजे. त्यासाठी दुहेरी कार्यक्रम देवल सुचवतात. पहिला वर सांगितल्याप्रमाणे दलितांना महत्त्वाच्या संस्था चालवण्याची संधी देऊन समाजाचे पुढारीपण घेण्यास प्रवृत्त करणे, दलितांमधील सुप्त आत्मविश्वास जागृत करणे आणि दडलेल्या गुणांचा बोध करून घेणे. दुसरा, सवर्णांचे प्रबोधन करणे. देवलांच्या मते म० फुले यांच्यानंतर प्रबोधनाचे काम रेंगाळले. स्वातंत्र्यपूर्व काळात वरिष्ठ लोकांत समाजसुधारणेसंबंधी जेवढी जागृती आणि आस्था होती तेवढी आज नाही. प्रबोधनाचे काम देवलांच्या मते प्रामुख्याने साहित्यिकांच्या हातूनच होईल. साहित्यिकांना याच विषयावर लिहिण्याविषयी आपण आवाहन करावे असे त्यांचे मत आहे.

म्हैसाळ प्रकल्पास सुरुवात झाली ती दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यापासून. त्याचा तपशील इतरत्र दिला आहेच. दूधव्यवसाय आणि त्यानंतर सामुदायिक शेती या मार्गांनी दलितांची आर्थिक स्थिती सुधारली. 'आपण स्वतंत्रपणे जगू शकतो, चांगल्या प्रकारे अर्थार्जन करू शकतो, आणि दलितेतरांजवळ असलेले कौशल्य आपणही आत्मसात करू शकतो,' हा आत्मविश्वास दलितांना मिळाला. परंतु केवळ आत्मोन्नतीवरच संतुष्ट न राहता एकात्म समाज निर्माण करण्यासाठी आपण हातभार लावला पाहिजे, किंबहुना पुढाकार घेतला पाहिजे, हा विचार सातत्याने मांडत राहिल्याने यानंतरचे पाऊल टाकले गेले. अशा उपक्रमांमध्ये दुष्काळात लहान शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या योजनेचा विशेष उल्लेख करता येईल. त्याचा तपशील पुढे येईलच. येथे एका लहान प्रसंगाचे उदाहरण देऊन दलितांवर संस्कार कशा प्रकारे केले गेले हे स्पष्ट करता येईल.

सवर्णांतील एका श्रीमंत शेतकऱ्याने काही बाचाबाचीत संस्थेच्या एका कार्यकर्त्याला चपराक दिली आणि अपशब्द वापरले. त्यावरून गावातील वातावरण तापले. सर्व दलित लोक जमले आणि 'ज्याने अपराध केला त्यास गावाने शासन करावे' असा आग्रह त्यांनी धरला. समान नागरिक कायद्याखाली खटला भरावा असेही ठरले. परंतु नेहमीच्या पद्धतीप्रमाणे दलित लोकांची बैठक झाली व त्यात या प्रकरणावर दीर्घकाळ चर्चा झाली. चर्चेस बराच काळ मी उपस्थित होतो. चर्चेत साधारणपणे दोन गट पडले. एक गट, विशेषतः तरुण लोकांचा, योग्य तो बदला घेण्यावर भर देत होता. पण 'बदला म्हणजे काय' हा प्रश्न उपस्थित झाल्यावर फारसे स्पष्टीकरण कोणी देऊ शकले नाही. सरतेशेवटी अपराध करणाऱ्या सवर्णाने माफी मागावी आणि प्रकरण मिटवावे असा इतरांचा, विशेषतः देवलांचे प्रथम काळातील सहकारी यांचा,

सल्ला एकमताने मान्य झाला. माफी मागून प्रकरण संपले आणि गावात पहिल्यासारखेच वातावरण प्रस्थापित झाले.

या प्रकरणाची चिकित्सा नंतर काही दिवस होत होतीच. त्यामध्ये या घटनेचा अर्थ लावण्यावर विशेषतः भर दिला जात होता. पूर्वीचा जमाना आणि आजचे दिवस हे दोन्ही ज्यांनी पाहिले होते व संस्था स्थापन करण्यापासून वाढवण्याच्या कार्यात ज्यांनी कष्ट उपसले होते त्यांना या घटनेत मोठा विजय दिसत होता व हे लोक ही गोष्ट इतरांना जिद्दीने समजावून सांगत होते. त्यांच्या म्हणण्याचा आशय थोडक्यात असा :

अपराधी इसमाने माफी मागावी, याबाबत गावातील सवर्ण पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला. झालेल्या प्रकाराबद्दल सर्वांनी प्रांजळपणे तीव्र शब्दांत नापसंती व्यक्त केली आणि त्याची परिणती अपराधी सवर्णाने एका दलित कार्यकर्त्याची माफी मागण्यात झाली. हा आपला मोठा विजय आहे. हे पूर्वीच्या जमान्यात घडले असते का? पूर्वी सर्रास शिवीगाळ, मारहाण होत असे; आज ती होत नाही याचे प्रमुख कारण आपली एकजूट आणि त्याचबरोबर आपली वाढती प्रतिष्ठा. ही एकजूट व प्रतिष्ठा आपण आपल्या कष्टाने जोपासली. ती कोणी आपणांस बहाल केलेली नाही. हे आपण मिळविलेले बळ शहाणपणाने न वापरल्यास आपले अंतिम उद्दिष्ट गाठले जाणार नाही. आपण आपल्या उद्दिष्टापासून अजून बरेच दूर आहोत. सर्व दलित आणि शोषित समाज आपल्याला संघटित करायचा आहे. ह्या कामात आपली प्रगती अजून फारशी झालेली नाही. या कामात आपणांस सर्व जातीजमातींतील आणि वर्गांतील पुरोगामी व्यक्तींना बरोबर घेतल्याखेरीज यश येणार नाही. म्हणून अशा घटना जेव्हा घडतात तेव्हा एकप्रकारे ह्या घटनांचे स्वागतच केले पाहिजे. कारण अशा घटनांतूनच आपल्या संघटित शक्तीचा अंदाज येतो आणि ही शक्ती आपण कशा प्रकारे पुढील कार्यासाठी वापरावी हे स्पष्ट होण्यास मदत होते.

दलित श्रेष्ठांनी मांडलेला हा विचार मान्य झाला. थोडीफार कुरबूर होत राहिलीच; नाही असे नाही. परंतु आपण विजय मिळविला असून एक पाऊल पुढे टाकले आहे असे बहुतेकांस वाटले. त्याचप्रमाणे बदल्याची भाषा पोकळ आहे असेही बहुतेकांना वाटले. तरुणांच्या प्रतिक्रियेचे वर्णन करताना आबा पिरू म्हणाले, "हे लोक मारुतीसारखे आहेत. मारुतीने आपल्या पेटत्या शेपटीने लंकेतील सर्व घरांना आग लावण्याचा सपाटा चालवला. हेही तसेच करू पाहतात. पण त्यात आपलेही घर जळते याचे त्यांना भान नाही. एका श्रीमंत सवर्णाने आमची माफी मागितली हाच खरा विजय. आणि तो आम्ही आपल्या परिश्रमाने मिळवलेला आहे." या विधानात दलित पुढाऱ्यांची परिपक्वता दिसते.

अशा लहानमोठ्या प्रसंगांतून दलितांवर नवीन विचारांचा प्रभाव पाडण्याचा देवलांचा प्रयत्न दिसतो. संघर्ष टाळण्याची त्यांची इच्छा नाही. दलितांचा फायदा होईल अशा रीतीने संघर्ष-प्रसंग हाताळण्यावर त्यांचा भर आहे.

सामुदायिक शेती : यश आणि धडे

१९७७-७८ अखेर श्रीविठ्ठल सोसायटीच्या खातेदार सभासदांची संख्या १०५ होती आणि शेतीखाली एकूण सुमारे १४५ एकर जमीन होती. त्यापैकी १०० एकर बागायत होते. एकूण भांडवली गुंतवणूक रु० २,२५,००० होती. यात प्रामुख्याने शेतीसाठी लागणारी आधुनिक साधने, गोबर गॅस प्लँट, विहिरी, इमारत-बांधकामाचा-खर्च, जनावरे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. १९६९-७० ते १९७२-७३ या चार वर्षांच्या काळात संस्थेला 'ब' दर्जा मिळाला. तेथून पुढे मात्र सतत आजतागायत संस्थेने आपला 'अ' वर्गाचा दर्जा टिकविलेला आहे.

संस्थेने दरसाल खालीलप्रमाणे निव्वळ नफा मिळवला :

तक्ता क्र० ६.१

श्रीविठ्ठल सोसायटीचा निव्वळ नफा

वर्ष	*निव्वळ नफा*
	रुपये
१९६९–७०	९३५
७०–७१	४१७८
७१–७२	१११५१
७२–७३	९१३०
७३–७४	५८८३
७४–७५	४७६४
७५–७६	४८७०
७६–७७	१०४३४
७७–७८	९९८६

एकूण नफ्याचे प्रमाण फार जरी नसले तरी सर्व खर्च भागून काही शिल्लक राहिली हे महत्त्वाचे आहे. एकूण विक्रीतून सर्व खर्च वजा केल्यानंतर राहतो तो निव्वळ नफा. खर्चामध्ये

खालील बाबींचा समावेश होतो : (१) मशागत, (२) बियाणे, खते, औषधे इत्यादी, (३) मजुरी, (४) खंड, (५) वार्षिक गड्यांचा पगार, (६) शेतसारा, यंत्रदुरुस्ती, (७) छपाई, व्याज, टपालखर्च, स्टेशनरी इत्यादी, (८) संस्थेच्या कायम नोकरांचा पगार आणि प्रवासखर्च, (९) वीज-बिल, (१०) बँक-कमिशन, ऑडिट-फी इत्यादी, (११) किरकोळ खर्च.

नफ्याचे प्रमाण हे पीक-रचनेवर अवलंबून असते. काही पिकांपासून निव्वळ नफा मोठ्या प्रमाणावर मिळतो, तर काही पिकांचे खर्च वजा जाता निव्वळ उत्पन्न नाममात्र असते. सामुदायिक शेती फायदेशीर व्हायची असल्यास विचारपूर्वक पीकरचना आखायला हवी. वैयक्तिक शेती प्रामुख्याने उदरनिर्वाहासाठी असल्यामुळे ही बाब लक्षात घ्यावी लागत नाही. परंतु सहकारी शेतीमध्ये खर्चाच्या बाजूला बऱ्याच बाबी असतात. म्हणून ज्या पिकांमध्ये निव्वळ नफ्याचे प्रमाण जास्त आहे अशा पिकांचा समावेश करण्याकडे कल ठेवावा लागतो. श्रीविठ्ठल सोसायटीत याचा विचार कसा केला जातो, हे एका वर्षाच्या तपशिलावरून आणि भावी काळातील योजनांवरून लक्षात येईल.

१९७६-७७ मध्ये एकूण बागायतक्षेत्र खालीलप्रमाणे होते :

तक्ता क्रमांक ६·२

पीकरचना : १९७६-७७

पिके	*क्षेत्र* *ए० गुंठे*	*एकूण विक्री* रु०	*दर एकरी प्रमाण* रु०
ऊस	२७–२०	१५१६६०	५५१४
द्राक्ष	१–०४	१७२९६	१५७२४
कापूस	१०–००	७५२८६	७५२९
ज्वारी	२९–००	२६३९७	९१०
गहू	२३–००	१३५८७	५९०

[उसाचे पूर्ण उत्पादन हाती पडलेले नव्हते.]

वरील माहितीवरून पैशाची पिके अधिक फायदेशीर असतात हे स्पष्ट होते. उत्पादनखर्चाचा विचार येथे केलेला नाही.

पीकवार उत्पादनखर्च पद्धतशीरपणे लिहिलेला नाही. परंतु काही वर्षांच्या आकडेवारीवरून कल्पना येते. उदाहरणार्थ, १९७७–७८ या वर्षी संकरित ज्वारी दहा एकर होती. एकूण उत्पन्न रु० १९६६० आले. खर्च रु० ८६२० झाला. निव्वळ नफा रु० ११०४० झाला. एकरी नफ्याचे प्रमाण रु० ११०४ होते. हे वर्ष 'चांगले' म्हणून मानले जाते. म्हणजे सरासरी नफ्याचे प्रमाण यापेक्षा कमी असते, असे मानावयास हरकत नाही. खर्चाच्या बाबतीत संस्था चालवण्यासाठी लागणारा खर्च समाविष्ट केलेला नाही. तो सर्व पिकांसाठी एकत्रित धरला

पाहिजे. त्याचा वाटा वजा केल्यास नफ्याचे प्रमाण थोडे कमी होईल.

हुलगा हे दुसरे धान्याचे पीक. ज्वारीनंतर त्याच दहा एकर जमिनीत हुलगा घेतला. त्यापासून दर एकरी निव्वळ उत्पन्न फक्त रु० ३४५ आले. गहू पाच एकरांत घेतला. त्याचे एकरी निव्वळ उत्पन्न फक्त रु० २५६ आले. पण या वर्षी गव्हास हवामान अनुकूल नव्हते.

अन्नधान्याची पिके फारशी फायद्याची नसल्यामुळे पैशाच्या पिकांवर अधिक भिस्त ठेवली जाणे साहजिकच आहे. जास्तीत जास्त जमीन पैशाच्या पिकांखाली आणण्याचा कल यामुळे दिसून येतो. यांत ऊस आणि द्राक्षे यांचा प्रामुख्याने समावेश आहे. गेल्या वर्षी द्राक्षाखाली एकूण दहा एकर जमीन आणण्याचे ठरविले ते याच कारणासाठी. दरवर्षी तीन एकर याप्रमाणे तीन वर्षांत एकूण नऊ एकर व पूर्वीचा एक एकर याप्रमाणे १९८१ अखेर दहा एकर जमीन द्राक्षाखाली आणण्याची योजना कार्यान्वित होती. यासाठी काही संस्थांमार्फत एक लाख रुपयांचे विनव्याजी कर्ज आणि दोन लाख रुपयांचे अनुदान मिळालेले आहे. द्राक्षाचे निव्वळ उत्पन्न एकरी किमान रु० १०००० धरले (प्रत्यक्षात ते रु० २०००० पर्यंत सहज येऊ शकेल), तरी रु० एक लाख निव्वळ नफा मिळू शकतो. त्यामुळे कर्जफेड करणे अवघड नाही.

पानमळा हे उत्पन्नाचे असेच एक उत्तम साधन आहे. आज दीड एकर जमीन पानमळ्याखाली आहे. पानमळा लावून सुमारे दीड वर्ष झाले. पानमळ्याचा सुरुवातीचा खर्च बराच असतो. हा खर्च रु० २५४६८ आहे. परंतु याच अल्प काळात उत्पन्न रु० ४५७२० मिळाले. म्हणजे निव्वळ उत्पन्न रु० २०२५२ आले. शिवाय रोज वैरणीचे २ भारे (रु० २०) मिळतात.

सभासदांना त्यांच्या जमिनीचा खंड दिला जातो. सभासदाच्या जमिनीचे प्रमाण व जमिनीची प्रत यांवर खंड अवलंबून आहे. जमिनीच्या तीन प्रती ठरल्या आहेत. प्रत्येक प्रतीचा खंड खालीलप्रमाणे :

तक्ता क्र० ६.३

जमिनीचा खंड—दर एकरी

प्रत	*१९७४ पूर्वी* रु० एकरी	*१९७४–७५* रु० एकरी	*१९७५–७६* रु० एकरी	*७७–७८* रु० एकरी	*एकूण जमीन* एकर
अ	३००	४००	५००	५००	४८
ब	१००	३००	३००	४००	१८
क	५०	२००	२००	३००	३९
ड				२००	२२
					१२७

खंडाचे प्रमाण वाढते आहे हे यावरून लक्षात येईल.

१९७७–७८ या वर्षी एकूण रु० ३८,७२३ खंड वाटण्यात आला. सभासदांत त्याची विभागणी खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्र० ६.४

खंड–रकमेप्रमाणे सभासदांची वर्गवारी

खंड रु०	*सभासद–संख्या*
५०० पर्यंत	४९
५०१ ते १०००	९
१००१ ते १५००	४
१५०१ ते २०००	१
४००१ ते ४५००	२
४५०१ ते ५०००	१
	एकूण ६६

बहुसंख्य सभासदांना रु० ५०० च्या आत खंड मिळाला. याचे कारण बहुसंख्य सभासदांची शेती अर्ध्या एकराच्या आत होती.

खंडाशिवाय मजुरी हे सभासदांना एक उत्पन्नाचे साधन आहे. सामान्यतः सरासरी सभासद कुटुंबास रु० ५०० खंडापोटी व रु० १२०० मजुरीपोटी मिळतात असे गृहीत धरण्यास हरकत नाही. जुलै ७८ ते जून ७९ या वर्षात एकूण ५४ सभासद कुटुंबांनी रु० ९६५०५ मजुरी मिळविली. त्यांची विभागणी खालीलप्रमाणे :

तक्ता क्र० ६.५

मजुरीप्रमाणे सभासदांची वर्गवारी

रक्कम रु०	*सभासद–संख्या*
५०० पर्यंत	६
५०१–१०००	३
१००१–१५००	१८
१५०१–२०००	१५
२००१–२५००	३
२५०१–३०००	४
३००१–३५००	१
३५०१–४०००	३
६००१–६५००	१
	एकूण ५४

सर्वसाधारणपणे रु० १००० ते रु० २००० मिळवणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यापेक्षा अधिक मजुरी मिळवणाऱ्यांच्या कुटुंबांत अधिक माणसे मजुरी करणारी असतात. अधिक कष्ट हेही अधिक मजुरी मिळवण्याचे कारण असू शकते.

ही सर्व मजुरी श्रीविठ्ठल सोसायटीच्या शेतीवर काम करून मिळवलेली नाही, कारण सोसायटीच्या शेतावर एकूण मजुरीप्रीत्यर्थ पडलेला खर्च कमी होता.

सोसायटीने दिलेली एकूण मजुरी सुमारे रु० ५१८६७ होती. सभासदांनी वर्षाकाठी मिळवलेली एकूण मजुरी रु० ९६५०५ होती. म्हणजे सभासदांनी एकूण रु० ४४६३८ मजुरी इतर शेतांवर काम करून मिळवलेली आहे. सभासदांनी सोसायटीच्या शेतावर नेमके किती दिवस काम करून किती मजुरी मिळविली हे सांगता येणे कठीण आहे. परंतु सोसायटीच्या शेतीवर काम करून मगच त्यांनी इतरत्र काम केले असे गृहीत धरले तर असा निष्कर्ष निघतो की सोसायटीची शेती सर्व सभासदांना वर्षभर मजुरी देण्यास असमर्थ आहे. त्यामुळे मजुरीसाठी सभासदांना इतरत्र काम शोधण्याखेरीज गत्यंतर नाही. या निष्कर्षास सोसायटीचे कर्मचारी दुजोरा देतात.

या परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या समस्या निर्माण होतात. सोसायटीच्या शेतीवर काम मागणाऱ्यांची संख्या अधिक झाल्यास 'कोणास काम द्यायचे आणि कोणास द्यायचे नाही ?' हा पहिला मोठा प्रश्न उभा राहतो. परंतु सुदैवाने हा प्रश्न कधी निर्माण झाला नाही. त्याची कारणे दोन : म्हैसाळमध्ये आणि परिसरातील गावांत गेल्या दहा वर्षांत अनेक उपसा-सिंचन-योजना निर्माण झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर बागायती शेती तयार झाली. खुद्द म्हैसाळ गावात लागवडीखालील एकूण जमिनीपैकी ८८ टक्के जमीन बागायत आहे. बागायत क्षेत्रात प्रामुख्याने ऊस, द्राक्षे, मका, भात, गहू, संकरित ज्वारी इत्यादी पिके घेतली जातात. बागायत क्षेत्राचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याने गावातील बेकारी नष्ट झाली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ज्याला काम हवे त्याला काम मिळते हा सर्वांचा अनुभव आहे. दुसरे कारण असे की मजुरीचे दरही या कामाबरोबर वाढले. गावात व आसपास पुरुषांस रोजी रु० चार ते रु० पाच याप्रमाणे व स्त्रियांस रोजी रु० तीन ते चार याप्रमाणे मजुरी मिळते. श्रीविठ्ठल सोसायटीने सुरुवातीच्या काळात गावातील दरापेक्षा आपला दर जास्त ठेवला होता. आज ही तफावत दिसत नाही. उलट, काही प्रमाणात सोसायटीचा दर गावातील दरापेक्षा कमीच दिसतो. स्त्रियांना अडीच रुपये दराने मजुरी मिळते. पुरुषांना सर्वसाधारणपणे रोजी साडेतीन रुपये मजुरी मिळते. पण काही विशिष्ट कष्टाच्या व जोखमीच्या कामासाठी रोजी चार रुपये मजुरी मिळते. इतरत्र मिळणाऱ्या दरात व सोसायटीच्या दरात, थोडा का होईना, पण फरक जाणवतो. यामुळे सोसायटीच्या कामावर मजुरांची ओढ असतेच असे नाही. गावात मजुरीचा दर जास्त पडतो याचे एक कारण असे की गेल्या तीनचार वर्षांत मजूर लोक ठेक्यावर काम मागतात. मजुरांचे गट तयार झाले असून गटाचा प्रमुख ठेक्याने काम घेतो. असे ठेक्याने काम घेतल्याने दरडोई मजुरीचा दर जास्त पडतो असा अनुभव आहे. बागायत क्षेत्र वाढल्याने रोजगारी वाढली व त्यामुळे ठेक्याने काम देण्याचा मजुरांचा आग्रहही मान्यता पावत आहे.

या परिस्थितीमुळे श्रीविठ्ठल सोसायटीवरील सभासदांना काम देण्याचे दडपण कमी झाले असे

म्हणावयास हरकत नाही. उलट, एक नवीनच समस्या निर्माण झाल्यासारखी दिसते. सोसायटीच्या शेतीवर कामासाठी आवश्यक तेवढे मजूर मिळत नाहीत. 'आपणांस योग्य दर्जाचे व योग्य प्रमाणात मजूर मिळत नाहीत,' अशी तक्रार सोसायटीचे सर्व कर्मचारी करताना दिसतात. सभासद आपण होऊन कामावर येण्यास राजी नाहीत असे दृश्य आज दिसत आहे. कामावर येणाऱ्या मजुरांत सभासदांच्या कुटुंबांतील मंडळींचे प्रमाण फार तर ७० टक्के असेल. उरलेले ३० टक्के बाहेरचे. पण याबाबत निश्चित माहिती मिळणे कठीण आहे. कामावर असलेल्या मजुरांना विचारले असता, सभासद मजुरांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी असते अशी माहिती मिळाली. बायकांमध्ये हे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे एका स्त्रीमजुराने सांगितले. त्यातही कठीण कष्टाच्या कामात सभासद मजुरांचे प्रमाण बरेच कमी असते. सभासद मजूर हे कार्यक्षम असतातच असेही नाही. सभासदांच्या घरातील वयस्कर मंडळी, लहान मुले व इतर (तुलनात्मक दृष्ट्या) अकार्यक्षम लोक यांचा भरणा सामुदायिक शेतीवरील कामात अधिक असतो, धडधाकट लोक इतरत्र कामावर जातात अशी तक्रार कानावर येते, तिच्यात बरेच तथ्य आहे असे वाटते.

सभासद कुटुंबांत, विशेषतः तरुण पिढीत, शेतीत कष्ट करण्याची इच्छा कमी होत आहे, असे नजरेस येते. याचे एक प्रमुख कारण असे की, दूधव्यवसायामुळे दलित कुटुंबांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. जमिनीचा खंड निश्चितपणे व वाढत्या प्रमाणात मिळू लागल्याने दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारली. जीवनाला स्थैर्य आले. शेतीच्या मानाने दूधव्यवसायात कष्ट कमी पडतात. त्यात धोकाही कमी. भाव ठरलेले आणि विक्रीव्यवस्था सोपी व सुटसुटीत. अलीकडे म्हशींऐवजी गायी मिळण्याची सोय झाली, त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढले. गायींसाठी कर्जपुरवठा सहजपणे उपलब्ध झाला. त्यामुळे दुभती जनावरे वाढविण्याकडे अधिक कल आहे. घरातील एक माणूस जनावरांकडे लक्ष देण्यास पुरेसा होतो.

या बदललेल्या परिस्थितीमुळे दलितांचे जीवनमान बरेच सुधारले. आर्थिक परिस्थिती सुधारली म्हणून अधिक कष्ट करण्याची गरज कमी झाली. आज गावात बरेच तरुण रिकामे दिसतात. पण ते शेतावर कामास जाण्यास तयार नसतात. सामुदायिक शेतीवर बाहेरचे मजूर नेमून काम करून घ्यावे असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांच्या चर्चेत खंड वाढवण्यावर भर असतो, परंतु मजुरीचे दर वाढवण्यावर भर नसतो. खंड अधिक झपाट्याने वाढला पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. 'एकरी दोन हजार रुपये निव्वळ नफा मिळू शकतो, मग खंड फक्त पाचशे रुपये का?' असा त्यांचा सवाल आहे.

शेती-सोसायटी स्थापन करणे सोपे, परंतु ती सतत चांगल्या प्रकारे चालवणे हे अवघड काम आहे. आपल्या देशातील सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनाचा अनुभव निराशाजनक आहे. साहजिकच श्रीविठ्ठल सोसायटीचा या क्षेत्रातील अनुभव कसा आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे.

खातेदार सभासदांची वर्षातून एकदा सर्वसाधारण सभा होते. त्यात कार्यकारिणीची निवडणूक होते. कार्यकारिणीत अकरा सदस्य असतात. कार्यकारिणी अध्यक्षाची निवड करते. या वर्षीच्या कार्यकारिणीत एक स्त्री-सभासद होती. ती पूर्वायुष्यात देवदासी होती. श्रीविठ्ठल सोसायटीचे काम

सुरू झाल्यानंतर तिने देवदासीचे काम सोडले. कार्यकारिणीची बैठक महिन्यातून एकदा होते. सर्व सभासद उपस्थित असतात. कार्यकारिणी सोसायटीच्या कारभाराबाबत सर्व निर्णय घेते व त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्था करते.

सोसायटीचे काम रोजच्या रोज ठरविण्यासाठी म्हणून रोज रात्री एक बैठक होते. त्यास 'वर्दी' म्हणतात. या बैठकीस सोसायटीचे चेअरमन, मुकादम, कार्यकारिणीचे काही सभासद व इतर सभासदही हजर असतात. वर्दी रोज बराच वेळ चालते. झालेल्या कामाचा आढावा आणि दुसऱ्या दिवशीचे काम यांवर सविस्तर चर्चा होते व निर्णय घेतले जातात.

कार्यकारिणीचे सदस्य बदलत असल्याचे दिसते. अध्यक्षही बदललेले आहेत. सध्याचे अध्यक्ष तरुण असून सुशिक्षित व कार्यक्षम म्हणून ख्यातनाम आहेत. दिवसभर ते सोसायटीच्या कामात दंग असतात. दिवसातून एकदा शेतावर फेरफटका मारतात. कार्यकारिणीच्या अकरा सभासदांपैकी सात सभासद निरक्षर होते. सदस्यांनी आपापसांत खातेवाटप केले आहे. दूधविभाग, यंत्रविभाग आणि शेतीविभाग असे तीन प्रमुख विभाग आहेत. याशिवाय सर्वसाधारण विभाग आहे. सभासदांत शेतीच्या कारभाराविषयी जागरूकता दिसून येते. प्रत्येक बाबीवर सविस्तर चर्चा होते. मतभेद स्पष्टपणे मांडले जातात. निर्णय बहुधा एकमताने घेतला जातो.

सर्वसाधारणपणे संस्थेचा कारभार चांगला चाललेला दिसतो. काही प्रमाणात अकार्यक्षमता आहे यात संशय नाही. पण या अकार्यक्षमतेबद्दलदेखील मोकळेपणाने सभासद आपापसांत आणि इतरांशीही बोलतात, हे वैशिष्ट्य आहे.

श्रीविठ्ठल सोसायटीची शेती सात तुकड्यांमध्ये विभागली गेलेली आहे आणि हे सात तुकडे निरनिराळ्या ठिकाणी आहेत. या सात तुकड्यांची नावे अशी : (१) म्हारकी, (२) मळी, (३) देसकत, (४) गस्त्याचे माळ, (५) घाबरेपट्टी, (६) चांभाराचे माळ, (७) घालवाडे पट्टी.

यांपैकी म्हारकी व मळी गावठाणातच आहेत. देसकत गावठाणापासून एक मैलावर, गस्त्याचे माळ व घाबरेपट्टी सुमारे तीन मैलांवर, चांभाराचे माळ आणि घालवाडे पट्टी एक मैलावर, अशा रीतीने ही शेते विखुरलेली आहेत. सर्व शेते सारख्या प्रतीची नाहीत. सर्व शेतांकडे लक्षही सारख्या प्रमाणात दिले जात नाही. व्यवस्थापनाच्या दृष्टीने या विभागणीमुळे गैरसोय होते. प्रत्येक तुकड्याचे थोडक्यात वर्णन दिल्याने, सोसायटीच्या सर्वसाधारण कार्यक्षमतेबाबत कल्पना येण्यास मदत होईल.

१. **म्हारकी** : एकूण बावन एकरांचा हा सलग तुकडा सर्वांत महत्त्वाचा मानला जातो. हे शेत संपूर्णपणे बागायती आहे. आणि जमिनीची प्रतही चांगल्या दर्जाची आहे. सोसायटीच्या मालकीची कृष्णा नदीवरील उपसा-योजना या शेतात आहे. एक विहीरही या शेतात बांधलेली असून तीवर पाच अश्वशक्तीची एक वीज-मोटर बसवण्यात आली आहे. गावठाणाला लागूनच हे शेत असल्यामुळे साहजिकच या शेताकडे जास्त लक्ष दिले जाते. सध्या या शेतात एक एकर जुनी द्राक्षबाग व दीड एकर पानमळा उभा आहे. ही दोनही पिके सोसायटीला भरपूर उत्पन्न देणारी आहेत. याच शेतात दहा एकरांपर्यंत द्राक्षबाग वाढवण्याची नवीन योजना अंमलात आणली जात आहे. याशिवाय साडेबारा एकरांवर वरलक्ष्मी कापसाचे पीक घेतले जाते. उरलेल्या क्षेत्रात प्रामुख्याने ऊस घेतला आहे. देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने हा तुकडा सोयीचा आहे.

२. **मळी** : हा तेरा एकरांचा तुकडा कृष्णा नदीच्या काठावर असून त्याचा उपयोग सभासदांच्या जनावरांना लागणारी वैरण करण्यासाठी केला जातो. ही जमीन सभासदांत वाटून दिली असून दरसाल रु० १७५ पट्टी आकारली जाते. यास पाणी देण्यासाठी पाच अश्वशक्तीची मोटर बसवण्यात आली आहे. सभासद गवत कापून नेतात. पाणी देण्याचे व राखण करण्याचे काम सोसायटी करते.

३. **देसकत** : ही जमीन सात एकर वीस गुंठे आहे. या जमिनीचा पूर्वेतिहास असा : मुळात हे रान छत्तीस एकर होते. त्यावर सरकारची मालकी होती. पूर्वीच्या रिवाजाप्रमाणे हे रान दरवर्षी लिलाव होऊन महार कुटुंबांना एकत्रित कसण्यासाठी मिळत असे. ही छत्तीस एकर जमीन त्रेपन्न महार लोकांमध्ये विभागली जात असे. प्रामुख्याने ज्वारी व वैरण यांसाठी या रानाचा उपयोग होत होता. वैरण व ज्वारी यांच्या उत्पादनाचे त्रेपन्न सारखे वाटे होत असत. १९५३ ते १९५६ ही तीन वर्षे अशा तऱ्हेने या जमिनीचा वापर होत होता. परंतु नंतर पक्षीय राजकारण आडवे आले. गावकऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे महार लोकांनी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा न दिल्यामुळे लिलाव महारांच्या बाजूने होणे बंद झाले. १९५७ मध्ये जमीन कोणासच दिली गेली नाही. ती पडीक राहिली. पुढील वर्षी मामलेदार स्वतः गावी आले. त्यांनी या शेतातील चौवीस एकर जमीन महार कुटुंबांना आणि बारा एकर मातंग कुटुंबांना वाटून दिली. नंतर त्यातही बदल झाला. शाळेला सात एकर, मातंग लोकांना सात एकर, बाहेरच्या तीन इसमांस प्रत्येकी पाच एकर असे वाटप होत होत महार कुटुंबांच्या वाट्याल फक्त साडेसात एकर आले. "काँग्रेसविरोधामुळे आमच्यावर हे संकट आले," असे सर्व सभासद एकमुखाने म्हणतात. आज ही साडेसात एकर जमीन चौतीस महार कुटुंबांत विभागली गेली आहे. ही सर्व जमीन त्यांनी सोसायटीत सामील केली. परंतु या जमिनीचा गेली सुमारे चार वर्षे उपयोग होत नाही. कारण आसपासच्या उपसा-योजनांमुळे या जमिनीत पाणी साचून ती क्षारयुक्त झाली आहे. यावर उपाययोजना होत नाही, त्यामुळे जमिनीचा आज काहीच उपयोग होत नाही. झटपट उपाययोजना करण्याबाबत फारशी हालचाल दिसत नाही.

४. **गस्त्यांचे माळ** : एकूण पस्तीस एकरांचे हे शेत गावापासून बरेच दूर, रेल्वेस्टेशनजवळ आहे. दोन वर्षांपूर्वी एक विहीर खणल्यामुळे पाण्याची सोय झाली आहे. परंतु विहिरीचे पाणी वापरण्यास अजून सुरुवात झालेली नाही.

५. **चांभाराचे माळ** : एकूण बावीस एकर बावीस गुंठे असलेले हे शेत एका चांभार कुटुंबाच्या मालकीचे आहे. त्याने हे आपले शेत श्रीविठ्ठल सोसायटीच्या शेतात समाविष्ट करून घेतले. महारेतर वर्गातील इसमांना सभासद करून घेण्याचा हा प्रयत्न श्रीविठ्ठल सोसायटीच्या मूळ उद्दिष्टांस धरून आहे. विविध जातींचे लोक एकत्र आणणे हा एक सोसायटीचा प्रमुख हेतू आहे हे पूर्वी सांगितले आहेच. सोसायटीत हे शेत सामील करण्याचा करार दि० ६-१०-७७ रोजी झाला. वार्षिक खंड एकरी दोनशे रुपये ठरला आहे. या इसमाचे पूर्वीचे रु० ५३९५० कर्ज होते. सोसायटीने हे कर्ज फेडण्याची जबाबदारी स्वीकारली. आणि त्याशिवाय या इसमास दरसाल एकरी दोनशे रुपये खंड देण्याचे कबूल केले. कराराची मुदत बावीस वर्षांची आहे.

६. **घालवाडे पट्टी** : या शेताचा आकार सुमारे तीन एकर पंधरा गुंठे असून, ते एका

मराठा कुटुंबाच्या मालकीचे आहे. यांचे पूर्वीचे सहा हजार रुपये कर्ज होते. वरीलप्रमाणेच याही शेताबाबत करार झालेला आहे.

७. **घाबरे पट्टी** : नरवाड या तीन मैलांवरील गावात राहाणाऱ्या घाबरे या लिंगायत जातीच्या कुटुंबाचे साडेनऊ एकर आकाराचे शेत श्रीविष्ठल सोसायटीने वरीलप्रमाणेच कसण्यास घेतले आहे. या जमिनीवर एकूण बोजा तीस हजार रुपये होता. पंधरा वर्षांचा करार असून या काळात सोसायटी जी गुंतवणूक या शेतावर करील त्या गुंतवणुकीसह हे शेत श्रीविष्ठल सोसायटीने घाबरे यांस परत करायचे आहे.

या सर्व तुकड्यांवर सारख्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. 'म्हारकी'ची सर्वांत चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाते. परंतु येथेही काही वेळा दुर्लक्ष होते असे दिसून आले. ऑगस्ट १९७९ या महिन्यात दोन एकर उसाला पाणी घातले गेले नाही म्हणून हे पीक वाया गेले व जनावरांना वैरण म्हणून सभासदांना विकून टाकावे लागले. हे टाळता आले असते. परंतु उद्याच्या कामाचे नियोजन आज न करण्याच्या प्रवृत्तीमुळे हे नुकसान टाळणे अशक्य झाले, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

चालढकल वृत्तीचे आणखी एक उदाहरण विजेच्या बिलासंबंधी. वीज-बिलाचा आकार मीटर-प्रमाणे किंवा अश्वशक्तीप्रमाणे करता येतो. वापरणाऱ्याने आपली निवड वीज-बोर्डास कळवायची असते. अश्वशक्तीप्रमाणे आकार केल्यास वीज-बिलात बरीच सूट मिळते. हे माहीत असूनही संस्थेच्या अधिकाऱ्यांनी त्याप्रमाणे कारवाई केली नाही. याचेही कारण निष्काळजीपणा हेच म्हणावे लागेल.

गस्त्याच्या माळावर अडीच एकर कापूस होता. तो मे ७९ च्या सुरुवातीसच काढून टाकलेला होता. त्यानंतर चार महिने झाले तरी त्या शेतात औत फिरलेला नव्हता. त्यामुळे तिथे गवताचे साम्राज्य पसरलेले होते. याच जमिनीत धडक योजनेच्या दोन तोट्या आहेत. त्यांचे पाणी गरज नसताना दोन पाटांतून घेतलेले आहे. त्यामुळे बरीच जमीन 'भिजाक' झाली आहे. या जमिनीची प्रत खराब होण्याच्या मार्गावर आहे असे त्या वेळेस दिसत होते. थोडा मजबूत पाट केला असता तर हा धोका टाळता येणे शक्य होते. याच ठिकाणी एक एकर ताग लावलेला होता. परंतु भांगलणी वेळेवर न केल्याने तागापेक्षा गवत व गाजर गवत अधिक प्रमाणात वाढले. मुकादमाजवळ चौकशी केली, तेव्हा "भांगलून कोळपी धरण्याचा निर्णय मी घेतला असता तर पंचांनी 'विनाकारण अधिक खर्च झाला' अशी ओरड केली असती, म्हणून पंचांनी प्रत्यक्ष पाहणी करीपर्यंत मी काहीच निर्णय घेतला नाही," असे त्यावर त्यांनी स्पष्टीकरण दिले.

येथील जमिनीमध्ये चार एकर ऊस केला होता. त्याची तोडणी जून १९७९ मध्ये झाली. चार एकरांमध्ये फक्त अठरा टन ऊस झाला. तोडणीनंतर चार महिने या जमिनीमध्ये औत फिरला नाही. घाबरे पट्टीही अद्याप म्हणावी तशी वहितीखाली आलेली नाही. घालवाडे पट्टी-मध्येही एक वर्षापेक्षा जास्त काळात पीक घेतलेले नाही.

चांभाराच्या माळापैकी सातआठ एकर ऊस सोडला तर बाकीची शेती सुधारू शकलेली नाही. तेथील जमिनीची प्रत कमी दर्जाची आहे, पण मेहनतही कमी आहे.

देसकत जमीन क्षारयुक्त झाली आहे हे खरे, परंतु त्यावर उपाययोजना करण्यासाठी कोणी

धडपडत असल्याचे दिसले नाही. तिथेही उन्हाळ्यामध्ये चारा करणे शक्य वाटले, पण अशा परिस्थितीत काय करता येईल याचा विचार कोणी करीत असल्याचे आढळले नाही.

मळीच्या रानात पट्ट्या पाडून त्या सभासदांना चाऱ्यासाठी वाटून दिलेल्या आहेत. तिथे एकमेकांचे गवत चोरल्याची आठवड्यातून किमान एक तरी तक्रार असते. म्हारकीतील ऊसही जनावरांना घालण्यासाठी चोरीस जातो, अशा तक्रारी आहेत.

वरील त्रोटक वर्णनावरूनदेखील काही निष्कर्ष काढता येतील.

श्रीविठ्ठल सोसायटीची शेती फायद्यात असली तरी फायदा मोठ्या प्रमाणावर वाढवणे शक्य आहे. पण त्यासाठी व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व डोळस पाहिजे. शेतीच्या सर्व तुकड्यांवर सारख्या प्रमाणावर लक्ष दिले जात नाही हे स्पष्ट आहेच. पण ज्या तुकड्यांवर अधिक लक्ष पुरविले जाते तेथील शेतीही उत्तम प्रकारे चालू आहे असे म्हणता येत नाही. त्याची दोन कारणे : या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यास आवश्यक अशा पद्धतीने माहिती टिपून ठेवलेली नाही, हे पहिले कारण. दर वर्षी कोणती पिके किती क्षेत्रावर घेतली या माहितीव्यतिरिक्त पीकवार खर्च व उत्पादन अशी स्वतंत्र माहिती नोंदलेली नाही. त्यामुळे दरवर्षी प्रत्येक पिकाचे दर एकरी उत्पादन वाढते आहे की नाही हे कळण्यास मार्ग नाही. असा तक्ता जर उपलब्ध झाला असता तर सोसायटीची प्रगती अधिक स्पष्टपणे दिसून आली असती. सभासदांना व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्यासही अशा तऱ्हेची माहिती आवश्यक आहे. दर एकरी उत्पादन एखाद्या वर्षी कमी असल्यास त्याची कारणमीमांसा करून त्यात व्यवस्थापनातील दोष किती, नैसर्गिक प्रतिकूलतेचा भाग किती इत्यादी गोष्टी स्पष्ट करून त्या दृष्टीने उपाययोजना करणे शक्य होते. आज अशा माहितीचा अभाव असल्यामुळे सर्वसाधारण सभेमध्येदेखील चर्चेस योग्य ते वळण मिळत नाही व त्यामुळे व्यक्तिगत प्रश्नांवरच खडाजंगी होते, असे दिसून येते. संस्थेच्या कार्यक्षमतेविषयी सभासदांना व इतरांनाही योग्य ते मार्गदर्शन होण्यासाठी संस्थेने अधिक पद्धतशीरपणे आपले दप्तर ठेवणे आवश्यक वाटते.

दरवर्षीची प्रगती पाहणे हे जसे महत्त्वाचे तसेच सोसायटीच्या शेतीची गावातील इतर शेतकऱ्यांच्या शेतीशीही तुलना करून पाहणे तितकेच अगत्याचे आहे. गावातील प्रगत शेतकरी सोसायटीच्या शेतीला नावे ठेवताना आढळतात. 'यांनी काय शेती करावी,' अशा उपेक्षावृत्तीने शेतकरी बोलतात. त्या बोलण्यात दलितांच्या आजपर्यंत झालेल्या प्रगतीबद्दल मत्सर असतो, यात शंकाच नाही. तथापि सोसायटीची शेती अधिक उत्पादनक्षम असावयास पाहिजे हेही तितकेच खरे.

आपली कार्यक्षमता असावी तेवढी नाही आणि त्याबाबत दिवसेंदिवस अधोगती होत आहे, याची जाणीव खुद्द जाणकार सभासदांमध्ये दिसून येते. सोसायटीचे संस्थापक व पहिले चेअरमन आबा पिरू कांबळे यांच्या मते सुरुवातीला सभासदांनी जोमाने व जिद्दीने कामे केली. तो जोम आज दिसत नाही. पूर्वी सर्व सभासद आपण होऊन कामावर हजर राहत. आज त्यांना बोलवावे लागते. आज सभासद शेतावर मजुरी करताना अळंटळं करतात. आबा चेअरमन होते, तेव्हा शेतावर रुबतही होते. चेअरमन म्हणून पहिल्या वर्षी त्यांनी मानधनही घेतले नाही. सभासद मजुरांच्या कामाचे वर्णन करताना ते म्हणतात, "सकाळी साडेसातला येतात. तास-

3000
दा. क. २४४८
निबंधू रजाध्यक्ष
मंत्र शाखा (स्थळ प्रत)

भराने पानतंबाखूसाठी अर्धा तास थांबतात. पुन्हा तासभर काम आणि नंतर जेवणासाठी तासभर. पुन्हा तासभर काम आणि नंतर पानतंबाखू. नंतर तासभर काम आणि मग सुट्टी. सभासद मजूर नीट काम करीत नाहीत, म्हणून त्यांच्या जोडीला बाहेरचे मजूर आणावे लागतात.''

"पूर्वी सोसायटी चांगली होती; आता नाही," अशी तक्रार अनेक सभासदांच्या तोंडून ऐकावयास मिळते. मुख्य तक्रार दोन प्रकारची : एक, सभासद सोसायटीच्या शेतीवर काम करण्यास तयार नाहीत; दोन, व्यवस्थापनात ढिलाई आली आहे.

यांतील पहिल्या तक्रारीत बराच तथ्यांश आहे. मुख्यतः दोष तरुण पिढीचा आहे. बरेच तरुण लोक दिवसभर उगाच हिंडत असताना दिसतात. ज्या परिस्थितीत सोसायटीचा जन्म झाला, त्या परिस्थितीची त्यांना कल्पना नाही. "आता दोन वेळा भरपूर जेवण मिळते, खिशात चारआठ आणे असतात, तेव्हा कामावर यावेसे त्यांना वाटत नाही."—आबा आणि त्यांचे सहकारी सहजपणे बोलून जातात. याउलट, तरुण लोकांना विचारले तर त्यांची प्रतिक्रिया अशी : "काम केलेच पाहिजे अशी सक्ती का ? सोसायटीच्या शेतीवर मजूर हवे असतील तर गावात भरपूर आहेत. त्यांना नेमून शेतीचे काम व्यवस्थित करून घ्यावे." सोसायटीचे उत्पादन वाढावे असा सर्वांचा आग्रह असतो. परंतु त्यासाठी सभासदांनीच कष्ट करावयास पाहिजेत का, असे त्यांचे म्हणणे आहे. शेतीची कामे मजुरांवाचून अडून राहिलेली नाहीत हे खरे. परंतु सभासदांनीच अधिक काम करून आपली शेती करावी आणि चार पैसेही अधिक मिळवावेत असे जुन्या कार्यकर्त्यांना व देवलांनाही वाटते. केवळ पोटापाण्याचा प्रश्न सुटला म्हणून शैथिल्य यावे हे जुन्या कार्यकर्त्यांना आवडत नाही.

व्यवस्थापनाच्या बाबतीत ढिलाईच्या तक्रारी फार आहेत. त्यांत मुख्यतः कामचुकारपणा, चोऱ्या व देखरेखीचा अभाव या तक्रारींचा समावेश आहे. प्रथमपासून देखरेखीचे काम करणारा एक सभासद म्हणतो, "मी पूर्वी दोन वर्षे राखणीच्या कामाला होतो. तेव्हा फारशा चोऱ्या होत नव्हत्या. झाल्या तर त्याच ठिकाणी पकडत होतो. त्यात पुढच्या तोंडावर असणारे लोक मी स्वतः पकडले आहेत. त्यांचे खाणे बंद झाले म्हणून मला काढून टाकले. आता सोसायटीच्या कारभारात खूप अंदाधुंदी माजली आहे. वैरणीच्या चोऱ्या खूपच होऊ लागल्या आहेत. बैलावरच्या गड्याच्या घरी वैरणीचे भारेच्या भारे सापडतात. गटबाजी चालते. आपले आपले लोक ओळखून काम चालले आहे. माझ्यासारख्यांनी पैसे वगैरे मागितले तर चाल-ढकल करतात. त्यांच्यातील असतील तर लगेच देतात. या भेदभावाला लोक कंटाळले आहेत. मी खत विकले त्या वेळी खत घेण्यास आलेल्या लोकांनी बारा रुपये भाव सांगितला. प्रत्यक्षात दहा रुपयेच भाव दिला. या भेदभावामुळे सभासद आतल्या आत चुरमे घ्यायला लागले आहेत. (चडफडू लागले आहेत.)

"सोसायटी आमच्या दृष्टीने खूप चांगली आहे, सोसायटीला नावे ठेवायला जागा नाही, पण आमचे लोकच वाईट नीतीचे आहेत. त्यामुळे एक दिवस सगळे मोडकळीला येईल. या 'तरासाने' लोक दारू पिण्याचे प्रमाण वाढले आहे...देवल आले होते तेव्हा द्राक्षबागेतील कोवळी फूट काढण्याकडे व नर्सरीतील द्राक्षावर पडलेल्या रोगाकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी

निदर्शनास आणून दिले. तसेच कापसावरील औषधाच्या बाबतीतही सूचना दिल्या. किमान-वेतन-निरीक्षकाने स्त्री-पुरुषांस साडेचार रुपयेप्रमाणे वेतन देण्याची लेखी सूचना दिली आहे. त्याचीही अंमलबजावणी होत नाही."

पंच-कमिटीतील शिक्षक पेशाचे व अत्यंत कार्यक्षम, निःस्पृह म्हणून लौकिक असलेले एक सभासद, यांनीही व्यवस्थापनात ढिलाई वाढत असल्याचे मोकळेपणाने सांगितले. अनेक सभासद रिकामपणात वेळ घालवतात असे त्यांचेही मत आहे. "मागच्या वर्षी (१९७७-७८) कापसाचे पीक हातून गेले. त्याला काही प्रमाणात व्यवस्थापनातील हलगर्जीपणा जबाबदार होता. ही गोष्ट सर्वांच्या लक्षात आली नाही, पण आम्हा काही जणांच्या लक्षात आली." परंतु सोसायटी कायमची टिकेल असा त्यांना विश्वास आहे. त्याचे कारण त्यांच्या मते बहुसंख्य सभासदांची शेती फार लहान आकाराची आहे. संयुक्तपणे कसण्यातील फायदे स्पष्ट आहेत. सोसायटीमुळे दलितांची अस्मिता जागृत झाली, त्यांना मानाने जगणे शक्य झाले, याची सर्वांना जाणीव आहे. तसेच सोसायटी केवळ खंड देत नाही; जीवनातील सर्व अडीअडचणींच्या प्रसंगी सोसायटी दलितांच्या पाठीशी उभी आहे. यामुळे संस्था कायम टिकेल याबद्दल कोणाच्याही मनात संदेह नाही.

आमच्या वास्तव्यात आम्ही शेतावर वारंवार जात होतो आणि गडी, मुकादम, सभासद, पंच-कमिटीचे सभासद यांच्याबरोबर याबाबत नेहमी बातचीत करीत होतो. सोसायटीची शेती सर्वसाधारणपणे चांगल्या प्रकारे केली जाते असे दिसून आले. परंतु बऱ्याच वेळा कसणुकीच्या कामामध्ये हलगर्जीपणा व उशीर होत होता. व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळणाऱ्यांत अधून-मधून सुसंवादाचा अभाव दिसून आला. एखादा निर्णय घेतल्यानंतर त्याचा पाठपुरावा होत नाही आणि सभासदांमध्ये आपल्या शेतीवर आपण अंग मोडून काम केले पाहिजे अशी भावना नाही असेही आढळून आले.

त्या सुमारास नवीन द्राक्षबाग करायचे ठरले. मे १९७९ पासून कामास सुरुवात झालेली होती. योजनेप्रमाणे हे काम दोन महिन्यांत पुरे व्हायचे होते. हे काम सोसायटीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. कारण एकूण दहा एकर द्राक्षबाग झाल्यावर सोसायटीच्या आर्थिक परिस्थितीत चांगलाच फरक पडणार होता. परंतु ऑगस्टअखेर अपेक्षित सहा एकरांपैकी फक्त तीन एकरांवरचे कामच पूर्ण झाले होते. द्राक्ष-नर्सरीमधील रोपांची संख्या सहा एकर बाग लावण्यास पुरेल असा अंदाज होता. प्रत्यक्ष मोजणी केल्यावर तीनच एकरांची लागण होईल एवढीच रोपे निघाली. याचा अर्थ, रोपे लावताना योग्य काळजी घेतली नाही. चऱ्या खणण्याच्या कामातही बऱ्याच उणिवा उजेडात आल्या. या उणिवा राहण्याचे वास्तविक कारण नव्हते. याचा अर्थ एवढाच की देखरेख करणाऱ्या मुकादमांनी आपले काम नीट बजावले नाही.

सोसायटीने दहाबारा गडी वर्षाच्या बोलीवर नेमलेले आहेत. त्यांच्यावर जबाबदारी अधिक आहे. परंतु महत्त्वाच्या वेळी काही गडी आधी न सांगता रजेवर जातात. त्यामुळे कामाची जुळणी विसकटते. रजा हवी असल्यास गड्याने आगाऊ अर्ज करावा असा नियम आहे. पण हा नियम काटेकोरपणे पाळला जात नाही. रजेचा अर्ज दिला असला तरी त्याची दखल घेतली जात नाही, असेही ऐकावयास मिळाले. शेतीवरचे काम आपले काम आहे ही भावना एकदोन अपवाद सोडले तर गड्यांच्या ठिकाणी दिसत नाही. द्राक्षबागेचे काम पाहण्यासाठी

देवल व त्यांचे सल्लागार आले होते तेव्हा त्यांना काम योजनेप्रमाणे होत नसल्याचे दिसून आले. या दोघांची भेट बऱ्याच जणांनी टाळली. जे सापडले त्यांना देवल यांनी सुनावले. देवल गेल्यावर सभासदांत चर्चा झाली :

"काय मर्दा, तुम्ही सटकलात अन् आम्ही तावडीत सापडलो. चांगली बिनपाण्याने चंपी झाली."—एक.

"दादा खवळल्याचं कळलं, कशाला तावडीत सापडायचं, म्हणून ते गेल्यावर आलो."—दुसरा.

देवलांच्या भेटीनंतर पहिल्या दिवशी चऱ्या खणण्याच्या कामासाठी श्रमदान करायचे ठरले. सर्व सभासदांनी घरटी एक माणूस पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु प्रत्यक्षात उपस्थिती जेमतेम तीस होती. दुसऱ्या दिवशी मजुरीने काम करायचे ठरले. त्यामुळे उपस्थिती एकदम वाढली. सुमारे साठ सभासद कामास हजर झाले. परंतु काम अपेक्षेच्या मानाने फारच कमी झाले. म्हणून रोजी मजुरीऐवजी ब्रासवर मजुरी देण्याचे ठरले. एक ब्रास म्हणजे शंभर चौरस फूट (दोन फूट खोली, दोन फूट रुंदी व पंचवीस फूट लांबी). या मजुरी देण्याच्या नवीन पद्धतीमुळे उपस्थिती घटली. कारण यात कामचुकारपणाला वाव नव्हता. पहिल्या दिवशी सुमारे साठ, दुसऱ्या दिवशी तीस व तिसऱ्या दिवशी पंधरा अशी उपस्थिती राहिली. मग गावातून मजूर आणायचे ठरले. सुमारे पन्नास मजूर ब्रास-मजुरी-पद्धतीवर नेमण्यात आले. कामाला गती आली. परंतु तेवढ्यात पाऊस आला आणि काम थंडावले. मजुरांत बायकाही होत्या. त्यांच्या हातून फारच कमी काम होत असल्याचे दिसले. दर दहापंधरा मिनिटांनी त्या दहापंधरा मिनिटे वेळ काढीत.

वरील वर्णनावरून कामात दिरंगाई कशी होते हे स्पष्ट दिसून येते. काम करून घेण्याची जबाबदारी प्रामुख्याने मुकादमांवर असते. माझ्या पाहणीतले माझे मदतनीस यांनी या कामात लक्ष घालण्याचे ठरविले. पहिल्या दिवशी त्यांनी देखरेखीचे काम केले. दुसऱ्या दिवशी मजूर त्यांच्या देखरेखीखाली काम करण्यास तयार झाले नाहीत. मजुरी अडीच रुपये होती. हा दर वाढवण्यात आला आणि त्यानंतर मजुरांची संख्या वाढली. आबा पिरू यांनी लक्ष घालायचे ठरविल्यावर कामास वेग आला. आठ दिवसांत तीन एकरांतील दहा चऱ्यांची लावण पूर्ण झाली. पावसाचा अडथळा चालूच होता.

मुकादम एकमेकाशी विचारविनिमयाने वागत नाहीत असेही दिसून आले. त्यांच्यात आत्मविश्वासाचा अभावही काही प्रमाणात दिसून आला. पंच-कमिटीतील सभासद आपल्याला मान देत नाहीत असे त्यांना वाटत होते. त्यामुळे एखादा निर्णय जागच्याजागी घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यास ते धजत नव्हते.

पंच-कमिटीतील सभासद आणि मुकादम यांच्यामध्ये अधिक जवळचे संबंध हवेत याची जाणीव झाली.

सामुदायिक शेतीतील यशापयश वरील विवेचनावरून स्पष्ट होते. यशाची बाजू प्रथम नजरेत भरते. तपशिलात पाहू लागलो की उणिवा लक्षात येतात : सामुदायिक शेती ही दलितमुक्तीचा

मार्ग म्हणून स्वीकारायची असेल तर ढिलाई, अकार्यक्षमता, उपेक्षा टाळणे आवश्यक आहे. आज या उणिवांना अवाजवी महत्त्व देऊन निराश होण्याचे कारण नाही; तरी पण दुर्लक्ष करूनही चालणार नाही. आज सभासदांत आपल्या उणिवांविषयी जाणीव आहे; त्याबाबत मोकळेपणाने चर्चा करण्याची तयारी आहे; हा एक आशेचा मोठा आधार आहे.

सामुदायिक शेतीत जमीन सामील करून घेताना दीड वर्षांचा करार झाला. आज त्याला दहा वर्षे पूर्ण झाली. अजून दहा वर्षांनी 'सामुदायिक शेतीत आपली जमीन ठेवायची का काढून घ्यायची' याबाबत सभासद निर्णय घेण्यास मोकळे होतील. सोसायटीविषयी काही मतभेद असले तरी आज असे दिसते की सोसायटी मोडीत काढावी असे कोणासच वाटत नाही. उलट, ती कायमची चालवावी असेच सर्वांना वाटते. कारण त्यात जसा वैयक्तिक फायदा आहे तसाच संपूर्ण समाजाचाही फायदा आहे याची जाणीव सर्वांना आहे.

ज्या परिस्थितीत श्रीविठ्ठल सोसायटीचा जन्म झाला, ती परिस्थिती लक्षात घेता, सामुदायिक शेतीचा प्रयोग यशस्वी झाला आणि होत आहे असे म्हणावयास हरकत नाही. शेतीचा आणि व्यवस्थापनाचा ज्यांना अनुभव नाही, ज्यांची सामाजिक-मानसिक परिस्थिती निकृष्ट दर्जाची होती, त्या लोकांनी सामुदायिक शेतीस प्रारंभ केला आणि बरेच यश पदरात पाडून घेतले. देवल यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले, त्यामुळे सुरुवातीच्या यशातील सिंहाचा वाटा देवलांनाच द्यायला हवा. नंतरच्या काळात संस्था चालवण्यास दलित कार्यकर्ते पुढे आले, आणि आज ते संस्थेची धुरा पूर्णपणे सांभाळीत आहेत, ही गोष्ट लक्षात घेतली तर संस्थेच्या कारभारातील अकार्यक्षमतेपेक्षा कार्यकर्त्यांची आजची कुवत, कार्यक्षमता आणि जिद्द यांकडेच अधिक लक्ष जाते. श्रीविठ्ठल सोसायटी ही केवळ शेतीसंस्था नसून दलितांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आणि त्यांना समाजात सन्मान्य स्थान देण्यासाठी निर्माण केलेले एक साधन आहे याचे भान कार्यकर्त्यांत दिसून येते. संस्थेचे यशापयश या विस्तृत दृष्टिकोनातून पाहावयास हवे.

सामुदायिक शेतीची कार्यक्षमता वाढवण्यासाठी मात्र डोळसपणे उपाययोजनांचा विचार करावयास हवा. अशा उपाययोजनेत सभासद व विशेषतः तरुण सभासद यांना कार्यप्रवण करण्यावर भर हवा. व्यवस्थापन, शेतीशास्त्र या विषयांचे धडे देत असतानाच सामुदायिक शेतीसाठी आवश्यक अशी मानसिक-वैचारिक घडण निर्माण होईल याकडे लक्ष द्यावयास हवे. म्हैसाळ-प्रकल्प केवळ म्हैसाळ गावापुरता नसून ग्रामीण भागातील दलितमुक्तीचा एक मार्ग आहे हे तरुण दलित आणि दलितेतर स्त्रीपुरुषांना मनोमन पटल्याखेरीज म्हैसाळसारखे प्रकल्प उभे राहणार नाहीत. सामुदायिक शेतीत सामील झालेल्या जमीनमालकांबरोबर भूमिहीन दलितांनाही स्थान देणे आवश्यक आहे; मालकीपेक्षा श्रमाला महत्त्व हवे, ही भावना तरुण सभासदांच्या मनात रुजली पाहिजे. नफ्याचे वाटप मालकीच्या क्षेत्राप्रमाणे न करता, श्रमांच्या प्रमाणावर करणे यासारखी नवीन मूल्ये जर रुजली नाहीत तर म्हैसाळसारखा प्रकल्प मार्गदर्शक ठरणार नाही.

सामुदायिक शेती अगर सहकारी पद्धतीवर चालू असलेली इतर कोणतीही संस्था यांचे दप्तर व्यवस्थित, उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने ठेवण्यावरही भर हवा. केवळ ऑडिटरसाठी कागदपत्रे ठेवणे एवढा संकुचित दृष्टिकोन असता कामा नये. दैनंदिन व्यवहारासंबंधी तपशीलवार माहितीचे टिपण हवे; त्याचे विश्लेषण आणि अभ्यास सभासदांनी वारंवार करावयास हवा.

अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांसाठी जाणकार तज्ज्ञांची मदत आवश्यक आहे. ही मदत मिळणे अवघड नाही. पण त्यासाठी पद्धतशीर प्रयत्न हवेत.

सामुदायिक शेती कायमची टिकवावयास हवी का? तिचे कार्य संपल्यानंतर पुन्हा व्यक्तिगत शेती करण्यास काय हरकत आहे? स्वतंत्रपणे जमीन कसून अधिक फायदा मिळवणे शक्य असल्यास तशी मुभा असावी असा प्रश्न उपस्थित केला जातो. सामुदायिक शेतीचे कार्यक्षम व्यवस्थापन न झाल्यास असा प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे.

सामुदायिक शेती हा प्रतिष्ठेचा प्रश्न करण्याची गरज नाही असे खुद्द देवलही मानतात. एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीत त्याला स्थान आहे. आज तरी त्याची उपयुक्तता दिसते. सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्ट साध्य झाले आणि सामुदायिक शेतीपेक्षा व्यक्तिगत शेती अधिक फायदेशीर आहे असे जर दिसले तर आपोआपच सामुदायिक शेती विसर्जित होईल. पण आजच्या परिस्थितीत तिला पर्याय दिसत नाही. फड-पद्धतीचा पर्याय सांगितला जातो. फड-पद्धतीमध्ये प्रत्येक सभासद स्वतंत्रपणे शेती करतो. परंतु कोणती पिके घ्यायची यासारखे निर्णय सर्वानुमते घेतले जातात. पाणीपुरवठ्याचे व्यवस्थापन सामुदायिक रीत्या होते. इतर सेवाही सहकारी पद्धतीने उपलब्ध केल्या जातात. म्हैसाळसारख्या प्रकल्पांना ही पद्धत लागू पडेल असे दिसत नाही. ऊस, द्राक्ष, पानमळा यांसारखी पिके स्वतंत्रपणे घेणे शक्य नाही आणि अशा पिकांवरच सामुदायिक शेतीची आर्थिक क्षमता अवलंबून आहे. व्यक्तिगत शेती फार अल्प प्रमाणावर आहे. दिवसेंदिवस ती अधिक लहान होत जाईल. कारण खातेफोड होत राहणार. श्रीविठ्ठल सोसायटीचा एक प्रमुख फायदा सामाजिक स्वरूपाचा आहे. श्रीविठ्ठल सोसायटी दलित आणि इतर गरीब यांना संघटित करण्याचे साधन आहे. यासाठी सामुदायिक शेती टिकवणे, ती अधिक संपन्न करणे आवश्यक ठरते. आज तरी असे दिसते की दलित सभासद सामुदायिक शेती टिकवतील आणि अधिक कार्यक्षम करतील.



प्रकरण सातवे

इतर उपक्रम

म्हैसाळ-प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट 'दलितांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे' हे होते. आर्थिक स्वावलंबन हा प्रकल्पाचा पाया होता. दूधव्यवसाय आणि सामुदायिक शेती यांमुळे हे पायाभरणीचे काम पूर्ण झाले. दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारली, ते स्वावलंबी झाले. सामुदायिक शेतीसंस्थेसारख्या एका अत्यंत महत्त्वाच्या व चालविण्यास अवघड अशा संस्थेचा कारभार यशस्वीरीत्या सांभाळल्याने दलितांविषयीचा गावकऱ्यांचा दृष्टिकोन बदलू लागला. "हे लोक काय शेती करणार? ह्यांनी भीक मागावी, एवढीच यांची लायकी!" असे मनापासून मानणारे लोक दलित कार्यकर्त्यांचेच मार्गदर्शन आणि मदत घेण्यास तयार होऊ लागले. सामुदायिक शेतीतील प्रयोगांपासून इतर शेतकरीही काही शिकू लागले. देशातील सहकारी शेतीचे प्रयोग कोलमडून पडत असताना, श्रीविठ्ठल सोसायटी भरभराटीस येत आहे, तिला सतत 'अ' दर्जा मिळत आहे आणि महाराष्ट्रात या प्रकल्पाचे कौतुक होत आहे हे पाहून दलित कार्यकर्ते इतरांपेक्षा कोणत्याही प्रकारे कमी नाहीत याची जाणीव वाढीस लागली.

दलितांची परिस्थिती सुधारू लागली म्हणजे दलितेतर गावकऱ्यांना त्याचे वैषम्य वाटते आणि ते अनेक मार्गांनी प्रकट होते हा आजपर्यंतचा अनुभव आहे. दलित आणि दलितेतर यांतील तणाव सवर्णांच्या या प्रवृत्तीमुळे वाढतो आणि त्याचे दुष्परिणाम दलितांनाच भोगावे लागतात. या भीतीपोटी, आपली परिस्थिती सुधारली तरी दलित तसे दाखवीत नाहीत. चांगले कपडे घालणे, घर दुरुस्त करणे, ताठपणाने भर रस्त्यातून जाणे या सर्व गोष्टी दलितांना टाळाव्या लागतात. तसे केले नाही तर "हे लोक फार माजलेत!" या सवर्णांच्या प्रतिक्रियेस तोंड द्यावे लागते. सवर्णांच्या या प्रवृत्तीचे पर्यवसान दलितांची घरे जाळण्यातसुद्धा होऊ शकते.

म्हैसाळ गावात ही भीती नव्हती असे नाही. त्यामुळे प्रकल्पाचे एक प्रमुख उद्दिष्ट 'दलित आणि दलितेतर यांमध्ये सामंजस्य निर्माण करणे आणि दलितेतरांनी दलितांना आपल्या बरोबरीने वागवावे यासाठी प्रयत्न करणे' हे मानले होते. पूर्वी सांगितल्याप्रमाणे दलितांचे संघटन आणि त्यांच्या परिस्थितीत झालेला बदल यांविषयी असूया आणि भीती न वाटता, 'ही आपल्याही हिताची गोष्ट आहे,' असे दलितेतरांना वाटावे या पद्धतीने दलितांनी आपली संघटित शक्ती वापरावी असा देवलांचा आग्रह होता. त्याचे कारण हेच होते की बदलत्या परिस्थितीमुळे तणाव न वाढता कमी व्हावेत. या कल्पनेला मूर्त स्वरूप देऊन जे उपक्रम हाती घेण्यात आले, त्यांत १९७२ च्या दुष्काळात अल्पभूधारकांसाठी जी योजना अंमलात आणली गेली तिचा विशेष

उल्लेख केला पाहिजे. सामुदायिक शेतीत व दूधव्यवसायात दलितेतरांना समाविष्ट करून घेणे हा आणखी एक प्रयत्न. श्रीविष्ठल सोसायटीमार्फत इतर जातींतल्या कुटुंबांना आर्थिक मदत देणे हाही याच उपक्रमाचा भाग मानता येईल. या सर्व उपक्रमांचा तपशील थोडक्यात खाली दिला आहे.

१. **लहान शेतकऱ्यांना मदत :** १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्रातील सर्व लहानमोठे शेतकरी होरपळून निघाले. सतत दोनतीन वर्षे पावसाच्या अवकृपेमुळे शेती करणे शक्य झाले नाही. जिथे पाणीपुरवठ्याची सोय होती, तिथे परिस्थिती बरी होती. म्हैसाळमधील दलितांची सामुदायिक शेती पाणीपुरवठा असल्यामुळे खंड न पडता चालू राहिली. परंतु पाणीपुरवठ्याचे प्रमाण कमी झाले होते. गावातील सर्व शेतकऱ्यांना दुष्काळाची झळ पोहोचली, परंतु त्यांतही लहान व अल्पभूधारकांना, स्वतःच्या मालकीची पाणीपुरवठ्याची सोय नसल्यामुळे शेती करणे जवळजवळ अशक्य झाले. अशा परिस्थितीत, महाराष्ट्र सरकारने अनेक सार्वजनिक कामे काढून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला. हजारो लोकांना त्यामुळे उपासमार टाळता आली.

पण रोजगार मिळाला म्हणूनच त्यांना स्वतःच्या शेतीवर काम करणे जमले नाही. नवीन वर्षाच्या सुरुवातीला, शेत नांगरून आणि इतर कामे उरकून पाऊस येईल या अपेक्षेने, शेते तयार करून ठेवावी लागतात. ही तयारी करण्यास घरचे मनुष्यबळ नव्हते, कारण सामान्य शेतकऱ्याच्या घरातील मोठी माणसे सार्वजनिक कामातील रोजगारासाठी जात होती. स्वतःच्या शेतीवर काम करायचे म्हटले तर रोजगार बुडतो आणि उपासमारीला तोंड द्यावे लागते; रोजगार पत्करायचा म्हटले तर स्वतःच्या शेताकडे दुर्लक्ष करावे लागणार आणि सरकारी काम बंद झाल्यावर 'रोजगारही नाही आणि स्वतःची शेतीही नाही' अशी परिस्थिती उद्भवणार अशा कोंडीत सामान्य शेतकरी सापडला.

या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी दलित कार्यकर्त्यांनी एका संस्थेच्या मदतीने एक योजना आखून अंमलात आणली. या योजनेनुसार सुमारे तेराशे गरीब शेतकऱ्यांना त्यांच्याच शेतीची कामे करून देण्यासाठी रोजगार देण्यात आला. या योजनेमुळे या शेतकऱ्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटला आणि त्याचबरोबर त्यांच्या शेतांचीही मशागत झाली. सुमारे पंचेचाळीसशे एकर जमिनीवर या योजनेप्रमाणे कामे करण्यात आली.

ही योजना पूर्णपणे दलित कार्यकर्त्यांनी अंमलात आणली. पंचवीस मजुरांचा एक गट याप्रमाणे काम मागणाऱ्यांचे गट करण्यात आले. एकूण तेराशे मजुरांनी काम केले. त्यांत दलित मजूर फक्त चारशेच्या आसपास होते. प्रत्येक गटात हेतुपुरःसर सर्व जातींचे मजूर समाविष्ट केले होते. ज्या शेतकऱ्यांच्या शेतांवर कामे करायची होती त्यांच्याकडून अर्ज मागविले. रोज पन्नास ते शंभर अर्ज येत. समाजमंदिरातच कचेरी थाटली होती. अर्ज घेऊन शेतकरी तिथे येत. अर्जांची छाननी जागच्या जागी होई. मुख्य निकष 'शेतकरी गरजू व गरीब आहे की नाही' हा होता. मोठ्या शेतकऱ्यांचेही अर्ज आले. या संधीचा फायदा घेऊन आपल्या शेतावरील कामे फुकट करून मिळाली तर उत्तमच असा त्यांचा विचार होता. परंतु असे अर्ज नाकारण्यात आले.

ज्या शेतकऱ्याचा अर्ज मंजूर होई, त्याला मजुरांचा एक गट देण्यात येई. त्या मजुरांची सर्व व्यवस्था त्या शेतकऱ्याने पाहावयाची असा नियम होता. स्वतःच्या शेतावर खुद्द मालक, त्याच्या

घरची मंडळी व इतर मजूर असे सर्व काम करीत. सर्वांना मजुरी दिली जाई. सर्व मजुरांना पाणी देण्याची, उत्तम वागणूक देण्याची जबाबदारी मालकावर होती. कोणत्याही प्रकारचा भेदभाव होणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली पाहिजे असे अर्थात अभिप्रेत होते.

काम नेमून देणे, मजुरांचे गट पाडणे, कामावर देखरेख ठेवणे, हिशेब ठेवणे इत्यादी सर्व कामांची जबाबदारी सुमारे पंचवीस दलित कार्यकर्त्यांनी घेतली होती. प्रत्येक जण रोज हिंडून ठरल्याप्रमाणे कामे होत आहेत की नाहीत हे पाहत असे.

गावच्या इतिहासात असा प्रसंग आलेला नव्हता. प्रथमच एखादी योजना दलित कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली जात होती. ही जबाबदारी दलित कार्यकर्त्यांनी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडली, असा अभिप्राय अनेकांकडून ऐकावयास मिळतो.

या उपक्रमाची वैशिष्ट्ये दिसतात ती खालीलप्रमाणे :

१. दलितांनी पुढाकार घेऊन दलितेतर गरजूंसाठी योजना राबविली.
२. सवर्ण शेतकरी दलित कार्यकर्त्यांच्या हाताखाली काम करण्यास तयार झाले.
३. मजुरांच्या गटात दलित व दलितेतर यांचा समावेश होता आणि सर्वांनी बरोबरीने काम केले.
४. मालक शेतकऱ्यांनी सर्वांना सारखे वागविले.
५. योजना राबविताना गैरकारभार, अरेरावी इत्यादी कोणत्याही प्रकारची तक्रार आली नाही. संबंधित शेतकरी, मजूर यांनी एकमुखाने दलितांच्या कार्यक्षमतेबद्दल व चांगल्या वागणुकीबद्दल प्रशंसा केली.

वरील गोष्टींचे महत्त्व, गावच्या आजपर्यंतच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे. सवर्ण मजूर दलित मजुरांबरोबर कामासही पूर्वी तयार होत नसत; दलितांच्या देखरेखीखाली काम करणे दूरच ! दलित कार्यकर्त्यांनी समान वागणुकीचा आग्रह धरला, पण त्यात विखार नव्हता, सुडाची भावना नव्हती हेही वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. हा प्रसंग सवर्ण गावकऱ्यांना हिणवण्याचा नसून, त्यांच्याशी जवळीक साधण्याचा आहे, हे ते जाणून होते.

संस्थेचे चेअरमन यांच्याच शब्दांत या उपक्रमाचे महत्त्व अधिक स्पष्ट होईल. ते म्हणाले, "पूर्वी आम्हांला लोक दूर ठेवीत. आमच्यासाठी पाणी पिण्याची भांडी वेगळी असत. परंतु या काळात ही वागणूक साफ बदलली. लोक आमच्यांत मिळूनमिसळून वागू लागले. आम्ही चेकिंगसाठी जायचे, त्या वेळी आमचे व्यवस्थित आदरातिथ्य व्हायचे. त्यांच्याच भांड्यातून ते आम्हांस पाणी देत असत. घरामध्ये नेत आणि चहापाणी विचारीत. दलित कार्यकर्त्यांच्या हाताखाली काम करावे लागले याबद्दल नाराजी जाणवली नाही. आलेला प्रसंग व आमचे चोख काम यांमुळे हा बदल झाला. प्रथम आम्हीच थोडे दबकून वागत असू. पण नंतर बरोबरीचे नाते निर्माण झाले. आणि आपणही भेदभाव घालवण्यासाठी नेतृत्व देऊ शकतो हा आत्मविश्वास आला. देवल नेहमी म्हणत, 'त्यांनीच आपल्यासाठी काम केले पाहिजे असे नाही. आपणही त्यांच्यासाठी काम केले पाहिजे.' असे काम करण्याची संधी या योजनेमुळे आम्हांस मिळाली.

"जेव्हा कामाला आम्ही सुरुवात केली, तेव्हा लोक म्हणायचे, 'एवढी मोठी स्कीम हे लोक कसे राबवणार ?' खरे म्हणाल तर आम्हीही साशंकच होतो. पण देवल मात्र पक्के होते. ही

योजना आम्हीच राबवली पाहिजे असे त्यांनी ठामपणे सांगितले. एवढेच नव्हे, तर ते म्हणायचे, 'सरकारी खात्यात सहसा न आढळणारी कार्यक्षमता आणि प्रामाणिकपणा तुमच्यामध्ये दिसला पाहिजे. तसेच इतरांशी तुम्ही समजुतीची वागणूक ठेवली पाहिजे.' अशी समज ते वारंवार देत होते. आम्ही पंचवीस जण देखरेख करीत होतो, पण आम्ही जादा मजुरी घेतली नाही. मजुरांना जे वेतन मिळे तेवढेच आम्ही घेत होतो. तेही गहू व तेल या रूपात. हिशेबठिशेब अगदी व्यवस्थित ठेवले. काम फक्त गरजू लोकांनाच दिले. आपल्या शेतावर फुकट काम व्हावे म्हणून काही मोठ्या शेतकऱ्यांचे दडपण यायचे, पण आम्ही ते कधी मानले नाही. आमच्या नियमाप्रमाणे जिरायत शेत दहा एकरांपेक्षा जास्त असता कामा नये. पण प्रत्यक्षात ज्यांचे शेत चारपाच एकरांच्या आत होते, त्यांच्याच शेतावरची कामे आम्ही केली. अर्जदार शेतकरी गरीब आहे अशी खात्री पटल्यावरच आम्ही त्याचा अर्ज मंजूर करीत होतो. मला आजही आठवते, या योजनेचे काम पाहण्यास लोक येत असत आणि खूष होत असत.

या कामाचा एक महत्त्वाचा फायदा असा दिसून आला की, मोठ्या लोकांकडून कर्ज काढायचे आणि त्याबद्दल कर्ज फिटेपर्यंत त्यांना शेत कसण्यास द्यायचे ही प्रथा वाढली असती, तिला वेळीच आळा बसला. या उपक्रमामुळे आम्हांला नवीन कल्पना सुचली. जे बिगर-हरिजन गरीब शेतकरी कर्जबाजारी असतील त्यांच्या जमिनी सोसायटीने कसण्यासाठी घ्यायच्या, त्यांत सुधारणा करायची, कर्ज फेडायचे आणि त्यांना जमिनी परत द्यायच्या. या कल्पनेप्रमाणे नंतर आम्ही तीन शेतकऱ्यांची अशी जबाबदारी पत्करली."

या यशस्वी उपक्रमामुळे सामान्य गावकऱ्यांमध्ये दलित कार्यकर्त्यांबद्दलची आदराची भावना वाढली हे स्पष्ट आहे. परंतु त्याचबरोबर काही प्रमाणात काही गोटांतील लोकांना हे यश खुपले. अशा मोठ्या योजना ग्रामपंचायतीनेच राबवल्या पाहिजेत, असा सूर या असमाधानातून निघाला. त्यावरून काही कुरबूरही झाली. तिचा तपशील हाती लागला नाही. परंतु या उपक्रमामागील जो हेतू होता तो बव्हंशी साध्य झाला असे मानण्यास हरकत नाही.

२. सामुदायिक शेती व दूधव्यवसाय यांमध्ये दलितेतरांना समाविष्ट करण्याचे प्रयत्न : ज्या आर्थिक उपक्रमामधून दलितांच्या प्रगतीस सुरुवात झाली, त्या उपक्रमामध्येच दलितेतर गरजू व गरीब लोकांना समाविष्ट करून घेऊन सर्व जातींच्या गरिबांमध्ये एकात्मता निर्माण करण्याचे प्रयत्न म्हैसाळ-प्रकल्पात दिसून येतात. श्रीविठ्ठल सोसायटीच्या सभासदांविषयीच्या माहिती-पत्रकावरून हे लक्षात येते. सभासदांचे चार वर्ग आहेत. पहिल्या वर्गात खातेदार सभासद येतात. एकूण खातेदार सभासदांची संख्या शहाण्णव आहे. त्यांत दोन चांभार जातीचे (बावीस एकर वीस गुंठे) व दोन मराठा जातीचे (सतरा एकर अठ्ठावीस गुंठे) सभासद आहेत. लहान शेतकऱ्यांसाठी जी योजना दुष्काळी वर्षात दलित कार्यकर्त्यांनी अंमलात आणली, त्या अनुभवा-तूनच गरीब दलितेतर शेतकऱ्यांना अधिक भरघोस मदत करण्याची कल्पना सुचली. गावात अनेक लहान शेतकरी कर्जपाण्यात बुडालेले आहेत. त्यांचा बोजा सोसायटीने स्वतःवर घेऊन कर्ज फेडण्याची व्यवस्था करण्याचे ठरले. या प्रयत्नांचा तपशील पूर्वी आलेला आहे.

हे प्रयत्न आज लहान प्रमाणावरच आहेत. परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व नाडलेल्या शेत-

कऱ्यांना जवळ करून त्यांना साहाय्य करण्याची ही कल्पना अभिनव वाटते. दलित शेतकऱ्यांची संस्था या कामात पुढाकार घेऊ शकते हे मोठ्या प्रमाणावर सिद्ध झाले तर त्याचे गावातील सामाजिक वातावरणावर योग्य ते परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. यासाठी हा उपक्रम अधिक नेटाने वाढविला पाहिजे.

सभासदांच्या दुसऱ्या वर्गात सरकार येते. सरकारने दोन हजार रुपयांचे भाग-भांडवल घेतले आहे.

तिसऱ्या वर्गात नाममात्र सभासद येतात. संस्थेच्या हमीपत्रावर दुग्धम धंद्यासाठी (दूध-व्यवसाय) ज्यांनी कर्ज घेतले ते सभासद या सदरात मोडतात. या सभासदांची संख्या सुमारे चारशे आहे. त्यात सुमारे दोनशे सभासद मराठा जातीचे आहेत. आठ सभासद मातंग जातीचे आहेत. सुमारे शंभर सभासद महार जातीचे आहेत. उरलेले इतर जातींचे आहेत. यावरूनही सोसायटी इतर दलित व सवर्ण जातींच्या गरीब लोकांना मोठ्या प्रमाणावर मदत देऊ इच्छिते हे दिसून येते.

चौथ्या वर्गात सहानुभूतिदर्शक (ठेवी देणारे) सभासद येतात. ते एकूण नऊ असून त्यांत सहा ब्राह्मण, एक जैन, एक महार व एक मराठा जातीचे आहेत. एकूण ठेव एक लक्ष चौसष्ट हजार रुपये आहे.

याव्यतिरिक्त इतर समाजांतील लोकांना दुग्धम धंदे चालविण्यास श्रीविठ्ठल सोसायटी मदत करते. कोरवी जातीतील सहा व्यक्तींना सायकली घेण्यासाठी प्रत्येकी सव्वादोनशे रुपये कर्ज देण्यात आले. या लोकांचा फळविक्रीचा धंदा आहे आणि या धंद्यास सायकल आवश्यक आहे. कोरवी लोकांनी हे कर्ज पूर्णपणे फेडले आहे. एका खाटिकास त्याच्या व्यवसायासाठी पाचशे रुपये कर्ज दिले. किराणा दुकान घालण्यासाठी दोन दलितेतरांना एकूण एक हजार रुपये कर्ज दिले. घर-बांधणीच्या कार्यक्रमातही दलितेतरांना स्थान देण्यात आले. त्याचा तपशील पुढे दिला आहे.

ही सर्व मदत फार मोठ्या प्रमाणावर नसली तरी तिचा परिणाम मात्र चांगला दिसून येतो. दलित कार्यकर्त्यांविषयी या उपक्रमामुळे आदराची भावना वाढत आहे असे निश्चित दिसते. मोठ्या प्रमाणावर अशा तऱ्हेने मदत देणे अवघड दिसते. कारण गरज मोठी आणि मदत करण्याची कुवत मर्यादित. आजही दलितांतील सर्व कुटुंबांना मदत पोहोचवणे शक्य झालेले नाही. दूधव्यवसाय सुरू करण्यास मात्र संस्था अधिक प्रमाणात मदत करण्यास तयार आहे असे दिसते.

शिबिरे, मेळावे व इतर शैक्षणिक उपक्रम यांमध्ये दलितेतरांना बोलावून अनेक सामाजिक समस्यांवर विचारविनिमय करण्याचा प्रयत्नही होत असतो. त्याचा काही तपशील पुढे येईलच.

३. **घरबांधणी-योजना** : दूध व शेती या व्यवसायांमुळे पोटापाण्याचा प्रश्न सुटल्यानंतर घरबांधणीच्या कार्यक्रमाचा विचार करण्यास सुरुवात झाली. देवलांच्या मनात प्रथमपासूनच याबाबत विचार घोळत होते. वेळोवेळी ते आपल्या मित्रांजवळ या विषयावर बोलत असत. दलितांना चांगली घरे बांधून देण्याच्या कार्यक्रमाला प्राधान्य द्यावे ही त्यांची भूमिका विशिष्ट विचारसरणीवर आधारलेली होती. राहायला घर बऱ्यापैकी असले तर दलितांच्या मनातील न्यूनगंड जाण्यास चालना मिळेल, गावातील प्रतिष्ठित सवर्णांबरोबरीचे आपण आहोत ही भावना

वाढीस लागेल, विशेषतः लहान मुलांना अभ्यास करण्यास योग्य वातावरण तयार होईल, यासाठी सर्व दलितांना विशेष प्रयत्न करून चांगली घरे बांधून द्यावीत असे देवलांना वाटत होते. एखाद्या दानशूर धनवंताकडून यासाठी देणगी मिळवण्याचीही त्यांनी खटपट केली. परंतु त्यात त्यांना यश मिळाले नाही.

देणगी मिळवून दलितांसाठी घरे बांधावीत या विचाराशी त्यांचे काही मित्र सहमत नव्हते. त्यांचे म्हणणे असे की, घरबांधणी अगर अशा प्रकारचे अनुउत्पादक उपक्रम दलितांच्या आर्थिक व्यवसायात मिळणाऱ्या नफ्यातून हाती घेणे अधिक योग्य ठरेल. देणग्या गोळा करून एका गावाचा प्रश्न सुटू शकेल. परंतु म्हैसाळ-प्रकल्पात आपणांस दलित स्वतःच्या आर्थिक व्यवसायातून चांगली घरे बांधू शकतात हे दाखवायचे आहे. तसेच स्वतःच्या बचतीमधून घर बांधायचे ठरविल्यास व्यवसाय अधिक कार्यक्षमतेने चालविण्यास आणि काटकसर करण्यास प्रोत्साहन मिळू शकेल. या कारणांसाठी देणग्यांतून घरबांधणीचा उपक्रम हाती घेण्यास देवलांच्या मित्रांचा विरोध होता.

अखेरीस हा दुसरा विचार मान्य झाला. सामुदायिक शेतीच्या उत्पन्नातून घरबांधणीचा उपक्रम पार पाडण्याचे ठरले. घरबांधणीच्या योजना दोन आहेत : (१) गावातील श्रीविठ्ठल सोसायटीचे सभासद व इतर कुटुंबे यांच्यासाठी 'गुरू गोविंद हाउसिंग सोसायटी', आणि (२) म्हैसाळ रेल्वेस्टेशनजवळच्या मोकळ्या जागेत स्थायिक झालेल्या भटक्या जमातीच्या कुटुंबांसाठी 'श्रीविजय हाउसिंग सोसायटी'. या दोनही योजनांचा तपशील खाली दिला आहे.

अ. *गुरू गोविंदसिंग हाउसिंग सोसायटी :* या संस्थेचे नावच प्रथम औत्सुक्य निर्माण करते. महाराष्ट्रातील एका सर्वसाधारण खेड्यातील दलित जातीच्या समाजातील लोकांनी गुरू गोविंदसिंग यांच्या नावाने संस्था काढावी ही एक आश्चर्यकारक घटना म्हणावी लागेल. हे नाव देवलांनी सुचविले व सर्वांनी स्वीकारले. असे नाव देण्यामागे इतर जमातींमधील श्रेष्ठ व्यक्तींचा आदर करावा ही भूमिका आहे. असे करण्याने विविध जाति-धर्मांतील लोकांमध्ये स्नेहभाव वाढेल असे देवल यांना वाटले.

या संस्थेमार्फत एकूण १५२ घरे बांधण्याचे ठरले आहे. त्याप्रमाणे कामास सुरुवातही झाली आहे. महार जातीचे १४० सभासद व कोरवी जातीचे १२ सभासद अशी एकूण १५२ कुटुंबांसाठी घरे होतील. हे सर्व लोक श्रीविठ्ठल सोसायटीचे सभासद आहेत. घराचा आराखडा तयार करताना लोकांच्या गरजा लक्षात घेतल्या आहेत. दोन खोल्या, एक गोठा, एक संडास, दोन घरांना मिळून एक गोबर गॅस प्लँट अशी घराची योजना आहे.

तक्ता क्र० ७·१

एका घराचा खर्च

२ खोल्या	...	रु० ४०००
१ गोठा	...	रु० ४०००
संडास व $\frac{1}{2}$ गोबर गॅस प्लँट	...	रु० ३५००
	एकूण	रु० ११५००

तक्ता क्र० ७·२

घरबांधणीसाठी पैशाची व्यवस्था

१. सरकारी अनुदान (सब्सिडी)	...	रु० १०००
२. बिनव्याजी कर्ज	...	रु० २६००
३. सभासदाची वर्गणी	...	रु० २००
४. जिल्हा परिषदेचे अनुदान	...	रु० २००
५. गोबर गॅस प्लँट (खादी कमिशन)	...	रु० ३५००
		रु० ७५००

उरलेले रु० ४००० बँकेकडून कर्ज काढणार आहेत.

कर्जाऊ रक्कम सभासदांनी फेडायची आहे. परंतु श्रीविठ्ठल शेती सोसायटीने यासाठी एक योजना तयार केली आहे. द्राक्षबागेचे क्षेत्र दहा एकरांपर्यंत वाढवायचे व त्यातील फायदा पूर्णपणे घरे बांधण्यासाठी वापरायचा अशी योजना आहे. द्राक्षबाग वाढविण्यासाठी देणगी व बिनव्याजी कर्जरूपाने पैसे मिळाले. द्राक्षापासून नफ्याचे प्रमाण बरेच असल्याने हे कर्ज फेडणे सहज शक्य दिसते.

शेतीमध्ये होणारा नफा परस्पर घरबांधणीच्या खर्चासाठी वापरण्याची ही योजना देवल व त्यांचे सहकारी यांच्या कल्पकतेची द्योतक आहे, असे म्हणावे लागेल. हा नफा सभासदांच्या हाती पडला तर ते स्वतः आपण होऊन नवीन घरे बांधतील अशी खात्री नाही. जरी बांधली तरी ती या आराखड्याप्रमाणे असतीलच असे नाही.

या आराखड्याप्रमाणे संडास व गॅस प्लँट दोहोंचाही घरात अंतर्भाव आहे. म्हैसाळ या मोठ्या गावात संडास फार तुरळक आहेत. श्रीविठ्ठल सोसायटीनेच प्रथम सहा संडास बांधले आणि त्यावर गोबर गॅस प्लँट बसविला. जर घरोघरी स्वतंत्र संडास बांधले गेले तर गावातील अस्वच्छता मोठ्या प्रमाणात दूर होईल. एकूण गावाचे रूपच पालटले जाईल असे दिसते.

शेतीतील नफा अशा रीतीने वापरल्याने एकाच वेळी लोकांची सोय, गावातील स्वच्छता इत्यादी गोष्टी साधल्या जाणार आहेत. दलितांना चांगली घरे देण्याचे देवलांचे स्वप्न, त्यांच्या श्रमांतून मिळगाऱ्या फायद्यातूनच साकार होत आहे.

ब. *श्रीविजय हाउसिंग सोसायटी :* म्हैसाळ रेल्वेस्टेशनजवळ सुमारे अडुसष्ट कुटुंबे राहतात. त्यांपैकी बेरड व गोसावी जमातींची कुटुंबे गेल्या दहा वर्षांतच स्थायिक झालेली आहेत. लिंगायत व मराठा लोक सोडल्यास शेतजमीन कोणास नाही. हे सर्व लोक मजुरी व इतर कामे करून पोट भरतात.

गोसावी लोक पूर्वी सतत भटकत होते. दहा वर्षांपासून ते येथे आहेत व येथेच स्थायिक होण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पूर्वी हे सर्व लोक भिक्षा मागून जगत होते. शिकार हाही त्यांचा एक उद्योग होता. एका गावात तीन दिवसांपेक्षा जास्त राहण्यास त्यांना परवानगी नव्हती. हे

लोक भटकत भटकत म्हैसाळ येथे आले. पूर्वीचे बंधन सरकारने काढून घेतले तेव्हा तेथेच स्थायिक होण्याचा विचार ते करू लागले. देवलांची व त्यांची गाठ पडली. देवलांनी त्यांना स्थायिक होण्यास मदत केली. प्रत्येक कुटुंबास त्यांनी एक म्हैस दिली. स्वतःच्या व इतरांच्या शेतावर काम देऊ केले.

स्थायिक होण्याचे ठरल्यावर या लोकांनी आपली घोडी इत्यादी जनावरे व शिकारीची साधने विकून टाकली व नवीन व्यवसायास प्रारंभ केला. दूधव्यवसाय, मजुरी यांव्यतिरिक्त काही कुटुंबांनी फळांचा आणि लोखंडी सामानाचा व्यापार सुरू केला. फळविक्रीत बराच फायदा झाल्याचे दिसते. घरी स्त्रियांना दुधाचा धंदा व पुरुषांना व्यापार अशा नवीन उद्योगांनी या लोकांच्या जीवनात बराच बदल घडवून आणला. म्हशींना लागणारा चारा गोळा करूनच आणतात. त्यामुळे फायद्याचे प्रमाण अधिक आहे. सर्वसाधारणपणे दिवसाकाठी पाच लिटर दूध मिळते. या कुटुंबांतील मुले प्रथमच शाळेत जाऊ लागली आहेत.

वेरड जातीची सात कुटुंबे ही अशीच बाहेरून आलेली आहेत. यांचा पूर्वीचा उपजीविकेचा मार्ग चोऱ्या, वाटमारी करणे आणि भीक मागणे हा होता. या कामांतून अधूनमधून खूनही होत असे. आपल्या पूर्वायुष्याबद्दल मनमोकळेपणे हे लोक बोलतात. पोलिसांचा त्रास फार होत असे. सुमारे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी शेडबाळ येथे त्यांनी जमीन घेतली होती. परंतु लोकांचा त्रास होऊ लागला म्हणून जमीन विकून हे सर्व लोक म्हैसाळ येथे आले. देवलांकडून तीन एकर जमीन विकत घेतली. त्याचबरोबर सर्वांनी म्हशी व शेळ्या घेतल्या. त्यांनाही वैरण विकत घ्यावी लागत नाही.

वरील अडुसष्ट कुटुंबांपैकी लिंगायत, मराठा, मुसलमान व धनगर यांची कुटुंबे सोडल्यास इतर कुटुंबांना झोपड्या बांधण्यास जागा नव्हती. झोपडी बांधल्यास त्या जमिनीचा अगर शेजारच्या जमिनीचा मालक त्यांच्यावर वेठबिगारी लादत असे. झोपडी बांधून देण्यास परवानगी दिल्याबद्दल घरातील एका माणसाला शेतावर फुकट काम करावे लागे. तसे केले नाही, तर जमीनमालक झोपडी पाडून टाकी.

सुमारे दहापंधरा वर्षे अशा तऱ्हेने फुकट काम केले. या परिस्थितीत १९६० नंतर थोडा फरक पडला. जमीनमालकांनी सक्तीने काम करून घेण्याचे सोडले, पण त्या बदल्यात या कुटुंबांनी मालकांच्या शेतासाठी खत गोळा करून आणून द्यावे, असे बंधन घालण्यात आले. खत देण्याचा ठराव दोनही बाजूंमध्ये चर्चा होऊनच झाला. घरटी एका माणसास आठवड्यातील तीनचार दिवस यासाठी घालवावे लागत, तेव्हा कुठे मालकाचे समाधान होईल एवढे खत गोळा होई.

१९६६ मध्ये कुटुंबामागे एकशे तीस याप्रमाणे पन्नास कुटुंबांनी वर्गणी गोळा केली आणि एकरी साडेदहाशे रुपये या दराने साडेपाच एकर जमीन विकत घेतली. त्याचे पन्नास प्लॉट पाडले आणि प्रत्येकाने आपापली झोपडी बांधली; हाउसिंग सोसायटी स्थापन केली आणि गावातील प्रतिष्ठित पुढाऱ्याचे नाव असल्याखेरीज सरकारदप्तरी दाद लागणार नाही म्हणून गावच्या पुढाऱ्याला मुख्य प्रवर्तक होण्याची विनंती केली. त्यांनी ती मान्य केली.

नंतर लगेच या जमिनीस लागून साडेचार एकरांचा एक तुकडा एकरी दोन हजार रुपये या दराने पंचेचाळीस कुटुंबांनी विकत घेतला.

१९७२ मध्ये मुख्य प्रवर्तक वारले. त्यामुळे त्यांच्या बंधूंकडे हे लोक गेले आणि सोसायटीचे काम चालू करण्याबाबत त्यांस विनंती केली. त्यांनी कागदपत्र पाहून याच लोकांकडून प्रत्येक कुटुंबामागे रु० १९५ ची बाकी काढली, व बाकी लवकर भरण्याचा तगादा लावला. या लोकांना याचा खुलासा होईना. आपली दाद लागत नाही, उलट आपल्यावरच बाकी काढून आपणांस आहे या जमिनीवरून हुसकावून लावले जात आहे असे त्यांना दिसू लागले. त्यांनी देवलांकडे धाव घेतली. सर्व कागदपत्रे मुख्य प्रवर्तकाकडे होती. देवलांनी सर्व कागदपत्रांच्या (कचेरीतील मूळ प्रतीवरून) नकला करून घेतल्या आणि सोसायटी रजिस्टर करण्यासाठी प्रयत्न केले. प्रवर्तकाने रु० ८४४० चा दावा केला. त्याची शहानिशा होऊन सोसायटी १२-७-७६ रोजी रजिस्टर झाली.

या काळात या गरीब कुटुंबांना फार हलाखीच्या परिस्थितीतून जावे लागले. अजूनही काही प्रमाणात त्रास सोसावा लागतोच. नंतर घेतलेल्या साडेचार एकर जमिनीचे बिगरशेतीकरण करण्यातही अडचणी आल्या. पूर्वीच्या जमिनीवर घरे बांधण्यास सुरुवात केली. परंतु त्यासही हरकती घेण्यात आल्या आहेत.

येथील घराचा आराखडा निराळा आहे. फक्त दोन खोल्या (१०'×१०'च्या) व बाहेर ओटा एवढेच घर आहे. त्याची किंमत चार हजार रुपये असून अस्पृश्य जमातीच्या लोकांना प्रत्येकी बाराशे रुपये व भटक्या जमातीच्या लोकांना घरामागे सतराशे रुपये सरकारी अनुदान मिळणार आहे. बाकीच्या रकमेसाठी एक बँक कर्ज देणार आहे. त्यावर नऊ टक्के व्याज आहे; पण त्यासाठी जिल्हा परिषदेचे अनुदान आहे. मूळ रक्कम दहा वर्षांत फेडायची आहे.

सोसायटी रजिस्टर करण्यासाठी प्रत्येक सभासदाने दोनशे रुपये द्यायचे होते. ही रक्कम देवलांनी भरली आहे. आज या योजनेनुसार एकूण बत्तीस घरे बांधली जाणार आहेत. त्यात खालीलप्रमाणे निरनिराळ्या जातीतील कुटुंबांचा समावेश आहे :

तक्ता क्र० ७.३

विजय सोसायटीतील विविध जाती

जात	कुटुंबे
गोसावी	१०
बेरड	५
चांभार	५
महार	१०
मराठा	१
धनगर	१
	एकूण ३२

वरील घरबांधणीच्या योजना लवकरच अंमलात येतील. तीन वर्षांच्या काळात घरे पूर्ण

होतील. पूर्वी सांगितल्याप्रमाणे या उपक्रमाची वैशिष्ट्ये थोडक्यात अशी :

(अ) दलितांच्या व्यवसायातील शिलकीमधूनच खर्च होणार आहे.

(ब) विविध जातींतील कुटुंबांचा यात समावेश आहे. त्यामुळे या जमातींतील सामंजस्य वाढीस लागेल.

(क) घराचा आराखडा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यात गोठा व संडास अंतर्भूत आहे.

(ड) मोठ्या संख्येने अशी घरे गावात बांधली गेल्यामुळे गावचे रूप पालटणार आहे. दलित वस्ती गावामध्ये उठून दिसेल. संडास, गोठा यांचा अंतर्भाव असल्यामुळे गावात स्वच्छता राहील व इतरांनाही याच पद्धतीने स्वच्छता राखणे भाग पडेल.

४. देवदासी पद्धतीस आळा व देवदासींचे पुनर्वसन : देवदासींची अनिष्ट पद्धत म्हैसाळ गावात फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. गावात यल्लमा देवीचे देऊळ आहे. या देवीची उपासना करणारे गावात बरेच दिसतात. महार, मांग, चांभार अशा जातींतील लोक आपल्या घरातील मुली देवाला सोडतात. मुख्यतः महार जातीतच हा प्रघात मोठ्या प्रमाणावर आहे. देवीस सोडलेली मुलगी अविवाहित राहते, जन्मभर देवीची उपासना करते, देवीपुढे नाचगाणे करते. या मुलीचे लग्न देवाबरोबर लावतात. देवाच्या नावाने मंगळसूत्र गळ्यात घातले जाते. हे मंगळसूत्र या बाईच्या मृत्यूनंतर तिच्या घरातील एखाद्या मुलीच्या गळ्यात घालावेच लागते. अशा रीतीने देवदासींची परंपरा चालू राहते. देवदासी अविवाहित राहिल्या तरी कोणा एकाबरोबर संबंध ठेवतात, बऱ्याच वेळा अनेकांशी संबंध येतो. या संबंधातून जन्माला आलेली मुले आपल्या आईचे नाव लावतात. 'देवदासींची मुले' म्हणून त्यांना संबोधले जाते. सामान्यतः देवदासी म्हणजे वेश्या असे समीकरण मानले जाते.

ही प्रथा बंद व्हावी आणि देवदासींचे पुनर्वसन व्हावे यासाठी देवलांनी सर्व दलित तरुणांचे मन वळवले व त्यांनाच या कामासाठी प्रवृत्त केले. श्रीविट्ठल सोसायटी स्थापन होण्यापूर्वी प्रत्येक महार कुटुंबात एकतरी देवदासी असे. इतर अस्पृश्य जातींतही देवदासी होत्या. जुन्या पिढीतील किमान तीस टक्के लोक तरी देवदासींची मुले होती. आता हे प्रमाण घटले आहे.

देवदासीची प्रथा बंद होण्यासाठी श्रीविट्ठल सोसायटीच्या तरुण सभासदांनी विशेष पुढाकार घेऊन देवदासींशी चर्चा करण्यास प्रारंभ केला. अनेक वेळा प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांचे मन वळवणे हा एक मार्ग झाला. पण तेवढ्याने भागण्यासारखे नव्हते. कारण त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न सोडवल्याखेरीज त्या स्त्रिया देवदासीचे काम सोडण्यास तयार होणे शक्य नव्हते. यासाठी सोसायटीच्या शेतीवर त्यांना काम देण्यात आले. त्यांना अग्रहक्काने काम देण्याचे ठरले. परंतु त्यांना काम करण्याची सवय नव्हती. त्यामुळे बऱ्याच देवदासी मजुरीच्या कामास तयार होईनात. यावर "तुम्ही जमेल ते काम करा. नुसत्या बांधावर बसून राहा. आम्ही पूर्ण मजुरी देऊ," असे तरुण दलित कार्यकर्ते म्हणू लागले. इतर मार्गानेही आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न झाला. या सर्व धोरणाचा व प्रयत्नांचा परिणाम होऊन बहुसंख्य देवदासींनी आपले देवदासीचे काम सोडले. नवीन देवदासी सोडण्याचा प्रघातही मोठ्या प्रमाणावर कमी झाला.

नवीन देवदासी सोडल्या जाऊ नयेत यासाठी दलित कुटुंबांतील मुलींच्या लग्नाला मदत

देण्याचा उपक्रम सोसायटीने हाती घेतला. आजपर्यंत एकोणतीस मुलींच्या लग्नासाठी प्रत्येकी सुमारे पाचशे रुपये मदत देण्यात आली. ही मदत दिली नसती तर यांतील निम्म्यापेक्षा अधिक मुली देवाला सोडल्या गेल्या असत्या, असा दलित कार्यकर्त्यांचा दावा आहे. त्यात तथ्य आहे. देवदासींच्या मुलींचीही लग्ने लावून देण्याचे प्रयत्न होत आहेत.

ही प्रथा पूर्णपणे बंद करण्यात मात्र यश आलेले नाही. याचे एक कारण असे की ही प्रथा बंद व्हावी असे गावातील प्रतिष्ठित लोकांना वाटत नाही. देवदासींना बोलावून घेतले जाते व देवदासीचे काम सोडणे धर्माविरुद्ध आहे हे त्यांना पटवण्याचा प्रयत्न केला जातो. देवदासींना जेव्हा सोसायटीच्या शेतावर मजुरीचे काम देऊ केले तेव्हा "दोन एकर जमीन दिलीत तरच देवदासीपण सोडू," अशी मागणी करण्याची चिथावणीही त्यांना दिली गेली. देवदासींवर देवाधर्माचे दडपण आणले जाते, त्याचप्रमाणे आर्थिक प्रलोभनही दाखवले जाते. त्यामुळे आजही गावात सुमारे पंधरावीस देवदासी आहेत. त्यांत नऊ महार जातीच्या, दोन मातंग समाजाच्या, दोन चांभार व एक मुसलमान आहे. एक मुसलमान देवदासी गेल्या दोन वर्षांपूर्वीच देवाला सोडण्यात आली. साधारण गरीब व मागास जमातीचे लोक या दडपणाला व प्रलोभनाला बळी पडतात.

संस्थेच्या कार्यकारिणीवर सोनाबाई तुका ही स्त्री-सभासद आहे. ती पूर्वी देवदासी होती. ती व तिची बहीण या दोघींनी आपली जमीन सोसायटीच्या शेतीत समाविष्ट करून टाकली. दोघीही शेतावर मजुरी करावयास लागल्या. दोन वर्षांपूर्वी त्यांनी गाय घेतली. त्या म्हणाल्या, "पूर्वी पाटलाकडे गयावया करून, भीक मागून, धान्य आणत असू. विठ्ठल सोसायटी झाल्यापासून त्यांच्याकडे जात नाही. पूर्वी त्यांच्याकडे झाडलोटीचे काम करावे लागे. लाकडे फोडावी लागत. आता त्याला सांगते, बखारीतून लाकडे घे. पहिल्यांदा कपबशी बाहेर होती. आता 'या या' म्हणतात. चहा आणून देतात. दादा (देवल) म्हणतात, 'बिनधास्त आत जाऊन चहा पीत जा.'"

कमळा कोयना ही संस्थेची चाहती असलेली एक देवदासी. सहासात वर्षांची असताना तिला देवीला सोडण्यात आले. तिला त्या वेळेस काहीच कळत नव्हते. नवीन कपडे घालायला मिळाले म्हणून आनंदात होती. वीस-पंचवीस मैलांवर असलेल्या डोंगरावर यल्लमाचे देऊळ होते. तिथे तिचे देवाशी लग्न झाले. एकदा घातलेले मंगळसूत्र तोडून टाकायचे नाही, एवढेच नव्हे तर दुसरीच्या गळ्यात ते घातले पाहिजे, अशी तिची श्रद्धा आहे. पण तिच्या मुलांनी या बाबतीत निर्धार केलेला आहे. तिचे मंगळसूत्र तिच्याबरोबर जाईल असे ते म्हणतात. मोठा मुलगा शिकलेला व अभिनयात वाकबगार आहे. तो स्पष्टपणे म्हणाला, "आमच्यापैकी कोणी मंगळसूत्र वागवण्याची जबाबदारी घेणार नाही. आई जाईल तेव्हा देवीला हात जोडून म्हणेन, 'तुझं झाड होतं ते तुझ्याबरोबर गेलं. त्याची जबाबदारी तुझी तू घे.'" ही जाणीव आणि हा निश्चय देवदासींच्या मुलांमध्ये प्रकर्षाने दिसून येतो.

खुद्द कमळाबाईदेखील आता विचाराने बदलली आहे. ती ठामपणे सांगते, "मी माझं मंगळसूत्र वागवण्यासाठी माझ्या मुलीला देवदासी सोडणार नाही. ही प्रथा वाईट आहे." तिच्या पूर्वीच्या समजुती आता नाहीशा होत आहेत. परंतु देवीची भीतीही वाटत असते. तिला एकूण

दहा मुले झाली. सहा मुले व चार मुली. आता फक्त एकाच मुलीचे लग्न राहिले आहे. त्या खटपटीत ती आहे. कमळाबाईसह अनेक देवदासींनी देवापुढे नाचणेगाणे सोडले. गावातील प्रतिष्ठित लोकांच्या घरी देवीपुढे भजन म्हणणे आणि नाचणे सोडले. त्यांच्याच मुलांनी त्यांना समजावले म्हणून हे जाणे बंद झाले.

देवदासीचा नित्याचा क्रम म्हणजे रोज देवळात जाऊन पूजा करणे आणि गाणी म्हणणे. अमावास्या, पौर्णिमा या दिवशी आणि दर मंगळवारी रोज तासभर देवीपुढे नाचगाणे होते. याव्यतिरिक्त, गावकरी देवदासींना घरी बोलावून त्यांच्याकडून देवीची पूजाअर्चा करून घेतात. बऱ्याच वेळा नवस फेडण्यासाठी पूजा होते. मराठा जमातीत निम्म्यापेक्षा अधिक लोक देवीची वर्षातून एकदा तरी घरी पूजा करतात. त्या वेळेला गावातील सर्व देवदासींना निमंत्रण असते. महिन्यातून पंधरा दिवस तरी असे बोलावणे येते. त्या वेळी सर्व देवदासींना मिळून सुमारे शंभर रुपये रोख वाटले जातात. याशिवाय जेवण व प्रत्येकीला खण वगैरे मिळू शकतो. गावकरी श्रीमंत असला तर बिदागी जास्त मिळू शकते. देवीला लुगडे देतात ते पुजारी घेतो. ते देवदासींना मिळत नाही. त्याशिवाय पुजाऱ्याला धोतर, टोपी आणि अंगरख्याचे कापड मिळते. गावात कोणी मरण पावले तर देवदासींना त्याच्या नावे आंघोळ करावी लागते.

गावात देवदासींना कमी लेखले जाते. त्यांच्या मुलांना 'देवदासींची मुले' म्हणूनच ओळखले जाते. मुलांची संपूर्ण नावे सांगताना बापाच्या नावाऐवजी आईचे नाव सांगतात. महार जातीत अशा लोकांची संख्या आजही बरीच आहे.

देवदासी पद्धत बंद करण्याचा प्रयत्न चालू झाला तेव्हा त्यांच्या मुलांमधील न्यूनगंड घालवणे यासाठीही प्रयत्न झाले. ते यशस्वी झाले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

५. **दारूमुक्ती** : "पूर्वी संध्याकाळ झाली की म्हारं आमच्या घरासमोरच्या रस्त्यात झुलत असत!" पूर्वीच्या परिस्थितीचे वर्णन एका चांभार समाजातील शेतकऱ्याने या शब्दांत केले. श्रीविठ्ठल सोसायटी स्थापन होण्यापूर्वी दलितांमध्ये दारू पिण्याचे प्रमाण फार होते. दारूच्या व्यसनाला आळा बसू लागला ते दूधव्यवसायाच्या प्रसारामुळे. जनावरांची देखभाल करणे भाग पडू लागले, तेव्हा साहजिकच दारू पिणे कमी करावे लागले. नंतर श्रीविठ्ठल शेती सोसायटी स्थापन झाली. तिचा उद्देश, पूर्वी सांगितल्याप्रमाणे दलितांची सर्वांगीण उन्नती साधणे हा होता. प्रथमपासूनच देवल सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर देत होते. तरुण कार्यकर्त्यांनी दारूचे व्यसन बंद पाडण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यास प्रारंभ केला. केवळ उपदेश करून दारूचे व्यसन जाणार नाही हे स्पष्ट होते. म्हणून अधिक परिणामकारक उपाय योजण्यात आले. दारूच्या भट्ट्या, भांडीकुंडी नष्ट करणे हा एक उपाय होता. त्याचबरोबर दारू पिणाऱ्यांना दंड करणे आणि दहशत बसवणे यासठीही उपाय झाले. दहशत बसण्यासाठी तरुण कार्यकर्त्यांनी एकदोन वेळा रात्रीच्या वेळेस पोलिसांचा वेष घालून दारुड्यांना समज दिली. त्याचा परिणाम झाला. समज देणारे खरोखरच पोलीस आहेत असे त्यांना वाटले. तेव्हापासून दारूचे प्रमाण एकदम घटले.

तरुण पिढीच दारूच्या विरुद्ध गेल्यामुळे मोठ्या लोकांच्या व्यसनावर बंधन पडू शकले. पण दारूचे पूर्णपणे उच्चाटन झाले असे म्हणता येणार नाही. हातभट्टी जरी नाहीशी झाली तरी

पुन्हा अलिकडच्या काळात दारूच्या दुकानांत दारू मिळण्याची सोय झाल्यामुळे पुन्हा दारूचे प्रमाण वाढते आहे की काय अशी भीती निर्माण झाली आहे. आजही भर दिवसा काही तरुण दारूच्या नशेत असलेले आढळतात. हे तरुण सोसायटीच्या सभासद कुटुंबांतील आहेत. पण हे प्रमाण अल्प आहे यात शंका नाही. वरील गृहस्थांच्या शब्दांतच सांगायचे झाल्यास "आता सुधारणा झाली आहे, पण फक्त आठ आणे. अजून पाण्याने गुणधर्म बदललेला नाही. एकदम सुधारणा कठीण." लोक या बाबतीतही देवलांना श्रेय देताना आढळतात. "मधादादांचे उपकार ह्यांच्याच्याने मेल्यानंतरही फिटणार नाहीत!" ही भावना सर्वत्र आढळते.

सभासदांना जेव्हा सोसायटीकडून मदत लागते तेव्हाही सभासद दारू पिणार नाही याची खात्री करून घेतली जाते. पाचसहा सभासदांना गायी देण्यासाठी विरोध झाला होता, तेव्हा 'आम्हांला सुधारण्यासाठी वाव दिला जात नाही' अशी त्यांनी तक्रार केली. त्यावर बरीच साधकबाधक चर्चा होऊन त्यांना गायी देण्याचे ठरले. परंतु हा निर्णय योग्य नव्हता हे नंतरच्या घडामोडींवरून दिसून आले. पहिले काही दिवस या सभासदांनी दारू बंद केली. पण नंतर पूर्ववत परिस्थिती. गायींची देखभाल घरच्या इतर लोकांनाच करावी लागली. शिवाय दुधापासून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग, निदान काही प्रमाणात तरी, दारू घेण्यासाठी होऊ लागला असे दिसून आले. त्यावर काही करता आले नाही. एकजण पूर्णपणे सुधारला. पूर्वी त्याला रोज उचलून घरी न्यावे लागे. त्याचे पिणे पूर्णपणे बंद झाले. त्याचा संसार मार्गी लागला. त्याला नंतर कार्यकारिणीचा सभासद करून घेण्यात आले.

एकंदरीत हा उपक्रम बराच यशस्वी झाला असे म्हणावे लागेल. दलितेतर प्रतिष्ठित मंडळी व्यसन मोठ्या प्रमाणावर संपुष्टात आल्याचे एकमुखाने सांगतात, हा याबाबत महत्त्वाचा पुरावा मानता येईल.

६. इतर कार्ये :

अ. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत :

शिक्षणाचा प्रसार करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांनी मानले आहे. आज शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण पुष्कळच वाढले आहे. गरीब मुलांना विशेष मदत दिली जाते. आजपर्यंत बारा विद्यार्थ्यांना प्रत्येकी सुमारे तीनशे रुपये मदत दिली आहे.

दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यापासून शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. आज किमान पंचाहत्तर टक्के मुले शाळेत जातात. मुलांना शाळेत पाठविण्याबाबत कार्यकर्त्यांचा आग्रह असतो. नुकतीच श्रीविठ्ठल सोसायटीमार्फत एक बालवाडी सुरू करण्यात आली आहे. मुलांची संख्या चाळीस असून, एक ट्रेंड शिक्षिका नेमलेली आहे. ही शिक्षिका हे काम हौसेने करीत असल्याचे दिसून आले.

ब. शिबिरे व इतर शैक्षणिक उपक्रम :

मेळावे आणि शिबिरे वेळोवेळी आयोजित करणे हे एक महत्त्वाचे काम सोसायटीचे कार्यकर्ते करीत असतात. या शिबिरांचे उद्दिष्ट आणि स्वरूप ठरविण्यात जागरुकता दिसून येते.

प्रस्थापित समाजव्यवस्था समजावून देणे व त्यातील अनिष्ट स्वरूपाची विषमता घालविण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे हे एक प्रमुख उद्दिष्ट असते. दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणारे ज्ञान देणे हेही एक उद्दिष्ट असते. इतरत्र भरणाऱ्या मेळाव्यांना आणि शिबिरांना म्हैसाळमधील किमान दोनतीन कार्यकर्ते पाठवण्यावर देवलांचा कटाक्ष असतो. त्यापाठीमागे हेतू हा की सर्व प्रकारच्या विचारप्रणालींशी येथील दलित तरुणांचा परिचय व्हावा. "दलितांचा इतर क्षेत्रांतील कार्यकर्त्यांशी संबंध आल्याशिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणार नाही," असे देवल नेहमी म्हणत असतात. त्यामुळे कोणताही विचारप्रणाली ते वर्ज्य मानीत नाहीत. येथील तरुण बाहेर पाठवणे, तसेच बाहेरचे कार्यकर्ते येथे आणणे यालाही तितकेच, किंबहुना अधिकच, महत्त्व ते देत असल्याचे दिसते.

शिबिरे आयोजित करताना स्त्रिया, तरुण व वयस्कर मंडळी यांच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रम आयोजित करण्याकडे कल दिसतो. उदाहरण म्हणून दोन शिबिरांचा उल्लेख करता येईल. मे १९७५ मध्ये पुण्यातील एकोणीस विद्यार्थ्यांना पाच दिवस म्हैसाळ येथे बोलाविले होते. त्यांनी जवळच्या काही गावांतील दलितांची आर्थिक, सामाजिक पाहणी केली. सोसायटीच्या शेतावर कामे केली आणि त्याशिवाय विविध विषयांवर चर्चासत्रे घेतली. त्यासाठी स्त्रिया, तरुण मुले व प्रौढ असे सभासदांचे तीन गट पाडले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतः निवडलेल्या विषयावर चर्चासत्र घेतले.

मे १९७८ मध्ये दहा दिवसांचे स्त्रियांचे एक शिबिर आयोजित केले होते. त्यात चांभार जातीच्या सहा, गोसावी अठरा, मराठा तीन व महार पासष्ट स्त्रियांचा समावेश होता. या सर्व स्त्रिया दहा दिवस एकत्र राहिल्या. या मजुरी करणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यांची मजुरी बुडू नये म्हणून त्यांना रोजी अडीच रुपयांप्रमाणे मानधन दिले. या शिबिरातून अंधश्रद्धा, स्त्री-पुरुष-समता अशा विषयांवर भर होता. काही व्यावसायिक शिक्षणही देण्याचा प्रयत्न झाला.

क. *औषधपाण्यासाठी मदत :*

आजपर्यंत वीस कुटुंबांना एकूण सुमारे सात हजार रुपये मदत देण्यात आली आहे.



प्रकरण आठवे

दलितांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत पडलेला फरक

दलित सभासदांची १९६२ पूर्वीची व आजची (१९७९-८०) परिस्थिती यांमधील फरक फार मोठा आहे. दूधव्यवसाय व सामुदायिक शेती यांच्या अभ्यासातून याबाबत निश्चित अंदाज करता येतो. सर्व बदलत्या परिस्थितीचा अभ्यास करून आम्ही एकूण अडुसष्ट सभासदांची व्यक्तिगत माहिती मिळवली. त्यातून हा फरक अधिक स्पष्टपणे मांडता येईल. या पाहणीतील आकडेवारी आणि सभासदांची वैयक्तिक निवेदने यांच्या आधारे या दोन परिस्थितींतील फरक दाखवण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

१९६२ पूर्वीची आर्थिक परिस्थिती अचूक आकडेवारीच्या स्वरूपात सांगणे अशक्य आहे. सभासद त्या काळच्या परिस्थितीचे फक्त ढोबळ वर्णन करू शकतात. पण हे वर्णन परिस्थितीची कल्पना येण्यास पुरेसे आहे. त्या काळात उत्पन्नाची फक्त दोनच साधने होती : स्वतःच्या शेतातून घेतलेले उत्पन्न आणि इतरांच्या शेतावर काम करून मिळविलेली मजुरी. यांपैकी पहिले साधन नाममात्रच होते. यापूर्वीच्या विवेचनात सभासदांची स्वतःची शेतजमीन अल्पप्रमाणात होती हे स्पष्ट झालेच आहे. निम्म्यापेक्षा अधिक सभासदांची शेती अर्ध्या एकरापेक्षा कमी होती. पाच एकरांपेक्षा अधिक शेतीचे क्षेत्र असणारे फक्त पाच सभासद होते. शेती लहान आणि त्यात पाणीपुरवठ्याची सोय नाही, साधनेही नाहीत, त्यामुळे शेतीतून उत्पादन नाममात्र होते. फक्त ज्वारीचे पीक आणि थोड्या प्रमाणात भुईमूग अशी दोनच पिके घेता येत असत. पण बहुतेक सभासदांना एवढेही शक्य नव्हते. एकदोन अपवाद सोडल्यास सर्वांनी आपली जमीन गहाण टाकलेली होती. त्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न नगण्य होते असेच म्हणावे लागेल.

एकूण अडतीस जणांकडून कर्जाचा तपशील मिळू शकला. त्यावरून परिस्थितीची कल्पना येते. या अडतीस जणांची, गहाण टाकलेल्या क्षेत्राप्रमाणे, खालीलप्रमाणे वर्गवारी दिसून आली :

तक्ता क्र० ८·१

गहाण क्षेत्रानुसार वर्गवारी

गहाण ठेवलेले क्षेत्र (एकर)	*सभासदांची संख्या*
१ एकरापर्यंत	२६
१·१ – २ एकर	७
२·१ – ३ एकर	२
३·१ – ५ एकर	१
७ एकर	१
११ एकर	१
एकूण	३८

बहुसंख्य सभासदांची जमीन एक एकरापेक्षा कमी होती, हे या तक्त्यावरून दिसून येते.

तक्ता क्र० ८·२

कर्जाच्या रकमा

रक्कम (रुपये)	*सभासदांची संख्या*
रु० १००० पर्यंत	२४
रु० १००१ ते १५००	६
रु० १५०१ ते २०००	५
५०००	१
७०००	१
८०००	१
एकूण	३८

कर्जाची रक्कम सामान्यपणे रु० १००० च्या आत होती हे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते.

तक्ता क्र० ८·३

कर्जाची मुदत

मुदत वर्षे	*सभासदांची संख्या*
५ वर्षांपर्यंत	०
५ ते १० वर्षे	८
१० ते १५ वर्षे	२०
१५ ते २० वर्षे	७
एकूण	३५

मुदतीचा काळ सामान्यतः दहा वर्षांपेक्षा अधिक होता. मुदत याचा अर्थ स्पष्ट करावयास हवा. गहाण ठेवलेली जमीन या काळामध्ये सावकारास व्याजापोटी पूर्णपणे वापरण्याचा अधिकार असतो, असा याचा अर्थ आहे. मूळ घेतलेली रक्कम पूर्णपणे परत केल्यानंतरच जमीन मालकाला मिळणार असते. वरील अडतीस सभासदांपैकी तीन सभासदांना मुदतीचा काळ सांगता आला नाही. त्याचा अर्थ त्यांची जमीन सावकाराने बेमुदत वापरण्यास घेतली होती असा होतो.

कर्ज-कराराचे स्वरूप वरील माहितीवरून स्पष्ट होते. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की एका एकरापेक्षा कमी आकाराचा तुकडा दहा ते पंधरा वर्षे गहाण ठेवून सुमारे एक हजार रुपये कर्ज मिळत असे. या दहापंधरा वर्षांच्या काळात सावकार ही जमीन कसून त्यावरील संपूर्ण उत्पादन तो स्वतः घेत असे. कर्जदारास फार तर काम केल्यास मजुरी मिळे. परंतु काम देण्याचे बंधन सावकारावर नव्हते. मुदतीआधी कर्ज फेडून कर्जदारास आपली जमीन परत घेणे तत्त्वतः अशक्य नव्हते. परंतु तसे झाल्याचे उदाहरण नाही. त्याचप्रमाणे मुदत निश्चितपणे ठरलेली होती असे म्हणता येणार नाही. सावकार अशी जमीन बेमुदत आपल्याकडे राहील अशा समजुतीनेच शेतीवर कामकाज करी. शेतजमिनीत सुधारणा करणे, पाण्याची सोय करणे, इंजिन इत्यादीसाठी गुंतवणूक करणे ही कामे करून त्या जमिनीतून तो भरमसाट उत्पन्न घेई. पाणी उपलब्ध असल्यामुळे उत्पादनक्षमता वाढवणे सहज शक्य होते. खुद्द दलित मालकाजवळ भांडवल नसल्यामुळे तो कोरडवाहू शेतीच करू शकला असता. सभासदांच्या मते, त्यांनी गहाण टाकलेल्या जमिनीमधून सावकार किमान एकरी पंधराशे रुपये निव्वळ फायदा सहजपणे मिळवत होता. याचा अर्थ असा की सावकार एक हजार रुपये कर्ज देऊन, त्या बदल्यात सुमारे पंधरा वर्षांच्या काळात साडेबावीस हजार रुपये मिळवत होता.

दलितांना स्वतःची शेती हे उत्पादनाचे साधन पूर्वीच्या काळात जवळपास नव्हतेच असा निष्कर्ष वरील विवेचनावरून काढण्यास हरकत नाही.

दुसरे साधन मजुरी. हेच प्रमुख, किंबहुना एकमेव, साधन होते. १९६२ पूर्वी म्हैसाळ व आसपासच्या गावांत भूमिसिंचनाची व्यवस्था विकसित झालेली नव्हती. त्यामुळे बागायती क्षेत्र अल्प प्रमाणात होते. रोजगारही या कारणास्तव मर्यादित प्रमाणातच उपलब्ध होता. या परिस्थितीत वर्षभर मजुरी कोणासच मिळत नव्हती. शेतमजुरीचे काम नसे त्यावेळी रयताकडे जाऊन त्याच्या दाराशी घोटाळत राहणे हाच एक उद्योग होता. रयत काही तरी काम सांगे आणि त्या बदल्यात काही धान्य, शिळे अन्न, ताक इत्यादी मिळे. उपासमार टाळणे अशक्य होते. माहिती देऊ शकणाऱ्या एकूण सदुसष्ट सभासदांपैकी बत्तीस सभासदांनी वर्षातून पाच महिन्यांपर्यंत बेकारीचे दिवस येत असल्याचे सांगितले. या काळात निश्चित उपासमार सोसावी लागत होती असे त्यांतील बावीस जणांनी सांगितले. उपासमारीचे प्रमाण एक महिना (सात सभासद), दोन महिने (पाच सभासद), तीन महिने (चार सभासद), आठवड्यातून दोन-तीन दिवस (सहा सभासद) असे सांगण्यात आले. परंतु उपासमारीचे दिवस सांगताना बहुतेक सभासदांना नेमके दिवस सांगता आले नाहीत. कारण अन्नाचा कणही पोटात गेला नाही या अर्थाने उपासमार मोठ्या प्रमाणावर नसली, तरी अर्धपोटी राहण्याचा प्रसंग सर्वांवर वेळोवेळी येत होता. त्याचप्रमाणे जेव्हा घरात शिजवण्यास धान्य नसे त्यावेळेस रयतांकडे हांजीहांजी

करून अथवा भीक मागून वेळ मारून नेता येत असे. असे वर्षाकाठी तीनचार महिने सर्वांच्याच वाट्याला येत असल्याचे आढळून आले.

फार पूर्वी म्हणजे १९५० च्याही पूर्वी परिस्थिती कशी होती हे यल्लाप्पा देवाप्पा याच्या शब्दांत सांगता येईल. तो म्हणतो, "त्यावेळी दिवसाला आठ आणेसुद्धा मजुरी मिळण्याची मारामार होती. वर्षातून जेमतेम चारपाच महिने काम मिळायचे. ते मुख्यतः ज्वारी व शेंगांच्या सुगीत (रबी हंगामात). उन्हाळ्यात अगदी थोडे काम मिळायचे आणि पावसाळ्यात अजिबात काम नसे. या बेकारीच्या काळात आठवड्यातून दोन दिवस चूल बंद. एकदोन दिवस घुघऱ्या किंवा काहीतरी खाऊन काढायचे. त्यावेळी रयताकडे जाऊन अंगावर पैसे आणायचे व पुढे सुगीत त्याच्याकडे मजुरीला जाऊन फेडायचे."

सर्वसाधारण परिस्थितीचा अंदाज वरील माहितीवरून येईल.

आज ही परिस्थिती पालटलेली आहे. परिस्थितीत पडलेला फरक आर्थिक व सामाजिक स्वरूपाचा आहे. प्रथम अर्थिक परिस्थिती पाहू.

एकूण अडुसष्ट खातेदार सभासदांची माहिती आम्ही मिळवू शकलो. या कुटुंबांच्या उत्पन्नाची साधने पाच आहेत; ती अशी :

१. सामुदायिक शेतीत समाविष्ट केलेल्या मालकाच्या जमिनीचा खंड; २. स्वतःची वैयक्तिक स्वतंत्रपणे कसलेली जमीन; ३. दूधव्यवसाय; ४. मजुरी करून मिळालेले वेतन; ५. किरकोळ व्यापार, नोकरीचा पगार इत्यादी.

खंडाविषयी माहिती यापूर्वी दिलेली आहे. सर्वसाधारणपणे एकरी चारशे ते पाचशे रुपये खंड मिळतो. मालकीची जमीन अल्प प्रमाणात असल्यामुळे खंडापासूनचे उत्पन्न मामुलीच आहे. सभासदांत याबाबत नेहमीच चर्चा चाललेली आढळून येते. आज सर्वत्र पाणीपुरवठ्याची सोय झाल्यामुळे एकरी किमान दोन हजार रुपये उत्पन्न मिळणे शक्य आहे. सभासदांना हे पहावयास मिळते. त्यामुळे आपल्या जमिनीचा खंड वाढवून मिळावा असेही सभासदांना वाटते. संस्थेच्या चालकांनाही हे पटते, परंतु आज खंड वाढवता येत नाही आणि नफाही वाटता येत नाही. याची दोन कारणे दिसतात. सोसायटीने शेतीत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे; ती अजून पूर्णपणे फेडली गेली नाही. ती फिटेपर्यंत एकरी खंडाचे प्रमाण वाढवता येणार नाही किंवा नफाही वाढून देता येणार नाही. सर्व कर्ज फिटल्यानंतर आणि गुंतवणुकीची गरज कमी झाल्यानंतर खंडाचे प्रमाण एकरी पंधराशे रुपयांपर्यंत वाढविता येईल असा कार्यकर्त्यांना विश्वास वाटतो. सामुदायिक शेती पूर्णपणे कार्यक्षम नाही हेही एक कारण असू शकेल. ज्या प्रमाणात कार्यक्षमता वाढेल त्या प्रमाणात नफ्याचे प्रमाण वाढेल.

आसपासच्या शेतकऱ्यांची शेती पाहून काही सभासदांना आपणही आपली शेती स्वतंत्रपणे कसून अधिक उत्पन्न घ्यावे असे वाटते. परंतु हा विचार फार काळ टिकत नाही. कारण सभासदांना याची जाणीव आहे की शेतीत मोठी गुंतवणूक केल्याखेरीज उत्पन्न मिळत नाही आणि स्वतंत्रपणे अशी गुंतवणूक करणे कोणासही शक्य नाही. सामुदायिक शेतीला पर्याय नाही याची सर्वांना खात्री पटलेली दिसते. सामुदायिक शेतीचे इतर फायदेही सर्वांना स्पष्ट दिसतात. जंबू

गोविंद कांबळे म्हणतो, "खंड खूपच कमी आहे. एकरी तीन हजार रुपये मिळायला हरकत नाही. तरी पण खंड जास्त मिळत नाही म्हणून मी माझी जमीन काढून घेणार नाही. कारण सोसायटीचे फायदे खूपच आहेत."

सामुदायिक शेतीतून बाहेर पडावे असे आज जरी कोणास वाटत नसले तरी एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे की हा विचार अनेक सभासदांच्या मनात येऊन जात आहे. मुळातला वीस वर्षांचा करार १९९० साली संपुष्टात येईल. तोपर्यंत हा विचार अधिक प्रबल होण्याची शक्यता आहे. त्याआधीच सामुदायिक शेती अधिकाधिक कार्यक्षम करणे आवश्यक आहे.

उत्पन्नाचा दुसरा मार्ग स्वतःची शेती. एकूण पंधरा सभासदांनी स्वतःची शेती असल्याचे सांगितले. त्यांपैकी तेरा जणांनी दुसऱ्यांची शेती भाड्याने घेतली होती व दोघांनी स्वतः शेतजमीन विकत घेतली होती. शेती विकत अगर भाड्याने घेणे ही अलिकडची म्हणजे गेल्या पाचसात वर्षांतील घटना आहे. शेती विकत अगर भाड्याने घेणे हे परिस्थिती सुधारत असल्याचे द्योतक मानण्यास हरकत नाही. आजपर्यंत जे लोक स्वतःचीदेखील शेती मामुली रकमेसाठी गहाण ठेवत होते, ते लोक आता नव्याने शेतजमीन घेऊन स्वतः कसू लागले ही गोष्ट निश्चितच दलितांच्या बदलत्या परिस्थितीचा पुरावा मानता येईल. शेती करण्यास आवश्यक असणारे आर्थिक बळ व अनुभव यांना मिळाला म्हणून हे लोक नव्याने शेती घेऊ शकले. दूधव्यवसायातून सवड मिळाली आणि साधने घेण्याइतपत आर्थिक परिस्थितीही सुधारली, यामुळे हा फरक दिसतो आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

दूधव्यवसाय हा उत्पन्नाचा तिसरा मार्ग. याविषयी विवेचन केले आहेच. तत्त्यामध्ये दुधापासूनचे उत्पादन घेताना म्हशीपासून वर्षाकाठी दीड हजार रुपये व गायीपासून वर्षाकाठी अडीच हजार रुपये असे प्रमाण धरून दुधापासूनचे उत्पन्न गृहीत धरले आहे. हा आकडा प्रत्यक्षात अधिक असू शकतो, हे दूधव्यवसायाविषयी केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होते.

मजुरी हा उत्पन्नाचा चौथा मार्ग. आणि नोकरी असल्यास पगार, परगावाहून आलेले पैसे इत्यादी हा शेवटचा मार्ग. या पाचव्या मार्गापासून होणाऱ्या उत्पन्नाची माहिती पूर्णपणे मिळाली नाही. एकूण चौदा जणांची माहिती मिळाली. त्यांतील तेरा जणांना नोकरीपासून उत्पन्न आहे. तीन लोकांना परगावाहून पैसे येतात व दोन कुटुंबांना किरकोळ व्यापार इत्यादी मार्गाने उत्पन्न आहे.

या विवेचनावरून लक्षात येईल की उत्पन्नाचे आकडे कमी धरले गेले आहेत.

या सर्व मार्गांपासून मिळालेले उत्पन्न लक्षात घेतल्यानंतर, सभासदांची वार्षिक उत्पन्नाप्रमाणे खालीलप्रमाणे वर्गवारी होते.

तक्ता क्र० ८·४

वार्षिक उत्पन्नाप्रमाणे वर्गवारी

उत्पन्न-गट	*सभासदसंख्या (वर्ष १९७८–७९)*
रु० ३००० पर्यंत	१९
रु० ३००१ ते ५००० पर्यंत	१४
रु० ५००१ ते ७५०० पर्यंत	१४
रु० ७५०१ ते १०००० पर्यंत	१०
रु० १०००१ ते १२२५० पर्यंत	६
रु० १२२५१ ते १५००० पर्यंत	४
रु० १५००१ ते १७२५० पर्यंत	०
रु० १७२५१ ते २०००० पर्यंत	२
एकूण	६९

निम्म्यापेक्षा अधिक लोकांचे वार्षिक उत्पन्न पाच हजार रुपयांपेक्षा जास्त होते. त्यातील बारा कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा जास्त होते. ज्यांचे उत्पन्न तीन हजार रुपयांपेक्षा कमी होते, त्यांची कारणे गाय-म्हैस वर्षभर दुभती नसणे, स्वतःची प्रकृती ठीक नसणे इत्यादी अशी होती.

सभासदांचे एकत्रित उत्पन्न खालीलप्रमाणे होते :

तक्ता क्र० ८·५

एकत्रित उत्पन्नाची विल्हेवारी

उत्पन्नाचा मार्ग	*उत्पन्न रुपये (१९७८–७९)*	*शेकडा*
१. खंड	३८,२९८	९·२
२. इतर (स्वतःची, वाट्याची शेती)	३२,०००	७·८
३. दूध	१,९२,५००	४६·६
४. मजुरी	९८,५९५	२३·९
५. इतर (पगार, परगावचे पैसे इ०)	५१,४८०	१२·५
एकूण	४,१२,८७३	१००·०

वरील तक्त्यावरून उत्पन्नाचे मुख्य साधन दूधव्यवसाय आहे हे दिसते. त्याखालोखाल मजुरी. सामुदायिक शेतीत सामील केलेल्या जमिनीचा खंड एकूण उत्पन्नात अत्यल्प प्रमाणात भर टाकतो. वर सांगितल्याप्रमाणे खंडाचे प्रमाण दीड हजार रुपयांपर्यंत किंवा त्याहूनही अधिक वाढले तर

मात्र खंड हे दूधव्यवसायाइतकेच महत्त्वाचे असे एक साधन होऊ शकेल. मजुरी पूर्णतः सामुदायिक शेतीवर मिळालेली नाही.

दलित सभासदांचे उत्पन्न बऱ्याच प्रमाणात वाढले आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट दिसते. उत्पन्न वाढले म्हणजे राहणीमान सुधारते. राहणीमानात अनेक गोष्टींचा समावेश होतो. आमच्या पाहणीत असे दिसून आले की, उत्पन्न वाढल्यामुळे उपासमार तर थांबलीच, परंतु राहणीमान खूपच सुधारले. रोजच्या जेवणात भाजी, दूध, ताक हे पदार्थ आले. सर्व सभासद कपडे मुबलक प्रमाणात व चांगल्या दर्जाचे घेऊ लागले. जवळजवळ सर्वांच्या घरात स्टेनलेस स्टीलची भांडी आली. बहुसंख्य सभासदांनी मनगटी घड्याळे, रेडिओ या वस्तू खरेदी केल्या. सायकलीही बऱ्याच जणांनी घेतल्या. याशिवाय महत्त्वाची गोष्ट दिसली ती ही की किमान वीस जणांनी तरी प्रवास केल्याचे सांगितले. त्यांत तीनचार जणांनी लांववर (कन्याकुमारी, बेंगलोर इत्यादी) प्रवास केल्याचे सांगितले. यावरून राहणीमानात पडलेल्या फरकाची कल्पना येते.

आर्थिक परिस्थितीत सुधारणा हा एक भाग झाला. दलितांच्या सामाजिक परिस्थितीत सुधारणा होणे हे तितकेच, किंबहुना प्रकल्पाच्या दृष्टिकोनातून अधिक महत्त्वाचे. सामाजिक परिस्थितीत झालेल्या सुधारणेचे आकडेवारीत मोजमाप करता येणार नाही. खुद्द दलितांनाच याबाबत काय वाटते हे पाहणे अधिक उपयुक्त ठरेल.

बाबू तानाजी म्हणतो, "सोसायटी झाल्यापासून एक झालं—रोज रयताच्या दारात जाऊन 'मालक, काम द्या,' असं म्हणायची लाचारी राहिली नाही. पूर्वी दारात जाऊन नमस्कार केला तरी बोलत नसत. 'का आला रे भडव्या?' अशी सुरुवात करीत. आता बाहेर कुठं रयत भेटले तर स्वतःहून बोलतात."

हुआप्पा लक्ष्मण अधिक स्पष्टपणे बोलतो, "पूर्वी दोन पैसे उसनेसुद्धा द्यायला गावातलं कोणी तयार नव्हतं. सोसायटीमुळे आमची पत वाढली. आता हजार रुपयेसुद्धा हातउसने मिळतात. पूर्वी पोटाच्या विवंचनेत होतो. आता पोटाची विवंचना संपली. आम्ही लोक एकत्र आलो, विचार करू लागलो. त्यामुळे आमच्यात ऐशी टक्के जागृती झाली. आज आमच्यात दहा आणे एकी आहे. सहा आणे विरोधात आहेत."

परिस्थितीत पडलेला फरक सांगताना हुआप्पाने एक उदाहरण सांगितले. "सतरा-अठरा वर्षांपूर्वीची गोष्ट. एका मोठ्या शेतकऱ्याकडे मी कामाला जात असे. दुपारच्या वेळी मजजवळ भाकरी नसे. असली तरी अर्धी चतकोर. म्हणून मी त्यांच्यापासून फटकून बसत असे. त्यांच्याबरोबर आणखी दोनतीन लोक जेवायला येत. त्यावेळी ते अर्धी भाकर कावळ्यांना टाकत, पण माझी चौकशी करत नसत. मीही मागत नसे. गेल्या वर्षी त्यांचेच चार एकर शाळूचे शेत मी सतराशे रुपयांना घेतले. त्यातून सतरा पोती ज्वारी काढली आणि शिवाय एक हजार रुपये कडबा काढला. पूर्वी नदीवर पाणी प्यायला गेलो तर त्यांनी वरती प्यायचे, मी खाली. आता त्यांच्या घरी जातो. ते आत घेतात आणि स्वतः पाण्याचा तांब्या आणून देतात."

विष्णु गंगाराम म्हणाला, "आता खूप फरक पडला. पूर्वी हॉटेलात बाहेर कप असायचा. आता सरळ आत जातो. पाच वर्षांपूर्वी न्हावी केस कापीत नव्हता. मीच आमच्या लोकांचे आणि मांग, चांभार या लोकांचे केस कापायचा. आता न्हावी सर्वांचे केस कापतो. आता फरक

फार पडला. सगळे सारखे झाले."

"पूर्वी आमच्या जगण्याला अर्थ नव्हता!" जंबू गोविंदाने एकाच वाक्यात बदललेल्या परिस्थितीचे वर्णन केले. मुक्ताबाईने या सर्वांपेक्षा उत्तम वर्णन केले, "सर्व लोक आता रयतासारखे झाले आहेत."

आण्णाप्पा निजाप्पा म्हणाला, "पूर्वी आमच्यातील फक्त चारपाच घरं 'गच्च' होती. बाकी सगळे रयताकडे मागाय जात. आता रयताकडे मागाया जावं लागत नाही." ('गच्च' म्हणजे परिस्थितीने चांगली).

शिवाप्पा खराप्पाने अधिक विस्तृतपणे आपली प्रतिक्रिया देताना, अजूनही सुधारणा पूर्ण झाली नसल्याचे सांगितले. त्याच्या सांगण्याप्रमाणे पूर्वी सावकाराकडे बांधिलकीचे प्रमाण फार मोठे होते. आधी उचल घेऊन सावकाराकडे कष्ट उपसावे लागत. दिवसाकाठी सहजपणे बारा तास अंग मोडून काम करावे लागे. सतत उचल घेत राहिल्याने बांधिलकी कायमचीच होती. आजही हा प्रकार पूर्णपणे थांबलेला नाही. त्याच्या मते आजही सुमारे पाचशे लोक पन्नास सावकारांकडे बांधलेले आहेत. यांत सर्व जातींचे लोक आहेत. "या सर्वांना मुक्त करण्याचे मोठे काम सोसायटीने केले. तरीदेखील आज महार जातीचे सुमारे पंधरा लोक या गुलामगिरीत आहेत. सोसायटीने गाय दिल्याने पुष्कळ लोक मुक्त होऊ शकले. या पंधरांपैकी सहा जणांचे गायी-संबंधीचे अर्ज आज सोसायटीपुढे विचाराधीन आहेत."

या निवडक प्रतिक्रियांतून दलितांनाच त्यांच्या बदलत्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीविषयी काय वाटते याची कल्पना येते. याशिवाय "गावात प्रतिष्ठा वाढली का?" या प्रश्नाचे उत्तर सभासदांनी ठामपणे होकारार्थी दिले.

सोसायटीच्या सेक्रेटरींचे वडील ऐशी वर्षांपेक्षा अधिक वृद्ध आहेत. त्यांना आता फार हिंडता येत नाही. दिसतही नाही. आपल्या पूर्वीच्या आयुष्यातील परिस्थिती सांगताना ते म्हणाले, "पूर्वी फार गरिबासारखे वागावे लागे. शिवाशिवी फार. आम्ही रयताच्या अंगणात दूर उभे राहायचे. मालकाने खायला दिले तर त्याने ते भुताला ठेवल्यासारखे अंगणात ठेवायचे, ते आम्ही घ्यायचे...आतासारखे राज्य नाही. आता आम्ही नटलो तर कुणी काही बोलायचं नाही. पूर्वी आम्ही नटलो तर बोलायचे. श्रीमंतांनीच नटायचे. आता लोक म्हणतात, 'म्हार लोकं आमच्यात मागून खात. आता सुधारली की.' पूर्वीची कामे आम्ही सोडली, फार तर दोन आणे पूर्वीची कामे आता आमचे लोक करतात. दादा आल्यापासून थेट देवळात जाऊन देवदर्शन करून येतो."

वरील प्रतिक्रिया सामान्य दलित सभासदांच्या आहेत. ज्यांनी देवलांच्याबरोबर पुढाकार घेऊन प्रकल्पाचे बीज रोवले, त्यांच्या प्रतिक्रिया अधिक तपशीलवार व स्पष्ट आहेत. त्यांतील एक निवडक प्रतिक्रिया देणे येथे उचित ठरेल.

"पूर्वीचे आयुष्य म्हणजे कमालीचे दारिद्र्य व लाचारी. जेमतेम एक रुपया मजुरी मिळे. परंतु बेकारीचे दिवस फार असत. त्यामुळे उपासमार मोठ्या प्रमाणावर. गावात आम्हांला किंमत नव्हती. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळीत. शाळेत आमची मुलं फारशी जातच नसत. जी जात त्यांच्या मनावर सतत दडपण असे. तीच फटकून असत. सहलीत वगैरे जेवायला वेगळी बसत. सामूहिक जीवन लाचारीचे होते. वैरण आणली किंवा काही काम केले तर घरात

वाया जाणारे ताक किंवा अन्न देत. मेलेल्या जनावरांचे मास आम्ही खाल्ले आहे. आमच्यापैकी ज्यांच्याकडे जमीन होती व घरात कर्ती माणसे होती त्यांचे चालत होते. इतरांचे खूप हाल होत. यातूनच देवदासींची प्रथा सुरू झाली. देव बाजूलाच; पण आईवडिलांच्या पोटासाठी मुलगी मात्र देवदासी व्हायची. गरिबी किती असायची! खळे भरून नेल्यानंतर राहिलेले धान्य खळे धुवून आम्ही न्यायचे. बैलाच्या शेणातून पडलेले दाणे धुवून आम्ही खाल्ले....आम्हांला (महार लोकांना) इतर लोकांनी ऐदी बनवले. चांभारांना चांभारकाम होते, मांगाना वाखाचे काम होते. पण महारांना विशेष धंदा नव्हता. रयताकडे भीक मागूनच खायची सवय झाली होती. जुगार, दारू, आजार आणि लग्नाचा खर्च इत्यादी कारणांमुळे आमच्या जमिनी गेल्या. सकाळपासून संध्याकाळपर्यंत जुगार खेळणारे लोक आमच्यांत होते.

"१९६०-६२ पासून परिस्थिती बदलायला सुरुवात झाली, ती दूध-सोसायटीमुळे. इतरांच्यापासून आमच्या लोकांची उत्सुकता वाढली. आमच्यातल्या काही लोकांनी दादांना गाठून विचारले. दादांनी खूप खटपट केली. 'सात-बारा' शिवाय (गहाण न ठेवता) काही लोकांना म्हशी दिल्या. हळूहळू सर्व लोकांनी म्हशी घेतल्या. विठ्ठल सोसायटी झाल्यावर एकदोन वर्षांनी जुगार बंद झाला. जुगार खेळणाऱ्यांवर दडपण आणले. समतेचा विचार आता जवळजवळ सर्वांपर्यंत पोहोचला आहे. एकूण जातिव्यवस्था गेली पाहिजे अशी मागणी नाही; पण समता पाहिजे असे सर्वांना वाटते. इतर मागासवर्गीयही सुधारावेत अशी आमची इच्छा आहे. तसे प्रयत्नही आहेत. आज लाचारी फारतर पाच टक्के असेल. त्यात काही व्यसनी व जुने लोक येतात. हे लोक सोडले तर उपासमार अजिबात नाही. लाचारी नाही.

"गावातील सर्वांनाच यामुळे बरे वाटले, असे मात्र नाही. तीसचाळीस टक्के लोकांना बरे वाटले. बाकीच्यांना नाही. 'म्हार मस्तीला आलेत!' असे काही म्हणतात. काही म्हणतात, 'आमच्याजवळ नाही ते यांच्याजवळ आहे. इतके यांना कशाला पाहिजे?' सुरुवातीला या प्रयोगाविषयी (सामुदायिक शेती) बरे वाटले नाही. माझाही विश्वास नव्हता. लोक म्हणत, 'एका बामणाकडून दुसऱ्या बामणाकडे जमीन गेली.' पण हळूहळू आम्हांला समजू लागले. मग मलाही विश्वास वाटू लागला. हळूहळू ऐदीपणा गेला. ईर्षा वाढली. सर्वजण कामास लागले. बरीच वर्षे जिद्दीने कामे केली.

"गेल्या दोन वर्षांत थोडा ढिलेपणा आला. दोन वेळा जेवण आणि चारआठ आणे खिशात खुळखुळत असले की काम करावेसे काही लोकांना वाटत नाही. पण ही प्रवृत्ती वाढणार नाही. गाई-म्हशींमुळेही शेतकामाकडे दुर्लक्ष होते....तरीपण सामान्य शेतकऱ्यापेक्षा आमची शेती फायदेशीर आहे. दादांच्या व बाळासाहेब पाटलांच्या तुलनेने कमी आहे. परंतु फार कमी नाही. ...अशा कामाला सुरुवातीला बाहेरचा माणूस आवश्यक आहे. आपल्यातील माणसांवर विश्वास ठेवण्यास लोक तयार होत नाहीत. आम्हांस कल्पनाही सुचत नाहीत. बायका पंचकमिटीवर घेण्याची कल्पनासुद्धा आमच्या डोक्यात नव्हती. एकदा विजय तेंडुलकरांनी ही सूचना दिली. त्याप्रमाणे गेल्या वर्षापासून एक बाई पंचकमिटीवर घेतली आहे."

वरील प्रतिक्रिया प्रातिनिधिक आहेत. आकडेवारीपेक्षा अधिक बोलक्या आहेत. त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.



प्रकरण नववे

एकात्मतेच्या दिशेने वाटचाल

केवळ एका विशिष्ट दलित जातीचा उद्धार हे उद्दिष्ट न ठेवता सर्व दलित आणि गरीब वर्गांना एकत्रित आणणे आणि सवर्ण व अस्पृश्य जमातींमध्ये सामंजस्य निर्माण करणे या दिशेने वाटचाल करण्याचे देवल आणि त्यांचे सहकारी यांनी प्रथमपासून ठरविले होते. या दृष्टीने केलेले प्रयत्न कितपत यशस्वी झाले हे पाहणे महत्त्वाचे आहे.

हे उद्दिष्ट साध्य करण्यात फार मोठ्या अडचणी आहेत आणि केवळ काही वर्षांच्या काळात ही गोष्ट साध्य होण्यासारखी नाही. एका गावात असे एकाकी प्रयत्न करणे म्हणजे प्रवाहाच्या उलट्या दिशेने अंतर तोडण्यासारखे आहे. देशातील राजकीय व सामाजिक वातावरण अशा प्रयत्नांना पोषक असल्याखेरीज एका लहान गावातील अशा प्रयत्नांना यश येणे कठीण आहे.

आजतरी असे पोषक वातावरण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कार्यकर्त्यांना काम करावे लागते. पूर्वीचे मोठे जमीनदार आणि सरंजामशाही कुटुंबांच्या हाती खेडेगावातील सत्ता आहे. आर्थिक संस्थांवर त्यांची पकड आहे. त्यांचे राजकारण जातिव्यवस्थेस खतपाणी घालणारे आहे. वरकरणी त्यांची वक्तव्ये पुरोगामी विचारांची वाटली तरी त्यांच्या मनांतून जातीयता, अंधश्रद्धा, सनातनी विचार आणि रूढी यांचे स्थान अबाधित राहिले आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत म्हैसाळ गावात एकात्मता साध्य करण्याच्या प्रयत्नांना साहजिकच मर्यादा पडतात. या महत्त्वाच्या मर्यादा लक्षात घेऊनही म्हैसाळ गावात दलितांनी पुढाकार घेऊन केलेल्या या प्रयत्नांचा मागोवा घेणे उपयुक्त ठरेल.

सर्व दलित जातींना एकत्र आणण्याची भूमिका श्रीविठ्ठल सोसायटीच्या कार्यकर्त्यांनी मनापासून स्वीकारल्याचे प्रत्ययास येते. कार्यकारिणीचे सभासद याबाबत विशेष जागरूक असल्याचे दिसते. महारेतर दलितांना एकत्र आणण्याचे दोन मार्ग : एक, सामुदायिक शेतीवर सातत्याने मजुरी देणे व दुसरा, दूधव्यवसाय उपलब्ध करून देण्यास आर्थिक सहाय्य देणे. या दोनही मार्गांनी इतर दलित कुटुंबांना मदत करण्याची इच्छा असली तरी मर्यादा मोठ्या आहेत. सामुदायिक शेतीवर सर्वांना मजुरीचे काम देण्यास वाव नाही. सभासदांनादेखील पुरेसे काम देता येत नाही हे पूर्वीच्या विवेचनात स्पष्ट झाले आहेच. त्यामुळे फक्त दुसरा मार्ग शिल्लक राहतो. दूधव्यवसायामुळे श्रीविठ्ठल सोसायटीचे सभासद झालेल्यांची संख्या चारशेच्या आसपास आहे. त्यात महार शंभर, मराठा दोनशे व राहिलेले इतर जातींचे आहेत. या सभासदांकडील दूध एकत्रित केले जाते. श्रीविठ्ठल सोसायटीच्या दूधकेंद्रावर दूध घालणे सोयीचे, म्हणून अनेक लोक सोसायटीचे

सभासद झाले. श्रीविठ्ठल सोसायटीच्या दूधकेंद्रावरील दलित कार्यकर्ते प्रामाणिक, कार्यक्षम व वागणुकीस चांगले, असा लौकिक असल्यामुळे हे लोक सभासद होण्यास तयार झाले हे निर्विवाद आहे. परंतु या सर्वच सभासदांना गाय अगर म्हैस घेऊन देण्यास श्रीविठ्ठल सोसायटी मदत करू शकलेली नाही. आजपर्यंत ज्या महारेतर सभासदांस सोसायटीने गाय अगर म्हैस घेण्यास सहाय्य केले त्यांची जातवार आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्र० ९.१

साहाय्यप्राप्त महारेतर सभासद

जात	*संख्या*
मराठा	४०
जैन	५
मुसलमान	५
चांभार	६
मातंग	१०
रामोशी	१
परीट	२
	एकूण ६९

सर्व जातींतील गरिबांना मदत होत असल्याचे वरील आकडेवारीवरून दिसून येते. आजपर्यंत दिलेली मदत अल्प प्रमाणात असली तरी ती महत्त्वपूर्ण आहे हे निश्चित. केवळ गाय-म्हैस घेण्यास मदत केल्याने एकात्मता साध्य होणार आहे असे नाही. परंतु आजपर्यंत उपेक्षित व दारिद्र्यात राहणाऱ्या दलितांनी इतर गरिबांना मदतीचा हात दिल्याने जातीजातींत आपुलकी वाढण्यास सुरुवात होऊ शकेल याबद्दल एकमत होण्यास हरकत नाही. ज्यांना दलित कार्यकर्त्यांनी मदतीचा हात दिला, त्यांत मराठा समाजातील गरिबांची संख्या सर्वांत अधिक आहे. जैन आणि मुसलमान या धर्मांचेही लोक आहेत.

सर्व जातींतील गरिबांना मदत देऊ करण्याचे सोसायटीचे स्वप्न आहे. ते साध्य होण्यास अवधी लागेल यात शंका नाही. केवळ अस्पृश्य जातीच लक्षात घेतल्या तर अजून त्या जातींतील गरीबही या योजनेखाली पूर्णपणे आलेले नाहीत. महार जातीतीलही सर्व कुटुंबांनी सोसायटीचे सभासदत्व स्वीकारलेले नाही. सर्व अस्पृश्य जातींतील मुख्यतः मजुरीवर अवलंबून असणाऱ्या निवडक कुटुंबांची आम्ही पाहणी केली. त्यांच्या वार्षिक उत्पन्नाची माहिती सोबतच्या तक्त्यात दिली आहे. हे सोसायटीचे सभासद नाहीत किंवा सोसायटीची मदत यांनी अजूनपर्यंत घेतलेली नाही.

तक्ता क्र० ९·२

मजुरीवर अवलंबून असलेली कुटुंबे

उत्पन्न गट रु०	महार	चांभार	मातंग	बागडी	कोरवी	शिकलगार	वडार	कुंभार	धनगर	एकूण
३००० पर्यंत	५	११	१७	३	४	४	३	२	२	५१
३००१–५०००	३	७	४	१	१	१	२	–	–	१९
एकूण	८	१८	२१	४	५	५	५	२	२	७०

या तक्त्यावरून असे दिसून येईल की बहुसंख्य कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न तीन हजार रुपयांच्या आत आहे. एकूण सत्तर कुटुंबांपैकी एकावन्न कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न तीन हजार रुपयांच्या आत आहे. मातंग आणि चांभार या जातीच्या लोकांचा भरणा या गटात अधिक आहे. या कुटुंबांपैकी बहुसंख्य कुटुंबांजवळ दुभते जनावर नाही. ज्यांच्याजवळ गाय किंवा म्हैस आहे त्यांचे उत्पन्न तीन हजार रुपयांच्या पुढे आहे. या सर्व कुटुंबांना "सोसायटीकडून तुमची काय अपेक्षा आहे?" असा प्रश्न विचारला असता, "सोसायटीने आम्हांस गाय घेऊन द्यावी," असे उत्तर मिळाले. नियमित मजुरीचे काम द्यावे असेही सांगितले.

यावरून एक गोष्ट सिद्ध होते की श्रीविठ्ठल सोसायटीच्या कार्यकर्त्यांनी या सर्व गरीब कुटुंबांना गाई घेण्यास अधिक तत्परतेने सहाय्य करणे आवश्यक आहे. सर्व दलितांना एकत्र आणण्याचे त्यांचे उद्दिष्ट त्याशिवाय सफल होणार नाही. वैयक्तिक जामिनावर गाय मिळणे शक्य असल्यामुळे आणि गाय घेण्यास कर्जपुरवठा उपलब्ध असल्याने या कामास गती देणे शक्य आहे.

केवळ अस्पृश्य जातींतील कुटुंबेच गरीब आहेत असे नव्हे. मराठी, माळी, मुसलमान या पुढारलेल्या जातींतही गरीब कुटुंबे आहेत. या सर्वांची पाहणी करणे आम्हांला शक्य झाले नाही. पण सर्व गरीब कुटुंबांची तशी पाहणी करून त्यांना कोणत्या प्रकारे मदत देता येईल याचा अभ्यास करणे सोसायटीच्या कामास गती देण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटते.

एकात्मतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले ते दुष्काळात गरीब शेतकऱ्यांसाठी जी योजना दलित कार्यकर्त्यांनी राबवली, त्या योजनेमुळे. तिचा तपशील यापूर्वी दिला असल्याने, येथे फक्त त्याचा उल्लेख पुरेसा आहे. या स्वरूपाच्या योजनांचा विचार त्यानंतर झालेला दिसत नाही. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या जमिनी मशागतीसाठी घेण्याच्या कल्पनेचा उदय या उपक्रमातून झाला. त्यानुसार तीन शेतकऱ्यांना मदत मिळाली. या बाबतीतही असे दिसते की बऱ्याच गरीब, कर्जाने बेजार झालेल्या शेतकऱ्यांनाही मदत घेण्याची इच्छा आहे. परंतु श्रीविठ्ठल सोसायटी या क्षेत्रात दमानेच पाऊल टाकीत आहे. हे स्वाभाविक आहे. सोसायटीची स्वतःची शेती सर्वप्रथम उत्तम प्रकारे होणे आवश्यक आहे. त्याशिवाय ही जबाबदारी तिला अंगावर घेता येणार नाही.

जातिव्यवस्था नष्ट होऊन पूर्णपणे एकजिनसी समाज निर्माण होणे ही आजच्या परिस्थितीत दुरापास्त गोष्ट आहे. म्हैसाळ गावात श्रीविठ्ठल सोसायटी प्रस्थापित झाल्यापासून दलितांचे प्रबोधन या दृष्टीने सुरू झाले. परंतु जातिव्यवस्था जावी असे फार थोड्यांनाच वाटते. जातिभेद नष्ट व्हावा, समान पातळीवर सर्वांना वागवले जावे, असे मात्र सर्वांना मनापासून वाटते. जातिव्यवस्थेत अभिप्रेत असलेली उतरंड नष्ट व्हावी, रोटीव्यवहार असावा, सार्वजनिक व खाजगी सणसमारंभांत सर्वांनी एकत्र मिसळावे हा विचार सर्वमान्य झालेला दिसतो. त्याप्रमाणे व्यवहारात तसे घडतानाही दिसते. पूर्वीच्या समजुतीप्रमाणे मागास जातींची उतरंड खालीलप्रमाणे सांगितली जाते :

१. चांभार
२. कोरवी – वडार – बागडी
३. शिकलगार
४. महार
५. मातंग

ही उतरंड आता फारशी शिल्लक राहिलेली दिसत नाही. पण जुन्या पिढीतील लोक ही उतरंड मानताना आढळतात. चांभार जातीचे लोक त्यांच्या खालील जातींतील लोकांच्या घरी जेवणास जात नाहीत. महार-मातंग या दोन जमातींत रोटीव्यवहार होतो. शिकलगार लोकही या लोकांबरोबर रोटीव्यवहार करतात.

महार आणि मातंग या दोन जमातींमध्ये जातिभेद जरी प्रखर नसला तरी काही प्रमाणात अंतर असल्याचे दिसून येते. या दोन जमातींमध्ये मैत्रीचे संबंध दिसत नाहीत. त्याचे कारण 'जात' हे नसून 'गावचे राजकारण' हे आहे असे दिसते. गावात काँग्रेस व बिगरकाँग्रेस असे दोन तुल्यबळ गट दिसतात. बिगरकाँग्रेस गट अलीकडे जनता पक्षाखाली संघटित झालेला आहे. काँग्रेस पक्षाकडे मराठा, वडार, मुसलमान, धनगर, मातंग या जाती आहेत. जैन, लिंगायत, महार, कोरवी व काही प्रमाणात चांभार या जाती काँग्रेसविरोधात आहेत.[1] ही दुफळी बऱ्याच दिवसांपासूनची आहे. श्रीविठ्ठल सोसायटी स्थापन झाल्यापासून महारेतर शेतमजुरांना आपल्याकडे खेचण्याचे काम काँग्रेसपक्षीय लोकांनी केले. शेतमजुरीचे काम सामुदायिक शेतीवर पुरेसे नसल्यामुळे त्यांना आपल्याकडे ओढण्याच्या कामात काँग्रेसला यश आले. श्रीविठ्ठल सोसायटीचे काम बऱ्याच मोठ्या शेतकऱ्यांना आवडले नाही. देवदासीप्रद्धत नष्ट करण्याचे कामही तेथील काँग्रेसश्रेष्ठींना आवडले नाही. मातंगांपैकी फक्त पांच जणांना (एकूण ४० पैकी) एकूण नऊ एकर जमीन आहे. 'देसकत' जमिनीपैकी सात एकर जमीन मातंग कुटुंबांना मिळाली. ही जमीन मातंग लोक एकत्रित कसत होते. गेली तीन वर्षे ती नापीक आहे.

भूमिहीन मातंग कुटुंबे प्रामुख्याने मजुरीवर अवलंबून आहेत. अधिक चौकशी करता असे समजले की प्रत्येक कुटुंबातील निदान एक माणूस तरी मोठ्या जमीनदाराकडे वर्षाच्या बोलीने नोकरीस असतो. जी कुटुंबे मोकळी होती, तीच फक्त गाय-म्हैस घेण्यास पुढे आली.

१. ही परिस्थिती १९७७–१९७८ ची आहे.

उरलेल्यांनाही शक्य होते, परंतु त्यांच्यावर थोडे दडपण असल्याचे सांगण्यात आले. "गाय-म्हैस मागण्यासाठी सोसायटीकडे कशाला जाता ? आम्ही देऊ," असे जमीनदार म्हणतात. त्यामुळे ही मातंग कुटुंबे सोसायटीकडे येऊ शकत नाहीत. जमीनदारांनी आजतागायत कोणासही गाय-म्हैस घेण्यास मदत केलेली नाही. सोसायटीच्या मदतीने गाय-म्हैस घेतली तर जमीनदार मजुरीचे काम देणार नाहीत, असे मातंग कुटुंबांना व इतर जमातींच्या कुटुंबांसही वाटते. या एकाच कारणामुळे श्रीविठ्ठल सोसायटीच्या कार्यकर्त्यांना सर्व अस्पृश्य जातींना एकत्र आणणे अवघड होऊन बसल्याचे दिसते.

चांभार जातीची सुमारे साठ कुटुंबे आहेत. त्यांतील दहापंधरा कुटुंबे सोडली तर इतर सर्व कुटुंबांना शेतजमीन आहे. त्या सर्वांची परिस्थिती चांगली दिसते. चांभारकीचे काम सहसा कोणी करीत नाही. जे भूमिहीन आहेत, तेही भाड्याने जमीन घेऊन शेती करतात. पूर्वीपासून चांभार जात सामाजिक व आर्थिकदृष्ट्या इतर अस्पृश्य जातींपेक्षा श्रेष्ठ मानली जाते. गेल्या काही वर्षांत चांभार आणि महार यांच्यामध्ये अधिक जवळीक निर्माण झाली आहे. वीस चांभार कुटुंबांनी म्हशी घेतल्या; त्यांतील सहा जणांना सोसायटीने साहाय्य दिले.

कोरवी जातीची बारा कुटुंबे आहेत. पैकी पाच कुटुंबांना शेतजमीन आहे. इतर शेतमजुरी करतात. किरकोळ व्यापारही करतात. ही कुटुंबे कोठेही मजुरीसाठी बांधलेली नाहीत. श्रीविठ्ठल सोसायटीने सहा कोरवी इसमांना व्यापार करण्यासाठी सायकली घेऊन दिल्या. तेव्हापासून श्रीविठ्ठल सोसायटीच्या सभासदांशी त्यांचे संबंध घनिष्ठ झाल्याचे दिसते.

शिकलगार जमातीची चार घरे आहेत. ही सर्व भूमिहीन आहेत. या चारही कुटुंबांना सोसायटीने म्हशी घेऊन दिल्या. तेव्हापासून सोसायटीशी त्यांचे संबंध निकटचे आहेत.

सर्व अस्पृश्य जातींना जवळ करण्याचे उद्दिष्ट काही प्रमाणात तरी साध्य झाल्याचे वरील माहितीवरून दिसून येईल. याचे श्रेय प्रामुख्याने श्रीविठ्ठल सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी व इतर जुनेनवे पुढारी यांना द्यावयास हवे.

अस्पृश्येतर समाजाशीही संबंध सुधारल्याचे दृष्टीस येते. अर्थात हे यश मर्यादितच म्हणावे लागेल. पूर्वी सांगितल्याप्रमाणे दुष्काळात श्रीविठ्ठल सोसायटीच्या कार्यकर्त्यांनी लहान शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जी योजना राबविली, त्यामुळे हे यश पदरात पडले. याशिवाय दूधव्यवसायातील कार्यक्षमता, सचोटी यांचीही छाप सवर्णांवर पडलेली दिसते.

गावामध्ये अस्पृश्यता पूर्णपणे नाहीशी झालेली दिसते. त्याचे श्रेय पूर्णपणे श्रीविठ्ठल सोसायटीला जरी देता येत नसले तरी यापूर्वीपासून चाललेल्या अस्पृश्यतानिवारणाच्या प्रयत्नांना सोसायटीच्या यशस्वी वाटचालीमुळे मोठ्या प्रमाणावर गती मिळाली यात शंका नाही. देवाप्पाच्या शब्दांत सांगायचे झाल्यास, "सोसायटी झाल्यापासून आर्थिक बाजू बळकट झाली. त्यांच्याकडे (सवर्णांकडे) जायची वेळ आता येत नाही. त्यामुळे नमायचे कमी झाले. शिवाशिवीचा विषय निघाला आणि 'तू कोण ?' म्हणून विचारले तर उलट आम्हीच म्हणतो, 'तूच आम्हांला शिवू नकोस.' घरातल्या ताटात वाढले तरच जेवतो. नाहीतर जेवत नाही. लग्नात तर सर्वांच्या बरोबर मांडीला मांडी लावूनच जेवायला बसतो."

गावात निरनिराळे कार्यक्रम पार पाडले जातात. गावातील तरुणांत व गावागावांतील तरुण

मंडळांत स्पर्धा ठेवल्या जातात, वक्तृत्वस्पर्धाही असतात. या सर्वांत दलितांना स्थान असते. खुद्द दलित पुढारीच हे अभिमानाने सांगतात.

म्हैसाळ गावात दोन व शेजारच्या नरवाड गावात एक असे तीन आंतरजातीय विवाह झाले. एका लग्नात वर महार व वधू रामोशी जातीची, दुसऱ्या लग्नात वर मातंग व वधू धनगर जातीची व तिसऱ्या लग्नात वर न्हावी जातीचा व वधू मराठा जातीची. तिसरे लग्न नरवाड गावात नोंदणी-पद्धतीने झाले. या आंतरजातीय विवाहांबाबत सर्वसाधारणपणे अनुकूल मत दिसते. नरवाड येथील लग्नाबद्दल एकाला विचारले असता तो म्हणाला, "छान वाटाय लागलं. असंच व्हायला हवं."

दलित आणि दलितेतर यांतील अंतर कमी होत असल्याचा एक पुरावा म्हणजे डॉ० आंबेडकर-जयंतीच्या समारंभात दलितेतरांचा सहभाग. सातआठ वर्षांपूर्वीपर्यंत आंबेडकर-जयंती फक्त महार जातीपुरतीच मर्यादित होती. इतर लोक तिच्यात सहभागी नसत. आज चित्र पालटत असल्याचे दिसते. या दिवशी डॉ० आंबेडकरांच्या प्रतिमेची मिरवणूक गावातील महत्त्वाच्या रस्त्यांवरून जाते. आणि तिचे वैशिष्ट्य असे सांगितले जाते की दलितेतर समाजातील स्त्रिया प्रतिमेला ओवाळून आपला आदर व्यक्त करतात.

वरील विवेचनावरून, गावातील गरीब जनतेच्या मनात सोसायटीने स्थान मिळवले आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. परंतु गावात सधन मोठे शेतकरी, पारंपरिक गावपुढारी, प्रतिष्ठित सवर्ण यांना श्रीविठ्ठल सोसायटीच्या उपक्रमांविषयी काय वाटते हेही पाहणे उपयुक्त ठरेल. खाली अशा सात निवडक लोकांच्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

१. मराठा, मोठा शेतकरी आणि पारंपरिक गावपुढारी :

"सोसायटीमुळे हरिजनांची परिस्थिती सुधारली हे खरे, परंतु हरिजन एकूणच कष्टास कमी. त्यांना फुकट जेवढे मिळेल तेवढे हवे. अलीकडे ही प्रवृत्ती वाढत आहे. त्याचबरोबर उर्मटपणाही वाढत आहे. इतर समाजाशी फटकून वागण्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावयास हवेत. गीता, मनाचे श्लोक इत्यादी त्यांना समजावून दिले पाहिजेत."

२. ब्राम्हण, शेतकरी, नोकरी–मध्यम वयाचे :

"देवल फक्त दलितांसाठीच काम करतात. तसे न करता त्यांनी सर्व लोकांना एकत्र आणण्याचे काम करावयास हवे. केवळ गरीब दलित यांसाठी काम करणे ही एक पळवाट आहे. ते सोयीचे असते, पण खरे नाही. सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य फक्त संघच करू शकेल. गावात संघाच्या पाचसहा शाखा असत्या तर अधिक चांगले काम झाले असते. परंतु देशात संघविरोधी वातावरण फार झाल्याने हे शक्य होत नाही. पण संघशाखेमार्फतच (सर्व जाती एकत्र आणण्याचे) खरे कार्य होऊ शकेल."

३. ब्राम्हण, सेवानिवृत्त–शेतीव्यवसाय :

"मुख्य काम सांस्कृतिक बदल घडवून आणण्याचे आहे. देवल ते काही करत नाहीत. आर्थिक सुधारणा झाल्याचे दिसते. पण एकंदरीत वागणूक तशीच. व्यसन काही सुटत नाही.

आंबेडकरजयंतीलाच हे लोक एकदा दारू पिऊन आले होते...देवलांनी काय काम करायचे ते तिकडेच करावे. इकडे लुडबूड करू नये." (दलित वस्तीत काम करावे. त्यांना गावात समान हक्काचे स्थान देण्याचा प्रयत्न करू नये.)

४. मराठा, मोठा शेतकरी, गावपुढारी :

"सोसायटी चांगली आहे. इतर ठिकाणी हरिजनांचा प्रश्न सोडवण्यासाठी हा मार्ग ठीक आहे. पण तेथील नैसर्गिक व इतर परिस्थिती पाहूनच हे ठरवावे लागेल. हरिजनांनी गावकीची कामे सोडली नाहीत. पूर्वी वेठबिगारीसारखे काम करावे लागत होते तेवढे फक्त सोडले आहे. आज ही गावकी त्यांच्या फायद्याची आहे. उदाहरणार्थ, मेलेले जनावर ओढून टाकण्याचे काम ते करतात. त्या जनावराचे कातडे बऱ्याच किंमतीला ते विकतात...सोसायटी झाल्यापासून त्या लोकांच्या वागणुकीत फरक पडलाय. मुले शाळेत जाऊ लागली आहेत. दारू पिऊन सतत होणाऱ्या कटकटी कमी झाल्या. रोज दुसऱ्याकडे लाचारीने वागायचे सोडून स्वाभिमानाने जगू लागले आणि एकी वाढली. यामुळे गावात तणाव वगैरे काही नाही. कारण त्याच लोकांनी अजून पायरी सोडलेली नाही. इतरांच्या मर्जीने राहतात. पूर्वीपासून आमच्या गावात जातीयतेचे तणाव नाहीत. पहिल्यापासून सलोखा आहे. एकमेकाबद्दल प्रेम आहे."

५. मुख्याध्यापक, जैन :

"सोसायटीविषयी मत खूप चांगले आहे. गावात सोसायटीमुळे तणाव निर्माण झाले नाहीत हे खरे, परंतु गावातील सधन लोक या घडामोडीमुळे फारसे खूष नाहीत. पण सक्रिय विरोधही नाही. पूर्वीपासूनच गावात अस्पृश्यता कमी. शाळेत सर्व मुले एकमेकांत मिसळतात. चांभार जातीची मुले बुद्धीने इतर अस्पृश्य मुलांपेक्षा सरस वाटतात. गावात तट पडले ते जातीमुळे नाही, गटबाजीमुळे. शिक्षकाला सतत तटस्थ राहावे लागते. म्हैसाळ गेल्या दोन वर्षांतच प्रसिद्धीस आले. पण परिसरात प्रभाव कमी दिसतो. इतर गावांत या उपक्रमाचे अनुकरण नाही ...नरवाडला एक पाणवठा करण्याचा प्रश्न उपस्थितच झाला नाही. कारण त्यांची स्वतंत्र सोय करून दिली आहे."

६. ब्राम्हण, मोठा शेतकरी :

"सोसायटी होऊन दहा वर्षे झाली. सभासदांच्या प्रवृत्तीमध्ये अजिबात फरक पडलेला नाही. यांच्यात स्वतःहून अंग मोडून काम करण्याची प्रवृत्ती नाही. त्याचेच प्रतिबिंब आता सोसायटीच्या शेतीवर दिसून येते. सोसायटीमध्ये काम करवून घेणारा भारदस्त माणूस नाही. आपली शेती आहे, आपल्यासाठीच काम करायचे आहे, असे समजून काम करीत नाहीत. सर्व हिशेब नीट ठेवा, सर्वांच्या ठेवी व देणग्या परत करा, दादांचे सर्व पैसे परत करा आणि मग सोसायटीत काय शिल्लक राहते ते पाहा...पूर्वी आम्ही सगळे काही देत होतो. आता फक्त मालक बदलला आहे. बाकी सर्व आहे तसेच आहे. दादांना बाहेर ठेवा; सोसायटी मोडीत निघते की नाही पाहा...दुसऱ्यांच्या शेतातील गवत चोरण्याची यांची प्रवृत्ती कमी न होता वाढलीच आहे.

सभासदांना सोसायटीविषयी आपुलकी नाही. 'तुमच्याकडे जमीन होती तेच बरे होते,' असे आजही हे लोक मला म्हणतात."

७. चांभार, मध्यम शेतकरी :

"पूर्वी संध्याकाळ झाली की म्हारं आमच्या घरासमोरच्या रस्त्यावर झुलत असत. (दारू पिऊन झिंगत असत). मधादादांचे उपकार ह्यांच्याच्याने मेल्यानेही फिटणार नाहीत. यांना पूर्वी शेती होती. उत्पन्न खूप होते. पण सगळे घालवून भीक मागत बसली होती. आता सुधारणा झाली आहे; पण फक्त आठ आणे. अजून पाण्याने गुणधर्म बदलला नाही. दोन बाटल्या दारूच्या फुल घ्यायच्या, किलोभर मटण घ्यायचे, घरी जाऊन बायकोला म्हणायचे की 'असं झन्न (तिखट) कोरड्यास कर की खाताना मुंग्या आल्या पाहिजेत.' मग किलोभर कांदा चिरायचा. बायकोनेही दोन कप दारू घ्यायची अन् नशेत सगळे फस्त करायचे. असे हे रक्त आहे. एकदम सुधारणा कठीण. आता शेती जरा चांगली करू लागलेत. आमच्या शेती करण्यात अन त्येंच्या करण्यात फरक हाय. त्यांचे हात लांब आहेत. दोन म्हणता चार पैसे खर्च करू शकतात. आम्हांला काटकसर करून थोडक्यात बसवावे लागते."

वरील सर्व प्रतिक्रिया महत्त्वपूर्ण आहेत. समाजातील प्रतिष्ठित सधन व पुढारीपण करणारा वर्ग दलित कार्यकर्त्यांनी चालविलेल्या प्रकल्पाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो, हे या प्रतिक्रियांवरून दिसून येते. वरील प्रतिक्रिया या वर्गाच्या प्रतिक्रिया आहेत असे मानावयास हरकत नाही. एकात्म समाज निर्माण करण्यात सवर्ण आणि सधन लोकांची मनोवृत्तीच प्रामुख्याने अडचण निर्माण करते हे यावरून दिसून येईल. सर्व प्रतिक्रियांमधून एक प्रकारचा अलिप्तपणा जाणवतो. आपल्याच गावात सामुदायिक शेती संस्था स्थापन करून दलितांची उन्नती आणि सामाजिक समता स्थापन करण्याच्या कामास प्रारंभ झाला आहे याची दखल या व्यक्तींनी घेतलेली दिसत नाही. या परिवर्तनाच्या कार्याचे मनापासून स्वागत कोणी केलेले दिसत नाही.

या उपक्रमामागील उदात्त उद्दिष्टे लक्षात घेऊन गावातील सर्व थरांतील प्रतिष्ठित गावकऱ्यांना वास्तविक या उपक्रमात सहभागी होता आले असते, यथाशक्ती मदत करता आली असती. किमानपक्षी या घडामोडीचे स्वागत करून सहानुभूती व्यक्त करता आली असती. गावकऱ्यांचा विरोध नव्हता हे खरे, परंतु सक्रिय सहानुभूतीही नव्हती हेही तितकेच खरे. दूर उभे राहून "बघू या हे हरिजन काय करताहेत ते" अशी वृत्ती या व्यक्तींची होती व आजही तशीच दिसते. या प्रकल्पाचे यश, त्यामुळे दलितांमध्ये झालेली जागृती यांकडे या व्यक्तींचे लक्ष गेले नाही. याउलट, आज दलितांमधील उणिवा मात्र त्यांना स्पष्ट दिसतात. दारूचे व्यसन, कामातील दिरंगाई आणि अकार्यक्षमता, अस्वच्छता इत्यादी गोष्टींवरच यांचे लक्ष खिळलेले आहे. दलितांचे संघटन आणि जागृती यांपासून परिवर्तनाच्या प्रक्रियेस झालेला प्रारंभ या वर्गाला फारसा रुचलेला नाही. वरील सात लोकांपैकी दोघांनी दलित वस्तीत कधी पाऊलही टाकलेले नाही.

पहिल्या प्रतिक्रियेत गावातील सधन शेतकरी व पुढारी यांचे मनोगत प्रतिबिंबित होते. हरिजनांचा 'उर्मटपणा' व 'फटकून वागण्याची प्रवृत्ती' यांबाबत त्यांची प्रमुख तक्रार दिसते.

परिस्थितीचे वस्तुनिष्ठ अवलोकन केले तर या तक्रारीत तथ्य नाही हे सहजपणे लक्षात येते. पूर्वीच्या जमान्यात लाचारीने (आपल्या पायरीने) राहणारे लोक आज आपल्या दाराशी येईनासे झाले, ताठ मानेने गावच्या मुख्य रस्त्यांवरून हिंडूफिरू लागले, बरोबरीच्या नात्याने हॉटेलमध्ये बसून चहापाणी घेऊ लागले याबद्दल त्यांना वैषम्य वाटते ही खरी वस्तुस्थिती आहे.

'हरिजन कष्टाला कमी पडतात, त्यांना फुकट मिळेल तेवढेच हवे' ही दुसरी तक्रार. या तक्रारीतही तथ्य नाही. उलट, पूर्वीच्या मानाने आज दलित लोक अधिक कष्ट करतात आणि याबाबत ते इतर कोणाच्याही मागे नाहीत, असे म्हणण्यास सबळ पुरावा आहे. विशेषतः दुधाचा व्यवसाय सुरू झाल्यानंतर दलित कुटुंबांना एक मोठा आवडीचा उद्योग मिळाला. गावात एका दिवसाच्या मुक्कामातही दलित लोक आपल्या गायी-म्हशींची किती काळजी घेतात हे दिसून येते.

यापूर्वी त्यांना स्वतःचा असा उद्योग नव्हता. शेती गमावलेली, कर्जाचे ओझे, रोजगारीचा अभाव आणि गावकीच्या कामांची सक्ती यांमुळे या समाजाला मरगळ आलेली होती. आजची परिस्थिती निराळी. कष्ट करून पैसे मिळतात, गावकीपासून मुक्त होता येते, बरोबरीच्या नात्याने वागणे शक्य आहे—या सर्व नवीन अनुभवांमुळे कष्ट करण्यास प्रेरणा मिळाली. दूधव्यवसाय आणि शेती या धंद्यांत प्रथमपासून सर्व तयारी करावी लागली, नवीन शिक्षण घ्यावे लागले. आज शेती उभी दिसते आणि भरभराटीस आलेला दूधव्यवसाय दिसतो, हे सर्व दलितांच्या परिश्रमांची, उद्योगप्रियतेची आणि आकलनशक्तीची साक्ष देते. त्यातच सामुदायिक शेतीसंस्था त्यांनी चालविली. अशा संस्थेचे व्यवस्थापन ही एक कठीण समस्या असते. या बाबतीतील त्यांची प्रगतीही प्रशंसनीय आहे. आज या कारभारात काही उणिवा असतील, सुधारणेला वाव असेल, परंतु सारासारविचार करता दलित लोक कष्टाला इतरांपेक्षा कमी पडतात असे म्हणण्यास जागा नाही.

क्रमांक दोनची प्रतिक्रिया सामान्य संघवाल्याची आहे. देवल एके काळी संघात होते. संघाच्या कामाची दिशा देवलांना पसंत पडली नाही म्हणून ते बाहेर पडले व आपल्या गावात त्यांनी एकाकीपणे आपल्या कल्पनेनुसार कामास सुरुवात केली. सदरहू प्रतिक्रियेवरून, संघात राहून देवलांना त्यांच्या इच्छेप्रमाणे काम करता आले नसते, हे स्पष्ट होते. देवलांच्या म्हैसाळ येथील कामावर या व्यक्तीचा (आणि हा संघाचा प्रतिनिधी मानल्यास संघाचा) आक्षेप असा की, देवल फक्त दलितांसाठीच काम करतात; तसे न करता त्यांनी सर्व जातींतल्या लोकांना एकत्र आणण्याचे काम करावे. वास्तविक देवलांचे उद्दिष्ट हेच आहे. त्यांच्या कामाची सुरुवात दलितांपासून आहे. या व्यक्तीला हेच मान्य नसावे. पण पर्यायी मार्ग कोणता हे स्पष्ट करणे तिला जमले नाही. ही व्यक्ती एके काळी देवलांची सहकारी होती. परंतु तिलाही या प्रकल्पामागील देवलांची भूमिका समजली नाही असे म्हणावे लागेल. समता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित समाजरचना निर्माण करायची झाल्यास, देवलांचा मार्ग सोडून इतर कोणत्या मार्गाने जावे हे कार्यक्रमाच्या स्वरूपात स्पष्ट केल्याखेरीज या प्रकल्पावर घेतलेल्या या आक्षेपाला अर्थ उरत नाही. काही शाखा काढून यापेक्षा भरीव काम झाले असते असे म्हणणे हास्यास्पद आहे.

क्रमांक तीनची प्रतिक्रिया क्रमांक दोनच्या प्रतिक्रियेशी मिळतीजुळती आहे. केवळ आर्थिक उन्नती चालणार नाही, सांस्कृतिक बदल हवा, असे या व्यक्तीचे म्हणणे आहे. आजपर्यंत

सांस्कृतिक बदल झाला नाही असे त्यात अभिप्रेत आहे. सांस्कृतिक बदल म्हणजे काय ? पूर्वीचे लाचारीचे जिणे टाकून दलितांनी स्वाभिमानाने आणि स्वकष्टाने जगण्याचे ठरविले, हा सांस्कृतिक बदल नाही काय ? दलित-दलितेतरांमधील भिंती उखडून टाकून सर्व दलितांना एकत्र आणण्यासाठी निश्चयपूर्वक प्रयत्न करणे हा सांस्कृतिक बदल नव्हे काय ? काही प्रमाणात दारूचे व्यसन असणाऱ्या व्यक्ती दलितांमध्ये आहेत, पण पूर्वीच्या मानाने या व्यसनाचे प्रमाण खूप घटले, हा बदल नगण्य आहे काय ? शिवाय, दारूचे व्यसन काय फक्त दलित जातींतच आहे ? व्यसनी लोकांची जातवार विभागणी केली तर कदाचित सवर्ण सधन लोकांचा भरणा त्यांत अधिक दिसेल. अस्वच्छतेबद्दलही हेच म्हणता येईल. अस्वच्छता सर्व थरांत सारख्याच प्रमाणात आढळून येते.

दलित लोक सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले आहेत असे म्हणण्यामागे वस्तुनिष्ठ अवलोकन नसून, त्यांनी पारंपरिक चौकटीतील आपली 'पायरी' सोडली याचे दुःख आहे. 'देवलांनी काय करायचे ते तिकडे करावे,' असे म्हणताना 'देवलांनी दलितांना आमच्याबरोबर आणून बसवू नये,' असे हे लोक निःसंकोचपणे सुचवतात. या एका वाक्यातच त्यांची खरी डोकेदुखी दिसून येते.

क्रमांक चारची प्रतिक्रिया पांरपरिक गावपुढाऱ्याची आहे. बाहेरून येणाऱ्या लोकांना 'आपल्या गावात सर्व काही ठीक आहे' असे सांगणे या लोकांना आपले कर्तव्य वाटते. गावात शांतता आहे, जातीजातीत सामंजस्य आहे, जातिभेद पाळला जात नाही, इतर गावांसारखे आमचे गाव नाही, इत्यादी परिचित रेकॉर्ड गावपुढारी बाहेरच्या लोकांना ऐकवीत असतात. अनेकांचा हा अनुभव आहे. मुत्सद्देगिरीने असे निवेदन करताना, 'दलितांनी आपली पायरी सोडली नाही म्हणून सामंजस्य टिकून आहे,' असे वाक्य ते बोलून गेले. या वाक्यातच त्यांची सनातनी संकुचित दृष्टी दिसून येते. 'गावात सामंजस्य टिकून राहावे यासाठी दलितांनी आपली पायरी सोडून वागू नये,' असे त्यात सूचित आहे.

क्रमांक पाचची प्रतिक्रिया गावात नोकरीनिमित्ताने राहण्यास आलेल्या शिक्षकाची आहे. शिक्षकाला गावच्या भांडणांत तटस्थ राहावे लागते असे ते आवर्जून सांगतात. नोकरी सांभाळून जगायचे असल्यास 'आपण बरे आणि आपले काम बरे' अशी भूमिका त्यांना स्वीकारावी लागते ही गोष्ट खरी आहे. आजच्या जमान्यात गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यास शिक्षक धजावत नाहीत. त्यांना गावात स्थानही उरले नाही. त्यांची परिस्थिती दयनीय असली तरी बऱ्याच वेळा त्यांची भूमिकाही प्रतिगामी व सनातनी असते असा अनुभव येतो. नरवाडच्या पाणवठ्याबद्दल बोलताना ते सहजपणे बोलून गेले की तिथे एक पाणवठा करण्याची गरज नाही, कारण अस्पृश्यांना निराळी विहीर आहे. 'एक गाव : एक पाणवठा' या चळवळीमागील समतेची भूमिका त्यांना समजलेली नाही, असे यावरून दिसते.

क्रमांक सहाची भूमिका एका मोठ्या सधन शेतकऱ्याची आहे. त्याच्या बोलण्यावरून एके काळी दलितांच्या जमिनी त्यांच्याकडे गहाण होत्या असे दिसून येते. आपल्या तावडीतून दलित मुक्त झाले, त्यांची परिस्थिती सुधारली याबद्दल त्यांना वाईट वाटत असावे असे दिसते. 'तुमच्याकडे जमीन होती, तेच बरे होते,' असे कोणी दलित त्यांना म्हणाले असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. पण असे म्हणण्यात त्या दलितांचे अज्ञान आणि आपल्या पूर्वीच्या सावकाराला

खूप करून काही पुढारात पाडून घेण्याची इच्छा असणे अधिक संभवनीय आहे.

सामुदायिक शेतीत उणिवा असणे थोडेफार साहजिक आहे. हीच सामुदायिक शेती आज एखाद्या निष्णात शेतकऱ्याकडे दिली तर तो अधिक उत्पादन घेणे अशक्य नाही. खुद्द हे जमीनदारही चांगले शेतकरी आहेत. परंतु केवळ उत्पादन अधिक असणे ही कसोटी नाही. ज्या लोकांकडून अधिक उत्पादनाची अपेक्षा आहे, त्यांची सामाजिक, मानसिक परिस्थिती लक्षात घ्यावयास हवी. सामाजिक सुधारणा म्हणजे केवळ उत्पादनवाढ नव्हे. आज दलित शेतकऱ्यांनी नवीन तंत्राचा अवलंब करून नवीन पिके घेण्यास प्रारंभ केला हे महत्त्वाचे. प्रगतीची पावले दलित व्यवस्थापक व सभासद यांनी टाकायची आहेत. देवल होते म्हणून सामुदायिक शेती-संस्था स्थापन होऊन तिच्या कारभाराची घडी व्यवस्थित बसली हे खरे. परंतु ते आहेत तोपर्यंतच ही संस्था चालेल असे म्हणणे चूक ठरेल. दलित कार्यकर्ते निवडून त्यांना संस्था चालविण्याचे शिक्षण देणे याला देवलांनी प्राधान्य दिले होते. त्यांच्या कार्यपद्धतीचा टीकाकारांना परिचय नाही.

शेवटची प्रतिक्रिया चांभार जातीच्या एका शेतकऱ्याची आहे. दलितांची पूर्वीची परिस्थिती त्यांनी अचूक शब्दांत टिपली आहे. आठ आणे प्रगती झाल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे. दलितांची शेती अधिक खर्चिक आहे अशी त्यांची तक्रार आहे; तिच्यात तथ्य आहे. सामुदायिक शेतीचा खर्च जास्त असतो. व्यवस्थापनाचा खर्च व्यक्तिगत शेती करणाऱ्याला नसतो. 'एकदम सुधारणा कठीण,' हे या गृहस्थांना समजते; पण सवर्णांना समजत नाही.

वरील प्रतिक्रिया पाहिल्या म्हणजे संपूर्ण समाजात सामंजस्य निर्माण करणे किती अवघड आहे याची कल्पना येते. सधन आणि सवर्ण लोकांची वृत्ती प्रामुख्याने बघ्याची आहे. झालेली प्रगती त्यांना मामुली वाटते किंवा नगण्य वाटते. होऊ घातलेल्या प्रगतीचे स्वागत करून तिला गती देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत नाही. म्हैसाळ प्रकल्पाला ज्या सवर्णांची आणि धनिकांची मदत झाली ते सर्व गावाबाहेरचे, शहरांतील आहेत. प्रत्यक्ष गावातील सवर्णांचा आणि सधनांचा सक्रिय पाठिंबा त्याला नाही.

सर्व ठिकाणी हीच परिस्थिती आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ग्रामीण भागात काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचा अनुभव हाच आहे. त्यांना मदत मिळते ती दूरच्या शहरांतील लोकांकडून. खुद्द गावातील प्रतिष्ठित सधन लोकांकडून मदत मिळत नाही, विरोधच होतो. अशा परिस्थितीत एकात्म समाज निर्माण करण्याचे कार्य यशस्वी कसे होणार हा प्रश्न उभा राहतो. म्हैसाळ गावात या दृष्टीने मिळविलेले यश स्पृहणीयच म्हणावे लागेल. कारण समाजातील व गावातील वातावरण अशा उपक्रमास पोषक नसतानादेखील दलित कार्यकर्त्यांनी एकात्मतेच्या दृष्टीने वाटचाल करण्याचा प्रयत्न केला. यामुळे किती अंतर तोडण्याचे शिल्लक राहिले यापेक्षा किती अंतर तोडले गेले याकडे पाहूनच यशापयश ठरविणे रास्त ठरेल.



म्हैसाळ-प्रकल्पापासून काय शिकायचे ?

म्हैसाळ-प्रकल्पाचा सर्वांगांनी अभ्यास करण्यामागे प्रमुख हेतू सामाजिक परिवर्तनाचे कार्य करणाऱ्यांना काही उपयुक्त मार्गदर्शन मिळते का, हे पाहणे, हा आहे. आज अनेक संघटना, स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्ते ग्रामीण भागात जाऊन दलित लोकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. त्यांचा त्याग, चिकाटी, धडाडी, प्रशंसनीय आहे; परंतु या स्वरूपाच्या कार्यात फार मोठ्या अडचणी येतात. त्यावर तोडगा शोधताना कार्यकर्ता नाउमेद होण्याचा प्रसंग येतो. वैचारिक गोंधळही निर्माण होतो. आपण हाती घेतलेले काम क्रांतिवादी की सुधारणावादी, प्रस्थापित व्यवस्थेस धक्का देणारे की पुष्टी देणारे यांसारखे वाद निर्माण होऊन कार्यकर्ता हतबल होण्याची शक्यता असते. या प्रकारच्या अडचणींतून मार्ग काढण्यास म्हैसाळ-प्रकल्पाचा अभ्यास उपयुक्त ठरेल असे वाटते. अर्थातच सर्व प्रकारच्या अडचणी पूर्णपणे समजण्यास किंवा त्या सोडवण्यास हा अभ्यास पुरेसा आहे असा दावा नाही. स्थलकालाप्रमाणे अडचणीचे स्वरूप बदलत असते. देशातील सामाजिक-राजकीय-आर्थिक वातावरणही लक्षात घ्यावे लागते. म्हैसाळसारख्या इतरत्र चालू असलेल्या प्रकल्पांचा सखोल अभ्यास करूनच अखेर या प्रश्नांवर मात करता येईल.

दलितमुक्तीच्या प्रकल्पाची सुरुवात आर्थिक उपक्रमापासून केल्यास प्रकल्प भक्कम पायावर उभा राहतो आणि जलद गतीने प्रगती होते असा पहिला धडा या अभ्यासातून घेण्याबाबत दुमत होणार नाही. दलितांबद्दलचा अशास्त्रीय व विकृत दृष्टिकोन दलितेतरांनी टाकून द्यावा आणि त्यांना बरोबरीचे स्थान द्यावे यासाठी प्रथम दलितांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करणे महत्त्वाचे आहे. दलित आणि दलितेतर—दोघांच्याही मनोभूमिकेत बदल व्हावयास हवा. दलितांच्या मनातील न्यूनगंड घालविणे आणि आपण इतरांपेक्षा कमी नाही, असलो तर काकणभर सरसच आहोत, अशी भावना दृढ होणे हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. परंतु जोपर्यंत दलितवर्ग दलितेतरांवर उपजीविकेसाठी अवलंबून आहे तोपर्यंत हे साध्य होणार नाही. हजारो वर्षे दलितेतरांच्या मर्जीवर व त्यांनी पुरस्कृत केलेल्या तत्त्वज्ञानावर अवलंबून राहिल्याने विशिष्ट प्रकारची मनोवृत्ती निर्माण झाली. केवळ वैचारिक पातळीवर कार्य करून ही मनोवृत्ती नष्ट होणार नाही. आजची सामाजिक विषमता सर्व दृष्टींनी चुकीच्या समजुतींवर आधारलेली आहे हे दलितांनी केवळ वैचारिक पातळीवर समजावून घेऊन भागणार नाही. दैनंदिन व्यवहारात जर त्यांना सन्मान्य

वागणूक हवी असेल तर हा विचार पटण्याव्यतिरिक्त त्यांचे जीवन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व सक्षम होणे अत्यावश्यक आहे.

या मुद्द्यावर भर देण्याचे कारण एवढेच की, आज सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी ज्या योजना कार्यान्वित आहेत त्यांमध्ये प्रामुख्याने प्रबोधनावर भर अधिक आहे. दलितांना आपल्या हक्कांची जाणीव करून देऊन, संघटितरीत्या त्यांनी आपले हक्क प्रस्थापित करावेत यासाठी झगडेही आयोजित केले जातात. अलिकडच्या काळात पॉलो फ्रेअरी यांच्या 'विवेक-जागरण'-पद्धतीचा अवलंब लोकप्रिय होत आहे. या पद्धतीचे उद्दिष्टही दलितांना जागृत करून आपले हक्क प्रस्थापित करण्यास आवश्यक त्या कृती हाती घेण्यास प्रवृत्त करणे हे आहे. 'एक गाव : एक पाणवठा', 'एक गाव : एक मसणवटा' या चळवळींचेही उद्दिष्ट दलितवर्गात जागृती निर्माण करून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हे आहे.

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची आणि योजनांची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्नही समाजकार्यकर्ते करीत असतात. या सर्व कार्यकर्त्यांचा एक महत्त्वाचा अनुभव असा की, दलितांना आपल्या हक्कांची जाणीव झाली, जातिव्यवस्था अन्यायी आहे हे मनापासून पटले, तरी सवर्ण गावबंधूंविरुद्ध किमान हालचाल करण्याचीही त्यांची तयारी नसते. एवढेच नव्हे तर बाहेरच्या कार्यकर्त्यांनी गावात येऊन समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तर आपणांस त्याचा उपद्रवच अधिक होईल अशी त्यांना भीती वाटत असते. 'एक पाणवठा' चळवळीत कार्य करणाऱ्यांना हा अनुभव येत असतो.

याचे कारण स्पष्टच आहे. आर्थिकदृष्ट्या परावलंबी असल्याने दलितांना समतेचा झगडा फार काळ चालविता येत नाही. रोजगार बंद करणे, बहिष्कार टाकणे, शेती व इतर व्यवसायांत अडथळे आणणे इत्यादि अनेक मार्गांनी दलितांचे आर्थिक जीवन धोक्यात आणणे दलितेतरांच्या हातात आहे. याशिवाय दलितेतरांचे संख्याबळ अधिक असल्याने प्रत्यक्ष दडपशाही, गुंडगिरी करून दलितांना जगणे अशक्य करणे हेही आहेच.

या कोंडीतून एक मार्ग असा की, दलितांचे संघटन हे कोणत्यातरी आर्थिक उपक्रमाभोवती करणे. जितक्या प्रमाणात आर्थिक स्वातंत्र्य लाभेल, तितक्या प्रमाणात दलितांचा समतेचा लढा प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. याचा अर्थ असा नव्हे की प्रबोधनाची किंवा जागृतीची चळवळ कमी महत्त्वाची आहे. यापूर्वीच्या चर्चेत स्पष्ट केल्याप्रमाणे ठिकठिकाणी खेडेगावांतून दलितांना आर्थिक आधार देता आला आणि त्या निमित्ताने त्यांच्या संघटना बांधता आल्या तर या जटिल समस्येतून बाहेर पडणे अधिक लवकर शक्य आहे, एवढाच याचा अर्थ आहे.

म्हैसाळ गावात अस्पृश्य लोकांना काही वर्षांपूर्वीच कोणत्या स्वरूपाची वागणूक मिळत होती, त्याचे त्यांच्याच शब्दांत वर्णन याआधी दिले आहे. ती परिस्थिती लक्षात घेता, देवलांनी केवळ प्रबोधनाच्या मार्गे हा प्रश्न सोडवायचा प्रयत्न केला असता तर आज दिसते ते यश पदरात पडले असते, असे म्हणता येणार नाही. आजच्या यशाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. पहिले असे की, दलितांची आर्थिक परिस्थिती सुधारली, एवढेच नव्हे तर ते आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाले; इतरांच्या बरोबरीने, सन्मान्य मार्गाने आपण जगू शकतो हा आत्मविश्वास त्यांनी मिळवला. दुसरे वैशिष्ट्य असे की, विशिष्ट उपक्रमांद्वारे दलितेतरांवरही त्यांनी प्रभाव पाडला

आणि दलितांना बरोबरीचे स्थान देण्यास त्यांना प्रवृत्त केले. हे यश पूर्णपणे पदरात पडले असे जरी म्हणता आले नाही तरी बऱ्याच प्रमाणात साध्य झाले असे मानण्यास हरकत नाही.

हे यश केवळ प्रबोधनामार्गे, जागृती करून अथवा विशिष्ट आंदोलनामुळे प्राप्त झाले असते असे म्हणता येणार नाही. प्रकल्पाला प्रारंभ झाला दूधव्यवसायापासून. त्यासाठी चाकोरीबाहेर जाऊन खटपट करावी लागली. पुढे गहाण जमिनी सोडवून, त्या सामुदायिकरीत्या कसण्याचा उपक्रम हाती घ्यावा लागला. त्यातही अडचणी होत्याच. परंतु केवळ आर्थिक स्वावलंबनावर प्रकल्प थांबला नाही. आर्थिक स्वावलंबन प्राप्त होत असतानाच, एकात्मता साध्य करण्यासाठी आवश्यक ते प्रबोधन व उपक्रम हाती घेण्यात आले. त्यामुळे दलित व दलितेतर यांमधील दरी न रुंदावता ती निदान काही प्रमाणात तरी संकुचित झाली. सुमारे दहा वर्षांच्या काळात मिळालेले हे यश स्पृहणीय आहे.

येथे महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो हा की, म्हैसाळ गावात दलितांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देणे शक्य झाले, तसे सर्वत्र कसे शक्य आहे? म्हैसाळप्रमाणे या समाजातील सामाजिक-आर्थिक विषमतेची समस्या सोडवायची झाल्यास गावोगावी अशी अनुकूल परिस्थिती आहे काय? तशी नसल्यास दलितांचा प्रश्न सोडविण्यास मार्ग कोणता?

म्हैसाळ गावी दलितांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देण्यास परिस्थिती बऱ्याच प्रमाणात अनुकूल होती हे खरे. परंतु पूर्णपणे अनुकूल होती असे मात्र म्हणता येणार नाही. सुरुवात दूधव्यवसायापासून झाली आणि आजही दूधव्यवसायच अधिक महत्त्वाचा आहे हे पक्के लक्षात घेतले पाहिजे. दूधव्यवसाय म्हैसाळ गावी पूर्वीपासून होताच. परंतु फक्त जमीनधारकच हा व्यवसाय करू शकत होते. त्यावेळी भूमिहीन असलेल्या दलितांना हा व्यवसाय करणे अशक्य होते. या परिस्थितीवर देवलांनी मात केली हे प्रकल्पाचे वैशिष्ट्य. या बाबतीत म्हैसाळ हे इतर गावांसारखे होते. म्हैसाळमधील परिस्थिती काही विशेष अनुकूल होती असे नाही.

दूधव्यवसाय सुरू झाल्यानंतर तो अधिक फायदेशीर करणे हे नंतरचे पाऊल. या बाबतीत म्हैसाळमधील परिस्थिती इतर गावांपेक्षा अधिक अनुकूल असण्याची शक्यता आहे. परंतु परिस्थिती अनुकूल असली तरी तिचा फायदा घेण्यासाठी लोकांना संघटित करावे लागते आणि त्यासाठी त्यांची मानसिक तयारीही करावी लागते. धार काढण्यापासून ते विक्रीव्यवस्था करण्यापर्यंत सर्व जोखमीची कामे दलित तरुणांनी हाती घ्यावी यासाठी परिश्रम घ्यावे लागले हे नजरेआड करून चालणार नाही.

गावोगावी दूधव्यवसायास अनुकूल परिस्थिती असेलच असे नाही. परंतु बऱ्याच ठिकाणी अशी अनुकूलता असण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. खरा प्रश्न भूमिहीन दलितांना, इतर कोणतीही साधनसामग्री नसताना, दूधव्यवसाय उपलब्ध करून देण्यासाठी जी व्यवस्था निर्माण करावी लागेल आणि जो शिक्षणादि खटाटोप करावा लागेल तो करणे हा आहे. कार्यकर्ता लाभला आणि कर्जपुरवठा करणाऱ्या व इतर संबंधित संस्था यांनी दलितांना सामावून घ्यायचे ठरविले तर अनेक ठिकाणी दलितांच्या दूध-सोसायट्या स्थापन होऊ शकतील. परंतु कार्यकर्ता नसेल तर हे काम होणार नाही. आज शासनाच्या योजना आहेत; अंमलबजावणीसाठी यंत्रणा

आहे. परंतु खेड्यातील उपेक्षित वर्गापर्यंत त्या पोहचविण्याचे काम आपोआप होणार नाही. गावपातळीवर सहकारी पद्धतीवर दूधसंकलन करता येते. सरकारने जाहीर केलेल्या भावाने संकलित केलेले दूध सरकारी खाते अगर सहकारी यंत्रणा खरेदी करू शकते. दुभते जनावर विकत घेण्यासाठी कर्ज मिळू शकते. परंतु गावपातळीवर उपेक्षित, गरीब, दलितवर्गाला या सर्व व्यवस्थेपासून दूर ठेवणे गावच्या सनातनी व प्रतिगामी वृत्तीच्या लोकांना सहज शक्य आहे. आणि म्हणूनच देवलांसारखा कार्यकर्ता असल्याखेरीज या सुविधांचा लाभ उपेक्षित वर्गापर्यंत पोहोचणार नाही. म्हैसाळ-प्रकल्पातून हा एक महत्त्वाचा धडा शिकावयास हवा.

म्हैसाळ येथील सामुदायिक शेतीचा प्रयोग त्यामानाने कमी ठिकाणी शक्य आहे असे दिसते. परंतु याही बाबतीत वारकाईने पाहणी केली तर असे दिसून येईल की, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तरी असा प्रयोग यशस्वी करून दाखविण्यास वाव आहे. आजपर्यंत खेड्यांची या दृष्टिकोनातून पाहणीच झालेली नाही. खेडोपाडी जमीनधारक दलितांची संख्या कमी नाही. परंतु सामुदायिक शेतीसाठी सर्वांची शेते सलग पट्टीत असावयास हवीत आणि शेतीस पाणी-पुरवठ्याची सोय हवी. म्हैसाळ गाव या दृष्टीने भाग्याचे ठरले. सलग सुपीक जमीन लाभली आणि पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणावर करणे शक्य झाले. सर्वत्र ही अनुकूलता असण्याची शक्यता नाही.

तसेच सामुदायिक शेतीमध्ये मालकी हक्क नष्ट होतो अशी सर्वसाधारण माणसाची समजूत आहे. सामुदायिक शेतीचे व्यवस्थापन आपण करू शकू असा आत्मविश्वासही आढळत नाही. यामुळे सामुदायिक शेतीचा विचार करणेही शक्य नाही. म्हैसाळमध्ये हे प्रश्न उपस्थित झाले नाहीत असे नाही; परंतु त्यांची तीव्रता कमी होती.

या सर्व अडचणी लक्षात घेऊनदेखील असे वाटते की, अनेक खेड्यांतून सामुदायिक शेतीस वाव असावा. म्हैसाळच्या यशस्वी प्रयोगावर भर देताना, तेथील शेती संबंधित कुटुंबांच्या उत्पन्न आणि रोजगार यांसंबंधीच्या गरजा भागवण्यास अपुरीच आहे हे विसरून चालणार नाही. आजही निम्म्यापेक्षा अधिक रोजगार सामुदायिक शेतीबाहेरच मिळवावा लागतो. उत्पन्नातही मोठा वाटा दूधव्यवसायाचाच आहे. तेव्हा म्हैसाळमधील सामुदायिक शेतीच्या यशस्वी प्रयोगावरून निष्कर्ष काढायचा तो हा की, जी काही उपलब्ध साधनसामग्री आहे, तिचा वापर सामुदायिकरीत्या केल्यास उत्पन्न वाढून, एक महत्त्वाची संस्था चालविण्यामुळे आत्मविश्वास आणि सामाजिक-राजकीय बळ वाढते.

अनेक गावांतून म्हैसाळसारखी, किंवहुना काही प्रमाणात जास्त चांगली, परिस्थिती असणे शक्य आहे. तिचा शोध घेणे हे सर्वप्रथम महत्त्वाचे आहे. जमीन सलग नसल्यास ती सलग करणे यास अग्रक्रमांक द्यावा लागेल. आजच्या चौकटीतदेखील हे अगदीच अशक्य नाही. पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे हे नंतरचे महत्त्वाचे पाऊल. या बाबतीत सरकार, पतपुरवठा करणाऱ्या संस्था आणि इतर स्वयंसेवी संस्था यांनी प्रयत्न करायचे म्हटल्यास अशक्य काही नाही. 'अनुकूल परिस्थिती फक्त म्हैसाळलाच आहे, इतरत्र नाही,' असा निष्कर्ष काढून या मार्गाची उपेक्षा करता कामा नये.

यासंबंधात आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेता येईल. आज अनेक खेड्यांतून अस्पृश्य जमातींतील लोक आपल्या जमिनी इतरांनी लुबाडल्याच्या तक्रारी करताना आढळतात. महार

वतनाच्या जमिनी गडप केल्या गेल्याच्या तक्रारी अनेक ठिकाणी कानावर येतात. त्यांत तथ्य आहे. यासाठी, आदिवासींना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या त्याचप्रमाणे दलितांनाही त्यांच्या जमिनी परत मिळाव्या यासाठी चळवळ उभी केली पाहिजे. तसेच कमाल जमीनधारणेच्या कायद्यान्वये जी अतिरिक्त जमीन उपलब्ध होईल ती जमीनही अग्रहक्काने दलितांना मिळण्याचे प्रयत्न व्हावयास हवेत. या व अशा मार्गांनी दलितांना काही प्रमाणात जमीन मिळवून देता येईल. मात्र, या मार्गांनी एकदा जमीन दलितांना मिळाली की आपले काम झाले, असे मानून चालणार नाही. या जमिनी एकत्रित आणून सहकारी अथवा सामुदायिकरीत्या कसण्याची व्यवस्था करणे तितकेच अगत्याचे आहे.

या प्रयत्नातच दलितेतर अल्पभूधारक यांनाही समाविष्ट करता येणे शक्य आहे. अल्पभूधारकांना सहकारी किंवा सामुदायिक शेतीशिवाय पर्याय नाही. परंतु आपल्या देशात सामुदायिक शेतीबाबत उदासीनता आहे; ती समर्थनीय वाटत नाही. सामुदायिक शेतीचे प्रयोग समाजवादी म्हणवणाऱ्या या देशात खऱ्या अर्थाने केलेलेच नाहीत. हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे; येथे ही चर्चा अप्रस्तुत ठरेल. मुद्दा एवढाच की, म्हैसाळ येथील सामुदायिक शेतीचा प्रयोग सर्वच गरीब शेतकऱ्यांना नवीन जोम आणि उत्साह देणारा ठरू शकेल. म्हैसाळ येथील सामुदायिक शेतीचे यश एक अपवाद म्हणून उपेक्षित केले गेले तर ती एक मोठी चूक होईल.

सुदैवाने म्हैसाळच्या धर्तीवर प्रकल्प उभे करण्याचे प्रयत्न काही ठिकाणी होत आहेत. सांगली जिल्ह्यातच कवठेपिरान या गावी चव्वेचाळीस दलित कुटुंबांनी आपली अठ्ठेचाळीस एकर जमीन सामुदायिक रीत्या कसण्यास वर्षापूर्वी सुरुवात केली. त्याच परिसरात नांद्रे या गावी शंभर दलित कुटुंबांनी एकशेचौदा एकर जमीन एकत्रित आणून 'डॉ० बाबासाहेब संयुक्त सहकारी शेती सोसायटी' ऑगस्ट १९७९ मध्ये स्थापन केली. इचलकरंजी या गावी 'श्रीदत्त संयुक्त सहकारी हरिजन शेतीसंस्था' नुकतीच स्थापन झाली असून चौऱ्याहत्तर कुटुंबांनी सुमारे अठ्ठावीस एकर जमीन एकत्र आणली आहे. पुण्यानजीक भुकुम या गावीही असाच प्रयोग एक वर्षभर चालू आहे. हे सर्व प्रयोग यशस्वी होणे आवश्यक आहे. योग्य दर्जाचा कार्यकर्ता असला तरच हे प्रयोग यशस्वी होऊ शकतील.

पोषक वातावरण व प्राथमिक अडचणी दूर करण्यासाठी भरघोस साहाय्य या दोन गोष्टींची अशा प्रकल्पांना नितांत गरज आहे. म्हैसाळ-प्रकल्पात जमिनी सावकारांपासून सोडवून घेण्यासाठी मोठी रक्कम उभी करावी लागली. देणग्या आणि ठेवी मिळवाव्या लागल्या. देवलांचा मित्रपरिवार मोठा होता. देवलांची वैयक्तिक आर्थिक परिस्थिती उत्तम होती. यामुळे ही अडचण सहजपणे दूर होऊ शकली. ही अनुकूलता इतर कार्यकर्त्यांच्या बाबतीत शक्य नाही. जमिनी सोडविण्यासाठी सरकार, बँका व अन्य पतपुरवठा करणाऱ्या संस्था मदत करीत नाहीत. आजच्या नियमांच्या चौकटीत अशी मदत देण्यास त्या संस्थांना वाव नाही. म्हणून हे काम खाजगी संस्थांनाच करावे लागणार असे दिसते. उद्योगपती, व्यापारी, धानिक लोक यांनी या कामाचे महत्त्व ओळखून स्वयंस्फूर्तीने या कामाला साहाय्य उपलब्ध करून दिले पाहिजे. दलितांच्या जमिनी कर्जमुक्त करणे आणि सामुदायिक शेतीस प्रारंभ करून देण्यास प्राथमिक साहाय्य देणे एवढेच उद्दिष्ट डोळ्यापुढे

ठेवून प्रत्येक जिल्ह्यात फंड गोळा करणारी संस्था काढणे आवश्यक दिसते. सरकारनेही याबाबत अधिक डोळसपणे व जबाबदारी ओळखून पूरक धोरण आखले पाहिजे.

पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी प्रामुख्याने सरकारवर पडते. ही जबाबदारी दुहेरी आहे. विविध कायदेकानू आणि योजना यांमध्ये आवश्यक ते बदल करून अशा प्रकल्पांना वाव देणे आणि स्थानिक पातळीवरील राजकीय वातावरण निकोप ठेवून या कार्यात अडथळा आणणाऱ्यांना प्रतिबंध करणे अशी ही दुहेरी जबाबदारी आहे. विविध कायदे आणि योजना यांची या दृष्टिकोनातून फेरतपासणी करण्यासाठी सरकारने तज्ज्ञांची समिती नेमावी आणि तिच्या शिफारसी मान्य कराव्यात. त्याचप्रमाणे विविध योजनांमध्ये अशा प्रकल्पांना विशेष सवलती व प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनेही विचारविनिमय करावा. उदाहरणार्थ, कर्जपुरवठा, सहकाराविषयीचे कायदे, आयकर-कायदा इत्यादी बाबतींत या दृष्टीने फेरविचार शक्य आहे.

आज या प्रकारची हालचाल दिसत नाही; सरकारची याबाबत काही जबाबदारी आहे याची जाणीवही दिसत नाही. म्हैसाळ येथील कार्यकर्त्यांचा अनुभव या बाबतीत निराशाजनक म्हणावा लागेल. सामुदायिक शेतीसंस्था रजिस्टर करून घेण्यासाठीदेखील विशेष खटपट करावी लागते. साचेबंद नियम आणि उपनियम, कर्मचाऱ्यांची दिरंगाई आणि अनास्था यांमुळे पदोपदी अडथळे निर्माण होत गेले. आजही सर्व अडचणी दूर झालेल्या नाहीत. आयकरासंबंधीचे प्रकरण आज चार वर्षे पेंड खात पडलेले आहे.

म्हैसाळ-प्रकल्पाचे एक उद्दिष्ट विविध दलित जातींतील लोकांना एकत्र आणणे आणि दलित-दलितेतरांमध्येही बंधुभाव निर्माण करणे हे आहे. या बाबतीतील यश मर्यादितच म्हणावे लागेल. १९७२ च्या दुष्काळामध्ये एक मोठी योजना आखून सर्व गरीब शेतकऱ्यांना मदत करण्यात दलितांनी पुढाकार घेतला. अशा तऱ्हेचा प्रयत्न पुन्हा झालेला दिसत नाही. हे सर्व प्रयत्न केवळ देवल यांनीच करावेत अशी अपेक्षा करणे चुकीचे होईल; परंतु यासारख्या प्रयत्नांसाठी त्यांनी एक यंत्रणा निर्माण करावी. काही निवडक कार्यकर्त्यांनी अशा उपक्रमांचा सातत्याने विचार करून आखणी करावी. शहरातील तरुणांची श्रमदानशिबिरे घेणे, स्त्रियांच्या सहली म्हैसाळ येथे आयोजित करणे इत्यादी उपक्रम हाती घेणे शक्य आहे. त्याची गरजही आहे.

एक गोष्ट येथे नमूद करावयास हवी. म्हैसाळ-प्रकल्पात खुद्द म्हैसाळमधील दलितेतर तरुणांचा सहभाग कमी आढळतो. त्याचे एक कारण असे दिसते की, गावातील दलितेतर तरुणांना प्रकल्पात सहभागी करून घेण्याचे प्रयत्न कमी पडले. दलितेतर लोकांमध्ये अशी भावना आढळते की, म्हैसाळ-प्रकल्प पाहण्यासाठी, त्यात सहभागी होण्यासाठी बाहेरच्या लोकांना पाचारण केले जाते; त्यांचे स्वागत होते; पण आम्हांकडे दुर्लक्ष होते. देवल यांना या गोष्टीची जाणीव आहे. पण या दृष्टीने प्रयत्न करण्यास त्यांना फुरसद मिळत नाही. वर उल्लेखल्याप्रमाणे यंत्रणा निर्माण केल्याने हे काम होऊ शकेल.

सामुदायिक शेतीच्या व्यवस्थापनाबाबत विवेचन आले आहेच. व्यवस्थापन अधिक कार्यक्षम पद्धतीने न झाल्यास केवळ आर्थिक नुकसान होणार नाही, तर दलितमुक्तीच्या चळवळीचेच नुकसान होणार आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. शास्त्रशुद्ध व कार्यक्षम व्यवस्थापन, सर्व प्रकारची माहिती देणारे रेकॉर्ड यांकडे लक्ष देण्यास जाणकारांची मदत घ्यावी. बाहेर हितचिंतक मोठ्या

प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यांना या कामासाठी जोडून घ्यावे.

जातीजातींतील अंतर तोडत असताना, मुसलमान, जैन या धर्मांतील गरीब कुटुंबांनाही सहभागी करून घेण्याचा प्रयत्न आवश्यक आहे.

सामुदायिक शेतीसंस्थेचे यशापयश हे शेतमालाच्या किंमती आणि विक्रीव्यवस्था यांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. श्रीविठ्ठल सोसायटीची भरभराट नगदी पिकांमुळे झाली. ऊस, द्राक्षे, विड्याची पाने यांसारखी भरपूर पैसा देणारी पिके घेतल्यामुळे नफ्याचे प्रमाण वाढले. आज या तीनही पिकांना स्थिर व उत्तम भाव येतो. ही परिस्थिती कायम राहीलच असे नाही. सामुदायिक शेतीमुळे ही पिके घेणे शक्य झाले. अन्नधान्याच्या पिकांतून फायदा नाही; उलट, तोटा होण्याची शक्यता आहे. संस्थेचा दैनंदिन खर्च भागणेदेखील अवघड आहे. सरकार किंमतीबाबत आणि विक्रीव्यवस्थेबाबत निश्चित धोरण ठरवून अशा संस्थांना उत्तेजन देऊ शकेल. अशा संस्थांकडून आलेल्या मालाची अग्रक्रमाने खरेदी करणे, अधिक भाव देणे, इत्यादी मार्गांनी सरकार अगर ग्राहकसंस्था अशा प्रकल्पांना प्रोत्साहन देऊ शकेल. ही एक सार्वजनिक जबाबदारी आहे असे सामान्य नागरिक, शासन आणि त्यांच्या संघटना यांनी मान्य केले तर अशा संस्था स्थिर पायावर उभ्या राहू शकतील.

शेती व दूधव्यवसाय यांव्यतिरिक्त इतर आर्थिक उपक्रमांचाही शोध घ्यावयास हवा. कारण हेच दोन व्यवसाय सर्वत्र भरभराटीस येऊ शकतील अशी परिस्थिती असण्याची शक्यता नाही. उदाहरणार्थ, अनेक गावांत मातंग समाजातील लोकांचा दोर वळण्याचा व्यवसाय संघटित करण्यास वाव दिसतो. आज घायपाताचे वेट व पाणी मोठ्या शेतकऱ्यांकडून भरमसाट भाडे देऊन घ्यावे लागते. त्यामुळे हा व्यवसाय तोट्यात जातो. फायदा मातंगांना न मिळता इतरांना मिळतो. मातंगांना संघटित करून हा व्यवसाय त्यांनीच पूर्णपणे चालविण्यासाठी त्यांना साहाय्य करण्याचा विचार करता येईल. म्हैसाळमधील भटक्या जमातींच्या लोकांना फळविक्री हा धंदा मिळू शकला, हे एक उदाहरण आहेच.

जे लोक पूर्णपणे भूमिहीन आहेत व राहतील त्यांच्यासाठी काय करायचे ? भूमिहीनांमध्ये अस्पृश्यांचा भरणा अधिक आहे. म्हैसाळ प्रकल्प या क्षेत्रात काय मार्गदर्शन करू शकतो ?

म्हैसाळमधील दलित दूधव्यवसायामुळे संघटित झाले व त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली हे वर सांगितले आहेच. जे जमीनधारक होते त्यांतील निम्म्याहून अधिक सभासद नाममात्र जमीनधारक होते, कारण त्यांची जमीन फारच अल्प होती. परंतु म्हैसाळमध्ये वैरणीचा प्रश्न सोपा होता आणि सामुदायिक शेती स्थापन झाल्यानंतर तो अधिकच सोपा झाला. इतरत्र वैरणीचा प्रश्न इतकाच सोपा असेल तर दुधाचा व्यवसाय भूमिहीनांना देता येईल. वैरण विकत घेऊन दैनंदिन खर्च भागण्याइतके उत्पन्न मिळेलच असे नाही. ठिकठिकाणी असे दिसते की, वैरण उपलब्ध असूनदेखील दूधविक्रीची व्यवस्था नसल्याने दूधव्यवसाय मूळ धरत नाही. उदाहरणार्थ, पुणे जिल्ह्यात पवना खोऱ्यात गावकरी म्हशी विकत घेतात, पण दुधासाठी नव्हे. आटलेली म्हैस विकत घ्यायची, वर्षभर पोसायची व गाभण होऊन व्यायला आल्यावर किंवा व्याल्यावर लगेच विकायची. सुमारे बाराशे रुपयांना घेतलेली म्हैस तीन हजार रुपयांपेक्षा अधिक

किंमतीला जाते. जर दूधविक्रीव्यवस्था असती तर त्यांनी दुधाचाच व्यवसाय केला असता. म्हैस विकत घेण्यास बँक कर्ज देते.

मुद्दा असा की, येथेही विक्रीसाठी संघटनात्मक प्रयत्न झाले तर लोकांना फायदा मिळू शकतो. दुधाशिवाय अन्य व्यवसाय दलितांना देता येईल का, याचाही विचार करावा लागेल. कोणता ना कोणता तरी व्यवसाय मिळू शकेल असे वाटते; परंतु मिळेलच अशी खात्री नाही आणि मिळाला तरी त्यावर पूर्णपणे भागेल असेही नाही. त्या त्या परिस्थितीत संशोधन करून प्रकल्प उभा करावा लागेल.

मजुरीवरच प्रामुख्याने अवलंबून राहावे लागणार असेल तर अधिक काम व योग्य वेतन यांसाठी मजुरांच्या संघटना बांधणे हा एकच मार्ग शिल्लक राहतो. सुदैवाने महाराष्ट्रात 'रोजगार-हमी योजना' लागू केली आहे. किमान वेतनाचा कायदाही आहे. या कायद्याचा आणि इतर योजनांचा उपयोग सर्व दलितांना संघटित करून त्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी करणे शक्य आहे. आज अनेक ठिकाणी असा अनुभव येत आहे की, रोजगार-हमी-योजना आणि किमान वेतनाचा कायदा या दोन गोष्टींचा अवलंब केल्याने गरीब दलित मजूर यांचे आर्थिक-सामाजिक जीवन सुधारणे शक्य झाले. दलितांच्या मुक्तिसंग्रामातही या योजनांचा वापर करता येईल. हा वापर कसा करायचा, त्यात काय प्रकारच्या अडचणी येतात, आजपर्यंतचा या क्षेत्रातील अनुभव काय आहे इत्यादी प्रश्न या संदर्भात उभे राहतात. या विषयाची स्वतंत्रपणेच चर्चा करणे योग्य ठरेल.

म्हैसाळच्या धर्तीवर काम करायचे ठरविल्यास त्यासाठी कार्यकर्ता मिळवणे ही एक महत्त्वाची अडचण उभी राहील. मोठ्या प्रमाणावर मातबर कार्यकर्ते मिळणे अवघड आहे, ही गोष्ट खरी. परंतु योग्य माणसे निवडून त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन कार्यकर्ते तयार करायचे ठरविल्यास हा प्रश्न दिसतो तेवढा अवघड राहणार नाही. आजही अनेक तरुण कार्यकर्ते कार्य करीत आहेत. तरुणांच्या संघटना आहेत. आपापल्या परीने ते परिवर्तनाचे कार्य करीत असतात. त्यांच्या किमान मानधनाची, प्रशिक्षणाची आणि त्यांच्या कार्यात लक्ष घालून त्यात सुसूत्रता आणण्याची जबाबदारी स्वीकारणारी संघटना मात्र आज अस्तित्वात नाही. ज्या संघटना आज अस्तित्वात आहेत त्यांना म्हैसाळसारख्या प्रकल्पांसारखे काम आकर्षित करीत नाही. अशा कामाविषयी त्यांना माहिती नसणे हेही कारण असू शकेल. किंवा अशा स्वरूपाच्या कामाला आवश्यक ते गुण अंगी असणारे कार्यकर्ते नसू शकतील.

कार्यकर्त्यांकडून दोन प्रमुख अपेक्षा ठेवाव्या लागतील. समता व न्याय या तत्त्वांवर आधारित असलेल्या समाजरचनेचे निदान ढोबळ स्वरूप त्याला स्पष्टपणे ठाऊक असावयास हवे आणि त्याचप्रमाणे हे उद्दिष्ट गाठण्याच्या मार्गाबाबतही किमान स्पष्टता हवी. संघर्ष आणि विधायक कार्य यांचे नेमके स्वरूप काय, केव्हा कोणत्या मार्गाचा अवलंब करायचा इत्यादी प्रश्नांची त्याला चांगली जाण हवी. तशी नसल्यास प्रयोग फसण्याची शक्यता वाढते.

ज्या व्यवसायामार्फत दलितांचे संघटन करायचे, त्या व्यवसायाचे शास्त्रीय ज्ञान असणे अगर त्या क्षेत्रातील तज्ज्ञांशी सतत संपर्क असणे ही आणखी एक महत्त्वाची बाब. पण केवळ

अद्ययावत शास्त्रीय ज्ञान असून भागणार नाही. स्थानिक पातळीवर जी नैसर्गिक, आर्थिक परिस्थिती असेल त्या संदर्भात आधुनिक विज्ञान आणि तंत्र यांत बदल करण्याची कुवत आवश्यक आहे. केवळ एखाद्या व्यवसायाचे अद्ययावत ज्ञान लोकांना देणे एवढेच काम नसून, मागासलेला, बुजरा दलित या व्यवसायात त्याच्या गतीने स्थिर होईल या दृष्टीने कामाची आखणी हवी. उदाहरणार्थ, दूधव्यसाय घेतला, तर सुरुवातीसच खूप दूध देणाऱ्या विलायती गायी गावात आणणे चुकीचे ठरू शकेल. सुरुवात गावठी म्हशीपासूनच करावी लागेल. परिसरात उगवणारी वैरण वापरून जनावरांची देखभाल ठेवणे व दुधाचे उत्पादन वाढवणे यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. जनावरे सांभाळण्याचा सराव झाला, व्यवसायावर पकड बसली, म्हणजे नंतर एकेक सुधारणा हाती घेता येतील.

खेडेगावांतील बड्यांची दडपशाही व गुंडगिरी आणि त्यांचे वरपर्यंत असलेले संबंध यांमुळे दलितांना संघटित करून त्यांना न्याय व प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या कामास गावपातळीवरील राजकारण पोषक नसून मारकच असते असा (काही अपवाद सोडता) सर्व ठिकाणचा अनुभव आहे. या वस्तुस्थितीची दखल घेऊन प्रकल्पाच्या कामास प्रारंभ करावयास हवा. या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची बाब ही की कार्यकर्ता एकाकी पडता कामा नये. तो एकाकी राहिला तर गावच्या राजकारणात तो खतम होऊन जाईल. म्हणून या कार्यकर्त्याच्या मागे मोठ्या संस्थेचे पाठबळ उभे हवे आणि तसे ते उभे आहे हे गावकऱ्यांना दिसावयास हवे. कार्यकर्त्याची प्रतिष्ठा आणि बळ या गोष्टी संस्थेच्या प्रतिष्ठेवर अवलंबून आहेत.

देवलांना यश मिळाले, त्याचे एक कारण देवलांची गावात प्रतिष्ठा होती. सर्व गाव त्यांना ओळखत होते व त्यांच्याबद्दल सर्व थरांत आदर होता. त्याचप्रमाणे गावाबाहेरील वजनदार व्यक्तींचा व राजकारणातील श्रेष्ठींचा त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा होता. देवलांच्या अंगी असलेल्या वैयक्तिक गुणांइतकेच या गोष्टीलाही महत्त्व आहे.

ख्यातनाम संस्थेचा पाठिंबा गावच्या राजकारणात तरून जाण्यास जसा आवश्यक आहे, तसा तो इतर क्षेत्रांतही उपयुक्त आहे. कार्यकर्त्याच्या वैयक्तिक गरजा भागविण्याची जबाबदारी संस्था घेऊ शकेल. दैनंदिन कार्यांतील समस्या सोडविण्यास संस्थेची मदत उपयुक्त ठरेल. महत्त्वाच्या प्रसंगी संस्थेच्या इतर कार्यकर्त्यांची मदत आणि मार्गदर्शन मिळू शकेल. असे अनेक फायदे संस्थेचा पाठिंबा असण्यामध्ये आहेत.

कार्यकर्त्यास ख्यातनाम संस्थेचा पाठिंबा आवश्यक आहे हे जर आपण मान्य केले तर दोन पर्याय आपणांपुढे उभे राहतात. पहिला पर्याय, आज अस्तित्वात असलेल्या मोठ्या स्वयंसेवी संस्थांनी म्हैसाळसारख्या प्रकल्पांसाठी कार्यकर्ते तयार करून ठिकठिकाणी कामे हाती घ्यावीत. दुसरा पर्याय, एकाकी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनीच एकत्र येऊन आपली शक्ती संघटित करावी आणि त्याला संस्थेचे रूप द्यावे.

या दोनही पर्यायांत सद्यःस्थितीत अडचणी दिसतात.

पहिल्या पर्यायातील अडचणी अशा : आज नामवंत स्वयंसेवी संस्था आणि संघटना म्हैसाळसारखे प्रकल्प हाती घेण्याच्या मनःस्थितीत दिसत नाहीत. या संस्थांची आज चालू असलेली कामे ढोबळमानाने दोन प्रकारची आहेत : एखादे विशिष्ट उद्दिष्ट निश्चित करून व्यापक

प्रमाणात आंदोलन व लढे उभे करणे हा कामाचा पहिला प्रकार. उदाहरणार्थ, दलितांना सवलती मिळवून देणे, एक पाणवठा प्रस्थापित करणे, आदिवासींच्या जमिनी सोडवणे, शेतसारा माफ करून घेणे इत्यादी. एखाद्या विशिष्ट ठिकाणी कल्याणकारी स्वरूपाचा कार्यक्रम राबवणे हा कामाचा दुसरा प्रकार. उदाहरणार्थ, गरिबांसाठी दवाखाने चालवणे, बालवाड्या काढणे, अपंगांसाठी संस्था चालवणे इत्यादी.

या दोनही प्रकारच्या कामांचे महत्त्व कोणी नाकारू शकणार नाही. पहिल्या प्रकारच्या कार्यामुळे दलित-शोषित वर्गात जागृती होऊन समाजात एक नवीन राजकीय शक्ती निर्माण होते. ती जितकी प्रभावी ठरेल तितक्या प्रमाणात सरकारच्या आर्थिक धोरणात समाजवादाचा अंश वाढू लागतो. दुसऱ्या प्रकारच्या कार्यातून गरीब लोकांच्या औषधपाणी, शिक्षण यांसारख्या तातडीच्या गरजा भागण्यास मदत होते, त्यामुळे त्यांच्या प्रगतीस काही प्रमाणात चालना मिळते. परंतु या दोनही प्रकारच्या कार्यांतून दलित-शोषितांचे आर्थिक जीवन मजबूत पायावर उभे करण्यास प्रेरणा व मदत मिळत नाही. त्यामुळे प्रगती फार काळ टिकत नाही. उदाहरणार्थ, आदिवासींना सावकारी पाशातून मुक्ती मिळू शकते. परंतु परत मिळालेल्या जमिनी योग्य प्रकारे कसून परत सावकारी पाशात आपण जाणार नाही अशी व्यवस्था होऊ शकत नाही.

म्हैसाळ येथील काम निराळ्या प्रकारचे आहे. एकाच ठिकाणी पाय रोवून, सातत्याने अनेक वर्षे काम करून, दलितांना स्वावलंबी बनवून सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे हे उद्दिष्ट आहे. त्यात गावपातळीवरील सर्व प्रकारच्या संघर्षांना तोंड देण्याची तयारी आहे, परंतु संघर्ष हा दलितांची शक्ती संवर्धित करण्यासाठी वापरण्याकडे कल आहे. अशा तऱ्हेचे काम हाती घेण्याकडे प्रस्थापित संस्थांचा कल व तयारी दिसत नाही. त्यास अनेक कारणे असतील. म्हैसाळसारखे प्रकल्प चालविण्यास तपशीलवार उपक्रमांची आखणी करावी लागते. गावातील सर्व परिस्थितीचे योग्य ज्ञान हवे. लहानमोठे प्रसंग हाताळण्याचे कसब हवे. मोठ्या स्वयंसेवी संस्थांचा कारभार कालांतराने सरकारी यंत्रणेसारखाच अकार्यक्षम होतो हेही एक कारण सांगता येईल. स्थानिक कार्यकर्त्यांस प्रकल्प चालवण्यास अधिक वाव व स्वातंत्र्य आवश्यक असते. संस्थेचे संचालक त्यावर विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक नियंत्रण ठेवू लागले तर प्रकल्प यशस्वी होणार नाही. अशा अनेक कारणांमुळे मोठ्या संस्थांकडून म्हैसाळसारखे प्रकल्प हाती घेतले जातील असे आज तरी वाटत नाही.

एकाकी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आपली शक्ती संघटित करावी आणि ही शक्ती आपापले प्रकल्प यशस्वी करण्यास वापरावी असे ठरविण्यातही बऱ्याच अडचणी दिसतात. आज असे एकटेदुकटे कार्य करणारे कार्यकर्ते संख्येने कमी नाहीत. परंतु व्यक्तिशः त्यांचे सामर्थ्य अपुरे पडते. त्यांची व्यक्तिगत आर्थिक परिस्थितीही कमकुवत असते. सरकारदरबारी त्यांची दाद लागत नाही. राजकारणाच्या वावटळीत त्यांचा निभाव लागत नाही. या सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन एक बलिष्ठ संघटना स्थापन करावी व तिचे पाठबळ सर्व कार्यकर्त्यांच्या मागे उभे करावे असे अनेकांना वाटते. अजूनपर्यंत या कामास यश आलेले नाही. त्यास प्रामुख्याने कार्यकर्तेच कारणीभूत आहेत. प्रत्येकास आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्याची इच्छा असते. आपले काम इतरांपेक्षा अधिक पुरोगामी व संघर्षवादी आहे असे वाटत असते. असे हिरीरीने

मांडण्याच्या खटाटोपात आपल्या कामाचे अतिरंजित वर्णन व दुसऱ्यांच्या कामाचे अवमूल्यन करण्याची प्रवृत्ती दिसून येते. गौण स्वरूपाच्या आणि अनावश्यक वादंगांना चर्चेत महत्त्वाचे स्थान दिले जाते. त्यामुळे एकत्रित येण्याची प्रक्रिया खुंटते.

दोनही पर्यायांमधील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे.

प्रकल्पाच्या कामाची सुरुवात बाहेरच्या कार्यकर्त्यामार्फत झाली असेल तर तो लवकरात लवकर त्या कामातून बाहेर पडावा व स्थानिक कार्यकर्त्याने काम पुढे चालविण्याची जोखीम पत्करण्यास पुढे यावे, याबाबत सर्वसाधारणपणे एकमत आहे. 'बाहेरचा' आणि 'स्थानिक' या शब्दांचा अर्थ विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात लावला पाहिजे. देवल हे खुद्द म्हैसाळ गावचेच, म्हणून एका दृष्टीने ते स्थानिक, परंतु ते दलित समाजातील नव्हेत म्हणून बाहेरचेही. देवल स्वतःस बाहेरचाच मानतात आणि हा प्रकल्प गावातील दलित कार्यकर्त्यांनीच पुढे चालविला पाहिजे अशी त्यांची ठाम भूमिका आहे.

प्रथमपासून त्यांनी दलित तरुण कार्यकर्ते निवडून त्यांना सर्व प्रकारची जबाबदारी पेलण्यासाठी तयार करण्यास प्राधान्य दिले. एखादी महत्त्वाची संस्था चालविण्याचे काम दलितांनी केल्याशिवाय त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही ही त्यांची प्रथमपासूनची भावना आहे. त्यामुळे कार्यकर्ते तयार करण्याकडे त्यांचे लक्ष होते. श्रीविठ्ठल सोसायटीचे ते प्रथम अध्यक्ष होते. १९७५ साली त्यांनी अध्यक्षपद सोडले. आज सोसायटीचा दैनंदिन कारभार दलित कार्यकर्तेच पाहतात. हिशेब ठेवण्याचे अवघड कामही दलित तरुणच पाहत आहेत. देवल महिन्यातून दोनदाच सोसायटीत जातात आणि महत्त्वाच्या प्रसंगी चर्चेत भाग घेतात. दैनंदिन निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत देवलांचा भाग फारसा नसतो.

ग्रामीण भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांत ही वृत्ती अभावानेच आढळते. जे कामासाठी गेले ते तिथेच अडकून पडले. तिथल्या राजकारणात रस घेऊ लागले. आपल्याशिवाय काम पुढे जाणार नाही असा त्यांचा समज असतो. स्थानिक तरुणांना त्यांनी आपले हस्तक म्हणूनच वापरले. त्यांना पुढारीपण दिले नाही. या संदर्भात देवलांचा अलिप्तपणा आकर्षक व काहीसा गूढ वाटतो. त्यांची ही वृत्ती त्यांच्या कार्याबद्दलच्या चिंतनातूनच निर्माण झालेली दिसते. दलितांना स्वावलंबी करण्याच्या त्यांच्या विचारसरणीचा हा परिपाक आहे.

बाहेरचा कार्यकर्ता कितपत आवश्यक आहे हा वादाचा विषय होऊ शकेल. परंतु सर्व ठिकाणचे अनुभव लक्षात घेता, सुरुवातीच्या काळात तरी बाहेरचा कार्यकर्ता आवश्यक आहे असे दिसते. त्याशिवाय कामास प्रारंभच होत नाही. प्रकल्पांची रूपरेषाही ठरत नाही. यास काही अपवाद आहेत. उदाहरणार्थ, पालघर तालुक्यातील भूमिसेना ही संघटना पूर्णपणे स्थानिक कार्यकर्त्यांनीच उभी केली. पण असे काही अपवाद सोडता, अशा कार्याचा प्रारंभ बाहेरच्या कार्यकर्त्याशिवाय होऊ शकेल असे दिसत नाही. म्हैसाळचा प्रकल्प देवल नसते तर निर्माण झाला नसता. परंतु प्रारंभ करून प्रकल्प आकार घेऊ लागला म्हणजे स्थानिक कार्यकर्त्यांवर भिस्त ठेवता येते हे म्हैसाळ-प्रकल्पावरून स्पष्ट दिसते.

याचा अर्थ असा नव्हे की, बाहेरची मदत आणि मार्गदर्शन पूर्णपणे बंद करता येईल, किंवा

मराठी अंक
दा. क्र. २४११८
जिल्हा ग्रंथालय
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

बंद करायला हवे. प्रकल्पाची प्रमुख जबाबदारी स्थानिक लोक घेऊ शकतात एवढेच यावरून दिसते. बाहेरच्या कार्यकर्त्याने पूर्णपणे निवृत्त होणे कितपत शक्य आणि योग्य आहे हे ठरविणे अवघड आहे. म्हैसाळमधील दलित कार्यकर्ते जोखमीची कामे स्वीकारण्यास आज तयार असले तरी देवलांनी पूर्णपणे अंग काढून घेतल्यास आपला निभाव लागेल, असे त्यांना वाटत नाही. "आम्ही र ट फ ची माणसे. आम्ही काबाडकष्ट करू. परंतु मोठ्या माणसाचे (बाहेरच्या) नेतृत्व हवेच. एक मुख्य खंब्या माणूस कायमचाच लागेल. तो नसेल तर आम्ही आपापसांतच भांडत बसू." या स्पष्ट शब्दांत अनेकांच्या मनातली भावना आबा पिरू यांनी बोलून दाखविली. मुख्य अडचण या लोकांना वाटते ती आपापसांतील मतभेदांची, गैरविश्वासाची, लोकशाहीच्या पद्धतीने संस्थेचे कामकाज चालविण्यास आवश्यक असणाऱ्या मानसिक वळणाच्या अभावाची. गटबाजी हा रोग झपाट्याने संस्थेला ग्रासतो आणि संस्था धुळीस मिळते. या रोगास आळा फक्त बाहेरचा कार्यकर्ता घालू शकतो असे दिसते.

हा एक भाग सोडला तर स्थानिक कार्यकर्ते प्रकल्पाची जबाबदारी पेलण्यास पुढे येऊ शकतात, एवढेच नव्हे तर इतरत्रही अशा प्रकल्पांच्या उभारणीस मदत करू शकतात, असे म्हैसाळ-प्रकल्पावरून दिसते. वेळोवेळी म्हैसाळमधील तरुण कार्यकर्ते आसपासच्या गावी भेट देऊन म्हैसाळ-धर्तीवर प्रकल्प उभे करण्यास लोकांना प्रवृत्त करीत आहेत. या प्रयत्नांना यश येत असल्याचे वर दिलेल्या उदाहरणांवरून दिसते.

म्हैसाळ-प्रकल्पाचा अभ्यास करताना, एका गावापुरते मर्यादित परिवर्तनाचे कार्य आणि दलितमुक्तीच्या व्यापक चळवळी व लढे यांचा एकमेकांशी संबंध काय, आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत या दोघांचे स्थान काय, हा विषय मनात आल्याशिवाय राहत नाही. यापूर्वी या विषयाचा ओझरता उल्लेख आला आहेच. जातिव्यवस्था नष्ट करून एकात्म समाज निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट गाठण्यास व्यापक लढे आणि विधायक प्रकल्प या दोहोंचीही गरज आहे. म्हैसाळ-प्रकल्पाचा पुरस्कार करताना, केवळ याच मार्गाने एकात्म समाजाचे उद्दिष्ट गाठता येईल, असा दावा करता येणार नाही. परंतु त्याचबरोबर, अशा प्रकल्पांखेरीज व्यापक लढ्यांना दिशा व पुष्टी मिळणार नाही, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. व्यापक चळवळी, आंदोलने आणि लढे यांनी प्रबोधनाचे आणि जागृतीचे कार्य होते. समाजात पुरोगामी विचार रुजू लागतात. परंतु त्याच्या जोडीला ठिकठिकाणी विधायक कार्याचे मोर्चे बांधले गेले नाहीत तर या पुरोगामी विचारांना मूर्त स्वरूप देऊन प्रत्यक्ष समाजरचनेत त्यांचा अंतर्भाव करता येत नाही.

समतेचा विचार केवळ प्रचार करून सामान्य जनतेपर्यंत पोहचविता येणार नाही; तो प्रत्यक्ष अंमलात आणून दाखवावयास हवा. विशेषतः ग्रामीण भागात विधायक कृतीने समतेचे तत्त्व प्रस्थापित करणे आवश्यक आहे. जातिव्यवस्थेतील विषमता हजारो वर्षांच्या संस्कारांमुळे खोलवर रुजली आहे. ती उखडून टाकण्यासाठी तितकाच प्रभावी संस्कार सतत मनावर व्हावयास हवा. प्रबोधन, विशिष्ट लढे व चळवळी यांनी जुनाट विचारांना धक्का देण्याचे काम होऊ शकते. परंतु सामान्य जनतेपर्यंत हा धक्का पोचत नाही असा अनुभव आहे. काही वेळा विपरीत

परिणाम होऊन जातीजातींतील अंतर वाढण्याचीही शक्यता असते. त्यामुळे दलितांची हलाखी वाढते. यासाठी अनेक ठिकाणी विधायक कार्याचे अड्डे तयार होऊन समतेची भावना टिकाऊ पायावर रुजविता आली, तर समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेस गती येण्याची शक्यता आहे.

व्यापक चळवळी आणि लढे यांना सातत्य नसते. याउलट, विधायक कार्यात सातत्य असते. 'एक गाव : एक पाणवठा' हे एक व्यापक चळवळीचे उदाहरण देता येईल. या चळवळीचे उद्दिष्ट ग्रामीण जनतेत जागृती निर्माण करून दलितांना समान हक्काने गावच्या विहिरीतून पाणी घेऊ देणे हे आहे. यात पाणी हे गौण आहे. समतेचे तत्त्व सवर्णांनी मानणे आणि दलितांनीही स्वाभिमानाने आपला समान हक्क राबविणे हे चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. दलितांना निराळी विहीर बांधून देऊन हा प्रश्न सोडवायचा नाही. त्यांच्या पाण्याची सोय करणे हा हेतू नाही. समतेचे उद्दिष्ट गाठण्याच्या वाटचालीतील ते एक प्राथमिक महत्त्वाचे पाऊल आहे.

पण ही चळवळ फार पुढे जाऊ शकली नाही. याचे एक कारण या चळवळीस पोषक असे विधायक व सातत्याने चालू राहणारे कार्य ठिकठिकाणी उभे करण्याकडे दुर्लक्ष झाले.

म्हणून केवळ चळवळी आणि लढे यांवरच भर दिला तर परिवर्तन आपोआप होऊ शकेल असे मानल्यास बरोबर ठरणार नाही. अशा चळवळींच्या बरोबरीने विधायक कार्याचे मोर्चे बांधणेही अगत्याचे आहे. चळवळी या लाटेसारख्या असतात. लाट आली तर ठिकठिकाणी पाणी अडविण्यासाठी तजवीज करावी लागते. तसे केले नाही तर पाणी येते आणि परत जाते. तद्वतच चळवळीचा परिणाम तात्पुरता राहू नये यासाठी ठिकठिकाणी विधायक कार्याची बांधबंदिस्ती हवी. विधायक प्रकल्प आधीपासूनच अस्तित्वात असते तर 'पाणवठ्या'सारख्या चळवळीमुळे त्यांना अधिक बळकटी आली असती आणि अधिक ठिकाणी विधायक प्रकल्प चालू करण्यास चालना मिळाली असती.

आपले अंतिम उद्दिष्ट एकात्म समाज निर्माण करणे हे आहे. हे उद्दिष्ट केवळ अधूनमधून आंदोलने आयोजित करून साध्य होणार नाही. तसेच एखाददुसऱ्या म्हैसाळसारख्या प्रकल्पानेही होणार नाही. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सातत्याने प्रबोधन, 'एक पाणवठ्या'सारख्या व्यापक चळवळी, आणि म्हैसाळसारख्या प्रकल्पांची जास्तीत जास्त ठिकाणी उभारणी या सर्व मार्गांचा अवलंब आवश्यक आहे. आज महाराष्ट्रात म्हैसाळसारखे प्रकल्प हजारो नव्हे पण निदान शेकडो गावी असते तर सामाजिक चित्र निराळे दिसले असते.

श्रीविठ्ठल सोसायटीचे चेअरमन यांच्याशी बातचीत करताना त्यांनी या दोनही मार्गांचे समालोचन केले. ते म्हणाले, "संघर्षात्मक लढ्याला महत्त्व आहे, व्यापक चळवळींना महत्त्व आहे. बाबा आढावांची 'एक गाव : एक पाणवठा' ही चळवळ प्रतीकात्मक आहे. त्याने तीस-चाळीस टक्के काम होऊ शकेल. पॅथरची धडक आकर्षक वाटते, पण त्याला विधायक कार्याची साथ नाही. विधायक कार्याची साथ असल्यासच या गोष्टी टिकू शकतात. जातिव्यवस्था गेली पाहिजे हे बरोबरच आहे. पण त्यासाठी सर्व पुरोगामी लोकांना एकत्र घेऊन झगडले पाहिजे. खेड्यांतील दलित जनतेला मजबूत पायावर उभे केल्याखेरीज या लढ्याला यश नाही. सवर्णांचे चुकले यात शंका नाही. परंतु त्या सर्वांना आजही शिव्याच देत बसायचे काय? डॉक्टर बाबासाहेबांचे

विचार मला बरोबर वाटतात. लोकांना जागे करायला हवे, पण कमीत कमी धोका पत्करून. म्हणून त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला..."

या विधानातील महत्त्वाच्या मुद्द्यावर एकमत होऊ शकेल. खेडोपाड्यांतील दलित लोकांना आर्थिक व्यवसायानिमित्त संघटित करावे, त्यात सर्व जातीजमातींच्या दुर्बल लोकांना समाविष्ट करून घ्यावे आणि एकात्म समाज निर्माण करण्यासाठी पुढचे पाऊल टाकावे. व्यापक चळवळी आणि लढे यांना म्हैसाळ-प्रकल्पासारख्या विधायक कार्याची साथ हवी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3000
ग्रं. क्र. 28486
संघ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024448

...."म्हैसाळचे जे चित्र देशपांडे यांनी या पुस्तकात रंगवले आहे, ते पुरेसे चिकित्सक आणि शिवाय एका संवेदनक्षमतेने रंगवलेले आहे"...."हे पुस्तक ही या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची — किंवा त्याच्या एका महत्त्वाच्या कालखंडाची बखर आहे. सच्च्या मनाने आणि सामाजिक तळमळीने अभ्यासपूर्वक ती लिहिली आहे." अशी प्रतिक्रिया साहित्यिक-विचारवंत विजय तेंडुलकर यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेत नोंदवली आहे.

या पुस्तकाचे लेखक डॉ० वसंत देशपांडे हे पुण्याच्या 'भारतीय शिक्षणसंस्थे'त अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत. 'ग्रामायन' या ग्रामीण विकासकार्य हाती घेतलेल्या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. सुशिक्षित दलितांविषयीच्या त्यांच्या 'नव्या जाणिवा' या संशोधन-प्रकल्पाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे. 'म्हैसाळ'-प्रकल्पाविषयीचे त्यांचे इंग्रजी पुस्तक यापूर्वी प्रसिद्ध झाले असून रोजगार-हमी व आदिवासींची वेठ-बिगार, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा विकासासाठी संघर्ष इत्यादी विषयांवरची त्यांची इंग्रजी पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत.

